सभापतीस्थानी माननीय सभापती

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशनला पुरविल्या जाणाऱ्या कोळसा खरेदीमध्ये मोठया प्रमाणात झालेला गैरव्यवहार

(१) * १९१८१ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. एस. क्यू. ज़मा , प्रा.सुरेश नवले , श्री.हुसेन दलवाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशनला पुरविल्या जाणाऱ्या कोळसा खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याने वीज उत्पादन कमी होत असून संबंधितांवर कार्यवाही करण्याबाबत दिनांक २१ जानेवारी, २०११ रोजी वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप याप्रकरणी चौकशी करण्यात आली नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) कोळसा खरेदीत, गैरव्यवहार झालेला नसल्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, मी चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशनबाबत अनेकदा प्रश्न विचारलेला आहे. चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशनला कशा प्रकारे खराब कोळसा पुरविला जातो यासंबंधी मी माननीय मंत्रीमहोदयांना पत्र लिहिलेले आहे. छापील प्रश्नाला "हे खरे नाही" आणि "प्रश्न उद्भवत नाही" अशा प्रकारे उत्तरे दिलेली आहेत. 2010मध्ये पप्पू सहानी या कोळसा वाहतूकदाराने खराब कोळसा आणलेला होता. इतकेच नाही तर कोळशाचे रिकामे ट्रक आणून कोळसा आणल्याची पावती तो घेऊन जात होता. या कोळसा वाहतूकदारावर कारवाई झालेली आहे हे खरे आहे काय ? ट्रान्स्पोर्टेशनद्वारे येणारा कोळसा खराब प्रतीचा येणार नाही याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे ?

श्री. राजेंद्र मुळक : दिनांक 18.7.2010 रोजी मे. सहानी ट्रान्स्पोर्टचा ट्रक क्रमांक 4857 हा रिकामा ट्रक भरत असताना पकडला गेला. या प्रकरणी विजय अल्याडकर, दीपक भिंद्रे या दोन कर्मचा-यांचा सहभाग असल्याचे सकृतदर्शनी दिसून आले. त्यांना पकडण्यात आलेले असून त्यांना 29.7.2010 पासून निलंबित करण्यात आलेले आहे. मे. सहानी ट्रान्स्पोर्टचे मालक यांच्या विरुध्द

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोळशाच्या अफरातफरीबाबत दुर्गापूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

श्री. अरुण गुजराथी : कोळसा पुरविण्याच्या बाबतीत गैरव्यवहार होत नाही असे उत्तर दिलेले आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी गैरव्यवहार कसा होतो याबाबतचे निवेदन दिलेले आहे. चांगल्या प्रतीचा कोळसा येत नाही, कोळशामध्ये मोठ्या प्रमाणावर दगड असतात. तेव्हा याबाबतीत विशेष चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री. राजेंद्र मुळक : चंद्रपूरमध्ये डब्ल्यूसीएल, आंध्र प्रदेश राज्याची साऊथ वेस्टर्न कोल्ड फिल्ड या कंपन्यामधून चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशनला कोळसा पुरविला जातो. याबाबतीत सहानी ट्रान्स्पोर्ट कंपनीवर कारवाई केली का असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. त्या प्रकारणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केलेला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

सभापती : 1 ट्रक सापडलेला आहे. त्या बाबतीत पोलीस केस झालेली आहे. मालकाविरुध्द देखील पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केलेली आहे. कोळशाच्या व्यवहारामध्ये फार मोठी गफलत होत असावी अशी सन्माननीय लोकप्रतिनिधींनी सातत्याने शंका उपस्थित केलेली आहे. या बाबतीत सखोल चौकशी करावी अशी सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी मागणी केलेली आहे. त्यानुषंगाने मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री. राजेंद्र मुळक : या संदर्भात निश्चितच सखोल चौकशी करु या. यामध्ये कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रयत्न होणार नाही. औष्णिक केन्द्रासाठी कोळशाची आवश्यकता आहे. कोळसा व्यवस्थित ट्रान्सपोर्ट होऊन यावयास पाहिजे. 15 दिवसापूर्वी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी डब्ल्यूसीएल आणि अन्य सर्व कंपन्यांच्या प्रतिनिधींना बोलावले होते. तसेच मागील महिन्यामध्ये केन्द्रीय ऊर्जा मंत्र्यांनी देशातील सर्व ऊर्जा मंत्रांची बैठक घेतली होती. मी देखील त्या बैठकीला गेलो होतो. कोळशाची वाहतूक वेळेवर होत नाही, रेल्वे वॅगन्स उपलब्ध होत नाहीत, अशा सर्व बाबींवर साधकबाधक चर्चा झाली. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्या बाबतीत सखोल चौकशी करुन कारवाई करु.

श्रीमती शोभा फडणवीस : गेल्या एक-दोन वर्षापासून चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशन वारंवार बंद पडत आहे. ट्रक वाहतुकीने येणारा कोळसा किती, रेल्वेने येणारा कोळसा किती, कोलवॉशरीजमधून येणारा कोळसा किती यासंबंधी विचारणा केली तर त्या बाबतीत काहीच माहिती

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिली जात नाही. सर्व कोळसा एकत्रितपणे ठेवला जातो असे सांगितले जाते. यामध्ये कर्मचारी आणि अधिका-यांपासून सर्वांची मिलिजुली भगत आहे. याची चौकशी झाली पाहिजे. गुप्ता कोल वॉशरीज, भाटीया कोल वॉशरीज यांच्याकडून 50 टक्के कमी कोळसा येतो. म्हणून या कोल वॉशरीजची देखील चौकशी करण्याची गरज आहे. ट्रक वाहतुकीने किती कोळसा येतो आणि रेल्वेने कचरा-कोळसा येतो याकडे अधिका-यांचे लक्ष नाही. प्रोजेक्ट सातत्याने बंद पडत आहेत. प्रोजेक्ट सातत्याने का बंद पडतात याचीही चौकशी होण्याची गरज आहे. गुप्ता कोल वॉशरीज आणि भाटीया कोल वॉशरीज यानी दोन-तीन महिने कमी कोळसा दिलेला आहे त्याची नोंद आहे की नाही, या बाबतीत चौकशी व्हायला पाहिजे. रेल्वेमधून येणा-या कोळशामध्ये माती आणि दगड असतात.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्रीमती शोभा फडणवीस : वाहतुकीने येणा-या कोळशाची नोंद ठेवली जाणार आहे काय, रल्वेने येणा-या कमी प्रतीच्या कोळशाबाबत चौकशी केली जाणार आहे काय आणि कोल वॉशरीज कडून येणा-या कोळशाबाबत चौकशी केली जाणार आहे काय ?

श्री. राजेंद्र मुळक : जेवढ्या कोल वॉशरीज राज्याला कोळशाचा पुरवठा करतात त्यांच्या बाबतीत मागील 15 दिवसापूर्वी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सर्व संबंधितांची बैठक घेऊन अत्यंत कडक निर्देश दिलेले आहेत. थर्मल पॉवर स्टेशन असो किंवा कोराडी थर्मल पॉवर स्टेशन असो की अन्य विद्युत केन्द्रे असोत, त्याबाबतीत माननीय उप मुख्यमंत्र्यांनी कडक निर्देश दिलेले आहेत. आपल्याकडे रेल्वेने येणारा कोळसा, वॉशरीजमधून येणारा कोळसा तपासला जातो. जेथून कोळसा येतो त्या कोळशाचे सेग्रेगेशन व्हायला पाहिजे. त्या बाबतीत नियमावली आहे. कोळसा पुरविण्याच्या बाबतीत करार केलेले असतात. कोणत्याही कराराचा भंग झाला तर दंडात्मक कारवाई केली जाते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे भविष्यामध्ये अशा काही गोष्टी घडल्या तर त्याबाबतीत कडक कारवाई करण्यात येईल. कोळशा शिवाय प्रोजेक्ट चालवू शकत नाही. प्रोजेक्टसाठी कोळसा अत्यंत उपयुक्त आहे. सद्य:परिस्थितीमध्ये पावसाळयात थोडासा ओला कोळसा येतो. वॉशरीज मधून कोळसा उपलब्ध करुन घेतला जातो आणि या पध्दतीने प्रोजेक्ट चालत असतात.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस.क्यू.जमा : सभापति महोदय, यह बहुत गंभीर प्रश्न है और इसका उत्तर भी लाइटली दिया गया है. उत्तर में बताया गया है कि "हे खरे आहे." इसका मतलब कम्पलेंट दिया है यह सही बात है. उसके बाद लिखा है कि ॲक्शन लेने का सवाल ही नहीं है. अभी माननीय राज्यमंत्री ने कहा है कि हम जांच करेंगे. मैं माननीय मंत्री जी को बताना चाहता हूं कि मैं उसी क्षेत्र में, 40 सालों से कोयला खदान में काम करता हूं. यह बहुत बड़ा रॅकेट है और इस रॅकेट को तोड़ना बहुत कठीन है. माननीय मंत्री जी से मेरे दो प्रश्न है. इसकी शिकायत जनप्रतिनिधियों ने माननीय मुख्यमंत्री जी को, उप मुख्यमंत्री महोदय को किया है. आप हमारे क्षेत्र के राज्यमंत्री भी है. जो कोयला आता है उसके कॉन्टीटी के बारे में, क्वॉलिटी के बारे में और ट्रान्सपोर्ट के बारे में बहुत बड़ा रॅकेट है. मैं इस बात को नजदीक से जानता हूं. मैं माननीय मंत्री जी से कहना चाहता हूं कि इस प्रकरण की गंभीर जांच होनी चाहिए. अभी विदर्भ के जितने भी पॉवर स्टेशन है, चंद्रपुर में सब से ज्यादा पॉवर स्टेशन है. जो कि अभी हमारा पॉवर हब बन गया है. वहां पर प्लॅंट लोड फॅक्टर बहुत कम है क्योंकि कोयले की क्वॉलिटी बहुत खराब है.

सभापति : सम्माननीय सदस्य ने प्रश्न पूछना चाहिए.

श्री एस.क्यू.जमा : सभापति महोदय, मेरा प्रश्न यह है कि इसके बारे में नॉर्मल जांच न करते हुए, गंभीरता से इसकी जांच की जानी चाहिए. आपने दो कर्मचारियों पर ॲक्शन लिया. यह जो रॅकेट है इसके बारे में शासन गंभीरता से जांच करेगी क्या ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि विदर्भ में हमारे जो पॉवर हाऊस है, उसके कोयले के आवंटन के बारे में उच्च स्तर पर, माननीय मुख्यमंत्री या माननीय उप मुख्यमंत्री के लेवल पर, आपकी उपस्थिति में एक मिटींग लेकर, जनप्रतिनिधियों को बुलाकर, इसके बारे में आप चर्चा करेंगे क्या ?

इसके बाद श्री खर्चे

अप्रधारित प्रश्न / अप्रश्नोत्तरी नोंद

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आताच सांगितले की, 15 दिवसांपूर्वीच माननीय मंत्री महोदयांनी एक बैठक घेतली होती. त्या बैठकीसाठी वेस्टर्न कोल फिल्ड, कोल वॉशरिज तसेच इतर गव्हर्नमेंट होल्डिंग कंपन्याना बोलावले होते. तेव्हा लोक प्रतिनिधींकडून येणाऱ्या तक्रारी लक्षात घेऊन चर्चा करण्यात आली तसेच प्रत्यक्ष प्लांटवर ज्या अडचणी असतील त्याचीही चर्चा करण्यात आली व अत्यंत कडक निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच यापुढे कोल वॉशरिजकडून ट्रान्सपोर्ट केल्या जाणाऱ्या कोळशाचे मोजमाप व्यवस्थित होणे, त्याची क्वॉलिटी मेंटेन करणे याबाबतचाही विचार झाला. त्यानंतर एजन्सीजला 15 टक्के कोल वॉशरिजसाठी देणे व केंद्रातील भारतीय मानक प्रणालीच्या आधारे त्याची गुणवत्ता निर्धारित करणे, कंत्राटदारांनी धुतलेला कोळसा गुणवत्तेपेक्षा कमी दर्जाचा, कमी श्रेणीचा आहे की कसे, यासंबंधीच्या अटी व शर्तींप्रमाणे त्यांना दंड आकारला जातो. तसेच हा धुतलेला कोळसा तपासण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्या संस्थेची नेमणूक केली आहे त्या इन्स्पेक्ट टोरेंट ग्रुप्स या कंपनीकडून या माध्यमातून या कोळशाची गुणवत्ता तपासली जाते. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अशा प्रकारच्या काही उणिवा असतील तर त्यांनाही विश्वासात घेऊन एक बैठक आयोजित करण्यात येईल व त्या बैठकीत त्यांच्या अडी-अडचणीसंबंधी स्पेसिफिक माहिती घेऊन आवश्यक ती कारवाई केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.जमा यांनी अत्यंत स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे. त्यांनी सांगितले की, अशा प्रकारचे निवेदन लोक प्रतिनिधींनी माननीय मुख्य मंत्र्यांना दिलेले आहे हे खरे आहे काय, चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र तसेच कोराडी पॉवर स्टेशन्स या तिन्ही प्रकल्पांसाठी जो कोळसा पुरविला जातो तो भेसळयुक्त असतो. मंत्री महोदयांनी वॉशरिज कंपन्यांबाबत सभागृहात सांगितले आहे पण अशा किती वॉशरिज कंपन्यांना दंड आकारलेला आहे, कारण अशा प्रकारची कोणतीही यंत्रणा या तिन्ही पॉवर स्टेशन्समध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे कोळसा पुरवठादार आणि तेथील अधिकारी यांचे संगनमत होऊन करोडो रुपयाचा अपहार होतो. त्याची उच्चस्तरीय चौकशी शासन करणार आहे काय, तसेच मंत्री महोदयांनी स्पष्ट केल्याप्रमाणे आतापर्यंत किती कंपन्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, अशा प्रकारची बैठक 15 दिवसांपूर्वीच झाल्याचे मी आताच सांगितले आहे. तरी देखील सन्माननीय सदस्यांना विश्वासात घेऊन पुन्हा बैठक घेण्यात येईल व त्या बैठकीत त्यांच्या स्पेसिफिक काही तक्रारी असतील तर त्यावर चर्चा करण्यात येईल. आवश्यकता भासल्यास उच्चस्तरीय चौकशी सुध्दा करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी शुध्द मराठीतून वाहतुकदार वगैरे शब्द वापरले पण मंत्री महोदय मात्र ट्रान्सपोर्टर अशाच प्रकारचा उल्लेख करीत आहेत. या प्रश्नावर आतापर्यंत 15 मिनिटे वेळ गेला आहे. एल अँड टी कंपनीत चुकीचा माल येणे, महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीत चुकीचा व अयोग्य माल पुरविणे किंवा टाटा कंपनीला अयोग्य मालाचा पुरवठा होणे या बाबींशी शासनाचा काही संबंध नाही. या सर्व खाजगी कंपन्या असून तेथे आपलेच सचिव एम.डी. म्हणून आहेत. विजेच्या संदर्भात शासनाचा रोल फक्त धोरणात्मक भूमिकेपुरता आहे. तसेच या कंपन्यांच्या एम.डी. नी तक्रार दिली तरी शासन यामध्ये कोणतीही भूमिका बजावू शकत नाहीत. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, जी बाब आपल्या अखत्यारित येत नाही त्याचे उत्तर शासनाने देऊ नये, त्यातून काहीच निष्पन्न होणार नाही. या कोळशाच्या वाहतुकीसंबंधी शासनाने जी भूमिका विशद केली ती बरोबर आहे. त्यानुसार वीज निर्मिती केंद्रावर कोळसा लवकरात लवकर पोहचणे ही भूमिका योग्य आहे. त्याच अनुषंगाने माननीय श्री. नितीन गडकरी हे सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना त्यांनी अशी भूमिका मांडली होती की, परळी औष्णिक वीज केंद्राकडे येणारा कोळसा 300 किलोमीटर फिरुन येतो, त्यामुळे तो कोळसा 22 दिवस उशिरा तर येतोच पण त्याची किंमत सुध्दा वाढते. म्हणून घुग्गुस ते नाकोडा हा रेल्वेमार्ग बांधकाम विभागाच्या खर्चाने तयार केला तर त्याला 22 कोटी एवढाच खर्च येईल. त्यामुळे भविष्याचा प्रश्न सुटू शकेल, कोळशाची वाहतूक लवकर होईल व जनतेला कमी किमतीत वीज पुरवठा करता येईल, या विषयावर शासन विचार करणार आहे काय ?

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत चांगली सूचना केलेली आहे. या नवीन रेल्वे मार्गाने जर अशा प्रकारे अंतर कमी होऊन कमी दिवसात व कमी किमतीत कोळसा मिळणार असेल तर त्याची व्यावहारिकता तपासून निर्णय घेतला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र पाटील : महोदय, मंत्री महोदयांनी आताच उत्तर देताना सांगितले की, साहनी ट्रान्सपोर्टवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पण माझ्या माहितीप्रमाणे सध्या या कंपनीच्या माध्यमातून तेथे कोळसा वाहतुकीचे काम चालू आहे, हे खरे आहे काय, तसेच चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशनची स्थापित क्षमता किती आहे, या पॉवर स्टेशनसाठी एकूण किती मिलियन कोळशाची गरज लागते ? समजा 500 मेगावॅट विजेची निर्मिती करावयाची असेल तर त्यासाठी 2 मिलियन कोळशाची गरज लागते. पण आवश्यकतेपेक्षा जास्त कोळसा चंद्रपूर पॉवर स्टेशनसाठी लागला ही गोष्ट खरी आहे काय, असल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करणार आहे ?

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, पी.एस.साहनी या कोळसा वाहतूक कंपनीला आपण काळ्या यादीत टाकले आहे. त्यानंतर त्या कंपनीने न्यायालयात दाद मागितली असल्याने सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशनची एकूण स्थापित क्षमता 2340 मेगावॅट एवढी असून या पॉवर स्टेशनला कोळसा पुरविणाऱ्या डब्ल्यूसीएल, एमईसीएल, एमसीसीएल या कंपन्यांमार्फत कोळशाचा पुरवठा केला जातो. तसेच या पॉवर स्टेशनसाठी जवळपास 12800 दलघमी इतका कोळसा आवश्यक असतो.....

सभापती : मंत्री महोदयांनी विस्ताराने माहिती देण्याऐवजी ती पटलावर ठेवावी.

श्री. राजेंद्र मुळक : ठीक आहे, महोदय, ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. तरी देखील सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, वीज उत्पादनासाठी जेवढा कोळसा लागतो तितका कोळसा वारंवार उपलब्ध होत असतो व त्यातूनच आपण वीज निर्मिती करतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अप्रधारित पत्र / प्रतिक्षिप्ती नाही

गोंदिया जिल्ह्यातील आरोग्य विभागात परिचारिकांच्या नेमणुकी करताना झालेला गैरव्यवहार

(२) * १८३८९ श्री.केशवराव मानकर , श्री.पांडुरंग फुंडकर , श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.चंद्रकांत पाटील : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात दोन वर्षापासून आरोग्य विभागात कार्यरत असणाऱ्या १० ते १५ परिचारिकांना कामावरुन कमी करुन त्यांच्या जागी दुसऱ्या परिचारिकांची नेमणूक करुन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आला असल्याचे माहे मे, २०११ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित प्रकरणाची जिल्हा प्रशासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, संबधित जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुरेश शेट्टी : (१) हे खरे नाही.

२), ३) व ४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, गोंदिया तसेच नक्षलवादी भागातील आरोग्याच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. गोंदिया जिल्हयात सेवेत असलेल्या 27 परिचारिका प्रशिक्षित होत्या. या परिचारिकांची नियुक्ती दिनांक 09/05/2008 ते 08/03/2010 या दोन वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात आली होती. या परिचारिकानी त्यांचा परिविक्षा काळ पूर्ण केलेला होता. यासंदर्भात शासनाचा जीआर दिनांक 2 मे, 2009 रोजीचा आहे. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनास विनंती करतो आहे की, अति दुर्गम भागतील परिचारिकांचा हा प्रश्न असून या परिचारिका प्रशिक्षित असून त्यांच्यावर अन्याय झाल्यामुळे त्या दाद मागण्यासाठी कोर्टात गेलेल्या आहेत. या परिचारिकांच्या दोन वर्षाच्या सेवा काळात त्यांच्या बाबतीत कुठल्याही प्रकारची तक्रार नव्हती. या परिचारिकांच्या संदर्भात माझा प्रश्न नसून शासनाला विनंती आहे. आदिवासी तसेच नक्षलग्रस्त भागात काम करण्यास परिचारिका मिळत नाहीत अशी वस्तुस्थिती आहे. या प्रश्नाचे उत्तर अंशत: बरोबर असले तरी ते समाधानकारक नाही एवढे या निमित्ताने मला सांगावयाचे आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, दिनांक 2 मे, 2009 रोजीचा शासन निर्णय असून या परिचारिकांची नियुक्ती दिनांक 05/02/2008 या वर्षातील असल्यामुळे संबंधित परिचारकांना हा शासन निर्णय लागू होत नाही त्यामुळे या 13 परिचारिकांना खास बाब म्हणून सेवेत सामावून घ्यावे अशी मी आपणास विनंती करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: १८३८९.....

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्र शासन 26 नर्सिंग स्कूल चालवत आहे. या नर्सिंग स्कूलमध्ये 1040 नर्सेसंना स्कॉलरशिप दिली जात असते. नर्सिंगचा दीड वर्षाचा कोर्स झाल्यानंतर या नर्सेसंना दोन वर्षे बॉंडवर ग्रामीण रुग्णालय, सब सेंटर्स मध्ये काम करावे लागत असते. त्यांनतर या नर्सेसंना खास करुन प्राथमिक आरोग्य केंद्रात पोस्टींग दिली जात असते. दोन वर्षाचा बॉंड पूर्ण केल्यानंतर त्यांची जिल्हा निवड समिती कडून रिटर्न व ओरल टेस्ट घेतली जात असते. या टेस्टमध्ये जे उमेदवार 45 टक्के मार्काने पास होतात त्यांनाच शासकीय सेवेत घेतले जाते. सन्माननीय सदस्यांनी गोंदिया जिल्हयातील नर्सेसचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या ठिकाणी 27 उमेदवारांपैकी 14 उमेदवारांना पर्मनन्ट केलेले आहे. ज्या उमेदवारांना 45 टक्क्यापेक्षा कमी मार्क्स मिळाल्यामुळे त्यांना सेवेत घेण्यात आले नाही व त्यामुळेच हे उमेदवार कोर्टात गेले होते. या विषयाच्या संदर्भात नागपूर हायकोर्टाने आदेश दिला आहे की, "14 उमेदवार सोडून बाकीची प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी." हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे आपण बाकीची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे.

सभापती महोदय, जे उमेदवार कोर्टात गेले होते त्यांना 45 टक्क्यापेक्षा कमी मार्क्स मिळाल्यामुळे त्यांना शासकीय सेवेत घेतले गेले नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या प्रश्नाच्या संदर्भात त्यांची अडचण सांगितली असून ती देखील रास्त आहे. माझा प्रश्न असा आहे की, गोंदिया जिल्हयात परिचारिकांची सर्व पदे भरण्यात आलेली आहेत काय ? ज्या ठिकाणी परिचारिकांची पदे रिक्त आहेत अशा रिक्त जागेवंर आपण या परिचारिकांची नेमणूक करु शकतो. त्यामुळे संबंधित परिचारिकांची रिक्त ठिकाणी कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने नेमणूक करता येऊ शकेल काय ? नियमा प्रमाणे आपल्याला अशा प्रकारची नेमणूक करता येऊ शकते काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, संपूर्ण गोंदिया जिल्हयात एकंदर 274 पदांपैकी 255 पदे भरण्यात आलेली असून 19 पदे रिक्त आहेत. एनआरएचएमध्ये काम करण्यासाठी 235 एएनएम यांना कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने घेतलेले आहे. गोंदिया जिल्हयात केवळ 19 पदेच रिक्त आहेत. या 14 परिचारिकांना एनआरएचएम मध्ये कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने कशा प्रकारे घेता येईल ते बघतो. कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने 14 नर्सेसंना घेण्यास माझी तरी काही अडचण नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील अनधिकृत ऑनलाईन लॉटरी विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत

(३) * १९३५० श्री.जगदीश गुप्ता , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.केशवराव मानकर , श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनधिकृत ऑनलाईन लॉटऱ्यांची विक्री होत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०११ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनधिकृत लॉटऱ्यांमुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवून ग्राहकांची फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अनधिकृत लॉटरी विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेंद्र मुळक,श्री.अजित पवार यांच्या करिता : (१) माहे फेब्रुवारी, २०११ मध्ये अनधिकृत ऑनलाईन लॉटऱ्यांच्या विक्रीबाबत कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

(२),(३) आणि (४) अनधिकृत लॉटरी विक्रत्यांवर कारवाई करणे शक्य व्हावे म्हणून वित्त विभागाकडून दिनांक २३ डिसेंबर, २०१० पासून दर आठवडयात लॉटरी कर भरणाऱ्या अधिकृत लॉटऱ्यांची यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, फेब्रुवारी, २०११ दरम्यान ऑनलाईन लॉटरीची विक्री होत होती. असे असतांनाही ही बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही. आपल्या राज्यात अनाधिकृत ऑनलाईन लॉटरी सुरु आहे काय, ऑनलाईन लॉट-यांचे रोज किती ड्रॉ काढले जातात, एका ऑनलाईन लॉटरीच्या ड्रॉ वर शासन किती कर आकारते, तसेच एक आठडयात ऑनलाईन लॉटरीमुळे शासनाकडे किती महसूल जमा होत असतो ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, दर आठवडयाला महाराष्ट्र राज्याकडून ४ लक्ष रुपये, गोवा राज्याकडून ८४ लक्ष रुपये, सिक्कीम राज्याकडून ३१.५० लक्ष रुपये, रॉयल स्टेट ऑफ भूतानकडून ३.५ लक्ष रुपये असे सर्व मिळून आपल्या राज्याला १.२३ कोटी रुपये कराच्या रुपाने महाराष्ट्र शासनास महसूल मिळत असतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, २३ डिसेंबर २०१० पासून दर आठवडयाला अधिकृत लॉटरीचा कर भरणा-यांची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे काय? जे अनाधिकृतपणे ऑनलाईन लॉटरी चालवतात त्यांच्याकडून आतापर्यंत किती कर गोळा केलेला आहे ? अनाधिकृत ऑनलाईन लॉटरी चालविणा-या कंपन्यांची नावे काय आहेत?

...४..

अधिकृत मत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.: १९३५० .....

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, अनाधिकृत लॉटरी चालवू नये तसेच अशा अनाधिकृत लॉटरींवर कारवाई व्हावी म्हणून दिनांक २३.१२.२०१० पासून दर आठवडयाला अधिकृत लॉटरी दर्शविणारे परिपत्रक निर्गमित केले जाते तसेच याची एक प्रत शासनाच्या वेबसाईटवर सुध्दा ठेवली जात असते तसेच या संदर्भात वेळोवेळी प्रसिध्दी माध्यमांद्वारे प्रसिध्दीही दिली जात असते.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्य शासनाने आता पर्यंत किती अनाधिकृत ऑनलाईन लॉटरी कंपन्यावर कारवाई केलेली आहे तसेच आतापर्यंत त्यांच्याकडून किती दंड वसूल केलेला आहे?

सभापती : अनाधिकृत ऑनलाईन लॉटरी कंपन्यांवर शासनाने ॲक्शन घेतलेली आहे काय असा सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी प्रश्न विचारलेला आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, अशा प्रकारचा घटनाक्रम आपल्या समोर आलेला नाही. अशा घटना आढळून आल्या तर निश्चितपणे कारवाई केली जाईल. आपल्या राज्यात २००८ ते २००९ या कालावधीत ऑनलाईन लॉटरी सिस्टीम सुरु होती परंतु नंतर ही सिस्टीम बंद करण्यात आलेली आहे. तसेच वेळोवेळी जे घटनाक्रम समोर आलेले आहेत त्यांच्यावर शासनाने कारवाई केलेलीच आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अनाधिकृत ऑनलाईन लॉटरी निदर्शनास आलेली नाही असे सांगितलेले आहे. आपल्या राज्यात राजश्री व गोल्डन या अनाधिकृत ऑनलाईन लॉटरीज सुरु आहेत. या कपंन्या दररोज ३० ते ४० ड्रॉ काढत असतात अशी आमच्याकडे माहिती आहे. अनाधिकृत लॉटरीच्या संदर्भात आम्हाला माहिती मिळते परंतु शासनाला माहिती मिळत नाही हे कसे शक्य आहे ? आपल्या राज्यात अनेक अनाधिकृत ऑनलाईन लॉटरीज सुरु असल्यामुळे महाराष्ट्र राज्याचा कोटयावधी रुपयांचा महसूल बुडवला जात आहे. या ऑनलाईन लॉटरी कंपन्यांना राजरोस अभय दिले जात आहे. या कंपन्यांवर कुठल्याही प्रकारची दंडात्मक कारवाई केली जात नाही. या कंपन्या वर पर्यंत हप्ते देत असतात त्यामुळे या ऑनलाईन लॉटरी कंपन्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. त्यामुळे यांसदर्भात शासन काय कारवाई करणार आहे ?

..५..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: १९३५० .....

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, चुकीच्या पध्दतीने जे लॉटरी चालवतात त्यांच्यावर आपण कडक कारवाई केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक माहिती दिली तर संबंधित लॉटरी चालकांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

सभापती : अनाधिकृत लॉटरीच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अनाधिकृत ऑनलाईन लॉटरी कंपन्यांची जी दोन नावे सांगितलेली आहेत त्या दोन कंपन्यांचीही चौकशी करण्यात यावी. अनाधिकृत लॉटरी चालविली जाते असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे त्या मुळे अनाधिकृत लॉटरीच्या संदर्भात आपण दक्ष रहावे व योग्य ती कारवाई करावी.

यानंतर श्री. भारवि...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, स्पेसिफिक नावे दिली तर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सावडाव दिरंबाई (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) ओहोळावर लघुपाटबंधारे धरण बांधण्याबाबत

(4) * 18186 श्री.विजय सावंत , श्री.हुसेन दलवाई : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सावडाव दिरंबाई (ता.कणकवली,जि.सिंधुदुर्ग) ओहोळावर धरणाचे बांधकाम झाल्यास सुमारे 248 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू लघुपाटबंधारे धरण बांधण्याचे संदर्भातील प्रस्तावाची क्षेत्रीय स्तरावरील तपासणी पूर्ण झाली आहे काय,

(3) असल्यास, तपासणी निष्कर्ष काय आहेत,

(4) त्यानुसार यासंदर्भातील पुढील कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

##**श्री.सुनील तटकरे** : (1) होय.

(2) होय.

(3) या योजनेअंतर्गत एक मुख्य धरण व दोन खळग्यातील धरणे असून त्याद्वारे 3.774 द.ल.घ.मी. पाणीसाठा होणार असून अंदाजे 248 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

(4) प्रस्तावाची छाननी प्रगती पथावर आहे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकणवली येथील लघुपाटंबंधारे धरण बांधण्या बाबतचा प्रश्न आहे. त्याला शासनाने "होय" असे लेखी उत्तर दिलेले आहे. विभाग असे देखील म्हणत आहे की, तपासणी पूर्ण झालेली आहे. तसेच लेखी उत्तर दिलेले आहे की, प्रस्तावाची छाननी प्रगती पथावर आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, या प्रकल्पासाठी किती निधीची उपलब्धता झालेली आहे, किती निधीची तरतूद करण्यात आली आहे व तो निधी कधी मिळणार आहे तसेच, सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी या विभागाने सदर कामासाठी किती रूपयांची तरतूद केलेली आहे ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या प्रस्तावित योजनेची मागणी ग्रामपंचायत सावडाव यांनी सन 2007 मध्ये केली. गेल्या 2-3 वर्षाच्या कालावधीमध्ये या योजनेचे सर्वेक्षण झाले. या धरणाची लांबी 428 मीटर एवढी आहे. धरणाचे काम पूर्ण झाले तर 248 हेक्टर जमीन सिंचना खाली येऊ शकते. याची अंदाजपत्रकीय रक्कम 21 कोटी 40 लाख एवढी आहे. प्रशासकीय मान्यतेसाठी सदर कामाचा प्रस्ताव विभागाकडे सादर झालेला आहे. त्यात काही त्रुटी आहेत. त्याची पूर्तता केल्यानंतर लवकरात लवकर प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रयत्न केला जाईल.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, माझ्या माहिती प्रमाणे सावडाव धरण हे स्तानिक स्तर मधील आहे. या धरणाच्या कामाला सन 2002 मध्ये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे आज या धरणाच्या कामाची परिस्थिती काय आहे, सदर धरणाचे काम प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर कधी पूर्ण करण्यात येईल, सदर काम पूर्ण करण्यासाठी शासनाची निश्चित भूमिका काय आहे ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सदर प्रस्ताव आमच्या विभागाकडे आहे. त्यास मान्यता देण्यासंबंधीची प्रक्रिया सुरू आहे. मी येथे सांगू इच्छितो की, प्रशासकीय मान्यता लवकरात लवकर दिली जाईल. तसेच हे काम पावसाळ्या नंतर हाती घेण्याची तजवीज घेण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, एकूण धरणाखाली येत असलेले क्षेत्र व राज्यामध्ये होत असलेले धरणांचे मोठे प्रकल्प, त्याच बरोबरीने लघुपाटबंधाऱ्यांच्या धरणांचे नियोजन यासाठी निधीची आवश्यकता काही प्रमाणात अतिशय मर्यादित असते. निधीची उपलब्धता योग्य झाली तर अशा छोट्या लघुपाटबंधाऱ्यातून अनेक भागांमध्ये सदर कामे करता येतील. माझ्याकडे एक माहिती आहे. धुळ्यामधील अशाच एका धरणाची कागदोपत्री असलेली नोंदच निघून गेलेली आहे. साधारण: 200 ते 300 हेक्टर क्षेत्र सिंचना खाली यावे,अशा या ज्या छोट्या छोट्या योजना आहेत, त्या अधिक गतीने पूर्ण करण्यासाठी शासन काही विशेष प्रयत्न करणार आहे काय आणि सर्वच जिल्ह्यांचे हे प्रश्न या मार्गाने सोडविण्यासंबंधी शासन विचार करेल काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी जो प्रश्न विचारला आहे, तो वस्तुस्थितीवर आधारित आहे. राज्यामध्ये मध्यम व मोठे प्रकल्प उभारावयाचे झाले, नव्याने किंवा सुरू असलेल्या कामांची प्रगती पाहिली तर असे दिसून येईल की, भूसंपादनाची प्रक्रिया हा क्लिष्ट भाग झालेला आहे. त्यामध्ये त्यांना द्यावयाचे दर, जमीन संपादित करण्यासाठी, कामे मर्यादित वेळेत पूर्ण करण्यासाठी करावयाचे नियोजन यामध्ये निश्चितपणे अनेक वेळा अडचणी येतात. त्यांनी सांगितले ते खरे आहे की, किमान 500 हेक्टर पर्यंतचे छोटे बंधारे आपण नियोजनात घेतले तर एका विशिष्ट वेळेमध्ये काम पूर्ण होईल. जमिनीची उपलब्धता मग ती या कामासाठी असो किंवा बुडित क्षेत्रासाठी असो, ती इतर मोठ्या प्रकल्पाच्या तुलनेने कमी लागते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

त्यामुळे त्या दृष्टीने आम्ही नियोजन करीत आहोत. माननीय राज्यपाल महोदयांनी आता 250 हेक्टर पर्यंतची सिंचनाची कामे करण्यासंबंधी परवानगी दिलेली आहे. त्याला आपले इतर काही नियम लागू नाहीत. आम्ही माननीय राज्यपाल महोदयांकडे एक प्रस्ताव पाठवित आहोत. आम्ही हाही विचार करीत आहोत की, किमान 500 हेक्टर पर्यंतची कामे करण्यासंबंधीची परवानगी माननीय राज्यपाल महोदयांकडून मिळाली तर राज्याला ते फायद्याचे ठरेल. याला कारण आज राज्यामध्ये अशा प्रकारच्या साईटस फार मोठया प्रमाणावर उपलब्ध आहेत. त्यादृष्टीने निधी उपलब्ध करून देण्यात येईल. भविष्यातील कालावधी विचारात घेऊन अधिक निधीचे नियोजन करीत असताना या कामाला प्राधान्य देण्याचा निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी कोकणाचा विकास करण्यासाठी व काम करण्यासाठी जो काही झपाटा लावला आहे, त्या बद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या प्रकल्पामुळे 620 एकर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. कोकणातील शेतकऱ्यांकडे अल्प जमीन आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांचा फायदा होण्यासाठी हा प्रकल्प किती कालावधीमध्ये पूर्ण करण्यात येणार आहे व माननीय मंत्री हे त्याच भागातील असल्यामुळे त्यांनी संपूर्ण कोकणासाठी कृती योजना तयार केली आहे काय ?

सुनील तटकरे : सभापती महोदय,मराठवाड्यातील आमच्या सन्माननीय सदस्यांनी कोकणातील प्रश्न विचारल्या बद्दल मी त्यांचे आभार मानतो. मी मघाशी उत्तर देत असताना सन्माननीय सदस्य सभागृहाच्या बाहेर असावेत त्यामुळे त्यांना कल्पना नसेल. पावसाळा संपल्यानंतर हे काम हाती घेण्यात येईल एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

.....

अप्रधारित प्रश्न / प्रश्नोत्तरासाठी नाही

दिपनगर (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील विस्तारित वीज प्रकल्पात झालेल्या दुर्घटना व नुकसानीबाबत

(५) * १७९२५ प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिपनगर (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील विस्तारित वीज प्रकल्पात वर्षभरात झालेल्या ३ दुर्घटनांमध्ये १० मजुरांचा बळी व कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच येथील विस्तारित वीज प्रकल्पास दिनांक २७ मे, २०११ रोजी रात्री कोळसा वाहून नेणाऱ्या रबरी पट्टयाला (कन्व्हेअर बेल्ट) लागलेल्या आगीत रुपये ४.५० कोटीचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय, तसेच दिनांक २६ एप्रिल, २०११ रोजी कुलींग टॉवर मधील पी.व्ही.सी.फीलला लागलेल्या आगीमुळे ४० लाखाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीतील अहवालात दुर्घटनेचे कारण काय आहे व यास जबाबदार व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेंद्र मुळक,श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) व (२) हे खरे आहे.

(३) कुलींग टॉवरमधील आगीची सुरुवात त्या भागात लायटींग, ड्रिलिंग, वेल्डिंग मशीनसाठी तात्पुरत्या वीज पुरवठयासाठी केबल टाकल्या होत्या या केबलमधील शॉर्टशर्किटमुळे पीव्हीसी फिलला आग लागली, तसेच कन्व्हेअर बेल्ट १०८ अ चे काम चालू असतांना वेल्डिंग व कटिंगचे गरम तुकडे पडल्यामुळे आग लागली. वरील सर्व जबाबदारी ही पूर्णपणे कंत्राटदार कंपनीची आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील प्रमाणे सुधारणा करावयाची आहे.

पहिल्या प्रश्नाच्या उत्तरासंबंधी सन 2008 मध्ये 1, सन 2009 मध्ये 4, सन 2010 मध्ये 4 अशा एकूण 9 कामगारांचा विविध अपघातांमध्ये मृत्यू झालेला आहे हे खरे आहे असे वाचावे.

दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरासंबंधी महानिर्मितीचे कोणतेही नुकसान झाले नसून मे.टाटा प्रोजेक्टस लि,कंत्राटदार यांचे नुकसान झालेले आहे असे वाचावे.

प्रा.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, दीपनगर, ता.भुसावळ, जि.जळगाव येथील विस्तारित वीज प्रकल्पात झालेल्या दुर्घटना व नुकसानीबाबतचा हा प्रश्न आहे. यात 10 मजुरांचा बळी गेलेला असून कोट्यवधी रूपयांचे नुकसान झालेले आहे. उत्तरात याची सर्व जबाबदारी ही कंत्राटदाराची आहे असे म्हटलेले आहे. शॉर्टसर्किटमुळे पीव्हीसी फीलला आग लागली. त्यामुळे

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.दिलीपराव सोनावणे.....

नुकसान झाले असून सदर नुकसान भरपाई सबंधितांकडून वसूल करण्यात आली आहे काय, असल्यास, किती वसूल करण्यात आली आहे ? तसेच, कन्हेअर बेल्ट 108 चे वेल्डींग व कटींगचे तुकडे पडल्याने आग लागली हे कारण होऊ शकत नाही. मग महाजनकोच्या अधिकाऱ्यांच्या हे लक्षात आले नव्हते काय, तसेच नुकसान भरपाई संबंधितांकडून वसूल करण्यात आली आहे काय, असल्यास किती व त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, प्रत्येकी 500 मे.वॅ.क्षमतचे संच क्र.4 व 5 उभारण्याचे काम सन जानेवारी 2007 मध्ये सुरू झाले. त्यानुसार बॉयलर, स्टीम, टर्बाईन व जनरेटर यांची कामे भेल कंपनीला देण्यात आली. बॅलन्स ऑफ प्लांटचे काम हैद्राबाद येथील मे.टाटा प्रोजेक्टस लि.यांना देण्यात आले. सन 2008 मध्ये 1, सन 2009 मध्ये 4, सन 2010 मध्ये 4 अशा एकूण 9 कामगारांचा आता पर्यंत झालेल्या अपघातांमध्ये दुर्दैवी मृत्यू झालेला आहे. आपण या कंपनी बरोबर ॲग्रीमेंट केलेले आहे. जे काही अपघात होतील, नुकसान होईल त्याची नुकसान भरपाई देण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावरच राहील अशा प्रकारचे ॲग्रीमेंट आपण कंपनी बरोबर केलेले आहे. येथे दोन घटनाक्रम घडले आहेत. त्यामध्ये कामगारांचा मृत्यू झालेला आहे. वर्क्समन कॉम्पेनसेशन ॲक्टच्या माध्यमातून आपण त्या नऊही कामगारांना कंपनीच्या माध्यमातून त्यांचे वय पाहून पगार, भत्ता इत्यादी नुकसान भरपाई दिलेली आहे. श्री.बृजभूषण निराला याला 2 लख 94 हजार, श्री.अमोद राय याला 3 लक्ष 86 हजार, श्री.जसपाल सिंग याला 3 लक्ष 57 हजार अशा प्रकारची नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. या प्रमाणेच अन्य मृत्य व्यक्तिाना वर्क्समन कॉम्पेन्सेशन ॲक्टनुसार नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, काही झाले तरी ती जबाबदारी कंत्राटदाराची राहील अशा प्रकारचा करार होता असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. एखाद्याचा जीव गेला तर ती जबाबदारी कंत्राटदाराची असा अर्थ होत नाही. हा सरकारी प्रकल्प आहे. या प्रकल्पामध्ये तीन वर्षाच्या कालावधीमध्ये 9 कामगारांचा मृत्यू झालेला आहे. त्यामुळे अशा प्रकारचे अपघात भविष्यात होऊ नये म्हणून शासनाने त्या कंत्राटदाराला सक्त सूचना दिल्या आहेत काय ?

यानंतर श्री.सरफरे....

दुसरा प्रश्न असा की, शासनाच्या प्रचलित नियमानुसार किंवा धोरणानुसार मृत्यू पावलेल्या कामगारांना 1 लाख रुपयांची मदत दिली जाते, त्याप्रमाणे शासन मदत करील आहे हे आम्हाला मान्य आहे, तो कामगारांचा हक्क आहे. हा सरकारी प्रकल्प असल्यामुळे त्या ठिकाणी दुर्दैवाने एखाद्या कामगाराचा मृत्यू झाल्यानंतर या कायद्यातील तरतुदीनुसार नुकसान भरपाई देण्याची सुध्दा शासनाची तितकीच जबाबदारी आहे. त्या मुळे शासनाच्या प्रचलित धोरणानुसार त्या कामगारांच्या वारसांना 1 लाख रुपयांची नुकसान भरपाई देणार काय? त्याचबरोबर त्या ठिकाणी चार वेळा अपघात घडलेला असल्यामुळे पुन्हा अपघात होऊ नये या साठी आपण कोणती कारवाई केली आहे?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या दोन्ही कंपन्यांना कंत्राट देत असतांना शासनाने अनेक अटी व शर्ती टाकलेल्या आहेत. त्या ठिकाणी घडलेल्या दुर्घटनेमध्ये मृत्यू पावलेले कामगार हे त्या कंपनीच्या मस्टर रोलवर होते, ते त्या कंपनीचे कर्मचारी होते. माननीय सदस्यांनी त्या कामगारांच्या वारसांना मदत करण्यात येईल काय असा प्रश्न विचारला आहे. त्या संदर्भात शासनातर्फे तपास करण्यात येऊन शासनाच्या प्रचलित नियमानुसार कंत्राटदाराकडील कामगारांचा मृत्यू झाल्यानंतर वर्क्समेन कॉम्पेन्सेशन ॲक्टमधील तरतुदीनुसार त्यांना नुकसान भरपाई दिल्यानंतर सुध्दा सरकार मदत करु शकत असेल तर ती बाब तपासून त्या प्रमाणे योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, यापूर्वी देखील या सभागृहामध्ये अशाप्रकारे कामगारांना भरपाई दिली गेली आहे. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की. विशेष बाब म्हणून आपण या कामगारांच्या वारसांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार मदत करणार काय?

श्री. राजेंद्र मुळक : या संदर्भात व्यावहारीकदृष्टया शक्याशक्यता असेल तर ती बाब तपासून घेऊन त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, त्या ठिकाणी दरवर्षी अपघात होत असतात. मागील तीन वर्षात नऊ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झालेला आहे. यामध्ये नुकसान भरपाई किती देणार व शासनाकडून त्या कामगारांना किती नुकसान भरपाई देणार या प्रश्नाबरोबरच हे अपघात थांबविण्यासाठी मॅनेजमेंटच्या माध्यमातून कोणती उपाय योजना करण्यात येत आहे, त्या बाबतीत शासन लक्ष घालणार आहे काय? या ठिकाणी लागलेल्या आगीमध्ये साडे चार कोटींचे नुकसान

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झाल्याचे म्हटले आहे. यामध्ये कंत्राटदाराने किती रुपये दिले, आणि वर्क्समॅन कॉम्पेसेशन ॲक्टनुसार नुकसान भरपाईचे पैसे आले आहेत काय? दुसरा प्रश्न असा की, हा प्लँट किती दिवस बंद राहिला. तिसरा प्रश्न असा की, 27 मे ला हा कन्व्हेअर बेल्ट जळाला तेव्हापासून 25 जून पर्यंत एक महिना हा प्लँट बंद राहिल्यामुळे वीज उत्पादन न झाल्यामुळे जे नुकसान झाले आहे त्याची भरपाई कंपनीकडून करुन घेण्यात येईल काय? शेतकऱ्यांना वीज मिळाली नाही त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्या संदर्भात आपण कोणती कारवाई करणार आहात? 26 एप्रिलला आग लागल्यानंतर 8 मे पर्यंत 15 दिवस तो प्लँट बंद राहिला अशाप्रकारची घटना या पुढील काळात घडणार नाही यासाठी शासन नेमकी कोणत्या प्रकारची उपाय योजना करणार आहे? या प्रश्नाकडे हे शासन गांभीर्याने पाहणार आहे काय?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात आपणामार्फत सांगू इच्छितो की, हा एक विस्तारीत प्रकल्प आहे. त्या प्लँटच्या क्षमतेमध्ये आपण नव्याने वाढ करीत आहोत. त्यामध्ये नव्याने इरेक्शनचे काम सुरु आहे. ते सुरु असतांना वीज निर्मिती बंद होण्याचा प्रश्न नाही. काम सुरु असतांना त्या ठिकाणी दुर्घटना घडली आहे त्या संदर्भात प्रश्न विचारण्यात आला आहे. सुरक्षा व्यवस्थेच्या संदर्भात महाजनकोतर्फे काही नियमावली करण्यात आली आहे काय? असा प्रश्न विचारण्यात आला. प्रत्येक प्रकल्पाच्या ठिकाणी महानिर्मितीतर्फे सुरक्षा अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्याप्रमाणे आवश्यक असलेली सुरक्षा विषयक उपाय योजना करण्याच्या दृष्टीने नियमावली केली आहे. त्या नुसार प्रस्तावित प्रकल्पाच्या सुरक्षेच्या संदर्भात दक्षता घेतली जात आहे. सन्माननीय सदस्यांनी शासनाकडून विशेष बाब म्हणून मदत करण्यात येईल काय? असा प्रश्न विचारला आहे. त्या संदर्भात ही बाब नक्की तपासून पाहून त्या मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना मदत मिळू शकत असेल तर ती नक्की करण्यात येईल.

सभापती : मंत्री महोदय, सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला की, वर्क्समेन कॉम्पेन्सेशन ॲक्टमधील तरतुदीनुसार त्या कामगारांना नुकसान भरपाई देत असतांना या ठिकाणी जी आकडेवारी सांगण्यात आली त्या मध्ये एका कर्मचाऱ्याला 3 लाख रुपये, दुसऱ्या कर्मचाऱ्याला 1 लाख रुपये आणि तिसऱ्या कर्मचाऱ्याला 85 हजार रुपये मिळाले आहेत. ही आकडेवारी पाहिली तर मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना, कुटुंबीयाना मिळणारी रक्कम अतिशय तोकडी आहे. या करिता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन शासनाने ही बाब तपासून पाहिली पाहिजे. या मध्ये वर्क्समेन कॉम्पेन्सेशन ॲक्टनुसार त्यांना नुकसान भरपाई वाढवून मिळाली पाहिजे. त्या दृष्टीने आपण लक्ष घालावे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, वर्क्समेन कॉम्पेन्सेशन ॲक्टचे जे मापदंड ठरविण्यात आले आहेत त्यानुसार नुकसान भरपाई देत असतांना मृत पावलेल्या कर्मचाऱ्याचे वय, त्याच्या पे स्लिपवरील अमाऊंट इत्यादी सर्व गोष्टी गृहीत धरुन त्या प्रमाणे नुकसान भरपाई देण्यात येते. त्या मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना कमी नुकसान भरपाई मिळाली असेल तर त्या संदर्भात माहिती घेऊन वर्क्समेन कॉम्पेन्सेशन ॲक्ट समोर ठेवून वाढीव नुकसान भरपाई कशी देता येईल या संदर्भात नक्की कारवाई करण्यात येईल.

सभापती : मंत्री महोदय, वर्क्समेन कॉम्पेन्सेशन ॲक्टमधील तरतुदी आपण तपासून पहाव्यात. अन्य ठिकाणी दिली जाणारी नुकसान भरपाई पाहिली तर त्या मध्ये काही ठिक्काणी 5 लाख, काही ठिकाणी 7 लाख तर काही ठिक्काणी 10 लाख रुपये इतकी दिली जाते. या ठिकाणी एवढया मोठया कंपनीमधील कामगार मृत्यू पावल्यानंतर त्या कामगाराचा पगार कमी आहे म्हणून त्याच्या कुटुंबीयाना कमी नुकसान भरपाई मिळणार असेल तर त्या कुटुंबीयावर अन्याय करणारी ती बाब आहे. या कामगारांचे हित सरकारने राखले पाहिजे त्या दृष्टीने आपण विचार केला पाहिजे. त्याच प्रमाणे अशा कंपन्यांमधील एखादा कामगार मृत पावल्यानंतर त्याच्या वारसाला अनुकंपा तत्वावर नोकरीमध्ये सामावून घेता येईल काय ही बाब सुध्दा आपण तपासून पहावी.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, आपण केलेल्या सूचनेनुसार कोणत्याही मृत कामगाराच्या कुटुंबीयाना दूर न ठेवता त्यांचा चांगल्या प्रकारे मदत करण्याच्या दृष्टीने सहानुभूतीपूर्वक कार्यवाही केली जाईल.

अप्रुव्हड पेज / प्रतिक्षेसाठी नाही

राज्यात १५ जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या नवसंजीवनी योजनेच्या सर्वेक्षणानुसार वर्षभरात ५१८५ बालकांचा मृत्यू होऊन ३६,११७ अतितीव्र कुपोषीत बालके आढळल्याबाबत

(६) * १७८१९ श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १५ जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या नवसंजीवनी योजनेच्या आढाव्यामध्ये गेल्या वर्षभरात ५१८५ बालकांचा मृत्यू तर ३६,११७ अतितीव्र कुपोषीत बालके असल्याची बाब दिनांक १४ फेब्रुवारी, २०११ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सर्वात जास्त बालमृत्यूचे प्रमाण आदिवासी नक्षलग्रस्त भागात असल्याचे निष्पन्न झाले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री.सुरेश शेट्टी : (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) राज्यातील आदिवासी भागात कुपोषण व बालमृत्यू कमी करण्याकरीता शासनामार्फत मातृत्व अनुदान योजना, भरारी पथक योजना, पाडा स्वयंसेवक योजना, दायी बैठक योजना, जननी सुरक्षा योजना, पाणी गुणवत्ता तपासणी, मेळघाटमध्ये कौन्सिलरची नियुक्ती, ग्रामीण रुग्णालयात पेडीयाट्रीक आय.सी.यु. स्थापना, प्रा आ केंद्र स्तरावर वार्मरुम व्यवस्था, बोकोपेटीचा वापर, ग्रामीण रुग्णालयात / प्रा आ केंद्रात बालरोग तज्ञांच्या सेवा, ग्रामीण रुग्णालयात स्त्रीरोगतज्ञांच्या सेवा, इ.उपाययोजना करण्यात येत आहे.

तसेच ग्रामीण रुग्णालयात आहार सुविधा योजना, ग्रेड ३ व ४ च्या रुग्णालयात भरती झालेल्या बालकाला आहार व त्याच्या सोबतच्या पालकास बुडीत मजुरीपोटी मोबदला, एकात्मिक बाल विकास सेवांतर्गत मुलांना, गरोदर / स्तनदा मातांना पूरक पोषण आहार दिवसातून २ वेळा तर कुपोषित बालकांना ४ वेळा दिला जातो. लसीकरण, मातेला समुपदेशन केले जाते. बालविकास केंद्र स्थापन करुन ग्रेड ३ व ४ च्या कुपोषित बालकांवर उपचार केले जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, प्रश्नामधील विषय अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे. छापील उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "ग्रामीण रुग्णालयात/प्राथमिक आरोग्य केंद्रात बाल रोग तज्ज्ञांच्या सेवा, ग्रामीण रुग्णालयात स्त्री रोग तज्ज्ञांच्या सेवा इत्यादी उपाय योजना करण्यात येत आहे". सभापती महोदय, बाल रोग तज्ज्ञ आणि स्त्री रोग तज्ज्ञांची पदे रिक्त असल्यामुळे या तज्ज्ञांची सेवा प्रत्यक्षात मिळत नाही. सन २०१०-११ मध्ये जवळपास २ लाख ६६ हजार मुलांची वैद्यकीय तपासणी केली त्यामध्ये ८२ हजार ६९३ अतिकुपोषित आणि कुपोषित बालके आढळली. नव संजीवनी योजनेसाठी ज्या गाडया घेण्यात आल्या त्या पूर्णपणे नादुरुस्त झालेल्या आहेत. तेव्हा त्यांच्याकरिता आपण नवीन गाडया घेऊन देणार काय? त्याच प्रमाणे पावसाळयाच्या दिवसात प्रत्येक गावामध्ये भाडयाची खोली घेऊन त्या ठिकाणी धान्य साठा करुन ठेवण्यात यावा अशी नव संजीवनी योजनेमध्ये तरतूद आहे...

सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपला प्रश्न विस्तृत करुन विचारुन या सभागृहाची पाच-सहा मिनिटे घेणे बरोबर नाही. आपण सभागृहाच्या ज्येष्ठ सदस्या आहात, परंतु त्याचा अर्थ असा काढता येईल काय?

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, प्रश्न विस्तृत करुन विचारला नाही तर उत्तर मिळत नाही. माझा प्रश्न असा आहे की, भाडयाची खोली न घेता दुकानदारांनी तीन-तीन महिन्याचे धान्य उचलावे अशाप्रकारचे आदेश दिले जातात. परंतु ते धान्य उचलण्याची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे ते धान्य उचलू शकत नाहीत. या करिता नव संजीवनी योजनेमधील नियमाप्रमाणे नवीन गाडया देण्यात येणार आहेत काय? त्यानुसार तीन महिन्यांचा धान्याचा साठा करणार काय? त्याच प्रमाणे बाल रोग आणि स्त्री रोग तज्ज्ञांची पदे तत्काळ भरुन कुपोषणाचे प्रमाण कमी करणार काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, होय.

(गोंधळ)

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांकडून अशाप्रकारचे उत्तर अपेक्षित नाही...

अप्रसृत पत्र / प्रसिद्धीपूर्वी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांना आपण ताकीद दिली पाहिजे. अशाप्रकारे उत्तर देऊन ते सन्माननीय सदस्यांची चेष्टा करीत आहेत काय?

सभापती : सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या प्रश्नामध्ये विचारलेल्या सर्व बाबींचे उत्तर मंत्रीमहोदयांनी दिले आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी गंभीर आणि स्पेसिफीक प्रश्न विचारला आहे. त्यासंदर्भात मी सभागृहासमोर दोन-तीन महत्वाचे मुद्दे मांडू इच्छितो. एकतर सन्माननीय सदस्यांनी प्रश्नामध्ये एकंदर 5180 मुलांचा मृत्यू झालेला आहे असा उल्लेख केला आहे. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, प्रत्यक्षात हा आकडा 5845 इतका आहे.

श्रीमती शोभा फडणवीस (खाली बसून) : माननीय मंत्री महोदयांना यासंबंधातील आकडेवारी बाबत माहिती नाही. ते चुकीची माहिती देत आहेत.

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 2010-2011 मध्ये एकूण 5845 लहान मुलांचे मृत्यू इ ाले आहेत. 2006-2007 मध्ये 8003, 2007-2008 मध्ये 6700 आणि आता यावर्षी हे प्रमाण कमी इ ाले असून ते 5845 इतके आहे.याबाबतीत मी सांगू इच्छितो की, राज्यामध्ये 5845 बालमृत्यू झाले आहेत. ते 0 ते 1 आणि 1 ते 6 या वयोगटातील आहेत. हे सर्व मृत्यू कुपोषणामुळे झाले आहेत असे नाही तर काही मुले कमी वजनाची आणि काही मुले कमी दिवसाची आहेत. यामध्ये कमी वजनाच्या मुलांची संख्या 476 आणि कमी दिवसाची जी मुले आहेत त्यांची संख्या 334 इतकी आहे. याशिवाय इतर ज्या मुलांचे मृत्यू झाले आहेत त्याची एकंदर 45 कारणे असून, मी त्या संबंधीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो आणि सन्माननीय सदस्यांना देखील देतो. आतापर्यंत संपूर्ण राज्यामध्ये एमएमआर चा रेशियो 137 होता. परंतु आता हा रेशियो 104 पर्यंत आलेला आहे. केरळ, तामिळनाडू आणि महाराष्ट्र या तीन राज्यांमध्ये मातांच्या मृत्यूचे प्रमाण कमी झालेले आहे. तसेच बालमृत्यूचे प्रमाण 31 वरुन 25 पर्यंत आणावे लागणार आहे आणि यासाठी केंद्र व राज्य शासन नवीन कार्यक्रम राबविणार आहे. आता आपण जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम हाती घेतलेला असून, आपण त्यासाठी 19.07 कोटी रुपयांचा निधी देत आहोत.

श्रीमती शोभा फडणवीस (खाली बसून) : माननीय मंत्री महोदयांनी नव्या संजीवनी योजनेबाबत सांगावे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, नवीन कार्यक्रमाबाबत सांगावयाचे तर यासाठी 19.07 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. यामध्ये प्रेग्नन्ट महिलांना घरातून हॉस्पिटलमध्ये तपासणी साठी, रिफरलसाठी शासनाकडून ट्रान्सपोर्ट मोफत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डिलीव्हरी झाल्यानंतर 30 दिवस हॉस्पिटलमध्ये येण्या-जाण्यासाठी त्यांना मोफत ट्रान्सपोर्टची सुविधा दिली जाणार आहे. तसेच शासकीय रुग्णालयामध्ये डिलीव्हरी मोफत करण्यात येणार आहे. अशा प्रकारे ट्रान्सपोर्ट बरोबरच त्यांना औषधे व जेवण देखील मोफत स्वरुपामध्ये देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून तो या महिन्यापासून लागू करणार आहोत. यासाठी बजेटमध्ये तरतूद देखील केलेली आहे. तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी 387 ॲम्ब्युलन्स् प्राथमिक आरोग्य केंद्राला दिल्याबाबत उल्लेख केला.रुरल भागामधील हॉस्पिटलना 137 ॲम्ब्युलन्स दिल्या आहेत.

श्रीमती शोभा फडणवीस (खाली बसून) : सभापती महोदय, मी धान्य पुरवठ्याबाबत उल्लेख केलेला आहे, ॲम्ब्युलन्स्बाबत उल्लेख केलेला नाही.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी माहिती सांगतो . . ..

सभापती : माननीय मंत्री महोदयांनी मला उद्देशुन बोलावे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी धान्य पुरवठ्याबाबत उल्लेख केला. याबाबत विधानसभेमध्ये देखील चर्चा झाली. तेथे मेळघाट बाबत स्पेसिफीक प्रश्न विचारला होता. मी सांगू इच्छितो की, या विषयाच्या संबंधात मेळघाट मधील सन्माननीय सदस्य आणि अजुबाजूच्या भागातील दोन सन्माननीय सदस्यांना घेऊन याचे मॉनेटरींग करण्यासाठी सदस्यांची एक कमिटी नेमलेली आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफीक सांगितले की, एखादा जिल्हा असेल किंवा तालुका असेल तर आमच्या विभागातर्फे त्या जिल्ह्यातील स्थानिक आमदार असतील त्यांची याबाबत मॉनेटरींग करण्यासाठी समिती स्थापन करण्याची आमची तयारी आहे.

श्री.जयंत प्र.पाटील (खाली बसून) : माननीय मंत्री महोदयांनी चुकीचे उत्तर दिलेले आहे.

सभापती : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी फक्त अमरावती जिल्ह्याचा प्रश्न नाही तर संपूर्ण राज्याचा आहे.पहिल्या प्रश्नामध्ये असे म्हटलेले आहे की,"राज्यात 15 जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या नवसंजीवनी योजनेच्या आढाव्यामध्ये गेल्या वर्षभरात 5185 बालकांचा मृत्यू तर 36,117 अतीतीव्र कुपोषित बालके असल्याची बाब दिनांक 14 फेब्रुवारी 2011 रोजी वा त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ?" याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी मागील वर्षाची, त्यापूर्वीच्या वर्षाची आकडेवारी दिली आहे. त्यानुसार हे प्रमाण 8 हजारावरुन 6 हजार आणि 6 हजारावरुन 5 हजार पर्यंत आलेले आहे असे सांगितले. कुपोषित बालकांच्या मृत्यूचे प्रमाण पाच हजारावर आणले ही फार अभिमानाची गोष्ट नाही.पण या राज्यातील पाच हजार कुपोषित बालकांचा मृत्यू होत आहे. याबाबत शासनाला काहीच वाटत नाही काय आणि आम्ही हे प्रमाण कमी करीत आहोत असे आपण अभिमानाने सांगत आहोत. याठिकाणी योजना जाहीर केल्या जातात.

सभापती : माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी प्रश्न विचारावा.

श्री.सुरेश शेट्टी (खाली बसून) : सभापती महोदय, आम्ही मोरटॅलिटी रेट 25 पर्यंत आणण्याचा प्रयत्न करीत आहोत असे मी मघाशी सांगितलेले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नव संजीवनी योजनेअंतर्गत आदिवासींना ज्या ज्या सोयी-सवलती द्यावयास पाहिजेत, त्या दिलेल्या नाहीत. तेथे गाड्या, पुरेसे कर्मचारी उपलब्ध नाहीत. मग योजना जाहीर करुन काय करीत आहात. आता 19 कोटी रुपयांची योजना जाहीर केली पण ती आदिवासींपर्यंत पोहोचणार आहे काय ? त्यासाठी तेथे आवश्यक तो कर्मचारी वर्ग, गाड्या असावयास पाहिजे. जोपर्यंत तेथे या सोयी होत नाहीत, तोपर्यंत या योजना आदिवासींपर्यंत जाणार नाहीत. यासाठी शासन काय करणार आहे ? आदिवासींसाठी केलेल्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी शासन कमी पडत आहे हे आपण मान्य करावयास पाहिजे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 15 आदिवासी जिल्हे व्ही.सी.डी.सी.अंतर्गत हाती घेतलेले आहेत. या 15 जिल्ह्यामध्ये एकंदर 55.900 लहान मुलांना अगोदरच ट्रिटमेंट दिलेली असून, त्या पैकी 44,700 मुलांमध्ये सुधारणा झाली आहे. त्यापैकी 1009 मुलांना ट्रिटमेंटसाठी ॲडव्हान्स क्लिनिकल ट्रिटमेंटसाठी रेफर केले आहे. सी.टी.सी.प्लॅनमध्ये एकूण 3770 मुलांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करुन घेतले आणि 3915 मुलांमध्ये इम्प्रुव्हमेंट झालेली आहे म्हणजे याचा उपयोग झालेला नाही असे नाही. 15 जिल्ह्यामध्ये जे काम झाले आहे त्याची सर्व माहिती मी माननीय सभापतींना आणि माननीय विरोधी पक्षनेते माननीय श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब यांनाही देऊ इच्छितो. पण कुठे काही तालुक्यामध्ये स्पेसिफीक त्रुटी असेल तर आपण मला माहिती द्यावी. तिथे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जर नवीन गाडी द्यावयाची असेल, तसेच त्या ठिकाणी गाड्या नसतील किंवा कर्मचारी वर्ग नसेल तर त्या बाबी पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे एक्झॅक्ट माहिती द्यावी म्हणजे त्यानुसार आपण काम हाती घेऊ शकतो.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आदिवासी जिल्ह्यामध्ये कुपोषणाचा प्रश्न आहे. यासाठी शासन जे प्रयत्न करीत आहे, त्यातून वारंवार एक बाब लक्षात येते की, आपण अनेक योजनांसाठी आर्थिक तरतूद करतो आणि त्याव्दारे जी यंत्रणा उभी रहाते, त्यामधून हा कुपोषणाचा प्रश्न सुटेल अशी आपण अपेक्षा व्यक्त करतो.पण साधारणपणे आपण जेव्हा आढावा घेतो, तेव्हा आपण केलेल्या सर्व तरतुदींमधील त्रुटीच मोठ्या प्रमाणात आपल्या समोर येतात. त्यामुळे . . . .

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी प्रश्न विचारावा.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या त्रुटी समोर येत असताना, कॅपिटल एक्सपेंडीचर सारख्या ज्या गोष्टी आहेत म्हणजे वाहने घेणे वगैरे या सर्व बाबी केल्या जातात. याऐवजी ज्या प्रमाणे काही योजनांमध्ये आपण आहाराबाबत किंवा इतर सोयी-सुविधा उपलब्ध करुन देतो, त्याऐवजी त्यांना कॅश इन्सेन्टीव्ह दिल्यामुळे काही फरक पडेल काय ? ते पाहिले पाहिजे. जेणेकरुन इतर योजनांमध्ये वेगवेगळे प्रकार घडतात, ते कमी होण्यास मदत होईल आणि धान्य किंवा इतर सोयी आदिवासींपर्यंत अधिक चांगल्या प्रकारे पोहोचू शकतील.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी अधिकारी आणि कर्मचारी यांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला. ही गोष्ट खरे आहे की,आपल्याला ट्रायबल एरियामध्ये स्पेशलिस्ट गायनॉकॉलॉजिस्ट आणि पिडिॲस्ट्रीशन मिळत नाहीत.त्यासाठी मेळघाट मध्ये नवीन कार्यक्रम हाती घेतला असून तेथे जे शासकीय पिडिॲस्ट्रीशन आणि गायनॉकॉलॉजिस्ट आहेत, तसेच खाजगी रुग्णालयामध्ये जे डॉक्टर आहेत. त्यांना अगोदर आपण पैसे देत होतो पण आता मेळघाटपुरते सांगावयाचे तर आता ही रक्कम 1 लाख रुपयापर्यंत वाढविली आहेत. ही योजना आपण पूर्ण 15 जिल्ह्यामध्ये देखील राबवू शकतो.

यानंतर कु.थोरात . . . .

अप्रुव्हड कॉपी / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ...

खरे म्हणजे सिव्हील सप्लाय विभागाच्या बाबतीतील हा प्रश्न आहे. मी सिव्हील सप्लाय विभागाच्या मंत्री महोदयांशी बोलून ट्रान्स्पोर्टच्या बाबतीत त्यांच्याशी चर्चा करतो.

सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी पैसै देण्याच्या बाबतीतील मुद्दा उपस्थित केला आहे. व्ही.सी.डी.च्या कार्यक्रमामध्ये जर महिला रुग्णालयात आल्या तर त्यांना शासनामार्फत 60 रुपये देण्यात येतात आणि 60 रुपये आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात येतात. तसेच त्यांना फ्री जेवण देण्यात येते. 120 रुपये प्रत्येक महिलांना आपण ऑलरेडी देतो. तसेच जेवण आणि औषधे पूर्णत: फ्री देण्यात येतात.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, कुपोषणावर मात करण्यासाठी कशा प्रकारे उपाययोजना करण्यात येत आहे हे मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. तसेच गेल्या वर्षीचा आणि आताचा मृत्यूदर कसा कमी-जास्त प्रमाणात झाला मुलांचे कुपोषित होण्याचे प्रमाण कितीने कमी झाले हे सांगण्याचा प्रयत्न करण्यात आला.सभापती महोदय, मला या ठिकाणी तीन प्रश्न विचारावयाचे आहेत. 1) कुपोषणावर मात करण्यात येत आहे या बाबतीत मंत्री महोदयांना, कॉन्फिडन्स आहे तर या कुपोषणाच्या बाबतीत श्वेतपत्रिका काढण्यात येणार आहे काय? 2) गेल्या एप्रिल पासून आज पर्यंत मेळघाटमध्ये किती पेडीयॉट्रिशन यांनी त्या ठिकाणी व्हिजिट केली. कारण मे महिन्यात शिवसेनेचा मेळघाटमध्ये कॅम्प झाला होता त्यामळे माझ्याकडे त्या ठिकाणची सविस्तर माहिती आहे. 3) मंत्री महोदयांचे म्हणणे असे आहे की, हे मृत्यू कुपोषणाने होत नसून न्यूमोनिया, डायरिया अशा विविध कारणाने होत आहेत. तेव्हा त्या ठिकाणी किती हात पंप चालू आहेत आणि किती दूषित पाण्याच्या नमुन्याची तपासणी केली आहे?

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय डॉ. दीपक सावंत यांना मला पहिल्यांदा असे सांगावयाचे आहे की, कुपोषणाच्या प्रश्नाच्या बाबतीत गेल्या वर्षा पासून सन्माननीय प्रा. वर्षा गायकवाड यांच्या महिला व बालविकास विभागाला नोडल एजन्सी म्हणून नेमलेले आहे. त्यामध्ये फक्त एक कम्पोनन्ट आरोग्य विभागाचा आहे. त्यामुळे त्या प्रश्ना संबंधीचे उत्तर मंत्री महोदया, प्रा. वर्षा गायकवाड देतील. सन्माननीय सदस्यांनी रुग्णालयाच्या संदर्भात या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला होता. या संदर्भात सेवाग्राम मेडिकल कॉलेजबरोबर शासनाची चर्चा झालेली आहे. मेळघाट येथील संपूर्ण उप

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17819.....

श्री. सुरेश शेट्टी ....

जिल्हा रुग्णालयाची त्यांनी मागणी केलेली आहे. त्यांचे स्पेशालिस्ट आणि डॉक्टर्स तेथे जाऊन ते हे रुग्णालय सांभाळतील असा त्यांचा प्रस्ताव आला आहे. शासन सेवाग्राम मेडिकल कॉलेज रुग्णालयाच्या म्हणण्याशी सहमत असून मेळघाट येथील संपूर्ण उप जिल्हा रुग्णालय सेवाग्राम मेडिकल कॉलेजला देण्यात येणार आहे. ...

सभापती : हा प्रश्न अत्यंत क्लिष्ट प्रश्न असल्यामुळे मंत्री महोदयांनी, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना त्यांच्या चेंबरमध्ये बोलावून त्यांच्याशी चर्चा करावी.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना माझ्या चेंबरमध्ये चर्चेसाठी येण्याची रोज विनंती करतो पण ते येत नाहीत. तेव्हा माझ्या चेंबरमध्ये येऊन चर्चा करण्याचे आपण त्यांना आदेश द्यावेत, अशी विनंती आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात)

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, कुपोषणाच्या बाबतीत श्वेतपत्रिका काढण्यात येणार आहे काय? ते सांगावे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मला अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती : खरे म्हटले तर 12.00 वाजता प्रश्नोत्तराचा तास संपतो. परंतु सदर प्रश्न अत्यंत महत्वाचा असल्यामुळे मी या प्रश्नासाठी दोन-चार मिनिटे जास्तीचा वेळ दिलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण उभे असताना काही मंत्री महोदय तसेच काही सन्माननीय सदस्य सभागृहात उभे राहून बोलत आहेत.

सभापती : मंत्री महोदयांनी व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

खरे म्हणजे 12.00 वाजता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. पण सदर प्रश्न अत्यंत महत्वाचा, जिव्हाळयाचा आणि आदिवासी विभागातील लहान मुलांच्या कुपोषणाचा असल्यामुळे या प्रश्नासाठी तीन-चार मिनिटे मी जास्तीची दिली आहेत. या प्रश्नावरील चर्चा संपतच नाही असे माझ्या लक्षात आल्यानंतर डॉ. दीपक सावंत यांच्या वतीने मी मंत्री महोदयांना त्यांच्या चेंबरमध्ये या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

विषयावरील बैठक घेण्यास सांगितले होते. पुन्हा एकदा मी असे सांगेन की, मंत्री महोदयांनी आदिवासी विभागातील सर्व सन्माननीय सदस्यांची एक बैठक घ्यावी. आदिवासी भागातील मुलांच्या कुपोषणाचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. मंत्री महोदय, त्यांच्या परीने त्या ठिकाणी काम करीत आहेत तरी देखील अनेक व्यथा आणि अनेक अडचणी त्या विभागाशी संबंधित आहेत म्हणून माझी अशी सूचना आहे की, या बाबतीत मंत्री महोदयांनी स्वत: पुढाकार घेऊन संबंधित सर्व सन्माननीय सदस्यांना एकत्र बोलावून त्यांच्याबरोबर चर्चा करावी आणि त्या चर्चेनंतर जे निष्कर्ष काढण्यात येतील ते सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी, प्रा. वर्षा गायकवाड यांचे नाव घेतले आहे. त्यांच्याकडे महिला व बालविकास विभागाची जबाबदारी आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या ठिकाणी श्वेतपत्रिका काढण्यात येणार आहे काय असा स्पेसिफिक प्रश्न विचारला होता, त्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी मंत्री महोदया, सभागृहात उभ्या राहिल्या होत्या तेव्हा आपण त्यांना उत्तर देऊ द्यावे.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, आज या ठिकाणी या विषयावर चर्चा होत असताना नोडल एजन्सी म्हणून महिला व बालविकास विभागाची नेमणूक करण्यात आलेली आहे, हे सर्व सन्माननीय सदस्यांना माहीत आहे. सभापती महोदय, आपण निर्देश दिल्याप्रमाणे या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांबरोबर एक बैठक घेण्यात येईल. मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, मुख्य सचिवांनी या संदर्भात बैठका घेतल्या आहेत. जे दहा कार्यक्रम आहेत त्यातील सगळयात महत्वाचा कार्यक्रम कुपोषण नष्ट करणे हा आहे. सभापती महोदय, सभागृहाची भावना लक्षात घेऊन या संदर्भात श्वेतपत्रिकेची जी मागणी केलेली आहे ती सुध्दा काढण्यात येईल आणि या संदर्भात लोकप्रतिनिधीं बरोबर बैठक आयोजित करण्यात येईल. तसेच त्या बैठकीला सन्माननीय आरोग्य मंत्र्यांना बोलावण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, एका मूलभूत प्रश्नाकडे मला सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. महाराष्ट्रात आणि देशात मुलींच्या लग्नाचे वय 18 वर्षे आहे पण अनेक आदिवासी पाडयांमध्ये लहान वयातच मुलींची लग्ने होतात. या आदिवासी मुलींचे कुपोषण लहान वयातच

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.....

झालेले असते. त्यांची आई देखील कुपोषित असते. आपल्या देशामध्ये अत्यंत गरिबी आहे. पोषण आहार दिला जात नाही. कुपोषण मेळघाटमधील असो, ठाणे जिल्ह्यातील असो किंवा मुंबईतील इ ाोपडपट्टीतील असो त्याचे मूळ कारण लहान वयात लग्न होणे हे आहे. म्हणून 18 वर्षापेक्षा लहान मुलींचे लग्न होणे, कुटुंब नियोजन या प्रश्नांकडे शासनाने थोडेसे जास्त लक्ष दिले तर हा कुपोषणाचा प्रश्न काही प्रमाणात कमी होईल, असे मला वाटते.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, राज्य शासन व केंद्र शासनाची मिळून राजीव गांधी सबलीकरण योजना आहे. या योजनेच्या अंतर्गत 11 ते 18 वर्षाच्या किशोर वयीन मुलींसाठी सकस आहार आणि प्रशिक्षणाचा नवीन कार्यक्रम अकरा जिल्हयांसाठी घेण्यात येत आहे. त्यामध्ये मुंबईचा समावेश असून साधारणत: बहुतेक आदिवासी जिल्हे यामध्ये कव्हर होत आहेत. त्यांनतर अमरावती आणि भंडारा या दोन जिल्ह्यासाठी इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना येत आहे. या योजनेमध्ये गरोदर महिलेने नाव नोंदणी केल्यानंतर 1500 रुपये, तिचे बाळंतपण आमच्या इन्स्टिटयुटमध्ये इ ाल्यानंतर 1500 रुपये आणि तिने सहा महिने स्तनपान दिले तर एक हजार रुपये असे चार हजार रुपये 19 वर्षे वय असलेल्या मुलींसाठी देण्याची नव्याने योजना येत आहे. केंद्र शासनाच्या अनुदानातून 100 टक्के पैसे दिले जाणार आहेत. या विविध योजनांच्या माध्यमातून काम होत आहे हे मला या ठिकाणी सभागृहाला सांगावयाचे आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये माता सुरक्षा जननी योजना सुरु करण्यात येत आहे, असे सांगितले आहे. ही योजना गेल्या वर्षी पासून केंद्र शासनाच्या 100 टक्के अनुदानातून सुरु आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी या ठिकाणी जास्त प्रश्न विचारले म्हणून मंत्री महोदया चुकून बोलल्या असतील. पण चुकीची दुरुस्ती झाली पाहिजे. माता सुरक्षा योजनेचे करोडो रुपये या राज्यामध्ये आलेले आहेत.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी मता सुरक्षा जननी योजने बद्दल सांगितले नाही तर शिशू सुरक्षा कार्यक्रम या नवीन योजनेची मी घोषणा केली आहे.

. . . G-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस.क्यू. जमा : सभापति महोदय, मेरा मंत्री महोदय से एक ही प्रश्न है. कुपोषण महाराष्ट्र के ऊपर एक बहुत बड़ा दाग है और इसमें कोई सुधार नहीं हो रहा है. मेरा प्रश्न दोनों माननीय मंत्रियों से है. कुपोषण को कम करने के लिए कई विभागों को कोर्डिनेशन के साथ काम करना चाहिए. मेरा आपसे अनुरोध है कि एक मंत्री के विभाग को नोडल एजेन्सी बनाने की बजाय माननीय मुख्यमंत्री या उपमुख्यमंत्री के स्तर पर कोर्डिनेशन कमेटी बनाई जाए, ताकि कुपोषण को कम करने के बारे में कालबद्ध तरीके से काम हो सके. हमारे प्रदेश में कुपोषण बढ़ रहा है, ऐसी अन्तर्राष्ट्रीय रिपोर्ट है, ऐसी यूनेस्को की बॉडी की रिपोर्ट है. इसलिए कुपोषण को कम करने के लिए क्या आप माननीय मुख्यमंत्री या उपमुख्यमंत्री के स्तर पर मॉनीटरिंग कमेटी बनाएंगे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापति महोदय, मैं माननीय सदस्य को बताना चाहता हूँ कि कुपोषण को दूर करने के लिए माननीय मुख्यमंत्री ने संयुक्त रुप से 9 विभागों के साथ 3 घंटे तक चर्चा करने के बाद महिला एवं बाल कल्याण विभाग के अन्तर्गत नोडल एजेन्सी बनाई है. 9 विभागों से संबंधित सचिवों को इसके अन्तर्गत काम करना पड़ेगा और इसकी रिपोर्ट प्रत्येक 3 या 6 महीने के बाद माननीय मुख्यमंत्री को देनी पड़ेगी. ऐसा निर्णय बैठक में लिया गया है.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास सपंला आहे.

. . . नंतर श्री. बरवड

अप्रधारित प्रत / प्रतिलिपी नही

पृ. शी. : लेखी उत्तरे

मु. शी. : अतारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस - येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात)

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : गिरणी कामगारांना घरे देण्याविषयीचे धोरण शासनाने जाहीर करण्याची आवश्यकता

मु. शी. : गिरणी कामगारांना घरे देण्याविषयीचे धोरण शासनाने जाहीर करण्याची आवश्यकता यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री कपिल पाटील, केशवराव मानकर, धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर व रामनाथ मोते, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे चालू)

सभापती : नियम 97 अन्वये तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीवरील अल्पकालीन चर्चेच्या अनुषंगाने सभागृहात गिरणी कामगारांच्या प्रश्नांवर चर्चा झालेली आहे. आता माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तराच्या भाषणास सुरुवात करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तराच्या संदर्भात माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो की, आपण ही चर्चा उपस्थित करण्याकरिता परवानगी दिली. ही चर्चा उपस्थित करण्याकरिता शासनानेही सहकार्य केले तसेच आपणही या माध्यमातून ही चर्चा घडविली त्याबद्दल मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. परंतु या ठिकाणी आमच्या सभागृहाच्या सार्वभौमत्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. आपण सांगितल्याप्रमाणे आम्ही सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत चर्चा केली. माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देण्यासाठी सभागृहात यावे हे ठरलेले होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देण्यासाठी सभागृहात उपस्थित राहावे याकरिता आपण संदेशही पाठविला होता. त्या संदेशाप्रमाणे माननीय मुख्यमंत्री आता येतील, आता येतील, असे करत करत त्यांची वाट पाहात दोन ते तीन सन्माननीय सदस्यांची भाषणे सुध्दा झाली. वाढविलेल्या वेळेप्रमाणे सायंकाळी 6.20 वाजता माननीय मुख्यमंत्री कधी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

येणार याबाबत आम्ही विचारले. आपण सांगितले की, आज मुख्यमंत्री येणार नाहीत, आपण त्यांच्याकडून सोमवारी उत्तर घेऊ. काही अडचण असू शकेल म्हणून आम्हीही त्याला मान्यता दिली. परंतु खरी जी अडचण निघाली त्यामुळे या सभागृहाच्या सार्वभौमत्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, मी या सभागृहाच्या सार्वभौमत्वाबद्दल बोलत आहे त्यामुळे आपण मला कृपा करुन बोलू द्यावे. कारण अशी घटना कधी घडत नाही आणि आजपर्यंत असे कधी घडलेले नाही. आपण या सभागृहाचे संरक्षण केले पाहिजे आणि सभागृहाचे सार्वभौमत्व सांभाळले पाहिजे, या भूमिकेतून मी उभा आहे. ही बाब अत्यंत खेदजनक आहे. विधानसभा सभागृहामध्ये ज्यावेळेला ही चर्चा चालू होती त्यावेळी तेथील काही सन्माननीय सदस्यांनी चर्चेला उभे राहात असताना, ते सन्माननीय सदस्य विधानसभेचे आहेत, मी त्यांचे नाव घेतो. त्या सभागृहामध्ये सुध्दा ही चर्चा चालू होती म्हणून मी त्या सदस्याचे नाव घेतो.....

सभापती : आपण सन्माननीय सदस्यांचे नाव घेण्याचे टाळावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ते महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सदस्य आहेत. त्या सन्माननीय सदस्यांनी विधानसभा सभागृहात असे सांगितले की, चर्चा करावयाची असल्यास ती सर्वप्रथम या सभागृहात झाली पाहिजे. तो त्यांचा विषय आहे. त्यानंतर त्यांनी असे म्हटले की, सदनातील सन्माननीय सदस्य इलेक्टेड आहेत. त्यांना 'इलेक्टेड' शब्दाऐवजी 'निवडून आलेले सदस्य आहेत' असे मराठी शब्द वापरता आले नाहीत. मराठीचा ध्यास घेणाऱ्या सदस्यांनी 'इलेक्टेड' असा शब्द वापरला. त्यानंतर 'माननीय सभापती यांच्याशी को-ऑर्डिनेशन केले असते तर' असा उल्लेख केलेला आहे. या ठिकाणी सुध्दा त्यांनी 'को-ऑर्डिनेशन' असा शब्द वापरलेला आहे. असे ते सन्माननीय सदस्य आहेत. त्यांनी असे म्हटले की, माननीय मुख्यमंत्री महोदय, या चर्चेच्या संदर्भात आपल्याला जे काही उत्तर द्यावयाचे असेल ते सर्वप्रथम या सदनात द्यावे. कारण आम्ही इलेक्टेड आहोत. म्हणजे निवडून आलेलो आहोत या ऐवजी इलेक्टेड आहोत असे ते म्हणाले. त्यानंतर त्यांनी असे सांगितले की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या सदनात सर्वप्रथम

श्री. दिवाकर रावते ....

उत्तर द्यावे अशी आमची तीव्र भावना आहे.

सभापती महोदय, त्यानंतर त्यावेळी जे तालिका सभाध्यक्ष होते त्यांनी असे म्हटले की, वरिष्ठ सभागृहात अजून चर्चेला सुरुवात झालेली नाही. त्यांनी दुपारी 4.30 वाजता असे सांगितले. परंतु त्यावेळी आपल्या सभागृहात चर्चेला सुरुवात झालेली होती. पुढे माननीय तालिका सभाध्यक्ष असे म्हणाले की, आता आपण चर्चेला सुरुवात करावी. चर्चेला सुरुवात झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्री रिप्लाय देतील. त्याचा परिणाम म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांवर दबाव आला की काय हे माहीत नाही पण आपल्याकडून त्याचा खुलासा झाला पाहिजे. आपण सांगितल्याप्रमाणे आम्ही या सभागृहामध्ये अत्यंत कमी वेळात चर्चा केली. कमीत कमी सदस्य बोलले. कारण आपले तसे ठरले होते आणि त्याला फाटे फुटता कामा नये म्हणून तसे केले. आपल्या मान्यतेने सगळी चर्चा संपत आल्यानंतर सुध्दा आपण सभागृहात येत आहात म्हणून आणखी तीन सन्माननीय सदस्यांना भाषणे करण्याची संधी दिली. एवढे असताना माननीय मुख्यमंत्री 6.20 वाजता सभागृहात आले नाहीत. विधानसभा सभागृहामध्ये उत्तर देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री 8 वाजून 20 मिनिटांनी उभे राहिले. 9 वाजून 40 मिनिटांनी विधानसभा सभागृहाचे कामकाज संपले. विधानसभा सभागृहातील चर्चा संपल्यानंतर त्या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री उत्तर देण्यासाठी उभे राहिले पण या सभागृहामध्ये निमंत्रण देऊन, बोलवून, आग्रह करुनही ते उत्तर देण्यासाठी आले नाहीत. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांकडून या सभागृहाचा अवमान झालेला आहे, असा माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहाची गरिमा, या सभागृहाची प्रतिष्ठा आणि या सभागृहाचा सन्मान, हे खालचे सभागृह की, वरचे सभागृह असे न करता, उत्तर या सभागृहात आधी दिले काय किंवा विधानसभा सभागृहात आधी दिले काय ? या ठिकाणी असे ठरले आहे की, जी धोरणात्मक बाब शासनाला सांगावयाची आहे ती विधानसभा सभागृहात सांगितल्यानंतर आम्हाला न विचारता ती बाब या सभागृहात सांगितली पाहिजे आणि या सभागृहात सांगितली तर न विचारता विधानसभा सभागृहात सांगितली पाहिजे. हे सार्वभौमत्वाचे लक्षण आहे. परंतु या बाबतीत आमच्या सभागृहाचा अवमान झालेला आहे अशी आमची भावना आहे. आमची अत्यंत गंभीर आणि तीव्र भावना आहे. या

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभागृहामध्ये जर आता योग्य निर्णय झाला नाही तर भविष्यामध्ये या सभागृहाला दुय्यम स्थान देण्यात येईल.

सभापती महोदय, या विधिमंडळामध्ये ज्येष्ठ स्थान हे माननीय सभापतींचे आहे आणि मग माननीय अध्यक्षांचे स्थान येते. असा आपला संकेत आहे. त्या संकेताप्रमाणे हे जे काही घडलेले आहे ते अघटित आणि चुकीचे घडलेले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या सभागृहाचा सन्मान ठेवणे आवश्यक होते. त्यांनी सन्मान ठेवला नाही असा मी आक्षेप घेत नाही. माझे असे म्हणणे आहे की, त्यांनी सन्मान ठेवणे आवश्यक होते. पण ते घडले नाही हे मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. या सभागृहाच्या सार्वभौमत्वाच्या बाबतीत भविष्यामध्ये जर असा पायंडा पडला तर वारंवार असे केले जाईल. जर असे असेल तर माननीय मुख्यमंत्र्यांबद्दल प्रश्न निर्माण होतो. चहाला येता का ? नाही येत, मग चहाच रद्द करु. सभागृहात उत्तर देता का ? सभागृह रद्द करु. करा. त्यांची मस्त रोखठोक, प्रामाणिक भूमिका असते. त्याचे कौतुक करावे की करु नये ? या सभागृहामध्ये बसून आम्हाला जर असा अवमान सहन करावा लागत असेल तर आपण त्या ठिकाणी रोखठोक सांगावयास पाहिजे होते की, वरच्या सभागृहात उत्तर दिले काय किंवा खालच्या सभागृहात दिले काय, मी वरच्या सभागृहातही उत्तर देतो आणि खालच्या सभागृहातही देतो. असे आपण सांगितले असते तर त्यात सन्मान होता. परंतु या सभागृहाचा अवमान झालेला आहे अशी माझी हरकत आहे. घडलेली घटना अत्यंत गंभीर आहे. आपल्या माध्यमातून ती याचवेळी सांभाळली आणि सावरली नाही तर भविष्यात वारंवार या सभागृहाचा अवमान होण्याचे प्रसंग निर्माण होतील अशी भीती व्यक्त करतो. धन्यवाद.

..6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब यांनी या ठिकाणी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. खरे म्हणजे त्या दिवशी गिरणी कामगारांच्या प्रश्नावर आम्ही चर्चेची सूचना दिली आणि सूचना दिल्यानंतर आपण त्या चर्चेला परवानगी दिली. फक्त आपला आग्रह एवढाच होता की, सभागृहाचे इतर कामकाज संपल्यानंतर ती चर्चा करु. ते आम्ही मान्य केले. आम्ही सभागृहाच्या कामकाजामध्ये कपात केली. आम्ही पुरवणी मागण्यांवरील चर्चेचे उत्तर सुध्दा घेतले नाही. कारण गिरणी कामगारांच्या प्रश्नावरील चर्चा आटोपून माननीय मुख्यमंत्र्यांनी या सभागृहामध्ये उत्तर द्यावे अशी आमची अपेक्षा होती. त्यामुळे पुरवणी मागण्यांवरील चर्चेचे उत्तरही आम्ही अपेक्षित केले नाही. आम्ही जाणीवपूर्वक सांगितले की, गिरणी कामगारांच्या प्रश्नासंबंधीची चर्चा अत्यंत महत्वाची आहे. या ठिकाणी आता जो सार्वभौमत्वाचा मुद्दा उपस्थित झालेला आहे तो खरा आहे. सभापती महोदय, हे सभागृह जर सर्वोच्च असेल तर या सर्वोच्च सभागृहाचा सन्मान राखला गेला पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, त्या दिवशी संध्याकाळी 4.30 वाजता चर्चेला सुरुवात झाली होती. आपल्या निर्देशानुसार आम्ही आमच्या बाजूच्या सभासदांची संख्या कमी केली. आम्ही असा आग्रह धरला की, सत्ताधारी पक्षाच्या सभासदांची संख्या सुध्दा कमी केली पाहिजे. आम्ही ती चर्चा लांबवू शकलो असतो. परंतु आम्हाला माननीय मुख्यमंत्र्यांकडून त्याच दिवशी उत्तर अपेक्षित होते. ती चर्चा संध्याकाळी 6.20 वाजता संपली त्यावेळी विधानसभेमध्ये चर्चा सुरु होती. ती चर्चा रात्री 9 वाजेपर्यंत चालली. आम्ही वेळेचे तंतोतंत पालन केले होते. असे असताना मधल्या काळात 2 ते 2.30 तासाचा वेळ असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी या सभागृहात उत्तर देण्यासाठी यावयास पाहिजे होते. त्यानंतर विधानसभेतील चर्चा संपल्यानंतर तेथे उत्तर द्यावयास पाहिजे होते. परंतु असे घडले नाही.त्यामुळे या सभागृहाच्या सार्वभौमत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. परंपरा व संकेतानुसार या सभागृहाचे कामकाज चालले नाही तर भविष्यामध्ये अशा प्रकारचे चुकीचे पायंडे पडतील. म्हणून यासंबंधी आपला निर्णय महत्वाचा आहे. विधानसभेचे सभागृह मोठे की विधानपरिषदेचे सभागृह मोठे असे कोणीही मानता कामा नये. आतापर्यंत ज्या परंपरा चालत आलेल्या आहेत त्या परंपरेनुसार विधिमंडळाचे कामकाज चालले पाहिजे अशी या सभागृहातील सन्माननीय सदस्यांची रास्त अपेक्षा आहे. म्हणून आम्ही आपल्याकडून न्यायाची अपेक्षा करीत आहोत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या सभागृहाच्या गरिमेबद्दल चर्चा होत आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे योग्य आहे. परंतु मी त्या दिवसाच्या काही गोष्टींकडे आपले लक्ष आकर्षित करतो. आपल्या आदेशाप्रमाणे त्या दिवशी त्या चर्चेसाठी संध्याकाळी 4 ते 6 वाजेपर्यंत उत्तरासहित वेळ निश्चित करण्यात आली होती. चर्चेच्या सुरुवातीला दोन्ही बाजूचे 3-3 सन्माननीय सदस्य बोलतील असेही ठरले होते. परंतु चर्चेतील विषय अतिशय महत्वाचा होता. मुंबईतील गिरणी कामगारांच्या दृष्टीने अतिशय जिव्हाळ्याचा होता म्हणून आपण सगळयांनी माझ्यासहित दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी विनंती केली की, आणखी काही सदस्यांना बोलण्याची परवानगी दिली जावी. त्यामुळे दोन्ही बाजूच्या 2-2 सदस्यांना बोलण्याची परवानगी देण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आपण त्यावेळी उपस्थित होता आणि मी देखील उपस्थित होतो. त्यावेळी जी गोष्ट झाली ती मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. त्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

दिवशी संध्याकाळी 6.20 वाजता चर्चा संपली होती. या सभागृहाच्या सार्वभौमत्वाविषयी माझ्या मनामध्ये जराही शंका नाही. राजशिष्टाचाराप्रमाणे या सभागृहाचा सन्मान करणे आवश्यक आहे. त्या दिवशी संध्याकाळी 6.20 वाजता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्याला विचारले की, या चर्चेला उत्तर केव्हा दिले जाणार आहे ? त्यावेळी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, या चर्चेला आजच्या ऐवजी सोमवारी उत्तर देण्यात यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य असत्य बोलत आहेत. त्या दिवशी संध्याकाळी आपण सभागहाला विनंती केली होती. हे सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना आपण सांगावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आपण आदेश दिला हे खरे आहे, परंतु त्याबाबत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी तशी विनंती केली होती.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण विनंती केली होती. हे सन्माननीय सदस्यांना आपण सांगावे. उलट त्याच दिवशी उत्तर मिळावे असा आम्ही आग्रह धरला होता. ही चापलुसी आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, आपल्या हरकतीच्या मुद्यावर मी माझ्या भावना व्यक्त करणार आहे. त्या दिवशी सभागृहामध्ये जे काही झाले होते त्या संबंधी मी सविस्तरपणे सांगणार आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे माझ्याबद्दल चापलुसी असा शब्दप्रयोग करीत आहेत. मला असे वाटते की, चापलुसी हा विषय आमच्यापेक्षा तुम्हाला जास्त लागू होतो. त्याच्या डिटेलमध्ये मी गेलो तर आपण सभागृहात सुध्दा थांबणार नाही. सभात्याग करुन बाहेर जाल. परंतु आता तो विषय नाही. त्या दिवशी माननीय मुख्यमंत्री चर्चेला उत्तर देण्यासाठी तयार होते. परंतु सभागृहातून असे सांगितले गेले की, त्या चर्चेला सोमवारी उत्तर देण्यात यावे. संध्याकाळी 6 वाजेपर्यंत चर्चेसाठी वेळ दिली होती. परंतु त्यावेळी 6 वाजून 20 मिनिटे झाली होती. तेव्हा आपण असे आदेश दिले की, त्या चर्चेचे उत्तर सोमवारी दिले जाईल. तेवढीच मी दुरुस्ती करीत आहे. या सभागृहाच्या परंपरा, सन्मान, राजशिष्टाचाराबद्दल कोणाच्याही मनामध्ये शंका नाही. परंतु रेकॉर्डवर असे राहता कामा नये की,

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

त्या दिवशी सभागृहात जे झाले त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर झाले नाही. एवढेच मला बोलावयाचे होते.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या ठिकाणी दोन मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्यापैकी एक म्हणजे त्या दिवशी माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर झाले नाही आणि दुसरा असा विषय आहे की, विधानसभेच्या एका सन्माननीय सदस्यांनी जे वक्तव्य केले आहे त्याबाबत काही गोष्टी क्लिअर झाल्या नाहीत त्या होणे आवश्यक होत्या. कारण त्या सभागृहाच्या तालिका सभाध्यक्षांनी काही म्हटलेले नाही. तेथील सन्माननीय सदस्यांनी असे म्हटले आहे की, या सदनात दोन वेळा, तीन वेळा, चार वेळा, पाच वेळा निवडून आलेले अनेक सन्माननीय सभासद आहेत. त्यामुळे एखाद्या विषयासंबंधी पॉलिसी मॅटरवर चर्चा करावयाची असेल तर ती याच सभागृहात केली पाहिजे. हे खरे आहे, असत्य आहे हे तालिका सभाध्यक्षांनी किंवा विधानसभेच्या माननीय अध्यक्षांनी स्पष्ट केले पाहिजे. हा देखील तितकाच महत्वाचा मुद्दा आहे. या सभागृहाला इतके कमी लेखले जात असेल तर त्या सभागृहातील त्या सन्माननीय सदस्यांसह इतर सन्माननीय सदस्यांना सुध्दा स्पष्टपणे सांगण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी म्हटल्यावर सन्माननीय राज्यमंत्री श्री.सचिन अहिर यांनी असे म्हटले होते की, माननीय मुख्यमंत्री विधानसभेच्या सभागृहात आहेत. आपल्याला त्यांच्याकडून उत्तर घ्यावयाचे असले तरी ते आज चर्चेला उत्तर देऊ शकणार नाहीत. त्यामुळे या सभागृहात पुढे चर्चा सुरु झाली.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या सभागृहात दोन मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यापैकी एका मुद्याचे स्पष्टीकरण देऊ इच्छितो. त्या दिवशी एकाच वेळी दोन्ही सभागृहात गिरणी कामगारांच्या प्रश्नासंबंधी चर्चा सुरु झाली होती. सुरुवातीला विधानसभेमध्ये चर्चा सुरु झाली होती. त्यावेळी असे ठरविले होते की, तेथील चर्चा संपल्यानंतर व उत्तर पूर्ण झाल्यावर विधानपरिषदेच्या सभागहामध्ये संध्याकाळी 6 वाजण्यापूर्वी उत्तर दिले जावे. परंतु या ठिकाणी अधिक सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी दिली गेली त्यामुळे वेळ वाढत गेली. त्यामुळे मला संध्याकाळी 6 वाजण्याच्या सुमारास असे सांगण्यात आले की, विधानपरिषदेच्या सभागृहाकडून असा निरोप आलेला आहे की, या चर्चेला विधानपरिषदेमध्ये सोमवारी उत्तर द्यावयाचे आहे. त्यामुळे विधानसभेच्या सभागृहातील चर्चा खूप लांबली. कारण विधानपरिषदेच्या सभागृहात त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिवशी मला उत्तर द्यावयाचे नसल्यामुळे त्याचा आधारा घेतला गेला आणि चर्चा लांबत गेली. परंतु त्यातून या सभागृहाचा अवमान व्हावा, तो माझ्याकडून घडावा असे कदापिही होणार नाही. कारण संसदीय लोकशाहीमध्ये दोन्ही सभागृहे सार्वभौम आहेत, सर्वोच्च आहेत. त्यामुळे कोणत्याही सभागृहाला कमी जास्त लेखणे हे अगदीच चुकीचे आहे. माझ्याकडून तर ते कधीच घडणार नाही. विशेषत: मी स्वत: या सभागृहाचा सदस्य आहे. त्यामुळे मला आपल्याला एवढीच नम्र विनंती करावयाची आहे की, एका वेळी एखाद्या विषयावर चर्चा सुरु होते त्यावेळी ती महत्वपूर्ण चर्चा होते. परंतु दोन्ही सभागृहात एकाच वेळी चर्चा घेण्याचे ठरले होते. ती चर्चा मागे पुढे झाली असती तर अधिक चांगले झाले असते. परंतु एकाच वेळी चर्चा सुरु झाल्यामुळे वेळेचे नियमन कमी जास्त झाले आहे. असे पुन्हा घडू नये. कोणत्याही बाबतीत माझ्याकडून किंवा सरकारच्या वतीने कोणाकडूनही असे घडू नये. कोणत्याही सभागृहाला कमी जास्त लेखण्याचा प्रयत्न कधीच होणार नाही. तरी पण सन्माननीय सदस्यांच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर त्या अनवधानाने दुखावल्या गेल्या असतील, त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. या बाबत वस्तुस्थिती अशी आहे की, संसदीय लोकशाहीमध्ये विधानसभा व विधानपरिषद ही दोन्ही सार्वभौम सभागृहे आहेत. ही दोन्ही सभागृहे आपापल्या पध्दतीने स्वतंत्रपणे काम करीत असतात. एखाद्या वेळी अनवधानाने विधानपरिषदेत एखाद्या विषयासंबंधी चर्चा सुरु झाली व त्या मध्ये विधानसभेचा किंवा विधानसभेच्या सन्माननीय सभासदाचा उल्लेख झाला तरी तो उल्लेख आपण कामकाजातून काढून टाकतो. किंबहुना, त्या बाबतची चर्चा या सभागृहात होऊ नये अशा प्रकारची आपण दक्षता सुध्दा घेत असतो. विधानसभेच्या सभागृहामध्ये जी चर्चा झाली त्या संबंधी मी माननीय अध्यक्षांना पत्र लिहून त्यांचे लक्ष वेधीन. मी त्यांना असे सविस्तर लिहीन की, सभागृहात एखाद्या विषयाची चर्चा घेण्याचा हट्ट धरणे वेगळे. परंतु विधानसभेमध्ये झालेल्या चर्चेच्या वेळी एका सन्माननीय सदस्यांनी आम्ही डायरेक्ट निवडून आलो असल्याची भाषा करणे म्हणजे दुसऱ्या सर्वोच्च सभागृहाचा अवमान आहे असे मी मानतो. सन्माननीय अध्यक्षांनी या विषयासंबंधी योग्य व उचित कार्यवाही करावी अशीही मी त्यांना विनंती करीन. त्यांनी केलेली कार्यवाही मला व माझ्या माध्यमातून या सदनाला कळावी अशा प्रकारची मी कार्यवाही करणार आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रमाणित प्रत / प्रतिक्षेसाठी नाही

(माननीय सभापती.....

या बाबतीत मी सन्माननीय अध्यक्षांना पत्र लिहून यानुषंगाने उचित कारवाई करावी अशी त्यांना विनंती करीन. तसेच जी कारवाई केली जाईल ती मला आणि माझ्या माध्यमातून सदनाला कळेल या दृष्टीने मी आपणा सर्वांच्या भावना जरुर त्यांना कळवीन. दिनांक 29 जुलै 2011 रोजी गिरणी कामगारांच्या प्रश्नासंबंधीची चर्चा सायंकाळी 6 वाजून 20 मिनिटांनी संपली. संबंधित विभागाचे राज्यमंत्री त्या वेळी सभागृहामध्ये उपस्थित होते. त्यांनी त्या वेळी माझे आणि सदनाचेही लक्ष वेधले. उत्तर देण्याची त्यांची तयारी होती. परंतु एकंदरीतच या चर्चेला माननीय मुख्यमंत्र्यांनीच उत्तर द्यावे असा सभागृहाचा नूर होता. मला वाटते त्या वेळी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी हळू आवाजात किंवा मोठ्या आवाजात म्हणा, असे सांगितले की, या चर्चेला सोमवारी उत्तर दिले तरी चालेल. दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य असे बोलले. त्या वेळची जी वस्तुस्थिती होती ती मी आपणास सांगितली. सभागृहाची प्रतिष्ठा राखण्यासाठी जसे आपण सर्व सदस्य सातत्याने जागरुक असता तसा विधानपरिषदेचा सभापती या नात्याने विधानपरिषदेचे सार्वभौमत्व सातत्याने टिकावे या दृष्टीने काळजी घेणे हे माझे काम आहे. सन्माननीय मुख्य मंत्र्यांनी जे वक्तव्य केले ते मला योग्य वाटते. तेव्हा सन्माननीय सदस्य दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेला मुद्दा हा हरकतीचा मुद्दा न समजता ते माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देण्यासंबंधीचे विधान आहे असे मी समजतो.

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, विधानसभेमध्ये दिलेले उत्तर आणि विधानपरिषदेमध्ये दिलेले उत्तर या मध्ये फरक पडू शकतो. म्हणून येथे जे उत्तर देण्यात येईल ते एक धोरण म्हणून खालच्या सभागृहामध्ये जाहीर करावे, म्हणजे त्यांची तक्रार राहाणार नाही.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, शुक्रवार, दिनांक 29 जुलै 2011 रोजी या सभागृहामध्ये गिरणी कामगारांच्या अत्यंत ज्वलंत अणि जिव्हाळ्याच्या प्रश्नाबद्दल अतिशय चांगली चर्चा झाली. या ठिकाणी चर्चा होत असताना विधानसभेमध्ये देखील त्याच विषयासंबंधी चर्चा सुरु होती. त्यामुळे त्या ठिकाणी मला उपस्थित रहावे लागले होते. माझे सहकारी राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित होते. त्यांनी चर्चेची सर्व टिपणे घेतली. अधिका-यांनी देखील चर्चेची टिपणे घेतली. काल आणि परवा मी माननीय राज्यमंत्र्यांसमवेत तसेच अधिका-यांसमवेत बसून विधानपरिषदेमध्ये जी चर्चा झाली त्याबाबतीत त्यांच्याकडील टिपणांसहीत माहिती घेतली. कोणकोणत्या सन्माननीय सदस्यांनी कोणकोणते मुद्दे उपस्थित केले याची मी माहिती घेतली. ही सर्व माहिती घेऊन मी या ठिकाणी चर्चेला उत्तर देण्यासाठी उपस्थित झालो आहे.

सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे की, या प्रश्नामध्ये काही तरी मार्ग निघावा म्हणून या आधी मी अनेक वेळेला कामगारांच्या संघटना, लोकप्रतिनिधी यांच्या बरोबर चर्चा केलेली आहे. या सर्व प्रश्नांना फार मोठा इतिहास आहे. 1981-82ला गिरणी कामगारांचा संप सुरु झाला. त्यानंतर 1980च्या दशकामध्ये ब-याच घटना घडल्या, संप झाले, गिरण्या बंद पडल्या, हिंसक प्रकार झाले, काही खूनही झाले. तरीही, या बाबतीत काही तरी तोडगा निघेल आणि गिरण्या चालू होतील अशी आशा होती. संबंध महाराष्ट्रातून आलेले कामगार असतील किंवा बाहेरच्या राज्यातून आलेले कामगार असतील, त्यांचे संसार पुन्हा सुखाने चालतील, त्यांना त्यांची देणी मिळतील अशा अपेक्षेत 1980चे दशक गेले. 1990च्या दशकामध्ये हे असे कदाचित घडणार नाही अशी परिस्थिती समोर यायला लागली. मग त्यातून काही मार्ग काढून, जमीन विकली तर या गिरण्यांचे आधुनिकीकरण होईल का, जुन्या यंत्रसामग्रीच्या सहाय्याने गिरण्या चालू शकणार नाहीत म्हणून गिरण्यांचे आधुनिकीकरण केले पाहिजे, त्यासाठी पैसा कोठून येणार, त्यासाठी जमीन विकायची का, असे प्रस्ताव पुढे आले. त्यातून काही व्यवहार्य मार्ग निघाला नाही. मग गिरण्या चालणार नसतील तर कामगारांची संपूर्ण देणी देऊन टाकू आणि त्यासाठी जमिनींचा पुनर्विकास करता येईल का असाही प्रश्न पुढे आला. त्यानंतर गिरण्या पुन्हा सुरु होतील आणि गिरणी कामगारांना पुन्हा रोजगार मिळेल अशी आशा हळूहळू मावळत गेली. म्हणून काही कामगारांनी स्वेच्छेने सेवानिवृत्ती घेतली. त्या वेळेला त्यांना फार काही मोठी रक्कम मिळाली असे नाही. ब-याच कामगारांना

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

उपजीविकेचे साधन नसल्यामुळे ते आपापल्या गावी परत गेले. ज्यांच्या मुलांचे शाळेत शिक्षण झाले होते, ज्यांच्या मुलांना रोजगार मिळाला होता ते कामगार कुठे एखादी खोली मिळाली तेथे राहिले. लाखोंच्या संख्येने काम करीत असलेले कामगार देशाधडीला लागले, त्यांचे संसार उद्ध्वस्त झाले. त्यातून काय काय प्रसंग झाले हे आपणा सर्वांना माहीत आहे.

सभापती महोदय, 2000च्या दशकामध्ये पुन्हा काही तरी पर्याय काढण्यास सुरुवात झाली. पहिल्यांदा या गिरण्यांच्या जमिनींची 1/3, 1/3, 1/3 या प्रमाणे वाटणी करावी असा पर्याय पुढे आला. त्यानंतर मुंबईच्या डीसी रुलच्या नियम 58 मध्ये बदल करण्याचे ठरले. त्याबाबतीत कोर्टकचे-या झाल्या. आक्षेप घेतले गेले. शेवटी आपल्या समोर वस्तुस्थिती आलेली आहे. जो निर्णय झाला. त्या प्रमाणे गिरणीची जी इमारत असेल ती वगळून 1/3, 1/3, 1/3 जमीन वाटण्याचा निर्णय झाला. हा निर्णय योग्य होता की अयोगय होता याबाबतीत खूप चर्चा झाली. त्या वेळच्या परिस्थिती नुसार तो निर्णय घेतला गेला. त्या निर्णयाबद्दल पुन्हा टिपणी करणे उचित ठरणार नाही. त्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी टिपणी केलेलीच आहे. सभापती महोदय, आपल्या समोर आज काय वास्तव आहे ? मी या ठिकाणी झालेल्या चर्चेची माहिती घेतली. मला असे वाटले की अनेक वेळेला तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी, तत्कालीन मंत्र्यांनी विधिमंडळासमोर येऊन काही वक्तवे केलेली आहेत, भाषणे केलेली आहेत. कित्येक वेळेला आपण वास्तवापासून दूर गेलो आहोत अशी परिस्थिती समोर आली. या प्रश्नासंबंधी अनेक वेळा चर्चा केलेली आहे. संघटनेबरोबर चर्चा केली, अधिका-यांबरोबर चर्चा केली. माननीय उप मुख्यमंत्री आणि मी स्वत: 9 संघटनांच्या पदाधिका-यांबरोबर चर्चा करुन त्यांच्या मागण्या ऐकून घेतल्या. अधिका-यांकडून वस्तुस्थिती घेतली. सुरुवातीला हे तथ्य माझ्या समोर आले की, अधिका-यांमध्येच काही विसंगती होती. महानगरपालिकेचे अधिकारी, गृहनिर्माण आणि नगरविकास विभागाचे अधिकारी या सर्व अधिका-यांना एकत्र बसवून या प्रश्नाच्या संबंधातील खरी परिस्थिती सरकारसमोर आणली. आज गिरणी कामगारांच्या घराबद्दल, गिरणी कामगारांच्या समस्यांबद्दल जे काही वास्तव आहे ते आपणा सर्वांसमोर ठेवणे अतिशय गरजेचे असून ते माझे पहिले कर्तव्य आहे.

सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे की, एकूण 58 गिरण्या होत्या. 58 आजारी पडलेल्या गिरण्यांपैकी 41 गिरण्यांचे प्रस्ताव महानगरपालिकेकडे आले आणि ते मंजूर केलेले

..4..

श्री. पृथ्वीराज चव्हाण....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. त्यावेळी ठरलेल्या 1/3, 1/3, 1/3च्या सूत्राप्रमाणे म्हाडाला मिळणा-या एकूण वाट्यापैकी आतापर्यन्त 6.83 हेक्टर इतका वाटा ताब्यात आलेला आहे. हा वाटा फक्त 18-19 गिरण्यांनी दिलेला आहे. म्हाडाला मिळालेल्या वाट्यावर काही घरकुले बांधली जात आहेत. एक-दोन महिन्यामध्ये ही घरकुले बांधून पूर्ण होणार आहेत. म्हाडाच्या वाट्याला मिळणा-या जमिनीतील 2/3 जमीन गिरणी कामगारांच्या घरासाठी आणि 1/3 जमीन ट्रांझिट कॅम्पसाठी देण्याचा निर्णय झालेला होता. त्यानुसार जवळपास 6948 घरकुले गिरणी कामगारांना वितरित करण्यासाठी तयार झालेली आहेत. एक-दोन महिन्यामध्ये ती घरकुले पूर्ण होतील. ती घरे कामगारांना वितरित करणे हा महत्वाचा प्रश्न आहे. ती वेळेवर वितरित झाली नाहीत तर काय होऊ शकते हे आपणा सर्वांना माहीत आहे. उर्वरित 40 गिरण्यांच्या बाबतीत विकासाचे प्रस्ताव आलेले आहेत. काही गिरण्यामध्ये अतिरिक्त जमीन बिलकुल नाही. 8 गिरण्यांमधून 8.55 हेक्टर अतिरिक्त जमीन मिळू शकते. या गिरण्यांची जमीन मिळेल त्यावेळी त्या जमिनीवर घरकुले बांधता येतील. म्हणजे मिळालेली आणि मिळणारी अशी एकूण 15.78 हेक्टर जमीन आहे. एवढीच जमीन कापड गिरण्यांच्या जमिनीच्या पुनर्विकासातून उपलब्ध होणार आहे.

...नंतर श्री. खेर्चे....

अधिकृत पत्र / प्रतिक्षेसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

ढोबळमानाने यामध्ये सरासरी वाटण्याकरिता आता जवळपास 7 हजार घरे आणि होऊ घातलेली 9 हजार घरे अशी एकूण 16 हजार घरे उपलबध होणार आहेत.

प्रश्न असा निर्माण होतो की, याव्यतिरिक्त घरांबाबत काय करावयाचे किंवा ही 7 हजार घरे कशी वाटप करायची, ती वाटप केल्यानंतर पुढची होऊ घातलेली 9 हजार घरे बांधायची की नाही ? मी यासंदर्भात माजी मुख्य मंत्र्यांची गेल्या दोन दिवसात भेट घेऊन त्यांच्याकडून माहिती घेतली. त्यांनी सांगितले की, पूर्वी असे स्पष्टपणे ठरले होते की, जी जमीन उपलब्ध होईल त्यातून गिरणी कामगारांच्या गृह निर्माण संस्थांना जमीन द्यावी व त्या जमिनीवर त्यांनी घरे बांधावीत असे प्रस्ताव होते. पण त्यावेळेस गिरणी कामगारांनी सांगितले की, जमिनीवर घरे बांधायला आम्हाला जमणार नाही. म्हणून "ना नफा ना तोटा" या तत्वावर त्या जमिनीवर घरे बांधण्याची जबाबदारी शासनाने म्हाडावर टाकली व म्हाडाने ती जबाबदारी स्वीकारली. अशा प्रकारे एकूण घरकुलांसाठी किती जमीन मिळण्याची शक्यता आहे ही परिस्थिती सभागृहासमोर आहे. अजून काही गिरण्यांचे विकास प्रस्ताव मंजूर होऊन सुध्दा देऊ केलेली जमीन दिलेली नाही. त्यासंदर्भात मी मागेच निर्णय घेऊन सांगितले होते की, येत्या तीन महिन्याच्या आत या गिरण्यांनी शासनाकडे ही जमीन हस्तांतरित केली पाहिजे, अन्यथा त्या जमिनीवर त्यांना कोणताही विकास करु दिला जाणार नाही, परंतु हे वास्तव जे आहे ते संपूर्ण जमीन विचारात घेऊन फक्त 16 हजार घरांचेच आहे हे मला सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे. यासंदर्भात चर्चा झाल्यानंतर अनेक प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले. त्यातील सर्वात जास्त चांगला व व्यावहारिक प्रस्ताव सुध्दा शासनाकडे आलेला आहे.

महोदय, मी कालच खालच्या सभागृहात सांगितले व त्यानंतर गेल्या दोन दिवसांत गिरणी कामगारांशी माझी चर्चा झाली व त्यामुळे काही गैरसमज सुध्दा झाले ते म्हणजे मी सभागृहाच्या बाहेर काही घोषणा केल्या. पण मी गिरणी कामगारांच्या जवळपास 9 संघटनांशी चर्चा केली तेव्हा माननीय राज्य मंत्री श्री. सचिनभाऊ अहिर हे माझ्यासोबत होते. काही दिवसांपूर्वी गिरणी कामगारांशी चर्चा करण्यासाठी शासनाने एक समिती नेमली होती. त्या समितीमध्ये माननीय महसूल मंत्री श्री. बाळासाहेब थोरात, माननीय राज्य मंत्री श्री. सचिन अहिर यांच्यासह काही अधिकारी सुध्दा होते. त्यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे चर्चा करुन खरी परिस्थिती पुढे आणण्यासाठी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मदत केली होती. काल माननीय उप मुख्यमंत्री व माननीय महसूल मंत्री चर्चेच्या वेळी उपस्थित नव्हते, माननीय राज्य मंत्री श्री. सचिन अहिर हे मात्र उपस्थित होते. आम्ही गिरणी कामगार संघटनांशी यासंदर्भात चर्चा केली. चर्चेच्या सुरुवातीलाच मी सांगितले की, विधान मंडळाचे अधिवेशन चालू आहे, तसेच मला या प्रश्नाच्या संदर्भात अद्याप विधान परिषदेत शासनाच्या वतीने उत्तर द्यावयाचे आहे, त्यामुळे मला येथे काहीही सांगता येणार नाही. फक्त विधानसभेत मी जे विधान केले त्याचीच माहिती आपल्याला देऊ शकेन. तसेच त्याबाबतची अधिकृत टिप्पणी सुध्दा देईल.

या अनुषंगाने मी आणखी एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मध्यंतरी ही घरे कशी वाटायची, गिरणी कामगारांपैकी किती हयात आहेत यासंबंधीची अधिकृत माहिती घ्यावी म्हणून म्हाडाच्या माध्यमातून अर्ज मागविण्यात आले होते. ते अर्ज मागवित असताना घरकूल वितरणाच्या नियमानुसार म्हाडाने जे नियम तयार केले आहेत त्यांचा आधार घेऊन हे अर्ज मागविण्यात आले. त्यात काही जुन्या कामगारांनी अर्ज केले तर काही सन 2000 च्या कामगारांनी अर्ज केले. अशा प्रकारे 1.10 लाख कामगारांचे अर्ज प्राप्त झाले. त्या सर्व अर्जांची छाननी करण्यात आली. त्यामध्ये म्हाडाच्या ज्या अटी असतात त्या स्वाभाविकपणे होत्याच. अशा सर्व अर्जांचे विश्लेषण संगणकाच्या माध्यमातून केले आणि प्रत्येक गिरणीत किती कामगारांनी अर्ज केले, त्या गिरण्यांमध्ये किती जमीन उपलब्ध झालेली आहे, त्या गिरणीमध्ये किती घरकुले बांधलेली आहेत यासंबंधीची सविस्तर टिप्पणी शासनाकडे आहे. या निमित्ताने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, एकूण 18 गिरण्यांकडून घरकुलांसाठी जमीन मिळाली असून त्या ठिकाणी घरकुले बांधण्याचे काम सुरु झालेले आहे. त्या गिरण्यांमध्ये अर्ज मिळाल्याची संख्या 34684 एवढी आहे. याच 18 गिरण्यांमध्ये 6948 घरकुले बांधली गेली आहेत. त्या गिरण्यां म्हणजे अपोलो मिल्स, एलफिन्स्टन मिल्स, इंडिया युनायटेड दोन व तीन, ज्युपिटर, कोहिनूर, मुंबई मिल्, न्यू इंडिया, बॉम्बे डाईंग, पिरामल, श्रीनिवास, सिम्प्लेक्स, स्टॅन्डर्ड प्रभादेवी, स्टॅन्डर्ड शिवडी, स्वदेशी अशा 18 आहेत व त्यात 6984 घरकुले व अर्जांची संख्या 34684 आहे. प्रत्येक मिलमध्ये किती अर्ज आलेले आहेत उदा. अपोलो गिरणीमध्ये 1518 आणि एलफिन्स्टन मिलमध्ये 1342 अर्ज घरांसाठी आलेले आहेत.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इंटरेस्टींग बाब अशी आहे की, काही गिरण्यांमध्ये उदा. कोहिनूर मिलमध्ये पात्र अर्जदार आहेत, अर्थात पात्रतेच्या अटी लावायच्या की नाही हा विषय नंतर येणार आहे. पण मुंबई मिलमध्ये घरकुलांची संख्या 1177 आहे व अर्ज फक्त 500 ते 600 एवढेच आले. जर आपण मिलवाईज घरांचे वितरण करण्याचे ठरविले तर मुंबई मिलच्या सर्वच अर्जदारांना घरकुले मिळतील. त्याचप्रमाणे कोहिनूर मिलच्या 291 कामगारांनी अर्ज केले आहेत त्यांना सर्वांनाच घरे मिळू शकतील. या तत्वाने विचार केला तर काही ठिकाणी निम्मी तर काही ठिकाणी 75 टक्के घरे मिळतील, पण हा विषय फक्त 18 मिलपुरताच आहे. इतर 75 हजार अर्ज आहेत, त्यांच्याकडून तर अजून जागा मिळालेलीच नाही. त्यापैकी आठ मिलकडून जमीन मिळण्याची शक्यता आहे. त्यात प्रभात कॉटन, भारत मिल्स, हिंदुस्तान अ व ब, सेंच्युरी, बॉम्बे डाइंग, न्यू ग्रेट इंडिया, भारत, सेच्युरी मिल्स, बॉम्बे डाईंग (2), रुबी मिल्स आणि श्रीनिवासन मिल्स अशा 8 गिरण्यांमधून ही जागा मिळणार आहे. याव्यतिरिक्त कुठलीही जमीन मिळणार नाही. ही वर्गवारी निश्चित करताना लॉटरी पध्दतीने घरे द्यावीत की त्या त्या मिलमध्ये काम करणाऱ्या लोकांना घरांचे वाटप करावे अथवा त्या त्या मिलपुरती लॉटरी काढावी याबाबत सर्वांचे एकमत झाले तर शासनाला अडचण वाटण्याचे कारण नाही.

महोदय, घरांसाठी अर्ज स्वीकारताना आपण ज्या पाच अटी घातल्या होत्या त्या म्हणजे मासिक उत्पन्न 12 हजारपेक्षा जास्त असू नये, मुंबईत त्या व्यक्तिच्या नावावर घर असता कामा नये, कट ऑफ डेट सन 2000 ची धरावी की सन 1982 ची धरावी, अधिवासाचे प्रमाणपत्र आणि शेवटची अट म्हणजे वारसांना हक्क द्यावयाचा की नाही. मी खालच्या सभागृहात हेच सांगितले आणि कामगारांशी चर्चा करताना सुध्दा सांगितले. एका बाजूला वास्तवत: 1.10 लाख अर्ज घरकूल मिळण्यासाठी प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी फक्त 16 हजार घरे देता येतील, नंतरच्या काळात काही उपाययोजना करता येतील काय तो वेगळा विषय आहे. एकूण 34 हजाराची संख्या विचारात घेतली आणि सन 1999 ची अट घातली तर 34 हजार ही संख्या 19 हजारावर येईल. त्यात अधिवासाच्या प्रमाणपत्राची अट टाकली तर ही संख्या 13 हजारावर येईल. उत्पन्नाची अट घातली तर तीच संख्या 11 हजारावर येईल. मुंबईत स्वत:चे घर नसावे या अटीचा विचार केला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तर ही संख्या 10 हजारावर येईल. शेवटी आकडा 34 हजार ठेवायचा की कुठल्या अटी स्वीकारायच्या याचा निर्णय सर्वांना विश्वासात घेऊनच घ्यावा लागेल. तसेच 1.10 लाख कामगारांना घराचे वाटप लॉटरी पध्दतीने करावयाचे की 34 हजार अर्जांचाच विचार करावा यासाठी देखील सर्वांना विश्वासात घेण्यात येईल. यामध्ये वास्तव मात्र 16 हजार घरे नजरेसमोर ठेवणे आवश्यक आहे, हे विसरता येणार नाही. म्हणून मी खालच्या सभागृहात सांगितले होते की, या बाबतीत फक्त कामगार संघटनांशी चर्चा करुन चालणार नाही तर सर्वच राजकीय पक्षाच्या गट नेत्यांशी चर्चा करावी लागेल. त्यात ज्या पाच अटी आहेत त्यांच्या संदर्भात मार्गदर्शन घ्यावे लागणार आहे. तसेच यातील कोणत्या अटी शिथिल करता येतील याचाही विचार सर्वांनाच करावा लागेल. मग सन 1982 च्या कट ऑफ डेटची अट असेल, वारसांच्या हक्काची अट असेल, डोमिसाईल सर्टिफिकेटची अट असेल या सर्वच बाबतीत सर्वांचेच मार्गदर्शन मला पाहिजे. या सर्व अटी स्वीकारावयाच्या असतील तर त्याचा परिणाम एकच होणार आहे म्हणून लॉटरी काढताना कमी संख्येची काढावयाची की जास्तीत जास्त संख्येची काढावयाची याचाही निर्णय घ्यावा लागणार आहे. मी आपल्या माध्यमातून सभागृहाला अशी विनंती करतो की, दोन्ही सभागृहातील सर्व पक्षाच्या गट नेत्यांशी चर्चा करुन या पाच सहा मुद्यांवर निर्णय घेण्यात येईल व त्यामध्ये आपणा सर्वांचे मार्गदर्शन आवश्यक आहे. आपण जे मार्गदर्शन कराल त्या पध्दतीने पुढे जाता येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अधिकृत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

सभापती महोदय, आपण त्यावेळेस वारसांचे अर्ज स्वीकारले नव्हते. वारसांचे अर्ज स्वीकारावयाचे असतील तर त्यासंदर्भात दोन तीन महिन्यात सर्व प्रक्रिया पूर्ण करुन आपल्याला वारसांचे अर्ज स्वीकारावे लागतील. गिरणी कामगारांसाठी घरे तयार होण्यास अजून दोन तीन महिने लागतील. घरे तयार झाल्यानंतर ते त्वरित हस्तांतरित झाले पाहिजे अशी शासनाची इच्छा आहे. घरे तयार झाल्यानंतर ते गिरणी कामगारांना त्वरित हस्तांतर झाले नाही तर त्यामध्ये वेगळे प्रकार घडण्याची शक्यता आहे. आता शेवटचा प्रश्न घरांच्या किमतीचा राहिलेला आहे. घरांच्या किमतीच्या संदर्भात काही वक्तव्ये करण्यात आली होती व त्याचे स्पष्टीकरणही झाले होते. जमीन मोफत दिली जाईल ही मूळ कल्पना यासंदर्भात होती. त्या त्या गिरण्यांच्या माध्यमातून जी जमीन उपलब्ध होईल तिचा कोणताही मोबदला न घेता ती दिली जाईल व त्या जमिनीवर गृहनिर्माण संस्था स्वत:च्या खर्चाने बांधाव्यात अशी मूळ कल्पना होती. त्यामध्ये घरे बांधून देण्याची कोणतीही कल्पना नव्हती. परंतु पुढे घरे बांधण्याची जबाबदारी म्हाडाने स्वीकारली. ना नफा, ना तोटा तत्वावर घरे बांधावीत अशा प्रकारचे वक्तव्ये त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांनी केले होते. मंत्रिमंडळाच्या समितीमध्ये मोफत घरे देण्याचा प्रयत्न करु अशा प्रकारची वक्तव्ये करण्यात आली होती. परंतु त्यावेळच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण दिले होते की, मोफत घरे देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या समितीमध्ये झालेला नाही. त्यामुळे हा विषय त्या ठिकाणी संपला होता. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात अधिक स्पष्टता असणे आवश्यक आहे. मला असे वाटते की, पहिल्यांदा 7000 अधिक 9000 घरांचा प्रश्न आपल्याला सोडवावा लागणार आहे.

खरे म्हणजे गिरणी कामगारांनीच मुंबईला घडवले आहे. हे गिरणी कामगार नोकरीच्या आमिषाने मुंबईत आले होते. गावातील घरे दारे सोडून ही माणसे मुंबईत आली होती. या गिरण्यांतील कित्येक गिरणी कामगार माझ्या गावचे आहेत, माझ्या शहराच्या जवळचे आहेत, जवळच्या नात्यातील आहेत. हे कामगार माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या जवळचे सुध्दा आहेत. प्रत्येकाच्या जवळची ही माणसे आहेत. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे या ठिकाणचे हे सर्व गिरणी कामगार आहेत. हे सर्व कामगार आपले आहेत. खरे म्हणजे या गिरणी कामगारांनीच मुंबई निर्माण केलेली आहे. त्यावेळेस हे कामगार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

कशा प्रकारे काम करीत होते, कशा प्रकारे मनी ऑर्डरवर अर्थव्यवस्था चालत होती याची आपल्याला कल्पना आहे. मुंबईची एसटी मुक्कामाला आली तर सणासुदीसारख्या गुढ्या लावून स्वागत होत असे. एसटी गावात आली हाच खरा आनंद होता. एसटी कंडक्टर हा गिरणी कामगारांमधील व त्यांच्या कुटुंबा मधील दुवा असायचा. गिरणी कामगारांसाठी शासनाच्या वतीने जे काही करता येईल ते केले पाहिजे अशी आपल्या सर्वांची भूमिका आहे व ही भूमिका आपल्या सर्वांच्या भाषणातून आल्याचे मी पाहिलेली आहे. यासाठी आपल्याला काही पर्याय तयार करावे लागतील व हे सर्व पर्याय मी गटनेत्यांच्या बैठकीमध्ये ठेवेनच. या प्रश्नाच्या संदर्भात खूप पर्याय आहेत. परंतु लागलीच मार्ग निघेल अशी वस्तुस्थिती नाही.

मी आपल्याला सांगू इच्छितो की, लाख, सव्वा लाख घरे एका हेक्टरमधून तयार होतील असा ढोबळ अंदाज केला तर त्यासाठी आपल्याला मुंबईतील 125 ते 150 हेक्टर जमीन लागेल. ही सर्व जमीन मुंबईत सहज उपलब्ध होईल अशी परिस्थिती नाही. एमएमआरडीएकडून जमीन उपलब्ध होऊ शकेल काय याचाही आपल्याला विचार करावा लागणार आहे. एसआरए मधून घरे देण्याचा प्रस्ताव काहींनी पुढे आणला होता. परंतु हा प्रश्न अत्यंत गुंतागुतीचा असल्यामुळे एसआरएचा अधिकार एका विशिष्ट वर्गाला देता येईल की, नाही हे आपल्याला तपासून पहावे लागणार आहे. गृहनिर्माण संस्था आपल्या जिल्हयात करता येईल काय या दृष्टीने हे जे प्रस्ताव आहेत ते आपल्याला तपासून पहावे लागणार आहेत. हा प्रश्न अत्यंत धिम्या पध्दतीने सुटणार आहे. सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात सूचना केल्या तर त्याचा निश्चितपणे सकारात्मक रीतीने विचार करण्यात येईल. या प्रश्नाच्या संदर्भात मी सभागृहाला तसेच राज्यातील जनतेला सांगू इच्छितो की, आजची जी वास्तव स्थिती आहे तिच्या चौकटीत राहून आपल्याला निर्णय घ्यावा लागणार आहे. आपण यासंदर्भात ज्या सूचना कराल त्या चौकटीत राहून निश्चितपणे स्वीकारल्या जातील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात सभागृहाच्या बाहेर कोणत्याही प्रकारचे आश्वासन दिलेले नाही, विचार मांडलेले नसल्यामुळे खरे म्हणजे आपण मला यासंदर्भात धन्यवाद दिले पाहिजे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या प्रकारचे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, विनोद तावडे, किरण पावसकर, रामदास कदम, श्रीमती अलका देसाई, डॉ. नीलम गो-हे, श्रीमती विद्या चव्हाण तसेच सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी विचार मांडलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्यासंदर्भात आपण तसेच माननीय सभापती महोदय, सांगतील त्या दिवशी गट नेत्यांची बैठक घेण्यात येईल. पहिल्या टप्प्यात जी घरे बांधून झालेली आहेत ती हस्तांतरित करण्याचा प्रथम निर्णय घेऊ व जे काही प्रश्न चिन्ह आहेत ते संपवून टाकू अशी विनंती करतो व आपली रजा घेतो.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : नियमा प्रमाणे ही चर्चा आता संपलेली आहे. ही चर्चा नियम 97 अन्वये असल्यामुळे या चर्चेनंतर भाष्य करता येत नाही, किंवा ज्यांनी चर्चा उपस्थित केलेली आहे त्यांना नंतर त्यावर विचार मांडता येत नाहीत. परंतु सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मला विनंती केल्यामुळे मी अपवाद म्हणून त्यांना दोन मिनिटे बोलण्याची संधी देत आहे.

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. मी एवढयासाठी बोलण्याची संधी मागितली आहे की, गेल्या 10-12 वर्षापासून विरोधी पक्षाच्या बाकावर आम्ही बसत आलेलो आहोत. परंतु या कालावधीत ठोस भूमिका शासनाने घेतली आहे असे आम्हाला कधीही दिसले नाही. परंतु माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी गिरणी कामगाराच्या बाबतीत ठोस भूमिका घेतल्याचे आम्हाला जाणवले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या आजच्या उत्तरामधून गिरणी कामगारांच्या प्रश्नाची तड लागेल असा संदेश त्यांच्या उत्तरामधून मिळालेला असल्यामुळे त्याबाबत समाधान व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सव्वालाख गिरणी कामगारांना घरे देण्याच्या संदर्भात मानसिकता व्यक्त करणे हे खरे म्हणजे धाडसाचे काम आहे. घरे कशा प्रकारे द्यावयाची यासाठी सर्व पक्षाच्या नेत्यांना एकत्र करण्याच्या संदर्भात त्यांनी घोषणा केलेली असली तरी सर्व पक्षांनी एकत्र येऊन गिरणी कामगारांना घरे दिली पाहिजे याबाबत त्यांनी जी भूमिका घेतलेली आहे त्यामध्ये त्यांनी कोणताही राजकीय अभिनिवेश न ठेवता भावना व्यक्त केल्याबद्दल मला माननीय मुख्यमंत्र्यांना धन्यवाद द्यावयाचे आहेत. विरोधी पक्षाला बरोबर घेऊन काम करण्याची इच्छा शक्ती असल्यानंतर जटीलातील जटील प्रश्न सोडवता येतात ही जी मानसिकता त्यांनी दाखवली त्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो. विरोधी पक्षातील असलेला चांगुलपणा बघण्याची इच्छाशक्ती आम्हाला माननीय मुख्यमंत्र्यांच्या आजच्या उत्तरामधून दिसून आलेली आहे.

सभापती महोदय, गिरणी कामगारांना घरे मिळावीत यासाठी मी श्रीमती जयश्रीताई खाडिलकर यांना मनापासून धन्यवाद देणार आहे. विखुरलेल्या संस्था मधून त्यांनी भांडणा-या कामगारांना एकत्र आणले एवढेच नाही तर त्या स्वत: नेतृत्व करुन या प्रश्नाच्या संदर्भात त्या माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यंत्री, शिवसेनेचे कार्यकारी अध्यक्ष, नवनिर्माण सेनेचे

श्री. दिवाकर रावते....

कार्याध्यक्ष तसेच आरपीआयच्या अध्यक्षांना भेटल्या. त्यांनी गिरणी कामगारांचा प्रश्न कोणत्याही एका झेंडयाचा किंवा पक्षाचा नसून तो सर्वांचा आहे हे दाखवून दिले. त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. अग्रलेखातून ते यासंदर्भात आपले मत मांडतीलच. हा विषय आमच्या पक्षाच्या कार्यकारी अध्यक्षांकडे आल्यानंतर या प्रश्नाच्या संदर्भात मी केवळ पाठींबा नाही तर कृतीमध्ये तुमच्या बरोबर असेन अशा प्रकारचा शब्द दिला होता व तो शब्द त्यांनी पाळूनही दाखवला आहे. त्याच्याही पुढे जाऊन हे अटीतटीचे युध्द आहे, शेवटची लढाई आहे, आता नाही तर पुन्हा कधीच नाही या भावनेतून शिवसेनेने 1 ऑगस्ट,2011 रोजी बंदचे आवाहन केले होते ते त्यांनी मागे घेतलेले आहे.1 ऑगस्टचा बंद न करण्याच्या बाबत आमच्या कार्यकारी अध्यक्षांचे मन आपल्या कृतीतून वळवल्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्र्यांना धन्यवाद देतो. माननीय मुख्यमंत्री विधानसभेत उत्तर देऊन थांबले नाही तर त्यांनी विविध संघटनांबरोबर या विषयाच्या संदर्भात चर्चा केली. या प्रश्नाच्या संदर्भात त्यांनी बाहेर कोठेही उल्लेख न करता या सभागृहात माहिती दिलेली आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी गिरणी कामगारांच्या प्रश्नाच्या संदर्भात महाराष्ट्रासाठी फार मोठे कार्य केलेले आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

मागे अधिवेशन सुरू असताना एका माननीय मुख्यमंत्र्यांना गोवारी प्रकरणात जावे लागले होते. तशाही प्रकारचा उद्योग काही जणांनी केला असता. पण आपण सकारात्मक भूमिका घेऊन त्यावर पाणी सोडण्याचे काम केले. 1 तारखेला मुंबई बंद न होण्याची मुख्यमंत्री म्हणून आपली भूमिका होती. त्याचा मी येथे नामोल्लेख करतो. या सदनामध्ये आमच्या भावना व्यक्त झाल्या. त्यात सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी सर्वसमावेशक भूमिका मांडली. त्याचा देखील आज आदर

झाला. जमीन कोठून आणायची या संबंधीचा तोडगा बैठकीमध्ये निघेल. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई आज आमच्या समोर आहेत. ज्या भगिनींनी गिरणी संपामुळे उद्ध्वस्तता भोगली होती ती उद्ध्वस्तता सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांच्या नशिबी आली होती. त्या आज येथे आहेत. त्यांनी गिरणी कामगारांची उद्ध्वस्त कुटुंबे पाहिलेली आहेत. मला हे मांडताना देखील आज वेदना होत आहेत. पण एक समाधानाची बाब अशी आहे की, उद्ध्वस्ततेला सावरून आज श्रीमती अलका देसाई ह्या सभागृहाच्या सन्माननीय सदस्या आहेत. कामगारांना न्याय देण्याची भूमिका माननीय मुख्यमंत्री मांडत असताना आज त्या सभागृहात असणे ही त्यांच्या जीवनातील फार मोठी उपलब्धी असेल असे मला वाटते.

1 लाख 10 हजार गिरणी कामगारांना घरे देण्याची मानसिकता आज माननीय मुख्यंत्र्यांनी दाखविलेली आहे. ती स्वागतार्ह आहे. ती घरे कशी द्यायची हा नंतरचा भाग आहे. म्हणून आम्ही समाधान व्यक्त करीत आहोत, अभिनंदन करत नाही. आपण आपले अभिनंदन करण्याची संधी लवकरात लवकर दिली तर त्याचा आनदं होईल. आदरणीय कार्यकारी अध्यक्ष यांच्यावतीने पुढच्या कामासाठी मी आपल्याला मन:पूर्वक शुभेच्छा देतो व आपल्याला आमच्याकडून सहकार्य उपलब्ध होईल हे मी आपल्याला जाणीवपूर्वक सांगतो. धन्यवाद.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, अतिशय जिव्हाळ्याच्या आणि गंभीर अशा प्रश्नाबाबत शासनाने घेतलेल्या भूमिकेबद्दल मी शासनाचे आभार मानतो. शासनाने घेतलेली भूमिका आणि आदरणीय मुख्यमंत्र्यानी घेतलेला वस्तुस्थितीचा आढावा ...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा आक्षेप आहे.

श्री.भाई जगताप : आपला आक्षेप माननीय सभापतींनी स्वीकारू द्या. आपण सांगितले म्हणून आक्षेप होत नाही.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना विचारू इच्छितो की, मी आपल्याला बोलण्यास अनुमती दिली आहे काय ? आपण आधी अनुमती मागावी आणि मी अनुमती दिली तर आपण बोलण्यास उभे रहावे. त्यामुळे आता सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी कृपा करून खाली बसावे. कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी बोलण्यासाठी परवानगी मागितली तर ती मी देत नाही काय ? मी नेहमीच परवानगी देतो. अचानक बोलण्यासाठी उठणे ही पद्धत बरोबर नाही. आपला हरकतीचा मुद्दा आहे काय ?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझी एकच मागणी आहे. विरोधी पक्षा तर्फे प्रस्ताव आला होता. ज्यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे,त्यांनाच रिप्लायवर बोलण्याची संधी मिळते. सन्माननीय मुख्यमंत्र्यांना देखील जायचे आहे. कधी थांबायचे याला देखील काही प्रथा आहे. मी या प्रस्तावावर बोललो नाही. वेळ वाटून दिला होता म्हणून मी बोललो नाही. मी देखील एक तास बोलू शकतो. विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर बोलण्याची प्रथा या सभागृहात सुरू झाली असेल तर पुढच्या प्रस्तावावर देखील बोलण्याची संधी आम्हाला येथे मिळाली पाहिजे एवढेच मी रेकॉर्डवर आणत आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या प्रश्नावर आदरणीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. एक अपवादात्मक बाब म्हणून माननीय सभापतींनी त्यास मान्यता दिली. गिरणी कामगारांशी सगळ्यांचाच संबंध आहे. एका गंभीर प्रश्नासंबंधी शासनाने आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रामाणिकता दाखविल्यामुळे मी आभार व्यक्त करीत असताना एका गोष्टीकडे मला नक्कीच लक्ष वेधावे लागेल. गिरणी कामगारांच्या सगळ्या 9 संघटना एकत्रित आल्या. येथे मला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

आदरणीय राज्य मंत्री श्री.सचिन अहिर यांचे देखील आभार मानावे लागतील. गिरणी कामगारांचा लढा विखुरला होता. सर्व गिरणी कामगारांना एकत्रित करण्याची भूमिका आपण घेतली. 9 संघटना एकत्रित येऊन त्यांनी हा निर्णय घेतलेला आहे की, अशा प्रकारे या प्रश्नाची उकल व्हावी. 1 लाख 10 हजार गिरणी कामगारांना घरे देण्यासंबंधीच्या प्रश्नावर जो वस्तुस्थितीवर आधारीत असा मिलाफ केला आहे, त्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो. गिरणी कामगारांना 225 चौ.फुटाचे घर देण्यात येणार आहे. घरांच्या किंमती कमी करण्याचा विचार शासन करणार आहे. त्यासंबंधी मला एकच सांगावेसे वाटते की, वाजवी किंमतीमध्ये घर देण्याचे आपण मान्य केले आहे. त्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन्ही सभागृहामध्ये घोषणा केली आहे. आपण 225 चौ.फुटाचे घर देणार आहात, त्यामुळे त्याचे लोडिंग किती असू शकते याचा विचार शासनाने आणि प्रशासनाने करावा एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी परवानगी घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत. प्रस्ताव विरोधी पक्षाचा होता. राईट ऑफ रिप्लाय त्यावर नव्हता. असे असताना माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी माननीय सभापती यांची परवानगी घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. याचा अर्थ हा नव्हे की, विरोधी पक्षाचा प्रस्ताव असताना सर्वांनाच बोलण्यास परवानगी द्यावी. मग आम्हाला आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना देखील बोलावे लागेल. ही पद्धत पुढच्या दृष्टीने चांगली नाही.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

उप सभापती : येथे प्रश्न आभाराचा आहे. मी थोडक्यात सभागृहाला अवगत करतो.

आभाराचा भार कशाला,
सत्काराचा हार कशाला,
घर जर बांधायचे प्रमाचे,
तर हृदयाला दार कशाला.

आपणही जरूर बोलावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सर्व पक्षीय समिती नेमण्यात येईल असे येथे सांगण्यात आले. त्या समितीमध्ये मी कदाचित असेनही, नसेनही. त्यामुळे मी येथे दोन-तीन सूचना करणार आहे. राष्ट्रीय वस्त्रद्योग मंडळाचे काम सुरू आहे. नुकतीच केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांनी घोषणा केली. देशातील आजारी असलेल्या गिरण्या व्यवस्थित चालवून त्यांना न्याय देण्याचे काम वस्त्रोद्योग महामंडळाने केले पाहिजे. प्रभादेवी येथे पाच गिरण्या आहेत. त्या गिरण्या वस्त्रोद्योग महामंडळाच्या ताब्यात आहेत. त्या गिरण्याची 45 एकर जागा आहे. ही जागा राज्य शासनाने ताब्यात घेऊन ती गिरणी कामगारांसाठी घरे बांधण्यासाठी दिली तर तेथे निश्चितच चांगली घरे बांधली जाऊ शकतील.

केंद्र शासनाचे दोन लाख रूपयाचे अनुदान आहे. ते अधिक वाढविणे आवश्यक आहे. आपण जर माननीय पंतप्रधानांना भेटलात तर ते अनुदान वाढवून मिळू शकेल. तेवढी क्षमता आपल्यामध्ये असल्यामुळे मी हे सांगत आहे.

आज बिल्डर्स मोठ्या प्रमाणात जागा खरेदी करत आहेत. एका एकरसाठी 100 कोटी या दराने, तर काही ठिकाणी एका एकरसाठी 200 कोटी या दराने जागा बिल्डर्सनी विकत घेतलेल्या आहेत. अशा बिल्डर्सवर आपण टॅक्स लावला व तो पैसा वसूल केला तर निश्चितपणे गिरणी कामगारांची घरे बांधण्यासाठी आपल्याला निधी मिळू शकेल. महाराष्ट्र शासन म्हणून आपण थोडेसे अनुदान दिले तर निश्चितपणे आपण गिरणी कामगारांना मोफत घरे देऊ शकतो. म्हणून माझ्या या 3-4 सूचनांचा आपण गांभीर्याने अभ्यास केला तर निश्चितपणे 1 लाख 10 हजार गिरणी कामगारांना न्याय देऊ शकतो.

शासन भाड्याने घरे देण्यासाठी 5 लाख घरे बांधणार आहे. त्यामधील काही घरे गिरणी कामगारांना देण्याचा निर्णय घेतला तर 1 लाख 10 हजार गिरणी कामगारांना निश्चितपणे न्याय मिळेल.

यानंतर श्री.सरफरे...

अधिकृत मत / अभिप्रायासाठी नाही

श्री. रामदास कदम...

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी मांडलेल्या भूमिकेप्रमाणे गेल्या 30 वर्षापासून हा विषय सुरु होता. या राज्यामध्ये अनेक मुख्यमंत्री होऊन गेले परंतु खऱ्या अर्थाने या विषयाला न्याय देण्याची भूमिका घेऊन आपण एक समिती नियुक्त करण्याचा निर्णय घेतला. आणि टाकण्यात आलेल्या पाच अटींचा पुनर्विचार करण्याची भूमिका घेतली. मी या ठिकाणी पाच गंभीर स्वरुपाच्या सूचना केल्या आहेत त्यांच्याही बाबतीत आपणाकडून विचार होईल अशी अपेक्षा व्यक्त करुन पुन्हा एकदा आपणास धन्यवाद देतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रस्तावावर राईट ऑफ रिप्लाय देण्याची पध्दत नाही. मी पावसामुळे ट्रॅफिकमध्ये अडकल्यामुळे दूरध्वनीवरुन सन्माननीय सभापतींकडे परवानगी मागितल्यानंतर व या ठिकाणी आल्यानंतर सन्माननीय सभापतींकडे जाऊन त्यांना पुन्हा विनंती केली. सन्माननीय सभापतींनी मला अशाप्रकारे परवानगी देता येणार नाही असे सांगितले. गेल्या 12 वर्षामध्ये पहिल्यांदाच असे घडत असल्यामुळे सन्माननीय मुख्यमंत्र्यांना धन्यवाद देण्यासाठी मी आपणाकडे परवानगी मागितल्यानंतर आपण अपवादात्मक परिस्थितीमध्ये तशी परवानगी दिली. समोरच्या बाकावरुन सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना परवानगी दिल्यानंतर आमच्याकडून सन्माननीय सदस्य श्री. रामदासभाई कदम यांना देखील बोलण्याची संधी मिळाली. खरे म्हणजे या विषयावर सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी भावना व्यक्त करावयाच्या होत्या. परंतु या सभागृहामध्ये पहिल्यांदाच सन्माननीय मुख्यमंत्री लाखो कामगारांबाबत सद्भावना व्यक्त करीत असतांना त्यांना धन्यवाद देण्यापुरता मर्यादित विषय असतांना आपण जर सर्वच सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी देत असाल तर आमच्याकडून देखील आम्ही बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांच्या नावांची यादी सादर करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खरे म्हणजे या प्रस्तावावरील चर्चेला सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सुरुवात केली होती. सभागृहाच्या प्रथेनुसार राईट ऑफ रिप्लायची पध्दत नसतांनाही सन्माननीय सभापतींची परवानगी घेऊन त्यांनी वक्तव्य केले आहे. या राज्यातील गिरणी कामगारांच्या जिव्हाळयाचा हा प्रश्न आहे. सन 1982 मध्ये पहिला संप झाला त्यावेळी मी विधानसभेमध्ये सदस्य म्हणून काम करीत होतो. तेव्हा पासून या राज्यामध्ये हा प्रश्न चिघळत राहिला. या राज्यामध्ये नवीन मुख्यमंत्री आल्यानंतर त्यांनी या प्रश्नाला हात घातला. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ AKN/

श्री. पांडुरंग फुंडकर ....

गिरणी कामगारांच्या घराच्या प्रश्नासंबंधी श्रीमती जयश्री खाडिलकर यांनी सर्व विरोधी पक्षांना एकत्र आणून मोर्चाचे आयोजन केले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. सर्व कामगार संघटना विभागलेल्या असतांना त्या सर्वांना एकत्र करुन गिरणी कामगारांचा हा प्रश्न सुटला पाहिजे या करिता त्यांनी मोर्चाचे आयोजन केल्यानंतर खऱ्या अर्थाने हा प्रश्न सुटण्यास गती आली. या सभागृहामध्ये चर्चेचे आयोजन करण्यात आल्यानंतर सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सर्व गट नेत्यांची बैठक घेऊन, सर्व राजकीय पक्षांना व संघटनांना बोलावून गिरणी कामगारांना न्याय देण्याची भूमिका घेतली व त्या दृष्टीने या सभागृहामध्ये धोरण जाहीर केले. या पुढील काळात राज्याच्या हिताच्या दृष्टीने जे जे निर्णय घ्यावयाचे असतील ते विरोधी पक्षांना विश्वासात घेऊन निर्णय घेण्याचा संकल्प त्यांनी जाहीर केला त्याबद्दल त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. या पुढील कालखंडामध्ये या राज्यातील सामाजिक प्रश्न असतील, गोरगरिबांना न्याय देण्याच्या दृष्टीने, शेतकरी व सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याच्या दृष्टीने जे प्रश्न असतील ते सोडविण्याच्या दृष्टीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी अशा प्रकारची भूमिका घेतली तर विरोधी पक्षाकडून त्यांना निश्चितपणे सहकार्य राहील एवढेच सांगतो आणि पुन्हा एकदा सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे आणि या सरकारचे अभिनंदन करुन मी माझे वक्तव्य संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी "शेतकऱ्यांना खत पुरवठा न करता आलेले खत नगरपरिषद तुळजापूर यांच्या कॉम्प्लेक्समध्ये साठा करुन त्याची काळ्या बाजारात विक्री करणे, परिणामी निर्माण झालेली खत टंचाई यामुळे शेतकऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

या नंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री भगवानराव साळुंखे, रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, नागो गाणार, डॉ. रणजीत पाटील यांनी "केंद्र शासनाच्या सहा ते चौदा वयोगटातील बालकाच्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 नुसार राज्यातील शाळांमध्ये निर्माण झालेल्या वाढीव तुकडयांना मान्यता देणे, तसेच त्या साठी निधी उपलब्ध करुन देण्याची गरज" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

या नंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील, नागो गाणार यांनी "राज्यातील पोलीस मोटर परिवहन विभागात (एमटी) सुरु असलेल्या घोटाळयाच्या संदर्भात नागपूर पोलीस मोटर परिवहन विभागात कार्यरत असलेल्या एका शिपायाने पोलीस महासंचालकाकडे केलेली तक्रार, या तक्रारीत वाहन दुरुस्तीची खोटी देयके सादर केल्याचे तपासणीत आढळून येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

या नंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "वरोरा, जि.चंद्रपूर येथील खाजगी वीज कंपनीत मनमानी करुन गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने ताब्यात घेऊन अत्यल्प मोबदला देऊन नुकसान केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती ...

या नंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "अमरावती जिल्ह्यातील मेळघाटातील आदिवासी बालकांच्या कुपोषणास आळा घालण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

या नंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. कपिल पाटील, जयंत प्र. पाटील यांनी "बांद्रा रिक्लमेशन सीटीएस नं.791 विशाल मैदान इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या माणिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी तेथील रहिवाशी संघटनेने केलेली मागणी, या मैदानावर वाढत असलेले झोपडयांचे अतिक्रमण रोखण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

या नंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "हिंगणा कोरेगाव, ता. खामगांव, जि. बुलढाणा येथील श्री. शक्तीसिंह सारंगधरसिंह चौहान हा विद्यार्थी खामगांव येथील शासकीय तंत्र निकेतन सिव्हील तृतीय वर्षात शिकत असून तो तंत्र निकेतनातून विद्यार्थी आघाडीचे काम करीत असून अधिव्याख्यात्यांनी त्यांच्याविरुध्द खोटे कॉपी प्रकरण घडवून त्यांचेवर खोटे आरोप ठेवल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

या नंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवानराव साळुंखे, धनंजय मुंडे यांनी "पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना अनुकंपा तत्वावर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांप्रमाणे परीक्षा न घेता ज्येष्ठतेनुसार शासन सेवेत सामावून घेण्याची आवश्यकता याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अप्रमाणित प्रत / प्रतिक्षार्थी नाही

DGS/ ST/ AKN/

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदनांसंबंधी

उप सभापती : नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील 4 निवेदने प्राप्त झाली असली तरी ती आज न घेता उद्या चर्चेला घेण्यात येतील.

पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. आपण स्थानापन्न झाल्यानंतर मागील आठवडयाचा बॅकलॉग न काढता या आठवडयापुरता बॅकलॉग काढण्यात यावा.

उप सभापती : आपणा सर्वांचे सहकार्य मिळाले तर या अधिवेशनाचे काम पुढील आठवडयात काढू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील साखरी वेळास या गावामध्ये आशापुरा माईनकेम लि.या कंपनीकडून बॉक्साईटचे बेकायदेशीरपणे उत्खनन होणे

मु. शी. : रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील साखरी वेळास या गावामध्ये आशापुरा माईनकेम लि. या कंपनीकडून बॉक्साईटचे बेकायदेशीरपणे उत्खनन होणे यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील,संजय केळकर, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील साखरी वेळास या गावात आशापुरा माईनकेम लि. या कंपनीला बॉक्साईटचे उत्खनन करण्यासाठी ४००० टनाची परवानगी असताना सुमारे ६२००० टन बेकायदेशीररित्या उत्खनन केल्याचे निदर्शनास येणे, सदर कंपनीला नोव्हेंबर, २००९ पर्यंतच उत्खननाची परवानगी दिलेली असतांना आजतागायत ही कंपनी या गावात बॉक्साईटचे अनधिकृतपणे उत्खनन करीत असणे, या प्रकरणी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी या अनियमिततेबाबत स्पष्टीकरण करण्याची नोटीस बजावणे, तसेच सदर बाब शासनाच्या निदर्शनास आणणे, सदर कंपनीने राज्य शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडवल्याचे निदर्शनास येणे, याबाबत त्वरित चौकशी करुन वरील कंपनीवर कारवाई करुन नुकसान भरपाई वसूल करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सचिन अहिर (खनिकर्म राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा स्टेटस ऑन माईन ऑपरेटिंग यांच्याकडून डेक्कन मिनरल्स कंपनीने पर्यावरणाचा क्लिअरन्स घेतलेला नाही. त्याचप्रमाणे आशापुरा माईनकेम लि. या कंपनीने सुध्दा क्लिअरनस घेतलेला नाही हे वास्तव खरे आहे काय? खरे असेल तर या बाबतीत शासनाने कोणती कारवाई केली आहे?

श्री.सचिन अहिर : होय, हे खरे आहे. या कंपनीने जेव्हा एमपीसीबीची परवानगी घेतली नाही ही बाब जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाच्या लक्षात आणून दिल्यानंतर संबंधित जिल्हाधिकाऱ्यांमार्फत त्यांना नोटिस देऊन त्या कंपनीने खनिज उत्खननाचे काम बंद करावे किंवा संपूर्ण खनिज प्रकरण बंद करण्याबाबत त्यांना आदेश देण्यात आले आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, शासनाने आदेश दिल्यानंतर त्या ठिकाणी कोणती कारवाई केली आहे? त्या ठिक्राणी अजूनही उत्खननाचे काम सुरु असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना मांडण्यात आली आहे. आपण स्वत: प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन पाहिले असता त्या ठिकाणी काम सुरु आहे असे दिसून येईल. त्या बाबतची कागदपत्रे सन्माननीय मंत्रीमहोदयांकडे आलेली आहेत ती खरी असली तरी त्या ठिक्राणी उत्खनन थांबले नाही ही वस्तुस्थिती आहे. याची मंत्रीमहोदयांना माहिती आहे काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, शासनाकडे असलेल्या माहितीनुसार त्यांना 2009 साली ते काम बंद करण्यास त्यांना भाग पाडले आहे. सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्याप्रमाणे सन 2009 मध्ये त्यांना परवानगी देण्याचे बंद केले आहे. त्याच प्रमाणे सन 2010 पासून त्या ठिक्राणाहून ॲक्चुअल वहातूक पासेस देण्याचे काम बंद करण्यात आले आहे. तरीसुध्दा सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन त्यांच्या म्हणण्यानुसार ही बाब पुन्हा तपासून पाहिली जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, तपासणी करतो असे म्हटल्यानंतर तो तपासणी अहवाल प्राप्त झाला काय.?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण करु दिले पाहिजे. माझ्याकडील माहितीनुसार सद्या मायनिंग बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, व त्या ठिकाणी उत्खननाचे काम बंद आहे अशी माहिती माझ्या रेकॉर्डवर आहे. सन्माननीय सदस्य म्हणत असलेली बाब सत्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ AKN/

श्री.सचिन अहिर...

समजून जिल्हाधिकाऱ्यांना पुन्हा सूचना देऊन माहिती मागविली जाईल आणि तसे आढळले तर त्याबाबत चौकशी केली जाईल.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये जास्तीचे उत्खनन झाल्याचे मान्य करण्यात आले आहे. लक्षवेधी सूचनेमध्ये 4 हजार ऐवजी 62 हजार मे.टन इतके उत्खनन झाल्याचे म्हटले आहे. ते आपण स्वीकारले आहे काय? जर ते स्वीकारले असेल तर 4 हजार ऐवजी 62 हजार मे.टन इतके उत्खनन झाल्याबद्दल त्या प्रमाणात आपण जास्तीचा दंड वसूल केला काय?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मुळात खनिज मायनिंग लिजमधील अटीनुसार आपल्याकडे रिन्युअलसाठी एकदा प्रस्ताव आल्यानंतर संबंधित वेळेत त्यांना परवानगी दिली पाहिजे किंवा नाकारली पाहिजे. ती दिली नाही तर "डीम्ड टू बी" असे आपण म्हटले आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यावेळी तेथे उत्खनन झाले ही गोष्ट खरी आहे. पण संबंधितांकडून रॉयल्टी वसूल केलेली आहे. ही बाब 2010 मध्ये लक्षात आल्यावर आपण संबंधितांविरुध्द कारवाई केली आहे. एवढेच नाहीतर त्यांच्याकडून पेनल्टी देखील वसूल केली जाईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, दोन वर्षापासून उत्खनन करण्यास बंदी घालणारी ऑर्डर आल्यानंतर आणि न्यायालयामार्फत त्यांच्यावर कारवाई झाल्यानंतर देखील दोन वर्षापासून तेथे खाणीतून उत्खनन करण्याचे काम सुरु आहे.परंतु याबाबतीत तेथील तहसीलदार बरोबर संगनमत केल्याशिवाय हे काम होईल काय हा मुद्दा आहे.म्हणून याबाबतीत तात्काळ चौकशी करुन तेथील तहसीलदारांना सस्पेंड करण्यात येणार आहे की नाही?कारण 2009 मध्ये न्यायालयात सदरहू प्रकरण दाखल केलेले आहे.संबंधितांनी आतापर्यंत 7 हजार टन उत्खनन केले आहे. त्यामुळे तेथील तहसीलदार, तलाठी यांच्यावर तत्काळ कारवाई करणार आहात की नाही ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी अगोदर सांगितले की, आमच्या रेकॉर्डनुसार उत्खननाचे काम बंद आहे. पण सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली, ती खरी आहे असे समजून मी पुन्हा चौकशी करतो असे मघाशी सांगितले आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी जी माहिती दिली आहे, तसे झाल्याचे आढळून आले तर संबंधित तहसीलदारांना देखील जाब विचारला जाईल. परंतु आज सदनासमोर हा विषय आल्यानंतर अजून एक पर्याय म्हणून सदरहू माईनच्या ठिकाणी तेथील गेट सील करण्याच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांना सांगून आपण कारवाई करु.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यामध्ये एवढेच महत्वाचे आहे की,आशापुरा माईनकेम लि.कंपनीला दर महिन्याला 4 हजार टन उत्खनन करण्यासाठी परवानगी दिलेली असताना प्रत्यक्षात 35 ते 40 हजार टन बॉक्साईट काढण्यात येत होते. त्यावेळी तेथील तहसीलदार झोपले होते काय, कलेक्टर झोपले होते काय, महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे अधिकारी झोपले होते काय, तसेच वाहतुकीसाठी परवानगी देणारे आर.टी.ओ.चे अधिकारी झोपले होते काय ? खरे म्हणजे त्या ठिकाणी दिवसाढवळया सगळे मिळून लुटत आहेत. त्यामुळे आपण त्या कंपनीचे लायसन्स काढून घेणार आहात पण त्याचबरोबर इतर सर्व संबंधित देखील दोषी आहेत म्हणजे पर्यावरण विभागाशी संबंधित असलेला अधिकारी, तेथील तहसीलदार, कलेक्टर यांच्या डोळ्यादेखील सर्वसंमतीने सुरु असताना आपण केवळ संबंधितांची चौकशी करणार आहात हे पुरेसे आहे काय? खरे म्हणजे या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

बाबतीत सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात यावी. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या कंपनीला 4 हजार टन उत्खननाची परवानगी असताना देखील 40 हजार टन उत्खनन करुन लूट केली जात आहे. खरे म्हणजे ही राज्य सरकारची लूट आहे. यावर असे उत्तर देण्यात येईल की, आम्ही संबंधितांचे लायसन्स काढून घेतो, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदमसाहेब सांगत आहेत तर आम्ही तेथे जाऊन पहातो वगैरे. पण प्रत्यक्षात दिवसा ढवळया काय सुरु आहे, तेथे कशी लूट सुरु आहे हे सर्वजण पहात आहेत. अशा वेळी संबंधितांवर आपण क्रिमिनल स्वरुपाचा गुन्हा दाखल करणार आहात काय आणि याची चौकशी करण्याचे काम सी.आय.डी.कडे सोपविणार आहात काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी अगोदर सांगितले की, याबाबतीत कारवाईचा भाग झालेला आहे. परंतु सन्माननीय सदस्यांचे समाधान होत नसेल तर सचिवांच्या स्तरावर देखील या प्रकरणाची चौकशी करण्याचे काम करण्यात येईल.तसेच त्याठिकाणी उत्खनन करण्याच्या बाबतीत देखील सुस्पष्टपणे सांगितलेले आहे. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी यांच्याकडून तेथील गेटला सील लावण्याची कारवाई करणार आहोत. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणामध्ये न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे असे मला वाटते.

. . . .ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सांगली-मिरज-कुपवाड येथे कामुद कंपनीकडून बंदी घालण्यात आलेल्या औषधाचे मोठया प्रमाणात उत्पादन होणे.

मु.शी. : सांगली-मिरज-कुपवाड येथे कामुद कंपनीकडून बंदी घालण्यात आलेल्या औषधाचे मोठया प्रमाणात उत्पादन होणे यासंबंधी सर्वश्री भगवान साळुंखे,नागो गाणार, रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील, डॉ.रणजित पाटील, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सांगली-मिरज-कुपवाड एम.आय.डी.सी.परिसरात गेल्या 15 वर्षापासून सुरु असलेल्या "कामुद" या कंपनीकडून विविध औषधात वापरली जाणारी रसायने तयार केली जाणे, त्यामध्येच अन्न व औषध प्रशासनाने माहे फेब्रुवारीपासून बंदी घातलेले "केटामाईन" सारखे भूल देण्यासाठी वापरण्यात येणारे ड्रग्ज मोठ्या प्रमाणात तयार होत असणे, या केटामाईनचा वापर नशेसाठी व रेव्ह पार्ट्यांमध्येही केला जाणे, गुप्तचर विभागाने अचानक टाकलेल्या छाप्यात केटामाईनच्या कारखान्यात सुमारे 800 किलो केटामाईन सापडणे, प्रशासनाकडून संबंधित दोषींवर कारवाई करण्यात टाळाटाळ केली जाणे, परिणामी सांगली जिल्ह्यातील सर्व नागरिकांमध्ये संबंधित प्रकरणा बद्दल व प्रशासनाबद्दल पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना"

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .ओ-4

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, हा सांगली जिल्ह्यातील प्रकार आहे. "कामुद" कंपनीने केटामाईन हायड्रोक्लोराईड या औषधाच्या निर्मितीचा परवाना घेतला.सदरहू औषध हे भूल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देंण्यासाठी वापरण्यात येणारे एक केमिकल आहे.पण त्याचा उपयोग अंमली द्रव्ये म्हणून केला जात असे ही बाब केंद्रीय महसूल गुप्तचर विभागाच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तेथे छापा टाकून कारवाई केली. त्यानंतर वराती मागून घोडे या न्यायाने महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषधी द्रव्ये विभागाला जाग आली आणि मग त्यांनी पुन्हा तेथे छापा टाकला. अशा वेळी तेथे सदरहू औषधाचे जे अतिरिक्त उत्पादन करण्यात आले होते, त्याबाबतीत निवेदनामध्ये पान क्र.2 वरील अनु.क्र.2 मध्ये असे म्हटलेले आहे की,"संस्थेच्या जागेतील घाऊक औषध विक्री परवाने कायमस्वरुपी रद्द करण्यात येत आहेत."तसेच अनु.क्र.3 मध्ये असे म्हटलेले आहे की,"संस्थेचे परवाने दि.9-6-2011 ते दि.10-8-2011 या कालावधीसाठी निलंबित करण्यात आले. परंतु याठिकाणी उत्तरामध्येच विसंगती दिसून येत आहे.त्यामुळे या प्रकरणाच्या बाबतीत शासन नक्की कोणत्या पध्दतीने कारवाई करणार आहे ? असा प्रश्न आहे. कारण या औषधाचे सांगली जिल्ह्यामध्ये उत्पादन होत आहे आणि अब्जावधी रुपयांचे अमली औषध परदेशामध्ये वितरित केले जात आहे आणि यामध्ये मोठे रॅकेट असून, आतापर्यंत कोणावर कारवाई करण्यात आली, कोणाला अटक करण्यात आली या बाबत निवेदनामधून काहीही खुलासा होत नाही. त्यामुळे याबाबतीत शासन कारवाई करणार आहे काय ? असा माझा प्रश्न आहे.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, "कुमूद"ड्रग्ज प्रा.लिमिटेड कंपनी अनेक उत्पादने तयार करते. सन्माननीय सदस्यांनी येथे एक स्पेसिफीक मुद्दा मांडलेला आहे. त्याबाबत सांगावयाचे तर त्याठिकाणी जे काही प्रॉडक्टस् तयार केले जाते त्यासंबंधात 60 दिवसासाठी शासनाने संपूर्ण दाखला निलंबित केला आहे.त्याठिकाणी केटामाईन, हायड्रोक्लोराईड,नायट्रोझेपाम, लोरोझेपान, झोपीक्लोन अशी गुंगी येण्यासाठी औषधामध्ये वापरण्यात येणाऱ्या ज्या बाबी आहेत, त्या आपण कायम स्वरुपी बंद केलेल्या आहेत.तसेच डी.आर.आय.कडे यांचे रजिस्ट्रेशन असल्या-मुळे त्यांना त्यांच्या एक्सपोर्ट ऑर्डरमध्ये काही विसंगती आढळून आल्याने येथे कारवाई केली आहे. परंतु अन्न व औषध विभागाच्या माध्यमातून आपण वेळोवेळी तपासणी केली आहे. याठिकाणी एक्सपोर्टच्या बाबतीत ही बाब आढळून आल्यामुळे संबंधितांनी कारवाई केलेली आहे. त्या कारवाईमध्ये डी.आर.आय. यांनी जवळजवळ 5 लोकांना अटक देखील केलेली आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "केटामाईन

हायड्रोक्लोराईड या औषधाच्या निर्मितीसाठी संस्थेस अन्न व औषध प्रशासनाची रीतसर परवानगी असून त्याची सेंट्रल ब्यूरो ऑफ नारकोटीक्स, ग्वाल्हेर यांच्या अनुमतीने औषधी उपयोगासाठी निर्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केली जाते." पुढे असेही म्हटलेले आहे की, "त्याबाबत संस्थेतील सर्व जबाबदार व्यक्ती केंद्रीय महसूल गुप्तचर विभागाच्या अटकेत असल्याने व सर्व अभिलेखे जप्त असल्याने त्याबाबतचा तपशील उपलब्ध न झाल्याने सदरचा साठा प्रतिबंधित करण्यात आला." पुढे असेही म्हटलेले आहे की,"अधिक चौकशी केली असता संस्था कागदोपत्री 205 ते 215 किलोची बॅच दाखवून प्रत्यक्षात 240 किलो पर्यंत उत्पादन करीत असे." जर 240 किलो पर्यंत उत्पादन करण्यासाठी परवानगी होती तर मग डी.आर.आय.ने 1850 किलो मिळाल्याची माहिती दिलेली आहे. त्यासाठी अन्न व औषध प्रशासनातर्फे काय कार्यवाही करण्यात आली आहे ? दुसरी बाब म्हणजे याच्या निर्यातीसाठी कोंडूसकर यांच्या टीमने इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, हंगेरी, पोर्तूगाल, मॅक्सिको, युगांडा, बारबाडोस इ.ठिकाणी केटामाईनची तस्करी केल्याचे प्राथमिक तपासामध्ये उघड झाल्याचे डी.आर.आय. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. माझा असा प्रश्न आहे की, याबाबतीत अन्न व औषधी प्रशासनाला माहिती होती काय ? जर हे सर्व डी.आर.आय.तर्फे पकडलेच गेले नसते तर मला वाटते की, आणखी वर्ष, सहा महिने, दोन वर्षे हा व्यापार असाच सुरु राहिला असता. त्यामुळे आपले प्रशासन याबाबतीत कशा प्रकारे कंट्रोल करीत आहे ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, या उत्पादनाचा समावेश शेड्युल-एच मध्ये म्हणजे "नॉर्मल ड्रग्ज" म्हणून होते.परंतु आपणच केंद्र शासनाला मागणी केली की, याचा उल्लेख सायक्रोट्रोपिक सब्सटन्स म्हणून एन.डी.पी.एस.च्या अंडर यावा आणि फेब्रुवारीमध्ये केंद्र शासनाने ही मागणी मान्य केली. म्हणून हे उत्पादन नार्कोटीक्स डिपार्टमेंटच्या अंतर्गत आले. तसेच मघाशी सन्माननीय सदस्यांनी संस्था कागदोपत्री 205 ते 215 किलोची बॅच दाखवून प्रत्यक्षात 240 किलो पर्यंत उत्पादन करीत असे याबाबतीत मुद्दा उपस्थित केला होता. पण याचा एका बॅचपुरता संबंध आहे. एकूण वर्षातील उत्पादनाबाबत आकडेवारी पाहिली तर ती वेगवेगळी आहे. याठिकाणी फक्त एक बॅचच्या संबंधातील आकडेवारी आहे. आपण वेळोवेळी ड्रग्ज डिपार्टमेंटच्या माध्यमातून तपासणी करतो, त्यावेळी त्यांनी केलेले उत्पादन आणि आपण लायसन्समध्ये ज्या अटी घालण्यात आल्या आहेत त्यानुसार त्याचे अनुपालन केले आहे की नाही हे देखील पहातो. परंतु याठिकाणी उत्पादन जास्त करुन त्याचे कोणत्याही प्रकारचे रेकॉर्ड न ठेवता

निर्यात केल्याचे आढळून आलेले आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, याठिकाणी कोंडुसकर ट्रॅव्हल या नावाची कंपनी प्रसिध्द आहे. त्यांचा 850 किलोचा एक साठा शेतावर पकडला गेला, दुसरा सांगली येथे पकडण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आला आहे आणि अंधेरी येथील एम.आय.डी.सी.मध्ये देखील याच कंपनीचा साठा पकडण्यात आला आहे. यामध्ये त्यांच्या ट्रॅव्हल कंपनीचा देखील सहभाग होता काय? तसेच त्यांच्यातर्फे अशा प्रकारे सदरहू ड्रग्ज दुसरीकडे घेऊन जाण्याचे काम सातत्याने होत होते काय? याबाबत प्रशासनाने चौकशी केली आहे काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या विषयाच्या संबंधातील तपासामध्ये ट्रॅव्हल कंपनीचा विषय कुठेही आढळून आलेला नाही. परंतु तशा दृष्टीनेही तपास करण्याच्या सूचना देण्यात येतील. तसेच अंधेरी येथील श्री.कोठारी या माणसाकडे ते प्रॉडक्ट देण्यात आल्यानंतर ते पकडण्यात आले होते.

. . . . .ओ-7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेली अनु.क्र.3 वरील लक्षवेधी सूचना आता लगेचच चर्चेला घेण्यात येणार नाही. दुपारी 1.30 ते 2.00 वाजेपर्यंत मध्यंतर होईल. त्या मुळे कामकाज पत्रिकेवरील अनु.क्र.3 वरील लक्षवेधी सूचना दुपारी 2.00 वाजता चर्चेसाठी घेण्यात येईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.30 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर कु.थोरात . . . .

अधिकृत फेर / परिपत्रकासाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री. किरण पावकर : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी क्रमांक 2 वर आपण मध्यंतरापूर्वी चर्चा करीत होतो. आपली मध्यंतराची वेळ झाल्यामुळे मध्यंतराची सुट्टी घेण्यात आली. पण या लक्षवेधी सूचनेतील विषय अतिशय महत्वाचा आहे. कॅटामाईन या ड्रगचा ॲनेस्थेशियासाठी उपयोग केला जातो.

उप सभापती : या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपलेली आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, या लक्षवेधीचे महत्व जास्त आहे. समाजाला विळखा घातलेल्या ड्रग्सच्या संदर्भातील विषय असल्यामुळे या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपलेली आहे, असे सांगून त्यावरील चर्चा बाजूला ठेवू नये, अशी माझी विनंती आहे.

उप सभापती : दुस-या माध्यमातून आपण हा प्रश्न उपस्थित करावा मी त्याला परवानगी देईन.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, हाच विषय पुन्हा सभागृहापुढे येण्यासाठी वेळ लागेल. तेव्हा या विषयावर बोलण्यासाठी मला फक्त दोन मिनिटे वेळ देण्यात यावा.

उप सभापती : ठीक आहे.

श्री. किरण पावसकर : रेव्ह पार्ट्या होत आहेत आणि या पार्ट्यांमधून हे भूल देण्यासाठी वापरण्यात येणारे ड्रग्ज वापरले जात आहेत. आज भूल देण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या ड्रग्जच्या बाबतीत केंद्र शासनाच्या डीआरआय च्या माध्यमातून धाड टाकून तो माल पकडला जातो. पण महाराष्ट्राचे अन्न व औषधी प्रशासन त्यांना पुन्हा उत्पादन करण्यासाठी परवानगी देते. पाच ड्रग्ज बाजूला करुन इतर ड्रग्जचे उत्पादन करण्यासाठी त्याना परवानगी देण्यात आलेली आहे. ज्या कंपनीवर धाड टाकल्या नंतर शेतामध्ये 850 किलो ड्रग्ज मिळाले आणि काही ड्रग्ज अंधेरीमध्ये मिळाले आहेत. त्याच कंपनीला या शासनाचे प्रशासकीय अधिकारी इतर ड्रग्जच्या उत्पादनासाठी परवानगी देतात ही नामुष्कीची गोष्ट आहे. इतर ड्रग्ज बरोबर हे पाच ड्रग्ज त्या ठिकाणी बनविलेच जाणार नाहीत, याची शासन खात्री देणार आहे काय? प्रशासन चालविण्यामध्ये

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर.....

जर अधिकारी एवढे कार्य तत्पर असतील तर डीआयआरला या कंपनीवर धाड टाकण्याची आवश्यकता का वाटली? सभापती महोदय, माझी विनंती अशी आहे की, ट्रान्स्पोर्ट कशा तऱ्हेने झालेले आहे, खरोखर हे ड्रग्ज किती प्रमाणात तयार करण्यात आलेले आहेत याची सविस्तर चौकशी होत नाही तोपर्यंत सांगलीच्या 'कामुद' या कंपनीला कुठल्याही ड्रग्जच्या उत्पादनासाठी परवानगी देण्यात येऊ नये, हे शासन मान्य करणार आहे काय?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, मी माझ्या उत्तरात सांगितले होते की, या कंपनीमधून अनेक औषधाचे उत्पादन केले जाते. त्यापैक्री ज्या ओषधाच्या बाबतीत डी.आय.आर.ने कारवाई केली होती, त्या कारवाईच्या अनुषंगाने त्या औषधाचे उत्पादन बंद करण्यात आले आहे. त्या ठिकाणी जी इतर औषधे उत्पादन करण्यात येत होती त्यांचे लायसन्स दोन महिन्या करिता निलंबित करण्यात आले होते. हियरिंग घेऊन इतर औषधांचे उत्पादन करण्यास त्यांना परवानगी देण्यात आलेली आहे. ट्रान्स्पोर्टच्या बाबतीत कुठे उल्लेख झाला आहे काय या बाबतीत निश्चितपणे चौकशी केली जाईल. 1940 च्या कायद्यातील कलम 18 च्या अंतर्गत काही खटले दाखल करण्यात येणार आहेत. सभापती महोदय, अशा पध्दतीचे उत्पादन होऊ नये ही खबरदारी निश्चितपणे घेतली जाईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, ज्या कंपन्यांमध्ये अशा प्रकारच्या ड्रग्जचे उत्पादन करण्यात येते त्या अधिकाऱ्यां विषयी शासन काय शाश्वती देणार आहे? 240 किलोची परवानगी असताना डीआयआर ने 1800 किलो ड्रग्ज जप्त केलेले आहेत. असे असताना पुन्हा या ठिकाणी सांगण्यात येत आहे की, ज्या इतर औषधांच्या उत्पादनासाठी परवानगी दिलेली आहे, त्याच औषधांचे उत्पादन करण्यात येईल. ज्या इतर ड्रग्जच्या उत्पादनासाठी परवानगी दिलेली आहे त्याला स्थगिती देण्यात येणार आहे काय? स्थगिती न देता पुन्हा या ड्रग्जचे उत्पादन त्या ठिकाणी केले जाणार नाही, याची काय खात्री देण्यात येणार आहे? जर राज्य सरकारला आपल्या अधिकाऱ्यांची एवढी गॅरन्टी होती तर डीआयआरला धाड टाकण्याची आवश्यकता का वाटली?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या कंपनीला 240 किलो ड्रग्जचे उत्पादन करण्याची परवानगी असताना 1800 किलो ड्रग्ज जप्त करण्यात आलेले आहेत. याचा अर्थच असा

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आहे की, त्यांनी शासनाला धाब्यावर बसवून ड्रग्जचे उत्पादन सुरु ठेवले आहे. सभापती महोदय, या संदर्भात मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर गंभीर आहे. अधिकाऱ्यांना वाचविण्याचा मंत्री महोदय, का प्रयत्न करतात हे मला कळत नाही. जर 240 किलो ड्रग्जचे उत्पादन करण्याची परवानगी असताना 1800 किलो ड्रग्ज जप्त झालेले आहेत. असे असताना हियरिंग घेऊन त्यांना इतर ड्रग्जच्या उत्पादनासाठी परवानगी दिलेली आहे. हिअरिंगमध्ये तोडबाजी झाली असा त्याचा सरळसरळ अर्थ आहे. तुमच्या अधिकाऱ्यांनी किती कोटी रुपये खाल्ले हा सरळ सरळ प्रश्न मी या ठिकाणी विचारु इच्छितो. अधिकाऱ्यांच्या बाजूने उत्तर देणे गंभीर आहे. सन्माननीय सदस्यांनी परवानगीच्या कित्येक पटीने जास्त ड्रग्ज जप्त झाले असे सांगितले आहे. ते इतके गंभीर आहे की, अधिकाऱ्यांनी त्यांना बादच करावयास पाहिजे होते पण हिअरिंग घेऊन त्यांना इतर ड्रग्जचे उत्पादन करण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे असे सांगण्यात येत आहे, हे या सभागृहामध्ये सरळ सरळ भ्रष्टाचाराचे समर्थन करण्यासारखे आहे. हा विषय गंभीर असल्यामुळे मंत्री महोदयांनी त्या पध्दतीने या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता या ड्रग्ज कंपनीमधून पुन्हा अशा ड्रग्जचे उत्पादन होऊ नये, याची दक्षता घेतली जाईल असे मी सांगितलेले आहे. तरी देखील पुन्हा एकदा सह आयुक्तांच्या माध्यमातून त्यांची चौकशी केली जाईल.

श्री. किरण पावसकर : ज्याच्यामुळे कंपनीवर डीआयआरची धाड पडली आहे त्या सह आयुक्तांना पुन्हा कसली परवानगी देण्यात येत आहे आणि त्यांची काय चौकशी करण्यात येणार आहे? त्या अधिकाऱ्यांवर पहिल्यांदा कारवाई करण्यात येणार आहे काय?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, उत्पादन केलेल्या मालाची निर्यात करत असताना हा माल सापडलेला आहे. मी या ठिकाणी सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊ या कंपनीवर आणखी जेवढी कडक कारवाई करता येईल.....

(गोंधळ)

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : मंत्री महोदय, प्रश्नाचे गांभीर्य आपल्याला देखील कळलेले आहे. आपणही काही निर्णयाप्रत आलेले आहात. फक्त हळूहळू पावले टाकून निर्णय घेण्यात येत आहेत. या सभागृहाची अशी इच्छा आहे की, ज्यांच्यामुळे हे सर्व कांड घडले त्या अधिकाऱ्यांना ताबडतोब निंलबित करणार काय? मला असे वाटते की, जर अशा अधिकाऱ्यांना निलंबित केले तरच न्याय मिळू शकेल, अन्यथा ही मंडळी त्या ठिकाणी अधिकारावर राहून पुन्हा याच गोष्टीला खतपाणी घालतील, तेव्हा या बाबतीतील निर्णय मंत्री महोदयांनी घ्यावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अधिकाऱ्यांना निलंबित केले तर पुन्हा ते आपल्या कामावर रुजू होतील. तेव्हा तीन महिन्याच्या आत चौकशी करुन ती कारवाई केली जाईल असे सांगण्यात यावे. अन्यथा सहा महिने 2/3 पगार द्यायचा आणि सहा महिन्यानंतर कोणतेही हियरिंग न झाल्यामुळे पुन्हा त्यांना प्रस्थापित करावयाचे मग पुन्हा तसेच चालू रहणार. म्हणून संबंधित अधिकाऱ्याच्या बाबतीत तीन महिन्यात चौकशीचा अहवाल पूर्ण करुन निलंबनाच्या काळातच योग्य ती कारवाई केली जाईल असे उत्तर देण्यात यावे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी महत्वाचे दोन विषय मांडलेले आहेत. एक म्हणजे सर्वच उत्पादन बंद करणे आणि अधिकाऱ्यांवर कारवाई करणे निश्चितपणे पुन्हा एकदा चौकशी करुन तीन महिन्याच्या आत संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल आणि उत्पादन कायम स्वरुपी बंद करण्याच्या संदर्भात देखील त्यांना नोटीस देऊन त्या संदर्भातील कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड.....

अप्रधारित प्रत / प्रिंटिंगसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मध्यंतरानंतर सभागृहाचे कामकाज सुरु होऊन दहा मिनिटे झालेली आहेत. सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. आपण सभागृहाची बैठक स्थगित करावी.

उप सभापती : सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.10 ते 2.20 वाजेपर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नव्हते म्हणून आपण सभागृहाची बैठक स्थगित केली होती. परंतु केटामाईन या ड्रगचा वापर प्रत्येक रेव्ह पार्टीमध्ये केला जातो. मंत्री महोदयांनी दोन गोष्टी जाहीर कराव्यात अशी मी मागणी केलेली आहे. संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करावे अशी आम्ही मागणी केली आहे. 3 महिन्याच्या कालावधीत चौकशी पूर्ण करावी असे मी म्हटले होते, परंतु मंत्री महोदयांनी दीड महिन्यात चौकशी पूर्ण करतो असे म्हटलेले आहे, त्याचा आम्हाला आनंद वाटतो. मात्र या कालावधीत चौकशी पूर्ण करुन त्याचा निर्णय झाला पाहिजे. तरच ते अधिकारी कायमचे घरी जातील. आतापर्यंत हजारो नाही तर लाखो कर्मचारी, अधिकारी यांना निलंबित केले होते, परंतु ते सर्व रिइन्सिस्ट झाले आहेत. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे 8-8 वर्षे चौकशी सुरु असते, त्यामुळे संबंधितावर काही कारवाई होत नाही. सगळे आबादी आबाद असते, दरम्यानच्या काळात संबंधितांना प्रमोशनही मिळते. म्हणून शासनाला नियमात दुरुस्ती करावी लागेल. निलंबित केलेल्या कर्मचाऱ्यांना किंवा अधिकाऱ्यांना वेतनवाढ मिळणार नाही, अशा प्रकारची तरतूद केली तरच प्रशासन सुधारेल. प्रशासनातील अधिकाऱ्यांना असे वाटते की, आपल्याला आपल्या खात्याचे मंत्री महोदय वाचवितात. त्यामुळे हे अधिकारी आनंदात असतात. मंत्री महोदय आपल्याला वाचविण्यासाठी हजर असल्यामुळे आपल्याला काही चिंता करण्याचे कारण नाही असे त्यांना वाटते. हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. म्हणून याला दोनच पर्याय आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य कारवाई केली आहे असे मंत्री महोदयांचे मत असेल तर संबंधित जे कोंडुस्कर आहेत त्यांना ड्रग माफिया म्हणून मोक्का लावण्यात यावा. तसे नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करावे. आपण दीड महिन्यात केले जाईल असे म्हटले आहे. दीड महिन्यात चौकशी पूर्ण करावी, ही चौकशी कोणते सचिव करणार आहेत ते सुध्दा जाहीर करण्यात यावे. त्यामुळे शासनाचा प्रशासनावर धाक निर्माण होईल.

2...

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, ज्या फॅक्टरीमध्ये बंदी घातलेल्या ड्रग्जचा साठा मिळालेला आहे त्यामुळे त्यांच्यावर व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. याच फॅक्टरीला इतर ड्रग्ज बनविण्याची परवानगी दिलेली आहे त्याला स्थगिती देण्यात यावी. ते बनविले जाऊ नयेत. डीआरआयच्या चौकशीत असे आढळले आहे की, कोंडुस्कर या कंपनीने फ्रान्स, स्पेन, इंग्लंड, हंगेरी या सगळया देशांना माल पुरविलेला आहे. कोंडुस्कर या कंपनीच्या बसेस डोमेस्टिक व इंटरनॅशनल एअरपोर्टच्या आतमध्ये वाहतुकीचे काम करीत आहेत. त्या वाहतुकीचे शासन चौकशी करणार आहे काय, त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे काय ? बंदी घातलेला ड्रग्ज बाहेरच्या देशांमध्ये गेलेला आहे हे डीआरआयच्या अहवालात नमूद केलेले आहे, याच कंपनीची एअरपोर्टमध्ये वाहतुकीची कामे चालली आहेत. त्याची चौकशी करुन त्याच्याविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द निलंबनाची कारवाई करण्यात येईल. त्याचबरोबर त्या कंपनीचे उत्पादन थांबविण्याच्या दृष्टीने...

श्री.दिवाकर रावते : संबंधित अधिकाऱ्यांकडून खुलासा मागविण्यातच सहा महिने जातील. मंत्री महोदय अमुक अमुक पदावरील अधिकारी असे आपण म्हणावे, त्यांचे नाव घेऊ नये. आपण नाव सांगितले तर आम्हाला आनंद वाटेल. परंतु आपण ठराविक कालावधीत चौकशी पूर्ण करावी,

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, हे अधिवेशन संपण्यापूर्वी त्या अधिकाऱ्यांचे नाव सभागृहात सांगितले जाईल. त्याचबरोबर कंपनीच्या परवान्यासंबंधी मी सांगेन की, त्या कंपनीचा परवाना बंद करावा लागला तर तो बंद करण्याचीही कारवाई केली जाईल. त्या कंपनीच्या ट्रान्सपोर्टच्या कामासंबंधी सुध्दा चौकशी केली जाईल.

NTK/ KTG/ KGS/

पृ. शी. : विविध फायनान्शियल कंपन्यांनी 4 टक्के दराने कर्ज पुरवठा करण्याची वृत्तपत्रात जाहिरात करुन विदर्भातील अकोला व वाशिम या जिल्ह्यातील शेतक-यांची केलेली फसवणूक

मु. शी. : विविध फायनान्शियल कंपन्यांनी 4 टक्के दराने कर्ज पुरवठा करण्याची वृत्तपत्रात जाहिरात करुन विदर्भातील अकोला व वाशिम या जिल्ह्यातील शेतक-यांची केलेली फसवणूक यासंबंधी श्री.दिवाकर रावते,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मे.कोचर फायनान्शियल सर्व्हिसेस प्रा.लि. चंदीगड व आम फायनान्शियल सर्व्हिसेस अलीगड (उ.प्र.) आणि मे.सहारा फायनान्शियल कन्सलटंन्सी या कंपन्यांनी विदर्भातील अकोला, वाशिम इत्यादी जिल्ह्यातील वृत्तपत्रात जाहिराती देऊन 4 टक्के दराने रु.1 लाख ते रु.1 कोटी रक्कमेचे कर्ज देण्याचे आमिष दाखविणे, जाहिरातीस भुलून गरीब शेतक-यांनी श्री.आशिष जामेकर यांचेकडे प्रोसेसिंग फी, कागदपत्रे स्टँप पेपर, नोटरी इत्यादीसाठी रु.30,000/- ते रु.50,000/- भरणे, अलीगड व चंदीगड येथून शेतक-यांना कर्ज ना मंजूर झाल्याचे कळविणे, श्री.जामेकर यांनी 567 गरीब शेतक-यांची सुमारे 2 कोटी रुपयांची फसवणूक करणे, या संदर्भात कारंजा, जि.वाशिम पोलीस स्थानकात तक्रारी करुनही पोलिसांनी काहीही कारवाई न करणे, त्यातच श्री.जामेकर फरार होणे, फरार असला तरी पत्नीशी मोबाईलवरुन सतत संपर्कात असूनही त्याला पकडण्यात पोलिसांना आलेले अपयश, फसवणूक झालेल्या शेतक-यांमध्ये पसरलेला असंतोष, हे प्रकरण सी.बी.आय.कडे हस्तांतरित करण्याची होत असलेली मागणी,"

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या फायनान्शियल कंपन्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची लूट सुरु आहे. त्यामुळे मी या सभागृहाचे या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून लक्ष वेधत आहे. आज शेतकऱ्यांना बँकांमधून कर्ज मिळत नाही. सावकाराचे कर्ज फेडता येत नाही म्हणून तो कर्ज देत नाही. त्यामुळे नाईलाजास्तव त्यांना वेगळी व्यवस्था करावी लागते. बँका तर अडवणूकच करतात. अशा या अडलेल्या शेतकऱ्यांना फसविण्याचे काम करणाऱ्या ज्या संस्था या राज्यात कार्यरत आहेत. त्यांच्यापैकी काही संस्थांसाठी ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. रिझर्व्ह बँकेने मे.कोचर फायनान्शियल सर्व्हिसेस प्रा.लि.चंदीगड या कंपनीला मान्यता दिली आहे. त्यांनी त्यांच्या अंतर्गत मे.सहारा फायनान्शिअल या कंपनीला मान्यता दिली आहे. मूळ कंपनी कोचर फायनान्शियल आहे, त्यांना मान्यता दिलेली कागदपत्रे माझ्याकडे आहेत. मंत्री महोदयांकडे नसतील तर ती मी देण्यास तयार आहे. माझ्याकडे तक्रार प्राप्त झाली आहे त्यानुसार 70 शेतकऱ्यांकडून आतापर्यंत 2 कोटी रुपये केवळ कर्ज मिळविण्यासाठी करावयाच्या अर्जाकरिता घेतले आहेत. स्टॅम्प डयूटी व इतर बाबीकरिता त्यांच्याकडून पैसे मागून घेतले आहेत. गरजू शेतकऱ्यांनी ते पैसे कर्जाने घेऊन आणून त्यांच्याकडे भरले आहेत. या कंपन्यांनी कोणाला 5 लाख रुपये कर्ज देतो, कोणाला 10 लाख रुपये कर्ज देतो असे सांगून हे पैसे घेतले आहेत. शेतकऱ्यांनी भरलेले पैसे घेऊन ही मंडळी फरार झाली आहेत. यासंबंधी एप्रिल महिन्यात पोलिसांकडे तक्रार करण्यात आली आहे.

मी ही लक्षवेधी सूचना दिल्यामुळे वर्ध्याच्या पोलिसांनी दिनांक 18.7.2011 रोजी त्या फरार आरोपींना अटक केली. या लोकांना सहकार्य करण्याची त्या पोलिसांना काय गरज होती ? 70 शेतकऱ्यांनी पोलिसांकडे येऊन या कंपन्यांतील लोकांनी आमच्याकडून पैसे घेऊन पलायन केले असल्याची तक्रार केल्यानंतर पोलिसांनी कोणताही तपास केला नाही. तपास न केल्यामुळे ते लोक फरार झालेले आहेत, ते लोक कोण आहेत ? प्रेमसिंग व मित्तल यांना हरियाणाच्या बँकेने परवानगी दिली होती. त्यांचे ऑफिस उत्तर प्रदेशातील अलीगड येथे आहे. त्यांचा दूरध्वनी क्रमांक 0571-2414333 असा आहे. प्रेमसिंगचा भ्रमणध्वनी 9219420733 असा आहे. या फोनवर मी फोन केला होता. त्यावेळी फोनची बेल वाजत होती. परंतु त्यांनी फोन उचलला नाही. त्यांनी मला प्रतिसाद दिला नाही. परंतु हे लोक पोलिसांना सापडू शकत नाहीत का, या प्रकरणी पोलिसांची काय हात मिळवणी केली आहे ? विदर्भातील शेतकरी कर्जामुळे उद्ध्वस्त झालेला आहे. तो बेजार

5....

NTK/ KTG/ KGS/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

झालेला आहे. अशा परिस्थितीत कोणी कर्ज देत आहे या आशेने गेल्यावर त्यांची फसवणूक होत आहे. रिझर्व्ह बँकेने संबंधित तक्रारदारला स्पष्ट शब्दात लेखी कळविले आहे की, आम्ही मे.कोचर फायनान्शियल या कंपनीला रजिस्ट्रशेन दिलेले आहे. बँकेने ओम फायनान्शियल कंपनीला रजिस्ट्रेशन दिलेले नाही. या कंपन्या वर्तमानपत्रात आम्ही तुम्हाला 4 टक्के दराने कर्ज देऊ अशा जाहिराती करतात. यावर सरकारचे नियंत्रण नाही काय, अशा प्रकारची जाहिरात आल्यानंतर कोणाला कर्ज देता येते काय ? सभागृहात शेतकऱ्यांना 4 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन दिले जाईल असे जाहीर करुन सुध्दा शेतकऱ्यांना या दरात कर्ज देऊ शकलेले नाही. आजही सरकार 10 टक्क्यांनी कर्जाची वसुली करते. परंतु या फायनान्शियल कंपन्या बाहेरुन येतात, लोकांना भुरळ घालतात. त्यावर शासन नियंत्रण आणत नाही. अशा प्रकारची वर्तमानपत्रात जाहिरात आल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्यामुळे स्वत:हून तक्रार नोंदवून या कंपन्यांची शासन तातडीने चौकशी करणार काय आणि ज्या अधिकाऱ्यांनी तक्रार केल्यानंतरही कारवाई केली नाही, पण विधिमंडळात प्रश्न लावल्यानंतर आरोपींना अटक केल्याचे नाटक केले आहे, आरोपी अजूनही फरारच आहेत. त्या अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे का ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी.डी.पाटील : सभापती महोदय, गेली अनेक वर्षापासून आपण पहात आहोत की, अशा अनेक फायनान्शियल कंपन्या रिझर्व्ह बँकेकडे नोंदणी करतात. या कंपन्या लोकांना वेगवेगळया स्वरुपाची आमिषे दाखवून पैसे देण्याच्या योजना जाहीर करतात. त्यांचे ऑफिस आपल्या राज्याच्या बाहेर असते. परंतु येथे एजण्टना नेमून या सर्व प्रक्रियेत समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो. असाच काहीसा प्रयत्न या मे.कोचर फायनान्शियल सर्व्हिसेस प्रा.लि.चंदीगड व ओम फायनान्शियल सर्व्हिसेस, अलीगड (उत्तर प्रदेश) यांच्याकडून झालेला आहे. या कंपन्यांबद्दल तक्रार दाखल झाल्यानंतर त्याबाबत ताबडतोब कारवाई करुन संबंधित आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रुव्हड प्रत / प्रिसिडेन्स नोट

श्री. दिवाकर रावते : मी तक्रारीची तारीख सांगितलेली आहे. "ताबडतोब" याचा अर्थ काय ? आरोपींना केव्हा अटक करण्यात येईल ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : इकॉनॉमिक ऑफेन्स असल्यामुळे जी कागदपत्रे उपलब्ध झाली त्या कागदपत्रांच्या माध्यमातून चौकशी केल्यानंतर ही अटक केली आहे. तीन प्रकरणांमध्ये आरोपींना अटक कलेली आहे. 5 आरोपी अजून फरार असले तरी लवकरच त्यांना देखील पकडले जाईल अशी मी ग्वाही या निमित्ताने देऊ इच्छितो. वर्तमानपत्रामध्ये येणा-या जाहिरातीसंबंधीचा विषय सन्माननीय सदस्यांनी मांडलेला आहे. यावर सभागृहामध्ये ब-याचदा चर्चा झालेली आहे. वर्तमानपत्रातून अनेक प्रकारची आमिषे दाखविणा-या जाहिराती येत असतात. यावर कशा प्रकारे निर्बंध आणावे यासंबंधीची चर्चा प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाशी करावी लागेल. अशा प्रकारच्या जाहिराती देत असताना त्याबाबतीत काही नियम करता येतील का, आमिषे दाखविणा-या जाहिराती येतात त्यावेळी त्या ठिकाणी काही माहिती असावी का, या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न केले जातील.

श्री. दिवाकर रावते : अधिवेशन संपेपर्यन्त आरोपींना अटक केली नाही तर संबंधित अधिका-यांवर कारवाई केली जाईल का ? आमिषे दाखविणा-या जाहिरांतीमध्ये कोणकोणते विषय येतात ?

श्री. आर.आर.पाटील : सभागृहामध्ये जो प्रश्न चर्चेला घेतलेला आहे त्याची या प्रकरणामध्ये व्याप्ती कमी असली तरी अशा प्रकारचे गुन्हे मोठ्या प्रमाणावर राज्यामध्ये घडत आहेत. आर्थिक गुन्हेगारी शाखा जिल्ह्याजिल्ह्यात गठीत कराव्यात अशा प्रकारच्या सूचना शासनाने दिलेल्या आहेत. त्याबाबतीत ट्रेनिंग देण्याचे काम सुरु आहे. तीन प्रकरणामध्ये आरोपींना अटक करण्यात आाली. उत्तर प्रदेशमध्ये पोलीस अटक करायला गेले असता तेथील पोलिसांनी सहकार्य केले नाही. तरी सुध्दा तेथील डी.जी.शी संपर्क साधून ज्यांनी अशी कंपनी काढली, रजिस्ट्रेशन केले त्यांना अटक करण्याची सरकारची भूमिका आहे. वेळेत तक्रार देऊन सुध्दा अधिका-यांनी गांभीर्याने दखल घेतली नाही असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. या बाबतीत मी स्वत: आयजीकडून चौकशी करुन घेईन. लोकांनी तक्रारी करुन सुध्दा पोलीस अधिका-यांनी वेळेत दखल घेतली नाही आणि या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले असे स्पष्ट झाले तर निश्चितपणे संबंधित दोषी अधिका-यांवर शासना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मार्फत कारवाई केली जाईल. उर्वरित आरोपी लवकरात लवकर पकडले जातील. या बाबतीत मोठ्या प्रमाणावर लोकशिक्षण करण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. चिटफंड, कंपन्या, मिसअॅप्रोप्रिएशन ऑफ गव्हर्नमेंट, मिसअॅप्रोप्रिएशन ऑफ सेमी गव्हर्नमेंट, को-ऑप. सोसायटीज, फायनान्शियल इन्स्टिटयुशन्स अशा विविध संस्थांच्या माध्यमातून राज्यामध्ये लोकांची फसवणूक झाल्याच्या रकमा मोठ्या आहेत. 2010मध्ये राज्यामध्ये 699 कोटी 7 लाख 85 हजार 598 रु.ची इकॉनॉमिक ऑफेन्सची नोंद झाली. जानेवारी ते जून 2010 पर्यन्त 299 कोटी आणि जानेवारी ते जून 2011 पर्यन्त 533 कोटी रुपयाची फसवणूक झालेली आहे. राज्यातील आर्थिक गुन्हेगारीची व्याप्ती बघून एक वेगळा सेल राज्यस्तरावर आणि त्याच्या शाखा जिल्हा स्तरावर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : अशा कंपन्यांना रिझर्व्ह बँक परवानगी देत असली तरी आपल्या राज्यामध्ये अशा ज्या खाजगी कंपन्या लोकांकडून पैसे गोळा करतात त्याला पायबंद घालण्यासाठी शासन कायदा करील काय ? स्पिक एशिया या कंपनीने लोकांकडून करोडो रुपये गोळा केलेले आहेत. या कंपन्या रिझर्व्ह बँकेकडून परवानगी घेतात. परंतु त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर नसते. लोकांकडून पैसे गोळा करुन या कंपन्या दोन महिन्यात निघून जातात. तेव्हा रिझर्व्ह बँक आणि केन्द्राच्या आर्थिक खात्याशी बोलून अशा प्रकारच्या कोणत्याही फायनान्स कंपन्यानी आपल्या राज्यातील लोकांकडून पैसे गोळा करु नये अशा प्रकारचे बंधन त्यांच्यावर घालण्यात येईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : ही बाब केन्द्र शासनाच्या अखत्यारितील आहे. कंपनी ॲक्टखाली या कंपन्या रजिस्टर केल्या जातात. तेथे राज्य सरकारचे ज्युरिस्डिक्शन पोहोचत नाही. ठेवीदारांच्या हक्काचे रक्षण करणारा कायदा राज्य सरकारने केला. तो सुप्रिम कोर्टामध्ये अडचणीत आला. त्यावर सुप्रिम कोर्टात निकाल प्रलंबित आहे. तो कायदा राज्यामध्ये यावा. जर कोणत्या कंपनीकडून, कंपनीच्या संचालकांकडून कुणाची आर्थिक फसणूक केली गेली तर त्यांची मालमत्ता जप्त करुन ज्यांची फसवणूक झालेली आहे त्यांना रक्कम वसूल करुन देण्यासंबंधीचा कायदा राज्य सरकारसाठी सुध्दा आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांनी स्पिक एशिया या कंपनीचा उल्लेख केला. एक गोष्ट खरी आहे की, आता पर्यन्त त्या कंपनीच्या वेगवेगळया खात्यावर इन्कम टॅक्स

श्री. आर.आर.पाटील...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डिपार्टमेण्ट आणि पोलिसांनी कारवाई केलेली आहे. जवळ जवळ 131 कोटी रुपये त्यांच्या खात्यावर आढळून आलेले आहेत. आतापर्यन्तच्या प्राथमिक अंदाजानुसार 2 हजार कोटी रुपये देशाच्या वेगवेगळया भागातून त्यांनी बाहेर नेले असण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रामध्ये या कंपनीच्या 18 शाखा आहेत आणि देशातील सर्व राज्यामध्ये देखील या कंपनीच्या शाखा आहेत. ही सिंगापूरबेझ कंपनी आहे. या कंपनीने अन्य देशामध्ये देखील लोकांना अशा प्रकारची आमिषे दाखून त्यांची फसवणूक केल्याच्या बाबी पुढे येऊ लागल्या आहेत. लोक अधिक नफा मिळावा म्हणून अशा कंपन्यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करतात. पैसे मिळतात तोपर्यन्त तक्रार करायला कुणी पुढे येत नाही. पैसे मिळण्याचे बंद झाल्यावर लोक तक्रार करायला येतात. तोपर्यन्त मोठ्या प्रमाणावर लोकांची फसवणूक झालेली असते. साखळी पध्दतीने जवळ जवळ 19-20 लाख लोकांची फसवणूक केल्याची शक्यता आहे. देशामध्ये ही बाब लक्षात आल्याबरोबर मुंबईच्या इओडब्ल्यूने याबाबतीत पुढाकार घेतलेला आहे. पहिली तक्रार आल्याबरोबर एवढी मोठी कंपनी असतानासुध्दा यातील अनेक आरोपींना अटक करण्यामध्ये आपल्या पोलिसांनी यश मिळविलेले आहे. त्यामध्ये विशेषत: तारक वाजपेयी, राजू मल्होत्रा, रवी खन्ना, रईम शेख आणि दीपक सरकार यांना अटक केलेली आहे. काही अन्य देशातील आरोपी सुध्दा वाण्टेड असून त्याबाबतीत आपल्या ईओडब्ल्यूने प्रयत्न सुरु केलेले आहेत. मान्यताप्राप्त वर्तमानपत्रातून या कंपन्यांच्या मोठमोठ्या जाहिराती दिल्या जात आहेत. एवढेच नाही तर आंतरराष्ट्रीय ॲडव्हर्टायझिंग कंपन्या देखील मोठमोठ्या जाहिरातबाजी करीत आहेत. मान्यताप्राप्त वर्तमानपत्रातून, विश्वासार्ह वर्तमानपत्रातून जाहिरात आल्यामुळे लोकांना त्या ख-या वाटतात आणि अशा साखळी पध्दतीमध्ये लोक मोठ्या प्रमाणावर फसतात.

सन्माननीय सदस्यांनी स्पिक एशिया कंपनीचा उल्लेख केला. त्या बाबतीत राज्य सरकारने फार लोकांची फसवणूक होण्यापूर्वी पहिली तक्रार आल्या बरोबर कारवाई करण्यास स्वत:हून सुरुवात केलेली आहे. या कंपनीची पाळेमुळे उखडून टाकण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यासाठी आवश्यक असणारे वकील, चार्टर्ड अकौण्टण्ट आणि विभागामध्ये काम करणारे या क्षेत्रातील तज्ज्ञ इओडब्ल्यूच्या मदतीला दिले जातील. परंतु एकंदरीतच आर्थिक गुन्हेगारीकरुन लोकांना मोठ्या प्रमाणावर फसविले जात आहे. एखादी चोरी झाली, एखादा दरोडा पडला की खूप मोठ्या

..4..

श्री. आर.आर.पाटील....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रमाणावर तो चर्चेचा विषय होतो. पण व्हाईट कॉलर गुन्हेगार कायदाचा आधार घेत आपल्या संस्था रजिस्टर करुन लोकांची मोठया प्रमाणावर फसवणूक करीत आहेत. या बाबतीत मोठी कॅम्पेनदेखील आम्ही करु. कोणत्याही संस्थेमध्ये गुंतवणूक केली तरी एका महिन्यामध्ये दामदुप्पट करणारा कोणता व्यवसाय असू शकत नाही. पण एका महिन्यामध्ये रकम दामदुप्पट करुन दिली जाईल असे सांगणा-या कंपन्या पुढे येत आहेत आणि भोळीभाबडी माणसे निवृत्ती नंतर मिळालेल्या प्राव्हिडण्ट फंडाची सर्व रक्कम त्यामध्ये गुंतवून लुटली जात आहेत. अशा ज्या फसविणा-या कंपन्या असतील, लोक असतील किंवा आंतरराष्ट्रीय कंपन्या असतील, त्यांचा चोख बंदोबस्त करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील.

श्री. दिवाकर रावते : या प्रकरणी सीआयडी किंवा क्राईम ब्रँचकडे चौकशी सोपविण्यात येईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : केलेली चौकशी योग्य आहे की नाही, चौकशीला विलंब लावला का, आरोपींना पाठीशी घातले गेले का याबाबतची माहिती आयजीकडून घेतली जाईल. तसे असेल तर ताबडतोब तपास काढून तो सक्षम अधिका-याकडे दिला जाईल. येत्या 15 दिवसामध्ये तपास संपविण्याच्या सूचना संबंधित अधिका-यांना दिल्या जातील.

...नंतर श्री. खर्चे....

अप्रमाणित प्रत / प्रतिक्षेसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे : मंत्री महोदयांनी अतिशय विस्ताराने उत्तर दिलेले आहे. पण मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, अशा प्रकारचा गुन्हा घडल्यानंतर किंवा त्यासंबंधीची तक्रार दिल्यानंतर चौकशी केली जाते आणि आरोपींना पकडण्यात येते. त्याऐवजी अशा प्रकारच्या जाहिराती ज्या वृत्तपत्रात वेळोवेळी येत असतात त्यांची माहिती सर्वांनाच असते. तसेच आता नव्याने असे सुरु झालेले आहे की, मोबाईलवर एसएमएस येण्यास सुरुवात झाली आहे. तो एसएमएस असा असतो की, "Congrats: Your Mobile number has won 750,000 GBP in 2011 ESPN Star Cricket Anniversary draw held in UK for details contact via this E-mail:infor@espncriket.tk" अशा प्रकारचे एसएमएस सर्रासपणे येऊन लोकांची त्यामुळे सुध्दा फसवणूक होते. या अनुषंगाने माझा प्रश्न असा आहे की, अशा परिस्थितीत तक्रारीची वाट न पाहता अशा जाहिरातींवर लक्ष ठेवण्यासाठी कार्यरत असलेल्या आर्थिक गुन्हे शाखेमध्ये एखादी वेगळी यंत्रणा उभी करुन अशा जाहिरातींबाबत सुओ-मोटो तक्रार दाखल करुन कारवाई करण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, जेव्हा अशा प्रकारच्या जाहिराती येत असतात तेव्हा त्यांनी सामाजिक कर्तव्य म्हणून स्वत:वर बंधन घालणे आवश्यक आहे. एखाद्या श्रीमंत माणसाची फसवणूक होणार असेल तर त्याची जाहिरात करण्यावर सुध्दा नैतिक बंधने घालून द्यावीत. वेबसाईट्स अथवा वर्तमान पत्रातून जाहिराती दिल्या जातात त्यासंदर्भात राज्य स्तरावर ॲनॉलिसीस केले जाईल अशी विंग स्थापन करण्यात येईल. तसेच अशा प्रकारच्या योजनांमध्ये पैसा गुंतवू नये यादृष्टीने सुध्दा मार्गदर्शन अथवा जागृती करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. पाशा पटेल : माननीय गृह मंत्र्यांना माझी अशी विनंती आहे की, आमच्या लातूर जिल्ह्यात "आर्यलोक" नावाच्या फायनान्शियल इन्स्टिटयूशनने किमान 10-20 हजारच नव्हे तर 25 हजार कोटी रुपये जमा केले असावेत. यासंदर्भात माननीय गृह मंत्र्यांकडे मी स्वत: तक्रार घेऊन गेलो होतो. मंत्री महोदयांनी मला एका पोलीस अधिकाऱ्याचा दूरध्वनी नंबर दिला व त्यांना भेटण्याचा सल्ला दिला. मी त्या अधिकाऱ्याच्या कार्यालयात भेटण्यासाठी गेलो तर मला असे चित्र बघायला मिळाले की, माझ्या अगोदर तेथे केरळ व पंजाब सारख्या राज्यातील लोक येऊन या संस्थेने फसवणूक केल्याचे सांगून रडत हाते. आम्ही सुध्दा संबंधित अधिकाऱ्यांना आमची

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल.....

फसवणूक झाली व आमचे पैसे आम्हाला मिळाले पाहिजेत अशी विनंती केली. पण दुसऱ्या दिवशी गेलो तर ते कार्यालय बंद असल्याचे आढळून आले. दुर्दैवाची बाब अशी आहे की, ही कंपनी सुरु झाली होती तेव्हा तिच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रमुख दोन-चार नेत्यांची नावे छापण्यात आली होती. असे प्रकार होतात व लोकांना त्याची सत्यता पटते व लोक गुंतवणूक करतात व त्यांची फसगत होते. आमच्या लातूरचे एक प्रा. श्री. सुर्यवंशी यांनी या योजनेत पैसे गुंतविले पण नंतर त्याला फसगत झाल्याचे समजले तेव्हा त्याने गोवा येथे जाऊन आत्महत्त्या केली. तसेच लातूरचा एक हॉटेल मालक याने सुध्दा त्याची फसवणूक झाली म्हणून आत्महत्त्या केली. अशा प्रकारे दुसऱ्या ठिकाणी जाऊन सुध्दा घटना घतात, यासंबंधी शासन या "आर्यलोक" फायनान्शियल इन्स्टिट्युटवर काय कारवाई करणार आहे, ज्यांनी आत्महत्या केल्या त्यांना मदत व त्यांच्या पैशाची वसुली शासन कशी करणार आहे ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, ज्यांनी आत्महत्या केल्या त्याचे कारण तपपासण्यात येईल. केवळ फसवणूक झाल्यामुळे आत्महत्या केली असेल तर त्याच्या आत्महत्येला प्रवृत्त करणाऱ्यावर गुन्हा दाखल करुन कारवाई केली जाईल.

श्री. एस.क्यू.जमा : सभापति महोदय, माननीय गृहमंत्री ने बहुत विस्तृत जानकारी दी है. मैं एक ही प्रश्न पूछना चाहता हूँ कि रिजर्व बँक ऑफ इंडिया बँकिंग के लिए जो परमीशन देती है, उसको किसी भी राज्य में लागू करने के लिए वहां के राज्य का कानून होता है. लेकिन नॉन बँकिंग फायनेन्सियल डीलिंग के लिए हमारे महाराष्ट्र में कोई कानून नहीं है. इकॉनॉमिक ऑफेन्स के लिए एक कानून होना चाहिए. अगर आपने किसी गुनाहगार को पकड़ा तो उसके ऊपर आई.पी.सी. की धारा 420 लगाकर सी.आर.पी.सी. में प्रोसीडिंग होगा. लेकिन इकॉनॉमिक ऑफेन्स के लिए एक विशेष कानून होना चाहिए, जिसको पुलिस को वाइड पावर होना चाहिए और प्रिवेंटिव एक्शन का भी पावर होना चाहिए. क्या ऐसा कोई कानून बनाने केलिए सरकार विचार करेगी ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : महोदय, आपल्या राज्यात यासंदर्भातील कायदा आपण केला होता. पण ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारित येत असल्यामुळे आपण केलेला कायदा रद्द झाला. त्यामुळे या गुन्ह्यांच्या संदर्भात काही तरी करण्याची नितांत गरज आहे असे शासनाला सुध्दा वाटते. सध्या यासंदर्भात जे नियम आहेत ते फारसे उपयोगाचे नाहीत. कारण असे गुन्हेगार कोणी सापडले तरी त्यांच्यावर केवळ 420 अंतर्गत गुन्हा दाखल करता येतो व नंतर दुसऱ्याच दिवशी तो जामीन मिळवितो. अशा प्रकारे त्या गुन्हेगाराला अटक केल्यानंतर तो जामिनावर सुटून नंतर तर तो राजरोसपणे मोकळा फिरता, म्हणून याबाबत शासनाला नक्कीच काही तरी कठोर पावले उचलण्याची गरज आहे. या अनुषंगाने अभ्यास करुन व विधी व न्याय विभागाचा सल्ला घेऊन आतापर्यंत लोकांची फसवणूक करणाऱ्या ज्या ज्या बँका अथवा वित्तीय संस्था आढळून आल्या असतील, मग त्या कोणाच्याही असोत त्यांच्यावर कारवाई करणे शक्य होईल. तसेच कार्यकर्त्यांना सुध्दा माझे असे आवाहन आहे की, बोलाविण्यापूर्वी बरेच लोक अशा संस्थांच्या उद्घाटन सोहळ्याला उपस्थित असतात. पण त्या कंपनीची विश्वासार्हता नसेल, महिन्याला 20 टक्के किंवा दाम दुप्पट पैसे देण्याची जाहिरात करीत असेल अशा संस्थांचे उद्घाटन करण्यासाठी जाऊ नये.

श्री. दिवाकर रावते : महोदय, या प्रकरणाची सीआयडी चौकशी जाहीर करावी, अशी मी विनंती करतो.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, हे प्रकरण आता तपासाच्या अंतिम टप्प्यावर आलेले आहे. आता पुन्हा सीआयडीकडे तपासासाठी दिले तर कदाचित विलंब सुध्दा लागू शकतो.

अप्रधारित प्रश्न / प्रश्नोत्तरासाठी नाही

पृ.शी.: आंबेजोगाई (जि. बीड) येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी करुन जिल्हा बँकेकडून घेतलेले करोडो रुपयांचे कर्ज

मु.शी.: आंबेजोगाई (जि. बीड) येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी करुन जिल्हा बँकेकडून घेतलेले करोडो रुपयांचे कर्ज यासंबंधी सर्वश्री विक्रम काळे, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री हेमंत टकले, रमेश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ता.अंबाजोगाई, जि.बीड येथे शेतकरी सहकारी तेलबिया कृषि प्रक्रिया कागदोपत्री दाखविण्यात येवून, सदर उद्योगासाठी दि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेंकडून कर्ज रुपात 2 कोटी 75 लाख 50 हजार रुपयाची रक्कम बनावट कागदपत्रांच्या आधारे घेण्यात येणे, तसेच धारुर तालुक्यातील देव दहिफळ येथे बनावट सिंदफणा शेतीमाल पुरवठा वितरण सहकारी संस्थेच्या नावाने घेवून 1 कोटी 80 लाख रुपयांचा अपहार झाल्याचे लेखा परीक्षण अहवालावरुन माहे जुलै, 2011 च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस येणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन जबाबदारांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. प्रकाश सोळंके (सहकार राज्य मंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर इवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : महोदय, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून परळी-वैजनाथ येथील शेतकरी सहकारी तेलबिया प्रक्रिया संस्था, घाटनांदूर येथील पनन सहकारी संस्था या नोंदणीकृत संस्थांकडून खोटी कागदपत्रे बँकेत दाखल करुन जवळपास 2.90 कोटी आणि 1.90 कोटी एवढी रक्कम कर्ज रुपात उचलली. या बँकेचे संचालक श्री. धैर्यशील सोळंके व इतरांविरुध्द एफआयआर दाखल केला. त्यात 1 कोटी 80 लाख 50 हजार एवढी रक्कम आंबेजोगाई येथील संस्थेने आणि घाटनांदूरच्या संस्थेने 2.75 कोटी एवढी अशी जवळपास 6 कोटीची रक्कम कर्ज रुपाने काढल्याचे सिध्द झाले. अशा बोगस संस्थांना दिलेल्या परवानग्या शासन रद्द करणार काय, तसेच 6 कोटीची रक्कम जी खोटी कागदपत्रे दाखल करुन घेतली ती रक्कम मंजूर करणारे आणि रक्कम उचलणारे दोन्ही गुन्हेगार समजून या रकमेची वसुली करण्यासाठी शासन कोणती कारवाई करणार आहे ? सध्या या सहकारी संस्थेचे ऑडिट खाजगी सी.ए. मार्फत होते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

खाजगी ऑडीटरकडून ऑडीट होत असल्यामुळे असे प्रकार झाकले जातात. त्यामुळे यापुढे सहकारी संस्थाचे ऑडीट शासनाच्या ऑडीटरकडून केले जाणार आहे काय ? सहा कोटी रुपये वसूल करण्यासाठी संबंधितांवर फौजदारी खटले दाखल करुन त्यांच्याकडून हे पैसे वसूल केले जातील काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी सदर लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. सिंदफणा शेतीमाल पुरवठा व वितरण सहकारी संस्था, मर्यादित, देवदहीफळ, ता. धारुर, जि.बीड या संस्थेला बँकेने 1.90 कोटी रुपयाचे कर्ज मंजूर केलेले आहे. जे संस्थेचे सभासद नाही अशा व्यक्तींच्या नावे बँकेने कर्ज वितरित केलेले आहे. तसेच शेतकरी सहकारी तेलबिया कृषि प्रक्रिया, सहकारी संस्था, घाटनांदूर, ता. आंबाजोगाई या संस्थेलाही अशाच प्रकारे कर्जाचे वाटप करण्यात आलेले आहे. त्यामुळे सहकार खात्याच्या माध्यमातून जॉईंट रजिस्ट्रार ऑडीटरकडे लेखा परीक्षण तसेच कारवाई करण्याची जबाबदारी सहकार खात्याने सोपविली होती. त्या प्रमाणे लेखा परीक्षण झालेले असून वसुली करण्याच्या दृष्टिकोनातून गुन्हयांची नोंद तसेच पूर्ण तपास व्हावा यासाठी पोलीस स्टेशनला दिनांक 30.6.2011 रोजी दोन गुन्हयांची नोंद करण्यात आलेली आहे. या प्रकारणात कर्ज मंजूर करतांना बँकेच्या संचालकांनी संगनमत केल्याचे उघड झालेले आहे. ज्या संस्थेचे भागभांडवल एक लाख रुपये सुध्दा नाही अशा संस्थांना 3-3,4-4 कोटी रुपये बँकेच्या संचालक मंडळाने मंजूर केलेले आहे. आता पोलिसांमार्फत गुन्हयाचा तपास सुरु असून यामध्ये संस्थेचे अध्यक्ष, संस्थेचे सचिव, संचालक मंडळ तसेच जे कर्जदार जबाबदार आहेत अशांचा शोध घेतला जात आहे. या प्रकरणात कर्ज देणारे बँकेचे संचालक किंवा त्यावेळचे तत्कालीन चेअरमन जबाबदार आहेत. त्यामुळे पोलिसांमार्फत चौकशी करुन संबंधितांवर लवकरात लवकर कायदेशीर कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न उपस्थित केला आहे की, ब-याचशा सहकारी संस्थांचे ऑडीट प्रायव्हेट चार्टड अकाउंटट कडून केले जाते. वैद्यनाथन समितीच्या तसेच नाबार्डच्या संदर्भात गुंतवणूक झालेली असून त्यास नाबार्डनेसुध्दा मान्यता दिलेली आहे. खरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ....

म्हणजे सरकारी ऑडीटरकडून ऑडीट न केल्यामुळे हे प्रकार झालेले आहेत. प्रायव्हेट ऑडीटर संस्थाच्या गैरप्रकाराला पांघरुण घालण्याचे काम करीत आहेत. पेण सहकारी बँकेचे उदाहरण आपल्या समोर आहेच. सहकारी संस्थाचे ऑडीट परत एकदा शासकीय ऑडीटरकडे कशा प्रकारे देता येईल याबाबत नाबार्डशी तसेच आरबीआयशी चर्चा करुन सरकारी ऑडीटचा निर्णय घेण्यात येईल. सरकारी ऑडीटरकडूनच सहकारी संस्थांचे ऑडीट झाले पाहिजे असे सरकारचे सुध्दा मत झालेले आहे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर असून मंत्री महोदयांनी सुध्दा या विषयाचे गांभीर्य मान्य केलेले आहे. ज्यांचे भाग भांडवल 1 लाख रुपये सुध्दा नाही अशांना 5-5,10-10 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. या प्रकरणावरुन अनेकांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, गुन्हे दाखल केल्यानंतर संबंधितांना अटक केली का? अटक केली नसेल तर का करण्यात आली नाही ? या प्रकरणामध्ये ज्यांच्यावर गुन्हे दाखल केलेले आहेत त्यांची नावे काय आहेत ? संबंधित व्यक्तींची मालमत्ता शासन जप्त करणार आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सदर गुन्हे दिनांक 30/6/2011 रोजी दाखल करण्यात आलेले आहेत. दोन गुन्हयांमध्ये शेतकरी सहकारी तेलबिया कृषि प्रक्रिया, सहकारी संस्था, घाटनांदूर, ता. आंबेजोगाई यामध्ये एकंदर 18 लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. यामध्ये चेअरमन श्री. शेषराव श्रीराम गुट्टे, संचालक श्री. रामभाऊ पंढरी गिते, परळी जिल्हा बँकेचे शाखा अधिकारी श्री. शिवाजी रामभाऊ खाडे, तसेच श्री.केदारेश्वर, श्री. रंगनाथ बाबुराव देसाई, बीड, श्री सुनील बाबसाहेब मसनानी, बीड. श्री. रमेश भीमराव मुंढे, वडवली हे कर्जदार असून संस्थेच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर कर्जाचे वाटप करण्यात आलेले आहे. श्री. बहिरवाल अशोक चंद्रकांत हे कजर्दार असून एकंदरीत 18 व्यक्तींवर गुन्हयांची नोंद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, सिंदफणा शेतीमाल पुरवठा व वितरण सहकारी संस्था, मर्यादित देवदहीफळ, ता. धारुर, जि.बीडमध्ये संस्थेचे अध्यक्ष, सर्व संचालक, सचिव, शाखा अधिकारी,

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ....

श्री. शिवाजी रामभाऊ तसेच कर्जदार मिळून 18 व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच खाजगी ऑडीटर श्री. बी.डी.सानप यांच्यावर सुध्दा गुन्हयाची नोंद करण्यात आलेली आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, शेतकरी सहकारी तेलबिया कृषि प्रक्रिया, सहकारी संस्था, घाटनांदूर, ता. आंबेजोगाई तसेच सिंदफणा शेतीमाल पुरवठा व वितरण सहकारी संस्था, मर्यादित देवदहीफळ, ता. धारुर, जि.बीड या दोन्ही सहकारी संस्थेला कर्ज उपलब्ध करुन दिले होते तेव्हा बँकेच्या सर्व संचालक मंडळाची परवानगी घेण्यात आली होती काय ? आपण जशी या दोन संस्थावर कारवाई केलेली आहे तशाच प्रकारची कारवाई बँकेच्या संचालक मंडळावर केली जाणार आहे काय ? कर्ज वाटपामध्ये बँकेचे संचालक मंडळ किती जबाबदार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, कर्ज वाटप करीत असतांना बँकेच्या खालच्या सर्व अधिका-यांनी कर्ज देऊ नये असा रिपोर्ट दिलेला असतांना सुध्दा बँकेच्या संचालक मंडळाने सहकारी संस्थेला कर्जाचे वाटप केलेले आहे. या प्रकरणात जे संचालक जबाबदार आहेत, जे त्यावेळच्या बैठकीत उपस्थित होते व ज्यांनी संमती दिलेली आहे अशांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल. परंतु ज्या संचालकांनी कर्ज देण्यास लेखी किंवा तोंडी विरोध दर्शवला त्यांच्यावर कारवाई करण्याची गरज नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, संचालक मंडळाने कर्ज मंजूर केले म्हणून त्यांच्यावर कारवाई केली तर ते चुकीचे होईल. या प्रकरणांमध्ये कागदपत्रे बरोबर आहेत. मिटिंगमध्ये प्रकरण मंजूर केले होते. करोडो रुपये राज्य बँकेने मंजूर केले होते परंतु कर्ज मंजूर केल्यानंतर उचल देण्याचे काम बँकेच्या अधिका-यांचे असते. खरे म्हणजे बँकेच्या अधिका-यांवर गुन्हे दाखल झाले पाहिजेत. ज्या वेळेला एक कोटी रुपयाचे कर्ज मंजूर होते त्याच दिवशी एक कोटी रुपयांचे कर्ज उचलले गेले असेल तर ते चुकीचे होईल. कर्जाची उचल टप्प्या टप्प्याने झाली पाहिजे. कामाची प्रोग्रेस जसजशी होईल तसतशी उचल दिली गेली पाहिजे होती ती या प्रकरणात दिली गेली नाही. त्यामुळे संबंधित अधिका-यांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके ....

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या प्रकरणात बँकेच्या अधिका-यांनी शिफारस केली नव्हती. कर्ज मंजूर करु नये म्हणून खालच्या अधिका-यांनी शिफारस केलेली असतांना बँकेच्या संचालकांनी कर्ज मंजूर केलेले आहे. नियमामध्ये बसत नसतांना सुध्दा या प्रकरणामध्ये कर्ज मंजूर करण्यात आलेले आहे. ज्या संस्थेचे भाग भांडवल एक लाख रुपये आहे अशा संस्थांना 3-3 कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आलेले आहे. बँकेच्या खालच्या अधिका-याने कर्ज देऊ नये म्हणून विरोध केलेला असतांना सुध्दा संबंधितांना कर्ज देण्यात आलेले आहे ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके

यात प्रामुख्याने पदाधिकारी यांची जबाबदारी येते. कर्ज वितरण करताना बँकेच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी येते या सन्माननीय सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे. येथे कर्ज मंजूर करताना जबाबदारी आलेली आहे, हे मी मुद्दाम येथे नमूद करू इच्छितो. निश्चितपणाने जे जे कर्मचारी, अधिकारी आणि संचालक जबाबदार असतील त्यांच्यावरही गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया पार पाडली जाईल.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, अनेक घोटाळे उघडकीस आल्याचे आम्ही वर्तमानपत्रात वाचलेले आहे. माननीय मंत्री महोदय कबूल करीत आहे की, बँकेच्या अधिकाऱ्यांचा विरोध असतानाही कर्ज देण्यात आलेले आहे. त्यामुळे आपण संचालक मंडळ बरखास्त करणार काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, संचालक मंडळ बरखास्त करण्यासंबंधीची तरतूद आहे. पण त्यासाठी प्रोसिजर आहे. संचालक मंडळ बरखास्त करण्यासंबंधीची आमची कारवाई सुरू आहे. कलम 78 ची नोटीस देण्यात आलेली आहे. त्यामुळे संचालक मंडळ बरखास्त करण्यासंबंधीचे उत्तर सभागृहात उत्तर देणे उचित होणार नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी घोटाळा झाल्याचे मान्य केले आहे. साडेपाच कोटी रूपये हे शेतकऱ्यांचे आहेत. ते कसे वसूल करणार आहात ? संबंधितांविरूद्ध गुन्हे दाखल होतात, जामिन मिळतो. शेतकऱ्यांचा पैसा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत असतो. ते पैसे कसे वसूल होणार आहेत ? खाजगी ऑडिटरकडे काम दिल्यामुळे हे सर्व घोटाळे झाकले जात आहेत. त्यामुळे आता आपण म्हणालात की, नाबार्डकडे जाऊन करू. हे किती कालावधीमध्ये करण्यात येणार आहे. पुढील अधिवेशन येण्याच्या आधीशासकीय यंत्रणेकडून ऑडिट करण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी परत एकदा सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, वसुली करण्यासाठीच पोलीस केस करण्यात आलेली आहे. गरज पडली तर जे जबाबदार लोक आहेत त्यांची मालमत्ता देखील अटॅचड् करून वसुली करण्यात येईल. मग

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके....

ते बँकेचे संचालक असो, अधिकारी असो किंवा कर्मचारी असो. येथे दुसरा प्रश्न महत्त्वाचा आहे. मी मघाशीच सांगितले की, वैद्यनाथन समिती बरोबर MOU झाला तेव्हा महाराष्ट्र शासनाच्या वतीने देखील काही कमिटमेंट दिल्या. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ऑडिट असेल किंवा विकास सेवा सहकारी सोसायटीचे ऑडिट असेल किंवा अन्य सहकारी संस्था असतील त्यांचे ऑडिट प्रायव्हेट ऑडिटरने करण्याची अट शासनाने मान्य केली आहे. सध्या महाराष्ट्रातील स्थिती पाहता गव्हर्मेंट ऑडिटरकडे ही सर्व कामगिरी सोपविली पाहिजे असा मतप्रवाह आहे. हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे. त्याबाबतीतही लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

.....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील वडवणी गावात पूर्वापार सुरू असलेला यंत्रमाग व्यवसाय बंद पडणे

मु. शी. : मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील वडवणी गावात पूर्वापार सुरू असलेला यंत्रमाग व्यवसाय बंद पडणे यासंबंधी प्रा.सुरेश नवले, सर्वश्री राजन तेली,सुभाष चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात बीड-परळी राज्यमार्गावर बालघाट डोंगररांगेच्या पायथ्याशी वडवणी गावात पुर्वापार सुरु असलेला यंत्रमाग व्यवसाय बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे निदर्शनास येणे, अंदाजे २००० यंत्रमागांपैकी १८०० यंत्रमाग बंद असून यंत्रमाग भंगारात टाकण्याची वेळ वडवणीतील यंत्रमागधारकांवर आलेली असणे, त्यामुळे अंदाजे १० हजार कारागिर रोजगारापासून वंचित होण्याची शक्यता निर्माण होणे, याकडे स्थानिक प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष यंत्रमागधारक व कारागिरांवर आलेली उपासमारीची पाळी, पसरलेली नाराजीची भावना, याबाबत शासनाने कार्यवाही करुन या भागातील यंत्रमाग उद्योगाला पुनर्जीवित करण्याची व चालना देण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री.प्रकाश सोळंके (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, बीड जिल्हा हा ऊस तोड कामगारांचा जिल्हा म्हणून महाराष्ट्रात ख्यातनाम आहे. 1985 मध्ये दोन हजार यंत्रमाग वडवणी परिसरामध्ये होते. आता तेथे 150 यंत्रमाग सुरू आहेत. मध्यंतरी बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आले. त्यापैकी एक निर्णय असा होता की, 27 अश्व शक्तीपर्यंत जेवढे यंत्रमाग आहेत त्यांना 50 टक्के वीज बिल भरण्यामध्ये माफी देण्यात आली होती आणि 27 अश्व शक्ती पेक्षा जास्त असलेल्या यंत्रमागांना 66 टक्के वीज माफी देण्यात आली होती. तेव्हा माझा प्रश्न आहे की, सरसकट 66 टक्के वीज बिलामध्ये माफी सर्व यंत्रमाग धारकांना देणार आहात काय ? शेतकऱ्यांना आपण 4 टक्के दराने कर्ज पुरवठा करतो. हा उपेक्षित घटक आहे. श्रमजीवी आहे. त्यामुळे या घटकाला 4 टक्के दराने कर्ज देण्याचा प्रयत्न करणार आहात काय, तशा सूचना राज्य शासन देणार आहात काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील यंत्रमागांचा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास मी आणून देऊ इच्छितो की, वडवणी येथे खाजगी क्षेत्रामध्ये 300 पावॅर लूम्स आहेत. 2000 हजार पॉवरलूम्स व 10 हजार कामगारांवर त्याचा परिणाम झालेला आहे, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. पण तशी काही परिस्थिती नाही. तरी सुद्धा शासनाचे निश्चतपणाने प्रयत्न सुरू आहेत. सदर यंत्रमाग जुने झालेले आहेत. त्यामध्ये तांत्रिकदृष्टया बदल आले पाहिजेत. तेथे चांगले पॉवरलूम्स उभे राहिले पाहिजेत. त्यामुळे शासनाच्या वतीने दिनांक 15.1.2011 रोजी बैठक घेण्यात आली. केंद्र शासनाच्या काही योजना आहेत. त्या योजनेनुसार त्यांचे क्लस्टर डेव्हलपमेंट व्हावे व चांगल्या पद्धतीने लूमचा विकास व्हावा म्हणून उद्योग संचालनालयाच्या माध्यमातून प्रकल्प अहवाल लिहिण्याचे काम सुरू आहे. निश्चितपणाने केंद्र सरकारच्यावतीने जास्तीतजास्त निधी मिळवून देण्याचा प्रयत्न राज्य शासनाच्या वतीने करण्यात येईल. सवलतीच्या दराने वीज यंत्रमागधारकांना दिली जाते. 27 हॉर्सपॉवरपर्यंत 50 टक्के आणि 27 हॉर्स पॉवरपेक्षा जास्त असलेल्यांना 66 टक्के सबसिडी देण्यात येते. वस्त्रोद्योग विभागाने अशी भूमिका घेतली आहे की, सर्वांना समान दराने वीज मिळाली पाहिजे. दोघांनाही 66 टक्के सबसिडी मिळाली पाहिजे. सदर प्रश्न मंत्रिमंडळाच्या विचाराधीन आहे. या संबंधी लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

मुंबईच्या समुद्र किनाऱ्याजवळ निर्मनुष्य जहाज भरकटणे

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एक छोटासाच मुद्दा आहे. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील सभागृहामध्ये उपस्थित आहेत. परवा सुरक्षेच्या प्रश्नावर चर्चा करताना पावसाळा सुरू असल्यामुळे समुद्रात बोटी गस्त घालत नाही अशा प्रकारचे उत्तर देण्यात आले होते. काल आम्ही पाहिले की, एम व्ही पॅव्हिट नावाचे निर्मनुष्य जहाज आले आहे. हे जहाज आल्याचे कोस्टल गार्डला माहीत नाही. आपल्याच स्थानिक लोकांनी सांगितल्यामुळे यासंबंधातील माहिती कळली. या पूर्वी विस्डम नावाचे जहाज आले होते. त्यामुळे हा नेमका काय प्रकार आहे ? त्या जहाजामध्ये काहीही नसेल. परंतु, मुंबईमध्ये सध्या घातपाताचे प्रकार सुरू आहेत. अशा पद्धतीचे जहाज आल्यासंबंधीची माहिती पोलिसांनी दिली आहे काय ? मुंबईमध्ये अशी चर्चा आहे की, मोठे जहाज येते त्याची माहिती शासनाला नसते. लोकांनी माहिती दिल्यानंतर ती माहिती कळते. तो पर्यंत कोस्टल गार्डला देखील काही माहिती नसते. आपण नेहमी म्हणतो की, सागरी मार्गाने आरडीएक्स आले. अशा प्रकारे मुंबईच्या किनाऱ्यावर जहाज येत असल्यामुळे मुंबईकरांमध्ये स्वाभाविकपणे एक प्रकारची चिंता आहे. यासंबंधातील अधिकची माहिती श्री.आर.आर.पाटील, माननीय गृह मंत्री यांच्याकडे असेल आणि ती त्यांनी संगितली तर ती जनतेपर्यंत पोहोचेल.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सेंट्रल एजन्सीच्या कोस्टल गार्ड या एजन्सीकडून तपशीलवार माहिती घेऊन मी उद्या तपशीलवार निवेदन सभागृहात करेन. मी एवढेच सांगतो की, यातून संशयदायक व भीतीदायक अशी कुठलीही परिस्थिती नसल्याची प्राथमिक माहिती कॉस्टल गार्डतर्फे पोलिसांना मिळाली असून त्यांनी ती मला दिलेली आहे. त्यामुळे कोणीही चिंता करण्याची आवश्यकता नाही. ते जहाज कसे आले, कुठून आले, नेमक्या कुठल्या यंत्रणाने ते थांबवायला पाहिजे होते यासंबंधातील सविस्तर निवेदन मी उद्या करेन.

====

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एमटीआर कायद्यात सुधारणा करणे

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय गृह मंत्री सभागृहात आहेत. त्यांनी मघाशी लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना ठेवीदारांचे सरंक्षण करतो असे सांगून त्यांच्या प्रती सहानुभूती व्यक्त केली. एमटीआर कायदा आहे. या कायद्यामध्ये बदल करण्यासाठी शासन केंद्र शासनाला व भारतीय रिझर्व्ह बँकेला सूचना करणार आहे काय किंवा त्यात बदल करण्यासंबंधी राज्य शासन काही पुढाकार घेणार आहे काय ? पेण अर्बन बँकेत 750 कोटी रूपये बुडाले आहेत. त्यापैकी 250 कोटी रूपयेच ठेवीदारांना मिळणार आहे. हा ब्रिटीश कालीन कायदा आहे. सदर कायद्यामध्ये बदल करण्यासंबंधी राज्य शासन पुढाकार घेईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मोठया प्रमाणावर फसवणूक प्रत्येक वर्षी कशी होते व यासंबंधातील रकमा सुद्धा मी सभागृहात सांगितलेल्या आहेत. चिंता व्यक्त करावी असा हा प्रश्न आहे. गोरगरीब माणसे मोठ्या अपेक्षेने पैसे गुंतवित आहेत. आपण आपल्या राज्यामध्ये युती शासन असताना ठेवीदारांचे रक्षण करणारा कायदा आणला. पण सेंट्रल ॲक्टच्या कॉन्ट्ररी ॲक्ट आहे म्हणून हायकोर्टाने तो सेट अ साईड केला होता. त्यामुळे आपल्या हातामध्ये कुठलाच कायदा राहीला नव्हता.

यानंतर सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर. आर. पाटील....

आणि असे करीत असतांना जर कुणी आढळले तर त्याविरुध्द कलम 420 प्रमाणे केसेस दाखल करीत होतो. त्यानंतर आम्हाला या कायद्याची आवश्यकता आहे हे सांगण्यासाठी राज्य सरकार सुप्रीम कोर्टामध्ये गेले. सुप्रीम कोर्टाने हा कायदा वैध ठरविल्यामुळे या पुढील काळात ठेवीदारांच्या हक्काचे रक्षण करणारा कायदा आपल्याला प्राप्त झाला आहे. तरी सुध्दा या कायद्यामध्ये परिपूर्णता नाही. एखाद्या व्यक्तीने फसवणूक केल्यानंतर त्याच्याकडील मालम-ता जप्त करता येते. परंतु ती विकल्यानंतर ठेवीदारांना परत देण्यासाठी ती मालमत्ता सापडत नाहीत. अनेक ठिकाणी बेनामी मालमत्ता केल्या जात असल्यामुळे हा कायदा केला तरी ठेवीदारांच्या हक्काचे पूर्णपणे रक्षण होऊ शकत नाही हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे गुंतवणूक करणाऱ्या लोकांच्या पैशाचे पूर्णपणे रक्षण व्हावे, त्यांच्या रकमा शाबूत, सुरक्षित रहाव्यात यासाठी राज्य सरकार पुढाकार घेईल. यामध्ये फिल्डवर येणाऱ्या अडचणी आम्ही केंद्र सरकारच्या व रिझर्व्ह बँकेच्या लक्षात आणून देऊ. फसवणूक करण्यापूर्वी काही प्रतिबंधात्मक उपाय योजना राज्य सरकारला करता आल्या पाहिजेत आणि जर कुणी फसवणूक केली तर पूर्णपणे आश्वासित केलेली रक्कम ठेवीदाराला मिळाली पाहिजे यासाठी एक परिपूर्ण कायदा आणण्यासाठी हे राज्य सरकार पुढाकार घेईल. आज ठेवीदारांच्या हक्काचे रक्षण करणारा जो कायदा प्राप्त झाला आहे त्या आधारे ज्या कंपन्यांनी भ्रष्टाचार आणि फसवणूक केलेली आहे त्यांच्याकडून जास्तीत जास्त रकमा वसूल करुन त्या गुंतवणूक करणाऱ्यांना देण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय गृहमंत्र्यांनी चांगला निर्णय घेतल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्रास विलंब होत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान

मु. शी. : मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्रास विलंब होत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान याबाबत श्री. पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्मा□□□य विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यातील अनेक अभियांत्रिकी व आरोग्य महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राखीव कोटयातून प्रवेश मिळाल्यामुळे जातपडताळणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. या विद्यार्थ्यांकडून जात पडताळणी समितीकाडे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज सादर केले जातात. परंतु त्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यास सुमारे एक वर्षाचा कालावधी लागत असल्यामुळे त्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागून त्यांचे शैक्षणिक नुकसान होते. अभियांत्रिकी व आरोग्य महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्राची तपासणी लवकर करण्याबाबत महाविद्यालयाकडूनही आपणांकडे विनंती करण्यात येते. विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने शैक्षणिक कार्यास्तव जात पडताळणी समितीकडे येणाऱ्या प्रकरणांवर लवकरात लवकर निर्णय घेऊन ती निकाली काढण्याच्या दृष्टीने या प्रकरणी योग्य ती कारवाई करण्याबाबत सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री महोदयांना संचित करावे म्हणून या विशेष उल्लेखाव्दारे ही बाब मी सदनाच्या निदर्शनास आणीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : इतर राज्यातील विद्यापीठांना आपल्या राज्यात विस्तारासाठी परवानगी देतांना घ्यावयाची काळजी

मु. शी. : इतर राज्यातील विद्यापीठांना आपल्या राज्यात विस्तारासाठी परवानगी देतांना घ्यावयाची काळजी याबाबत श्री.हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्मा□□□य सदस्य श्री. हेमंत टकले यां□□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडतो.

उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रातील सर्वाधिक विद्यापीठे महाराष्ट्रात आहेत त्याचप्रमाणे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ ही देशात अग्रेसर आहे. अशा परिस्थितीत इतर राज्यातील विद्यापीठांना विस्तारासाठी आपल्या राज्यात येण्याची परवानगी देताना काळजी घेण्याची आवश्यकता आहे. आपल्या विद्यापीठाला एखाद्या विषयात उपलब्धता नसेल तर प्रथम राज्यातील विद्यापीठांना असे अभ्यासक्रम सुरु करण्यास प्राधान्य देण्याचे निर्देश द्यावेत. अन्य राज्यातून येणाऱ्या विद्यापीठांबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता आहे".

अधिकृत मत / परिस्थिती नाही

पृ. शी. : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या सरदारगृह वास्तूची झालेली दुरवस्था

मु. शी. : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या सरदारगृह वास्तूची झालेली दुरवस्था याबाबत श्री. रामदास कदम, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : :सन्मा□□□य सदस्य श्री. रामदास कदम यां□ विशेष उल्ले□सबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"1ऑगस्ट रोजी आपण लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करीत असतो. परंतु लोकमान्य टिळकांनी ज्या सरदारगृहात शेवटचा श्वास घेऊन त्यांचे देहावसान झाले ती ऐतिहासिक वास्तू सद्या वादात असून मुंबई हायकोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात आहे. या वास्तूच्या दर्शनी भागात असलेला लोकमान्यांचा अर्धाकृती पुतळा असून त्यांची पुरती दुरवस्था झाली आहे. त्या खाली असलेली त्यांच्या नावाची पाटीही तुटली आहे. प्रवेश व्दारावरील संगमरवरावर "स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे व तो मी मिळवणारच" ही सिंहगर्जना कोरलेल्या भिंतीवर झुडपे उगवली आहेत. या वास्तूचा वाद असेल, परंतु लोकमान्यांचा पुतळा व सिंहगर्जनेवरील उगवलेले झुडपे काढून सुस्थितीत करण्याबाबत कोणतीच मनाई न्यायालयाने केलेली नाही. ज्या लोकमान्यांनी देश घडविला व स्वातंत्र्ययुध्द जिंकले त्यांचेच विस्मरण झाले आहे. शासनाने वास्तूबाबतचा निर्णय लागत नाही तो पर्यंत तरी लोकमान्यांच्या पुतळयाची व सिंहगर्जनीची काळजी घेणे गरजेचे आहे, या बाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे".

सभापती महोदय, आज 1 ऑगस्ट रोजी आपण लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी साजरी करीत आहोत म्हणून आपल्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास एक गोष्ट आणीत आहे. लोकमान्य टिळकांचा मृत्यू सरदारगृहामध्ये झाला. "स्वराज्य हा माझ्या जन्मसिध्द हक्क आहे व तो मी मिळविणारच" असे सांगून ज्यांनी ब्रिटीश राजवटीशी उभे आयुष्य झुंज दिली. ज्या घरामध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला ते घर आज मुंबई उच्च न्यायालयाच्या ताब्यात आहे. लोकमान्य टिळकांची पगडी व त्यांची काठी देखील न्यायालयाकडे जमा आहे. या सरदारगृहाबाहेर असलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ AKN/

श्री.रामदास कदम....

लोकमान्य टिळकांच्या पुतळयाची सुध्दा अतिशय वाईट दुरवस्था झाली आहे. त्या ठिकाणी "स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे" हे घोषवाक्य लिहिले आहे. त्यावर झाडे झुडपे उगवली आहेत. एका बाजूला त्यांच्या माध्यमातून आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यामुळे आम्ही या सभागृहामध्ये आलो. एका बाजूला आपण त्यांची पुण्यतिथी साजरी करीत असतांना दुसऱ्या बाजूला त्यांचा ज्या वास्तूत मृत्यू झाला, त्या वास्तूच्या चौथ्या मजल्यावर असलेले त्यांचे घर न्यायालयाच्या ताब्यात आहे. या साठी शासन नेमके कोणते प्रयत्न करणार आहे? त्यांच्या पुतळयाची जी दुरवस्था झाली आहे, त्याकडे हे शासन लक्ष देणार आहे की नाही? ही गंभीर बाब असल्यामुळे विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणीत आहे. आज त्यांची पुण्यतिथी असल्यामुळे आपण याची तातडीने गंभीर दखल घेऊन त्यांच्या पुतळयाकडे कसे लक्ष देता येईल, ज्या घरामध्ये त्यांचा मृत्यू झाला ते आपल्या ताब्यात कसे आणता येईल हे पहावे. हे घर सन 2005 पासून न्यायालयाच्या ताब्यात आहे, या करिता शासनाने तात्काळ दखल घेऊन या मध्ये हस्तक्षेप करावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

अप्रमाणित प्रत / प्रतिक्षेपणी नाही

पृ. शी. : बेस्टच्या बस चालकांची रिक्त पदे न भरल्यामुळे प्रवाशांना तासन तास बसची प्रतिक्षा करावी लागणे

मु. शी. : बेस्टच्या बस चालकांची रिक्त पदे न भरल्यामुळे प्रवाशांना तासन तास बसची प्रतिक्षा करावी लागणे याबाबत श्रीमती अलका देसाई, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्मा□□□य सदस्या श्रीमती अलका देसाई यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडते.

"मुंबई येथील बेस्टमध्ये बसगाडयांची संख्या वाढविण्यात आली असली तरी बस चालकांची शेकडो पदे रिक्त असल्यामुळे अनेक बसगाडया डेपोबाहेरच पडत नाहीत. त्या मुळे या बसगाडया धूळ खातच पडल्या असल्याचे आढळून आले आहे. सुमारे 15 टक्के बस गाडया डेपोबाहेर पडत नसल्यामुळे प्रवाशांना तासन तास बस स्टॉपवर बसची वाट पहात उन्हा-पावसात बसची प्रतिक्षा करीत रहावे लागत असल्याचे आढळून येत आहे. त्याच प्रमाणे बसेसची 15 टक्के संख्या कमी झ ाल्यामुळे बेस्टला कोटयवधी रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. या मुळे बेस्टमध्ये असलेली रिक्त पदे त्वरित भरण्याची अत्यंत गरज असल्याने या अतिशय गंभीर व महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील प्राथमिक माध्यमिक शाळांतील शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याची आवश्यकता

मु. शी. : राज्यातील प्राथमिक माध्यमिक शाळांतील शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याची आवश्यकता याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□□य सदस्य श्री. जयवंतराव जाधव यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

"राज्यातील प्राथमिक माध्यमिक शाळांतील शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याच्या मागणीसाठी शिक्षक संघटनांनी घंटा नाद व धरणे आंदोलनाचा अवलंब करणे, तुटपुंज्या तीन हजार मानधनामुळे शिक्षकांसमोर कुटुंबाच्या उदरनिर्वाह करण्याचा निर्माण झालेला जटिल प्रश्न तसेच उद्याची भावी पिढी घडविण्यासाठी दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना आर्थिक प्रश्नातून मुक्त करण्यासाठी त्यांना मानधनावरुन वेतनावर आणण्याची किंवा मानधनात भरघोस वाढ करण्याची आवश्यकता, या बाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बी.एस.एफ.चे शहीद जवान प्रवीण डेरे हे यांच्या कुटुंबियाना शासनाकडून मदत न मिळणे

मु. शी. : बी.एस.एफ.चे शहीद जवान प्रवीण डेरे यांच्या कुटुंबियाना शासनाकडून मदत न मिळणे याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□□य सदस्य श्री.जयवंतराव जाधव यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

"दिनांक 14 मार्च, 2011 रोजी आसाममध्ये नक्षलवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देताना मौजे कवठे (ता. वाई, जि.सातारा) येथील बी.एस.एफ. जवान प्रवीण डेरे हे शहीद झाल्याची घटना घडणे, मात्र त्यांच्या बलिदानानंतर चार महिन्याचा कालावधी ओलांडूनही त्यांच्या कुटुंबाला शासनाकडून मदत न मिळणे, त्यामुळे ह्या शहीद जवानाची आई व पत्नीवर मजुरी करण्याची तसेच उपासमारीची आलेली वेळ, या बाबत देशाच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या शहिदांच्या कुटुंबांना शासनामार्फत तातडीने मदत करण्याची आवश्यकता, या बाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कळव्यातील मफतलाल इंजिनिअरींग कंपनी बंद होऊनही हजारो कामगारांना हक्काची देणी न मिळणे.

मु.शी.: कळव्यातील मफतलाल इंजिनिअरींग कंपनी बंद होऊनही हजारो कामगारांना हक्काची देणी न मिळणे याबाबत श्री.किरण पावसकर वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.किरण पावसकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, कळव्यातील मफतलाल इंजिनिअरींग कंपनी बंद होऊन 23 वर्षे झाली. परंतु कंपनीतील हजारो कामगारांना त्यांच्या कष्टाची हक्काची देणी आजतागायत मिळाली नसून न्याय मिळावा म्हणून कामगार संघर्ष करीत असून 13 जून रोजी मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. कळवा नाका ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत कामगार व कामगारांच्या कुटुंबियांनी मोर्चा आयोजित केला होता.गेल्या 23 वर्षात 3500 कामगारांपैकी 1250 कामगारांचे निधन झालेले आहे. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींच्या आशीर्वादाने बंद मफतलाल कंपनीच्या जागेवर बेकायदा बांधकामे, झोपडपट्टया उभ्या रहात आहेत. कामगारांना या जागेवर घरे बांधण्यास परवानगी देण्यात यावी तसेच अतिक्रमण होऊ नये म्हणून संबंधित यंत्रणा जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत सूचना देण्यात याव्यात व कामगारांची देणी लवकरात लवकर मिळावी. अन्यथा ठाणे जिल्हाधिकारी, ठाणे महानगरपालिका आयुक्त यांच्या कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशाराही कामगारांकडून देण्यात आलेला आहे. याबाबत शासनाकडून तातडीने कार्यवाही व्हावी यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील धामापूर येथे कृषी
पर्यटन केंद्र स्थापन करणे

मु.शी.: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील धामापूर येथे कृषी
पर्यटन केंद्र स्थापन करण्याबाबत श्री.सुभाष
चव्हाण वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची
सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

महाराष्ट्र शासनाने सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेला आहे. याच सिंधुदूर्ग जिल्ह्यात सन 1650 मध्ये बांधण्यात आलेला शिवकालीन धामापूर तलाव आणि त्याचा परिसर अत्यंत निसर्गरम्य आहे. त्यामुळे "धामापूर" हे गाव शासनाने पर्यटन क्षेत्र म्हणूनही घोषित केले आहे. याठिकाणी अनेक पर्यटक येतात. या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेती व शेती विषयक आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती शेतकरी व पर्यटकांना देणे तसेच नवनवीन शेतीचे तंत्रज्ञान, अवजारांची माहिती, प्रात्यक्षिके, काजू, आंबा, चिकू, नारळ, फणस, मिरी आणि पिकांची कलमे इत्यादी विषयक माहिती देण्यासाठी शासनाने धामापूर येथे सन 2007 मध्ये ज्यावेळेला माननीय श्री.शरद पवारसाहेब राज्याचे माननीय मुख्यमंत्री होते. त्यावेळी फलोद्यानमध्ये क्रांती झाली तेव्हा सर्व सोयीने युक्त व अद्ययावत आधुनिक तंत्राची माहिती देणारे "कृषी संशोधन केंद्र" स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. धामापूर येथे "कृषी संशोधन केंद्र (कृषी बीज केंद्र)" स्थापन करण्यात आले. परंतु आज या ठिकाणी अत्यंत दयनीय अशी अवस्था आहे. या केंद्रात रोपवाटिका सक्षम नाहीत. आधुनिक अवजारे उपलब्ध नाहीत. माहिती दर नाहीत. वीज केंद्र कार्यान्वित नाही. महाराष्ट्र शासनाने सन 2007 रोजी सिंधुदुर्ग जिल्हा "कृषी पर्यटन जिल्हा" म्हणून घोषित केला तरी धामापूर येथील केंद्राचे रुपांतर आधुनिक व नवीन तंत्रज्ञानाने युक्त असे "कृषी पर्यटन केंद्र" स्थापन करावे अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे सूचना करीत आहे.

. . . .एक्स-3

पृ.शी.: महामानवांनी केलेल्या महान कार्याची माहिती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देण्यासाठी परिपत्रके काढण्याची आवश्यकता

मु.शी.: महामानवांनी केलेल्या महान कार्याची माहिती देण्यासाठी परिपत्रके काढण्यची आवश्यकता या बाबत श्री.भगवान साळुंखे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंके यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आज एका विशेष उल्लेखाच्या माध्यमातून महत्वाच्या मुद्याकडे शासनाचे लक्ष वेधत आहे. राज्यातील सर्वच शैक्षणिक संस्थामधून महात्मा गांधी, महात्मा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अशा महामानवांची जयंती किंवा पुण्यतिथी साजरी केली जात असते. आजच लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आहे. प्रत्यक्ष अध्यापनाचे कामकाजाव्यतिरिक्त या महामानवांनी केलेल्या महान कार्याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधणे, त्यांनाही तशा प्रकारे काम करण्याची प्रेरणा देणे,त्या कार्यक्रमाच्या अनुषंगिक इतर काही उपक्रम आयोजित करणे असे या जयंती आणि पुण्यतिथी साजरी करण्याच्या पाठीमागे आपला हेतू असतो. या पूर्वी शासनाच्या स्तरावर शालेय शिक्षण विभागाकडून हे उपक्रम कसे साजरे केले जावेत याकडे लक्ष वेधले जात होते आणि तसे ते करुनही घेतले जात होते. आज प्रशासनाच्या उदासीनतेतून या जयंत्या-मयंत्याचे दिवस हे शाळांना सुट्टया उपभोगण्याचे दिवस आहेत असा चुकीचा अर्थ लावला जात आहे, त्यामुळे याकडे लक्ष दिले जात नाही.म्हणून या महामानवाच्या संबंधातील उपक्रमांचा उपयोग केवळ सुट्टयांसाठी आहे असा चुकीचा संदेश शासनाच्या उदासीनतेमुळे जात आहे. मी या माध्यमातून शासनाला अशी विनंती करतो की, अशा मानवांच्या जयंती आणि पुण्यतिथीच्या निमित्ताने चांगले उपक्रम साजरे करण्यासाठी विशेष योजना राबविली जावी आणि तसे आदेश देण्यात यावेत.

. . . .एक्स-4

पृ.शी.: कोयना धरण व वीज प्रकल्पाच्या सुरक्षेबाबत

मु.शी.: कोयना धरण व वीज प्रकल्पाच्या सुरक्षेबाबत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष भोईर, वि.प.स.यांनी दिलेली विशेष

उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुभाष भोईर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सुभाष भोईर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्याचा नव्हेतर देशाचा गौरव असलेला सुमारे 600 लाख लोकांना सुमारे दहा वर्षे पुरेल एवढ्या पाणी साठ्याची क्षमता असलेले कोयना धरण असून, त्या धरणाच्या सुरक्षेसाठी पर्यटकांच्या मोबाईल, कॅमेरावर तेथील व्यवस्थापनाने बंदी घातली आहे. पण धरण परिसरात नेहरु उद्यान उभारण्यात येऊन, पर्यटकांकडून दहा रुपयांचा मोबदला घेऊन त्यांना तेथे प्रवेश दिला जातो व पर्यटकांची कोणत्याही प्रकारची नोंदही घेतली जात नाही. तसेच माहिती संकुल केंद्रामध्ये प्रकल्प माहितीपट म्हणजेच धरण व वीज प्रकल्पाची माहिती देण्यात येत आहे. सुरक्षेच्या नावाखाली जर मोबाईल, कॅमरासह पर्यटकांना बंदी घातली असेल तर प्रकल्प माहितीव्दारे पर्यटकांना गुप्त माहिती पोहोचविणे म्हणजे कोयना धरण व वीज प्रकल्पाच्या सुरक्षेचे शासनाकडून धिंडवडेच काढले जात आहेत. या गंभीर प्रकरणी त्वरित दखल घेण्याची आवश्यकता असल्याने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सदरहू विशेष उल्लेखाची बाब याठिकाणी मांडत आहे.

. . . .एक्स-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांना हे माहितच असेल की पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. आज कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे.पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन व्दारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे.प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रीनिहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागां बाबत सदस्यांनी बोलावे. त्यानंतर मंत्रिमहोदयांना एकदम उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही, हे सदस्यांना विदितच आहे.

कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

. . .. एक्स-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या</u>

तालिका सभापती : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

1) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) आणि पर्यटन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - एच-4,एच-5,एच-6,एच-7,एच-8,एच-9, झेड डी-4
2) कृषी व पणन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - डी-3, डी-7
3) ग्रामविकास मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - एल-2,एल-3,एम-4,एल-5
4) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - आय-3,आय-4,आय-5
5) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-6
6) शालेय शिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - ई-2, ई-3
7) वस्त्रोद्योग, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - झेड ई-1
8) सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, राजशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - आर-1, आर-3
9) कामगार आणि विशेष सहाय्य मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - के-4
10) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - डी-1,डी-4,डी-5,डी-11
11) क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - ई-3
12) महिला व बाल विकास मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - एक्स-1,एक्स-2, एक्स-3
13) पर्यावरण व सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - यु-3, यु-4, झेड डी-1, झेड डी-2.

आता सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी भाषण सुरु करावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये जे प्रश्न उपस्थित केले जातील, त्याबाबत उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत काय ? कारण

डॉ.दीपक सावंत . . . .

मागच्या वेळेला उत्तरे दिली नव्हती,

तालिका सभापती : याठिकाणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर दिले जाते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मागच्या वेळेस तसे झालेले नाही. तेव्हा डायरेक्ट पुरवणी मागण्या मंजूर केल्या होत्या.

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो की, आपल्याकडे विभागाच्या मागण्यांवरील चर्चेला उत्तर देण्याची प्रथा आहे. त्याप्रमाणे आतापर्यंत उत्तरे देण्यात आली आहेत आणि परवाची गोष्ट आपल्यालाही माहिती आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी भाषण सुरु करावे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, सांस्कृतिक विभागाबाबत सांगावयाचे आहे. पान क्र.311 . . .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेला विरोधी पक्षातर्फे सुरुवात झाली पाहिजे.

तालिका सभापती : याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते सभागृहात उपस्थित नाहीत .....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मग गटनेत्यांना भाषण करण्याची संधी द्यावी.

तालिका सभापती : सदनामध्ये गटनेते देखील उपस्थित नाहीत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव प्र. पाटील यांना संधी द्यावी.

तालिका सभापती : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव प्र.पाटील यांनी भाषण सुरु करावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सदनामध्ये माननीय विरोधी पक्षनेते उपस्थित नाहीत.

(सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत खाली बसून बोलतात.)

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना विचारु इच्छितो की, प्रत्येक बाबीवर आपण बोलले पाहिजे असे काही आहे काय ? सदनामध्ये माननीय विरोधी पक्षनेते हजर नसल्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना संधी दिली होती. पण आता सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना भाषण करण्यास सांगितले आहे.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सन्माननीय सभापती महोदय, मी या ठिकाणी पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी उभा आहे. मला पहिल्यांदाच एक बाब सांगावयास पाहिजे की, याठिकाणी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून चर्चा करीत आहोत आणि सरकार सदरहू खर्च करण्यासाठी आपल्याकडून परवानगी घेत आहे की, सदनाने आम्हाला निधी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खर्च करण्यासाठी काही अंशी परवानगी द्यावी. मला कल्पना आहे की, आपण या सरकारच्या खजिन्यातील एकही पैसा सभागृहाच्या मंजुरीशिवाय खर्च करु शकत नाही. पण एक गोष्ट मला सांगितली पाहिजे की, गेल्या अनेक वर्षापासून माझी मागणी आहे. आज महाराष्ट्रावर 2 लाख 40 हजार कोटी रुपयांचे कर्ज झालेले आहे. आपण हे कर्ज कशासाठी घेतलेले आहे ? आपण त्याचा खर्च कुठे-कुठे केला आहे याबाबत श्वेतपत्रिका काढण्यात यावी. पण आजतागायत श्वेतपत्रिका काढण्यात आलेली नाही आणि किमान त्याचे कारण काय आहे हे देखील कळले पाहिजे. हा निधी कोणाच्या घशात गेला, कोणाच्या खिशात गेला, कोणाच्या जिल्ह्यामध्ये गेला, कोणाच्या मतदार संघामध्ये गेला, कर्ज कशासाठी काढण्यात आले याचे चित्र स्पष्ट होणे अत्यंत आवश्यक आणि गरजेचे आहे.

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून एक बाब शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. आताच म्हणजे एक तासापूर्वी शासनाला संभाजीनगर कोर्टाने आदेश दिलेले आहेत. मुळा-प्रवराच्या बाबतीत सांगावयाचे तर संबंधित ग्राहकाने 500 रुपयांचे बिल भरले नाही म्हणून त्याचे विजेचे कनेक्शन कापले होते. मग तो माणूस कोर्टामध्ये गेला आणि .....

यानंतर कु.थोरात . . . . .

तालिका सभापती . . . .

आता सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी भाषण सुरु करावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये जे प्रश्न उपस्थित केले जातील, त्याबाबत उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत काय ? मागच्या वेळेला उत्तरे दिली नव्हती,

तालिका सभापती : याठिकाणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर दिले जाते.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मागच्या वेळेस तसे झालेले नाही. तेव्हा डायरेक्ट पुरवणी मागण्या मंजूर केल्या होत्या.

अप्रसारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो की, आपल्याकडे विभागाच्या मागण्यांवरील चर्चेला उत्तर देण्याची प्रथा आहे. त्याप्रमाणे आतापर्यंत उत्तरे देण्यात आली आहेत आणि परवाची गोष्ट आपल्यालाही माहिती आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी भाषण सुरु करावे.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सांस्कृतिक विभागाबाबत सांगावयाचे आहे. पान क्र.311 . . .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेला विरोधी पक्षातर्फे सुरुवात झाली पाहिजे.

तालिका सभापती : याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते सभागृहात उपस्थित नाहीत .....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मग गटनेत्यांना भाषण करण्याची संधी द्यावी.

तालिका सभापती : सदनामध्ये गटनेते देखील उपस्थित नाहीत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव प्र. पाटील यांना संधी द्यावी.

तालिका सभापती : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव प्र.पाटील यांनी भाषण सुरु करावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सदनामध्ये माननीय विरोधी पक्षनेते उपस्थित नाहीत.

(सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत खाली बसून बोलतात.)

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना विचारु इच्छितो की, प्रत्येक बाबीवर आपण बोलले पाहिजे असे काही आहे काय ? सदनामध्ये माननीय विरोधी पक्षनेते हजर नसल्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना संधी दिली होती. पण आता सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना भाषण करण्याबाबत सांगितले आहे.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सन्माननीय सभापती महोदय, मला पहिल्यांदाच एक बाब सांगावयास पाहिजे की, याठिकाणी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून चर्चा करीत आहोत आणि सरकार सदरहू खर्च करण्यासाठी आपल्याकडून परवानगी घेत आहे की, सदनाने आम्हाला निधी खर्च करण्यासाठी काही अंशी आम्हाला परवानगी द्यावी. मला कल्पना आहे की, आपण या सरकारच्या खजिन्यातील एकही पैसा सभागृहाच्या मंजुरीशिवाय खर्च करु शकत नाही. पण एक गोष्ट मला सांगितली पाहिजे की, गेल्या अनेक वर्षापासून माझी मागणी आहे. आज महाराष्ट्रावर 2 लाख 40 हजार कोटी रुपयांचे कर्ज झालेले आहे. आपण हे कर्ज कशासाठी घेतलेले आहे ? आपण त्याचा खर्च कुठे-कुठे केला आहे याबाबत श्वेतपत्रिका काढण्यात यावी. पण

अधिकृत अहवाल / प्रसिद्धीसाठी नाही

आजतागायत श्वेतपत्रिका काढण्यात आलेली नाही आणि किमान त्याचे कारण काय आहे हे देखील कळले पाहिजे. हा निधी कोणाच्या घशात गेला, कोणाच्या खिशात गेला, कोणाच्या जिल्ह्यामध्ये गेला, कोणाच्या मतदार संघामध्ये गेले, कर्ज कशासाठी काढण्यात आले याचे चित्र स्पष्ट होणे अत्यंत आवश्यक आणि गरजेचे आहे.

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून एक बाब शासनाच्या निदर्शनास आणून देउु इच्छितो. आताच म्हणजे एक तासापूर्वी शासनाला संभाजीनगर कोर्टाने आदेश दिलेले आहेत. मुळा-प्रवराच्या बाबतीत सांगावयाचे तर संबंधित ग्राहकाने 500 रुपयांचे बिल भरले नाही म्हणून त्याचे विजेचे कनेक्शन कापले होते. मग तो माणूस कोर्टामध्ये गेला आणि त्याने तेथे असा युक्तीवाद केला की, माझ्याकडे 500 रुपये नव्हते म्हणून माझी वीज कापण्यात आली.

यानंतर कु.थोरात . . . . .

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम.....

त्या माणसाने आता असा युक्तीवाद केला आहे की, माझ्याकडे 500 रुपये नव्हते म्हणून माझे विजेचे कनेक्शन कापले गेले. मुळा-प्रवरा सरकारचे 2300 कोटी रुपये देणे आहे, त्यांच्यावर काय कारवाई करणार? सभापती महोदय, आता एका तासा पूर्वीची ही घटना आहे. मुळा-प्रवरा विरुध्द गुन्हा का दाखल करण्यात येत नाही, असे न्यायालयाने विचारले आहे. एका बाजूला पैसे पाहिजे म्हणून पुरवणी मागणीच्या माध्यमातून सभागृहात मागणी करण्यात येते आणि दुसऱ्या बाजूला अशा प्रकारे जे कोटयवधी रुपयाचे येणे बाकी आहे ते वसूल करण्यात येत नाही. म्हणून या बाबतीत शासनाकडून योग्य ते उत्तर मिळाले पाहिजे, अशी माझी मागणी आहे. मी या ठिकाणी अधिक न बोलता फक्त पाच मिनिटात माझ्या दोन-तीन सूचना करणार आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाची बाब क्रमांक 64, पान क्र. 45 वर मी बोलू इच्छितो. सभापती महोदय, शिक्षण विभागाचे मंत्री महोदय, सभागृहात उपस्थित नाहीत, तेव्हा मंत्री महोदय सभागृहात येई पर्यंत सभागृहाचे कामकाज थांबविण्यात यावे.

श्री. पद्माकर वळवी (बसून) : मी नोटस् लिहून घेत आहे.

तालिका सभापती :(श्री. मोहन जोशी) : मंत्री महोदय, नोट्स घेत आहेत.

श्री. रामदास कदम : मंत्री महोदय, आपण कशासाठी त्रास घेत आहात ? मग संबंधित मंत्री महोदयांचे काय काम आहे? लाल दिव्यांच्या गाडया घेऊन ते कशासाठी फिरत आहेत? शालेय शिक्षण विभागाला राज्य मंत्री आहेत तसेच कॅबिनेट मंत्रीही आहेत. दोन-दोन मंत्री असताना एक मंत्री महोदय, विधानसभेत उपस्थित असतील तर दुसरे मंत्री महोदय, कुठे आहेत?

श्री. पद्माकर वळवी (बसून) : मंत्रिमंडळाची सामुदायिक जाबबदारी आहे. मी नोटस् लिहून घेत आहे.

श्री. रामदास कदम : मंत्रिमंडळाची सामुदायिक जबाबदारी आहे हे मला सुध्दा मान्य आहे. मी नवीन नाही. माझी ही पाचवी टर्म आहे. बाकीचे मंत्री कुठे गेले आहेत हे सदनाला कळले पाहिजे.लाल दिव्याच्या गाडीसाठी डिझेल आणि पेट्रोलसाठी जो पैसा खर्च होतो तो सर्वसामान्य शेतकऱ्याच्या घामाचा पैसा आहे. मंत्रिमंडळाची समुदायिक जबाबदारी आहे असे म्हणून

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

चालणार नाही. सभापती महोदय, शासन या पुरवणी मागण्यांच्या बाबतीत गंभीर आहे असे मला वाटत नाही. माननीय मंत्री महोदय, शासनाला नोट्स देतील पण आमच्या भावना संबंधित मंत्री महोदयांपर्यंत पोहचल्या पाहिजेत.

सभापती महोदय, शिक्षण विभागाने राज्यातील कायम विनाअनुदानित शाळांचा इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून 'कायम' हा शब्द काढलेला आहे. विनाअनुदानित तत्वावर शाळांना मान्यता देण्याबाबतचा निर्णय अनेक वर्षा पासून प्रलंबित आहे. सभापती महोदय, मी या संदर्भात विधानसभेमध्ये एक स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती, त्यावर चर्चा देखील झाली होती. त्यावेळी 'कायम' हा शब्द काढला गेला. माझ्याकडे उप सचिवांचे लेखी हमी पत्र आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "आम्ही सन 2012-2013 या शैक्षणिक वर्षापासून हे अनुदान निश्चितपणे देणार आहोत आणि त्याच्या अगोदर सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यात येणार आहे." सभापती महोदय, आम्हाला हे कळले पाहिजे. सन 2012-2013 मध्ये सर्व शाळांना अनुदान देण्यात येणार असेल तर मराठी शाळांना पैसे देताना शासनाची अडचण होते. ही खेदाची बाब आहे. हे शासन एका बाजूला मराठीला प्राधान्य देण्यात येईल, मराठी भाषेला प्राधान्य देण्यात येईल असे सांगते पण या मराठी शाळांसाठी किंवा मराठी शिक्षण विभागासाठी मराठी सचिव या शासनाला मिळत नाहीत. या बाबतीत आम्ही अनेक वर्षापासून मागणी करीत आहोत. मराठी सचिव दिला तर याला मराठीची काही तळमळ असेल. पण ते होत नाही. म्हणून या विनाअनुदानित शाळाबाबंत जो निर्णय शासन घेणार आहे तो नेमका कधी घेण्यात येणार आहे? या बाबतीत केवळ आश्वासने देण्यात येतात. आता या बाबतीत मूल्यांकन करण्याची भूमिका घेण्यात आलेली आहे. हे मूल्यांकन झाल्याशिवाय अनुदान देण्यात येणार नाही. तेव्हा हे मूल्यांकन कधी करण्यात येणार आहे, या शाळांना अनुदान कधी पासून देण्यात येणार आहे व ते किती देण्यात येणार आहे? याचा खुलासा करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रात आणि या मुंबईमध्ये देखील मराठी शाळा बंद होत आहेत. म्हणून सभापती महोदय, आपल्या मार्फत शासनाला विनंती आहे की, प्राधान्यांने यामध्ये लक्ष घालावे आणि शाळांच्या अनुदानाचा विषय आणि मूल्यांकनाचा विषय तातडीने सोडवावा.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

सभापती महोदय, आरोग्य विभागाची बाब क्रमांक 196, पान क्रमांक 248 वर मी बोलू इच्छितो. सार्वजनिक आरोग्य राज्य मंत्री प्रा. फौजियाखान या देखील सभागृहात उपस्थित नाहीत. आरोग्य खात्याचे मंत्री महोदय, सुध्दा या ठिकाणी उपस्थित नाहीत. सामुदायिक जबाबदारी म्हणून त्या सगळयांचा ठेका फक्त एका मंत्री महोदयांनी घेतलेला आहे काय? सभापती महोदय, या शासनाला काही गांभीर्य आहे, असे वाटत नाही. खेडमध्ये 100 बेड्सचे रुग्णालय काढण्यात आले. त्याचे उद्घाटन विधानसभेचे तत्कालीन अध्यक्ष श्री. बाबासाहेब कुपेकर यांनी केले. या रुग्णालयासाठी जो 62 पदांचा स्टाफ मंजूर झालेला आहे तो तत्काळ एका महिन्याच्या आत देऊ असे या सभागृहात याच मागण्यांच्या चर्चेच्यावेळी नागपूर येथे मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. आम्ही फक्त येथे प्रश्न मांडावयाचे आणि मंत्री महोदयांनी फक्त आश्वासने द्यावयाची काय? सभागृहात मंत्री महोदयांचा पत्ताच नाही. सभापती महोदय, आम्ही नेमके काय केले पाहिजे? आमचा वेळ घरी जात नाही म्हणून आम्ही येथे येऊन बडबड करीत आहोत काय? सभापती महोदय, खेड तालुक्यातील कळबणी रुग्णालयाच्या बाबतीत आश्वासन देण्यात आले होते की, या रुग्णालयासाठी लागणारा स्टाफ मंजूर आहे, निधी मंजूर आहे एका महिन्याच्या आत तो देण्यात येईल. मुंबई-गोवा या रस्त्यावरील हा भाग असा आहे की, या ठिकाणी शेकडो अपघात होतात आणि माणसे मरतात पण त्या ठिकाणी स्टाफ नाही, अशी अवस्था आहे. म्हणून आता पुरवणी मागण्यांना उत्तर देतांना मंत्री महोदयांनी सांगावे की, मागच्या वेळी आम्ही आश्वासन दिले होते पण ते पैसे दुसऱ्या ठिकाणी नेले आहेत. सभापती महोदय, आंधळं दळतय आणि कुत्रं पीठ खाते अशी या शासनाची अवस्था आहे. या अनुषंगाने शासन नेमकी काय भूमिका घेणार आहे हे एकदा स्पष्ट होणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या बाब क्रमांक 242 पान क्रमांक 291 वर मी बोलू इच्छितो. महिला व बालविकास विभागाचे मंत्री महोदय देखील सभागृहात उपस्थित नाहीत. हे काय चालले आहे? मंत्री महोदय, लिहून घेत आहेत. त्यांचे काम चाललेले आहे. ठीक आहे.

(प्रा. फौजिया खान सभागृहात येतात)

श्री. रामदास कदम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय आरोग्य राज्यमंत्री महोदया आता सभागृहात उपस्थित झाल्या आहेत. मंत्री महोदया, प्रा. फौजिया खान मला तुमच्या विरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना आणावयाला पाहिजे काय?या सभागृहात आपण आश्वासन देता पण दिलेले आश्वासन पाळत नाही. खेड तालुक्यातील कळबणी या ठिकाणी जे रुग्णालय काढण्यात आले आहे त्या बाबतीत मी नागपूर अधिवेशनामध्ये प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी मी आपल्या उपस्थितीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांना देखील सांगितले होते की, आपण मंत्री महोदयांना स्टाफ भरण्यासाठी परवानगी द्यावी. मंत्री महोदयांनी आश्वासन देऊन देखील आता पर्यंत कळबणी या ठिकाणच्या रुग्णालयासाठी एकाही स्टाफची नियुक्ती केलेली नाही. पुन्हा एकदा एका गोष्टीची मला या ठिकाणी आठवण करुन द्यावयाची आहे. मुंबईपासून गोव्यापर्यंत सर्वात जास्त अपघात कशेळी घाटात होतात. कळबण येथील 100 बेड्सच्या रुग्णालयाचे तत्कालीन विधानसभेचे अध्यक्ष श्री. बाबासाहेब कुपेकर यांनी उद्घाटन केले होते. पण आता पर्यत आश्वासन देऊन देखील त्या रुग्णालयासाठी स्टाफ दिला जात नाही. आज या पुरवणी मागण्यांच्या उत्तराच्या वेळी मंत्री महोदयांनी केवळ आश्वासन देऊ नये तर या ठिकाणी नियुक्त करावयाच्या स्टाफची ऑर्डर काढली आहे असे मला या ठिकाणी सांगितले तर मला अतिशय आनंद होईल.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून जे बालकाश्रम देण्यात आले त्या बालकाश्रमामध्ये जवळ जवळ 500 कोटी रुपयांचा घोटाळा झाला. त्या वेळी जे कोणी मंत्री होते त्यांनी तो घोटाळा केला. मी हा विषय विधानसभेमध्ये उपस्थित केला होता. त्या वेळी जे कोण राजकीय नेते होते त्यांनी कोणताही प्रस्ताव न घेता बालकाश्रम देऊन टाकले.

यानंतर श्री. बरवड....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

गंमत अशी आहे की, बालकाश्रमांचे वाटप करताना ज्या ठिकाणी बालकाश्रमच नाही त्या ठिकाणी बालकाश्रम चालू आहे असे दाखवून त्यांना मागच्या एक-एक वर्षाचे अनुदान देऊन टाकले. यामध्ये घोटाळा आहे. कागदावर काही नाही, जागेवर काही नाही, इमारत सुध्दा नाही, बालकाश्रम नाही अशा ठिकाणी अनुदान देऊन टाकले. आपण बालकाश्रम देण्यासंबंधीचा नियम वाचावा. तालुकानिहाय 1-1 बालकाश्रम देण्याचा नियम असताना आपण एका तालुक्यात 10-10 बालकाश्रम दिले. माझ्याकडे यादी आहे, नावे आहेत. मराठवाडा आणि लातूरला प्राधान्य दिले आहे. नियम बाजूला ठेऊन काही तरी द्या आणि बालकाश्रम घ्या, अशी परिस्थिती आहे. मी जबाबदारीने बोलतो. माहितीच्या अधिकारामध्ये मी सगळी माहिती घेतलेली आहे. आम्ही सांगतो की, आमच्याकडे कोकणामध्ये इमारत आहे, पाणी आहे, शौचालये आहेत, जागा आहे, प्रस्ताव दिलेले आहेत पण कोकणात बालकाश्रम देत नाहीत. मग तालुकानिहाय एक बालकाश्रम देण्याचा नियम का केला ? याचा अर्थ आम्ही कोर्टात जाऊन कोर्टातून आदेश आणावयाचे का ? आम्ही कोर्टात जाऊ. त्यामध्ये काही अडचण नाही. या सभागृहात जर न्याय मिळणार नसेल आणि प्रत्येक बाबतीत कोर्टातून आदेश आणावयाचे असतील, शासनाला कोर्टाची भाषाच कळणार असेल तर तसे करावे लागेल. मी मुळा-प्रवराच्या बाबतीत एक उदाहरण दिले. मी सांगू इच्छितो की, बालकाश्रमाच्या संदर्भात कोकणातून परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे आलेले आहेत. प्रत्येक तालुकानिहाय एक बालकाश्रम देण्याचा नियम आहे. कोर्टाने शासनाला सांगितले की, बृहत आराखडा तयार करुन ताबडतोब वाटप करावे. अडीच वर्षे झाली तरी शासनाचा बृहत आराखडा तयार होत नाही. ते तसेच ठेवले आहे. कारण बृहत आराखडा जर केला तर आपण जे आठ-आठ, दहा-दहा बालकाश्रम दिलेले आहेत त्यांची मान्यता रद्द करावी लागेल. त्यामुळे आपण बालकाश्रम का देत नाही हे मला माहीत आहे. सर्व नियमबाह्य काम केलेले आहे. जिसके हाथ में लाठी उसकी भैस अशी म्हण फक्त ऐकली होती पण ते आता आम्ही प्रत्यक्षात अनुभवत आहोत. कोकणातून तालुकानिहाय ज्यांनी परिपूर्ण प्रस्ताव पाठविले आहेत, जे प्रस्ताव शासनाकडे आलेले आहेत अशा प्रस्तावांना शासन ताबडतोब मान्यता देणार की नाही याचे उत्तर या ठिकाणी देणे अत्यंत आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 70 वरील बाब क्रमांक 88 बाबत बोलणार आहे. यामध्ये औसा येथील न्यायालयाच्या इमारतीसाठी तरतूद केलेली आहे. अनेक तालुक्यांमध्ये न्यायालयाच्या इमारती नाहीत. त्या अनुषंगाने आम्ही शासनाकडे वारंवार मागणी करतो की, जे नवीन तालुके झालेले आहेत त्या ठिकाणी सुध्दा न्यायालयाच्या इमारती झाल्या पाहिजेत. औसा येथील न्यायालयाच्या इमारतीसाठी तरतूद केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो पण कळम तालुक्यामध्ये सुध्दा न्यायालयाची इमारत झाली पाहिजे. किमान पुढील अधिवेशनामध्ये तरी त्यासाठी तरतूद झाली पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, यानंतर मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 62 वरील बाब क्रमांक 77 बाबत बोलणार आहे. यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याच्या संदर्भात पुरवणी मागणी केलेली आहे. आम्ही या सभागृहामध्ये वारंवार मागणी करतो. आज लोकसंख्या वाढत असल्याचे आपण पाहतो तसेच वाहनांची वाढत असलेली संख्या पाहतो. दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत आहे. मात्र रस्त्यांची रुंदी वाढत नाही. त्यामुळे वारंवार अपघात होत आहेत. रोज वर्तमानपत्रात अपघातामुळे पाच दहा लोक मृत्युमुखी पडल्याच्या बातम्या आपण वाचतो. परवा या सभागृहामध्ये अत्यंत दु:खद आणि दुर्दैवी घटनेची चर्चा झाली. अंबड तालुक्यामध्ये अपघातात वारकऱ्यांचा मृत्यू झाला. मला असे वाटते की, जर त्या ठिकाणी चौपदरी रस्ता असता तर कदाचित ही घटना घडलीही नसती. म्हणून आम्ही शासनाकडे वारंवार मागणी करतो की, जिल्ह्या-जिल्ह्याला जोडणारे जे रस्ते आहेत किमान त्या रस्त्यांचे तरी चौपदरीकरण झाले पाहिजे. वाटल्यास टोल लावा. त्याला हरकत नाही. लोकांची टोल देण्याची तयारी आहे. आज लोकांना घराच्या बाहेर पडल्यानंतर जीव मुठीत घेऊन जावे लागते. घराच्या बाहेर गेलेला माणूस सुखरुप परत येईल की नाही याची शाश्वती नाही. म्हणून या निमित्ताने मी पुन्हा एकदा शासनाला विनंती करतो की, किमान जिल्ह्या-जिल्ह्याला जोडणारे जे रस्ते आहे ते तरी चौपदरी करावेत. राष्ट्रीय

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ AKN/

श्री. विक्रम काळे .....

महामार्ग, राज्यमार्ग होतीलच पण किमान जिल्ह्या-जिल्ह्याला जोडणारे रस्ते चौपदरी करावेत. कामाच्या निमित्ताने अनेक लोकांना एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात जावे लागते. हे रस्ते जर चौपदरी केले तर संपूर्ण महाराष्ट्र चौपदरी रस्त्याने जोडला जाईल. त्याबाबतचा कृती कार्यक्रम शासनाने हाती घेतला पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 75 वरील बाब क्रमांक 90 बाबत बोलणार आहे. यामध्ये तुळजापूर येथील तहसील कार्यालयासाठी पुरवणी मागणी केलेली आहे. भारत देश स्वतंत्र होऊन जवळपास 60 वर्षे झालेली आहेत. अजूनही आपण तहसील कार्यालयाच्या इमारती बांधू शकलेलो नाही. या संदर्भात एक कृती कार्यक्रम हातामध्ये घेऊन, एखादे मॉडेल प्लॅन तयार करावे. किमान शेतकऱ्यांना, सामान्य माणसांना ती इमारत पाहिल्यानंतर समजले पाहिजे की, ही इमारत तहसील कार्यालयाची आहे. त्यांना ओळखता येईल अशा प्रकारचा टाईप प्लॅन संपूर्ण राज्यामध्ये केला तर महाराष्ट्राच्या दृष्टीने चांगली बाब होणार आहे.

सभापती महोदय, यानंतर मी कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 40 वरील बाब क्रमांक 60 बाबत बोलणार आहे. आज राज्यामध्ये शेतकऱ्यांना कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणावर बोगस बियाणांचा पुरवठा केला जातो. आमच्या लातूर, उस्मानाबाद जिल्ह्याचे उदाहरण घेतले तर सोयाबीनचे हजारो हेक्टरवरील पीक वाया गेलेले आहे. या बोगस बियाणांमुळे हजारो शेतकऱ्यांवर संकट कोसळलेले आहे. मी शासनाला विनंती करतो की, तातडीने त्यांचा सर्व्हे झाला पाहिजे आणि ज्या शेतकऱ्यांचे या बियाणांमुळे नुकसान झालेले आहे त्यांना एकरी नुकसान भरपाई दिली पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मी ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 150 वरील बाब क्रमांक 152 बाबत बोलणार आहे. दारिद्र्य रेषेखालील लोकांची गणना करण्याच्या संदर्भात यामध्ये पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. आज आपण पाहतो की, ग्रामीण भागामध्ये प्रत्येक गावामध्ये दारिद्र्य रेषेखालील लोकांची गणना करण्याचे काम काही प्रमाणात सुरु आहे. पण एक कृती आराखडा तयार करुन, कालबध्द कार्यक्रम तयार करुन दारिद्र्य रेषेखालील लोकांची गणना झाली पाहिजे, जेणेकरुन त्यांना सगळ्या योजनेचे लाभ मिळतील. ते काम लवकर करावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे ....

सभापती महोदय, यानंतर मी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 282 वरील बाब क्रमांक 234 बाबत बोलणार आहे. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठाच्या संदर्भात पुरवणी मागणी केलेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी घोषणा केली की, राज्यामध्ये नवीन तंत्र विद्यापीठ होणार आहे. आम्ही अशी मागणी केली की, पहिल्यांदा आपण लोणेरे येथे तंत्र विद्यापीठाची घोषणा केली त्याच ठिकाणी हे नवीन तंत्र विद्यापीठ उघडावे. ते विद्यापीठ दुसरीकडे उघडण्याची गरज नाही. तशा पध्दतीने हालचाली सुरु आहेत पण ते काम तातडीने झाले पाहिजे आणि सगळे तंत्र शिक्षण त्याखाली आणले पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, यानंतर मी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 283 वरील बाब क्रमांक 237 बाबत बोलणार आहे. यामध्ये शासकीय तंत्रनिकेतने व संलग्न संस्था यांच्या अधिव्याख्यात्यांना मानधन देण्याच्या संदर्भात पुरवणी मागणी केलेली आहे. आज आपल्या राज्यामध्ये शासकीय तंत्रनिकेतने मोठ्या प्रमाणावर आहेत. त्या ठिकाणी आज कंत्राटी पध्दतीवर अधिव्याख्याते काम करीत आहेत. ते चांगल्या पध्दतीने काम करीत आहेत. ते गुणवंत विद्यार्थी घडविण्याचे काम करीत आहेत. पण आपण त्यांना नियमित सेवेत घेत नाही. आपण त्यांना तुटपुंज्या मानधनावर नोकरीमध्ये ठेवलेले आहे. त्यांच्या सेवा आठ-दहा वर्षे झालेल्या आहेत. या सर्व अधिव्याख्यात्यांना तसेच आय.टी.आय.चे निदेशक असतील, महाविद्यालयातील तदर्थ अधिव्याख्याते असतील किंवा तंत्रशिक्षणातील तदर्थ अधिव्याख्याते असतील त्या सगळ्यांना नियमित केले पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मी शालेय शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 45 वरील बाब क्रमांक 64 बाबत बोलणार आहे. यामध्ये ग्रंथपालांच्या वेतनाच्या संदर्भात पुरवणी मागणी केलेली आहे. सामाजिक जीवनामध्ये काम करीत असताना आपण पाहतो. अशी एक म्हण आहे की, पुस्तक वाचल्याने माणसाचे मस्तक संपन्न होते आणि संपन्न झालेले मस्तक कोणापुढेही नतमस्तक होत नाही. पुस्तक वाचल्याने हा फायदा होतो. म्हणून विद्यार्थ्यांमध्ये पुस्तक वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांनी पुस्तके वाचावीत यासाठी प्रत्येक शाळेमध्ये ग्रंथालय स्थापन करण्याचे ठरले. पण ते

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ AKN/

श्री. विक्रम काळे .....

ग्रंथालय चालविण्यासाठी आपण ग्रंथपाल दिलेले नाहीत. आज जे अर्धवेळ ग्रंथपाल काम करीत आहेत ते पुटपुंज्या वेतनावर काम करीत आहेत. त्यांना पूर्णवेळ केले पाहिजे अशी आम्ही शासनाकडे सातत्याने मागणी करतो. पण अजूनही त्याचा विचार होत नाही. खऱ्या अर्थाने उद्याची पिढी घडवावयाची असेल तर या अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ केले पाहिजे. आज शिक्षणाच्या बाबतीत अनेक प्रश्न आहेत. या राज्यात आघाडीचे सरकार येऊन 8 वर्षे झालेली आहेत. आम्ही सुध्दा त्याच पक्षाचे आमदार आहोत. आमच्याकडे पैसे नाहीत असे आम्ही लोकांना किती वेळा सांगावयाचे ? कायम शब्द निघत नाही. कनिष्ठ महाविद्यालयाच्या बाबतीत कायम शब्द काढावा अशी मागणी आम्ही सातत्याने करतो पण अजून कनिष्ठ महाविद्यालयाच्या बाबतीत कायम शब्द निघत नाही. आपण प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या बाबतीत कायम शब्द काढला. 2012 मध्ये अनुदान देणार अशा पध्दतीची घोषणा झाली.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

सगळया शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते, परंतु त्यांचे मूल्यांकन सुरु झालेले नाही. बोडके राहिलेले आहे. म्हणून शासनाने शाळांचे मूल्यांकन करण्याबाबतचा जी.आर.काढण्यात यावा अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, आज शाळांचे वेतनेतर अनुदान मिळत नाही. शिक्षण सेवकांचे मानधन वाढलेले नाही. शिक्षक कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध तयार करावा ही बिन पैशाची मागणी आहे. तीही पूर्ण केली जात नाही. असे मूलभूत प्रश्न आहेत. खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या शाळा आहेत, त्यांचे प्रश्न शासनाने सोडविले पाहिजेत अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, पान क्र.45 वरील बाब क्र.65 वर मी बोलतो. राज्यातील पूर्व माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी ही मागणी केलेली आहे. परंतु या शाळांमधील शिक्षकांच्या पालकांच्या फीची प्रतिपूर्ती झालेली नाही. प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या शिक्षकांच्या मुलांना अभियांत्रिकी, व्यावसायिक किंवा वैद्यकीय शिक्षण घ्यावयाचे असेल तर त्यांच्या फीची प्रतिपूर्ती शासनाकडून केली जाते. पण गेल्या अनेक वर्षापासून यासाठी शासनाने तरतूद केलेली नाही. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होत असल्यामुळे या शिक्षकांच्या पाल्यांना ना अभियांत्रिकीचे शिक्षण घेता येत ना वैद्यकीय शिक्षण घेता येत. म्हणून त्यांची फीची पूतिपूर्ती शासनाने केली पाहिजे.

सभापती महोदय, पान क्र.46 वरील बाब क्र.68 वर मी बोलणार आहे. आता माननीय क्रीडा मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. दिनांक 25.4.2011 रोजी यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये राज्य क्रीडा पुरस्कार वितरण सोहळ्याच्या दिवशी माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती की, राज्यातील प्रत्येक तालुक्यात क्रीडा संकुल उभे केले जातील. आजच प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये क्रीडा संकुलासंबंधीचा प्रश्न होता. परंतु वेळेअभावी तो चर्चेला आला नाही. त्यामध्ये असे उत्तर दिले आहे की, राज्यातील 289 तालुक्यांपैकी 80 तालुक्यांमध्ये क्रीडा संकुले बांधून पूर्ण झालेली आहेत. राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करण्यात आले, विधानसभेचा अमृत महोत्सव साजरा होणार

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

आहे. परंतु एवढ्या कालावधीत संपूर्ण राज्यात क्रीडा संकुले उभी करता आलेली नाहीत. माननीय क्रीडा मंत्र्यांकडे पाहिल्यावर ते किती वजनदार मंत्री आहेत ते लक्षात येते. त्यामुळे सर्व तालुक्यात क्रीडा संकुले कशी उभी राहतील यासाठी त्यांनी ठोस प्रयत्न करावेत अशी मी मागणी करतो आणि येथेच थांबतो. धन्यवाद.

3....

अप्रधारित पत्र / प्रतिक्षेसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011-12 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, पर्यावरण विभागाच्या पान क्र.269 वरील बाब क्र.222 वर मी माझे विचार प्रथम मांडणार आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यात साकिस्ट हा कारखाना आहे. या कारखान्याच्या प्रदूषणामुळे तेथील शेती, बागायती शेती संपूर्णपणे नष्ट झालेली आहे. या राज्यातील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा कायद्याला डावलून एखादी कंपनी किंवा कारखाना जल, हवा प्रदूषित करीत असल्याचे आढळल्यास हवा प्रतिबंध नियंत्रण कायदा 1981 या कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करु असे दिनांक 15.2.2010 रोजी त्या ठिकाणच्या संघर्ष समितीला प्रदूषण नियंत्रण मंडळाने कळविले होते. पण आजही ही कंपनी त्या ठिकाणी दूषित पाणी व हवा त्या परिसरामध्ये सोडत आहे. त्यामुळे तेथील शेती नष्ट होत आहे. त्या भागातील आजुबाजूच्या सर्व गावातील रहिवाशांनी ते पाणी प्यायल्यामुळे त्यांच्या अंगावर फोड आले आहेत. यासंबंधी ताबडतोब चौकशी करुन मंत्री महोदयांनी संबंधित कारखान्यावर कारवाई करावी. या कंपनीबद्दल मी अनेक वेळा तक्रार केलेली आहे. शासनाने निदान प्राथमिक स्वरुपात तेथील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी. या कंपनीचे पाणी चिपळूणपर्यंत सोडले जाते. त्यामुळे शेती व बागायती नष्ट होत असल्यामुळे कृषी खात्यामार्फत पंचनामे करुन त्यांचे अहवाल घेऊन संबंधित शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील साळाव येथील वेल्सन नावाच्या कंपनीने नवीन विस्तार करण्याचे काम सुरु केलेले आहे. या कंपनीने शेतकऱ्यांचा बंधारा नष्ट करण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे शेतीमध्ये खारे पाणी शिरल्यामुळे शेती नष्ट झालेली आहे. या कंपनीने मॅन्ग्रोव्हची सुध्दा मोठ्या प्रमाणात तोड केलेली आहे. त्याची चौकशी करुन या कंपनीवर कारवाई होण्याची गरज आहे.

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यात नागरीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्या दृष्टीकोनातून मी गेल्या आठवड्यात झालेल्या चर्चेच्या वेळी रायगड जिल्ह्यात स्मशानभूमीचा व दफनभूमीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावत असल्याचे म्हटले होते. स्मशानभूमी किंवा

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

दफनभूमीची जागा ठरविताना शासनाने अधिसूचना काढली पाहिजे. यासाठी जी कायदेशीर प्रक्रिया केली पाहिजे ती पूर्ण केली जात नाही. समुद्र किनाऱ्याजवळ, भर समुद्रात ग्रामस्थांचा विरोध असताना सुध्दा स्मशानभूमी बांधल्या जात आहेत. मुरुड तालुक्यात 4-5 ठिकाणी ही बांधकामे होत आहेत. त्यामुळे पर्यावरण खात्याने त्या बांधकामाला स्थगिती देण्याची गरज आहे. तसेच संबंधित ग्रामस्थांना विश्वासात घेऊन सीआरझेडचे उल्लंघन होणार नाही अशा पध्दतीचे बांधकाम करण्यासाठी संबंधित खात्याला आदेश द्यावेत.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पान क्र.64 वरील बाब क्र.76 वर मी माझे विचार मांडणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी न्यायालयीन इमारती बांधण्याचा उल्लेख केला होता. पनवेल तालुक्यामध्ये न्यायालयाची असलेली इमारत ब्रिटिशकालीन आहे. आपल्याला माहिती असेल की, आता पनवेल म्हणजे प्रती मुंबई झालेली आहे. त्या न्यायालयामध्ये केवळ दोन खोल्या आहेत. तेथील स्थानिक आमदार श्री.विवेक पाटील यांनी अनेक वेळा न्यायालयासाठी नवीन इमारत बांधण्याची शासनाला विनंती केली आहे. न्यायालयाच्या इमारतीचा दर्जा कसा असावा, तेथील बार असोसिएशनची रुम कशी असावी यासंबंधीचे एक मॉडेल शासनाने तयार करण्याची गरज आहे असे मला वाटते. सध्या न्यायालयाच्या इमारती म्हणजे गुरांच्या गोठ्या सारख्या उभ्या असल्याचे चित्र राज्यातील ग्रामीण भागात दिसते. म्हणून शासनाने यासाठी एक धडक कार्यक्रम तयार करुन पनवेलच्या न्यायालयाच्या इमारतीसाठी मोठ्या प्रमाणात तरतूद करावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, आज सकाळी मी 6 वाजता अलिबाग येथून मुंबईला निघालो आणि सकाळी 10.30 वाजता या सभागृहात पोहोचलो. मुंबईत अनेक ठिकाणी खड्डे असल्याची चर्चा होत आहे. परंतु आता रस्त्यांमध्ये खड्डे नाही तर द-या पहावयास मिळतात. 3-3 मीटरच्या दऱ्या निर्माण झाल्या आहेत. त्यामध्ये मला खड्डे शोधावे लागतात. सन्माननीय राज्यमंत्री श्री.रणजित कांबळे आणि मी एकदा रेल्वेने प्रवास केलेला आहे. त्यांच्या वर्धा जिल्ह्यात कोकणासारखा पाऊस पडत नाही, त्यामुळे त्यांना रस्त्यावरील खड्डयांची कल्पना नाही. सभापती महोदय, आपल्यालाही या

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

प्रश्नाची जाणीव आहे, परंतु आपण एक्सप्रेस हायवेने मुंबईला येता. रस्त्यांच्या कामाच्या दर्जासाठी शासन काही ठोस निर्णय घेणार आहे की नाही, आपण हा विषय हसण्यावारी नेतो, दरवर्षी तीच तीच चर्चा करतो, त्याच त्याच मागण्या या सभागृहात आम्ही करतो. एक्सप्रेस हायवे हा रस्ता टिकतो. खोपोली-पेण हा रस्ता बीओटी तत्वावर बांधलेला आहे. त्या रस्त्यावर खड्डे पडत नाहीत. ज्या ठिकाणी बीओटीचे रस्ते बांधण्यात आले आहेत तेथे कोठेही खड्डे पडत नाहीत. मग शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेल्या रस्त्यांवरच खड्डे का पडतात ? तसेच बीओटी तत्वावरील व सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेल्या खर्चामध्ये प्रचंड तफावत असते. बीओटी तत्वावर बांधलेल्या खर्चापेक्षा सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेला खर्च जास्त दिसतो. याचीही गंभीरपणे चर्चा झाली पाहिजे. या चर्चेसाठी आपण सुध्दा तयार असाल. एक्सप्रेस हायवेचा रस्ता टिकतो, पण मुंबईत आत येणारा रस्ता टिकत नाही. म्हणून शासनाने संबंधित विभागातील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

जे संबंधित अधिकारी एस्टिमेट करतात, मेझरमेण्ट करतात, एमबी नोंदवतात त्यांच्यावर कारवाई करायला पाहिजे, त्यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविला पाहिजे. जनतेच्या पैशाची लूट चालली आहे. सभापती महोदय, मी अलिबाग तालुक्यामध्ये गेलो होतो. तेथे 25-50 लोक जमले होते. मी दारु पित नाही. त्यामुळे त्यांनी मला कोंबडी आणि भाकरी दिली. त्यांनी सांगितले की, "भाई, आमचे काम वगैरे काही नाही. परंतु रस्त्यावर किती वाईट खड्डे पडलेले आहेत ते दाखविण्यासाठी तुम्हाला बोलावलेले आहे." तेव्हा या रस्त्यावरील खड्डयांच्या बाबतीत शासनाने गांभीर्याने विचार करावा.

सभापती महोदय, शेवटची महत्वाची बाब मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. पृष्ठ क्रमांक 45 वरील बाब क्रमांक 64 ही शालेय शिक्षणासंबंधीची आहे. शालेय शिक्षणाच्या बाबतीत मला सांगावयाचे आहे की, ज्या जिल्हा परिषदांच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आहेत त्या शाळांच्या दर्जाबाबत विचार करण्याची गरज आहे. मी माझ्या अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांचा सर्व्हे केला. या जिल्हा परिषदांच्या शाळामध्ये कुठे 3 विद्यार्थी आणि 5 शिक्षक, कुठे 6 विद्यार्थी आणि 7 शिक्षक अशी परिस्थिती आहे. दर्जा चांगल्या नसल्यामुळे शाळेत मुले येत नाहीत. सदनामध्ये शिक्षक आमदार आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण या ठिकाणी शिक्षकांच्या पगारासंबंधीची मागणी करीत असताना शिक्षणाच्या गुणवत्तेची देखील चर्चा करण्याची गरज निर्माण झालेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये गरिबांची मुले शिकतात. ज्यांची चूल पेटत नाही, जे फी भरु शकत नाहीत, ज्यांच्या मुलांना घालण्यासाठी कपडे नाहीत अशांची मुले जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिकण्यासाठी येतात. तेव्हा शिक्षकांना पगार द्यायचा असेल तर तो मुलांच्या शैक्षणिक गुणवत्ते नुसार द्यावा अशी मी मागणी करतो. रस्त्यावर खड्डे पडल्यानंतर त्या बाबतीत आरडाओरड केली जाते त्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत देखील येथे बोलण्याची गरज आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधून दिल्या जाणा-या शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या बाबतीत कालबद्ध कार्यक्रम आखावा अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011-2012च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पृ.क्र. 311 वरील बाब क्रमांक 258कडे मी सन्माननीय सांस्कृतिक कार्य मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्राचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या सांगता कार्यक्रमासाठी खूप मोठ्या रकमेची तरतूद केलेली आहे. 5 कोटीच्या आसपास तरतूद केलेली आहे. सांस्कृतिक कार्यक्रम म्हटले की, तबला, पेटी, तंबोरा, सितार, मृदुंग या गोष्टी आल्या. या सगळया गोष्टी मिरज येथे तयार होतात. आपल्या देशामध्ये कलकत्ता, मिरज आणि दिल्ली अशा तीनच ठिकाणी तंबोरा आणि सितार ही वाद्ये तयार केली जातात. महाराष्ट्रामध्ये मिरज येथे ही वाद्ये तयार केली जातात. ही पारंपरिक कला मिरजेतील काही लोकांनी जोपासलेली आहे. ही कला शिकण्यासाठी अमेरिका, कॅनडा, जर्मनी, हॉलंड, थायलंड येथून लोक येतात. थायलंड येथून पीटर ली लावाचा एक युवक मिरजेला ही कला शिकण्यासाठी आलेला आहे. 200 वर्षापासूनची ही कला मिरजेमध्ये 140 लोक जोपासत आहेत. ही कला स्वातंत्र्यानंतरच्या काळात त्या कलाकारांनी जोपासली. आजकाल ही कला संपुष्टात येऊ लागली आहे. पूर्वीच्या काळी अशा कलांना राजाश्रय मिळत होता. आता आपण कलियुगातील राजे आहात. तुमच्या या कलेकडे लक्ष गेले नाही तर ती संपुष्टात येईल. तेव्हा ही कला जोपासणा-या कलाकारांना सरकारने काही तरी पुरस्कार द्यावा, त्यांना मानधन द्यावे तसेच मिरज येथे एक संशोधन केन्द्र उभारावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 39 वरील बाब क्रमांक 57कडे मी माननीय पशुसंवर्धन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. लातूर जिल्हयातील मंठा या गावातील लोकांना मानव विकास मिशन मधून इमू पालनाचे प्रशिक्षण दिले. शेती परवडत नाही, शेतकरी मरायला लागला, तो जगावा म्हणून त्याला इमू पालनाचे प्रशिक्षण दिले. त्या गावातील लोकांना केवळ प्रशिक्षणच नाही तर इमू पालनासाठी युनियन बँकेचे रु. 2 लाख 70 हजाराचे कर्ज आणि 60 हजार रुपयाचे अनुदान दिले. 30 लोकांना कर्जवाटप केले. या लोकांना पहिल्यांदा इमूची 10 जोडपी दिली. एका पिलाची किंमत 17 हजार रुपये ठरली. 1500 रुपयास अंड घेतले जाईल असे सांगण्यात आले. एका गावातील 30 घरे या व्यवसायामध्ये आली. आता त्या इमूची अंडी कोणी घेत नाही. त्यांनी काय करायचे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इमू रानात ठेवूनही चालत नाही. त्यांला विशिष्ट्य खाद्य दिले नाही तर ते अंडी देखील देत नाही. या इमूचे अंडे कोणी घेत नसल्याने ते शेतकरी झुरायला लागले आहेत. शेतक-याने आत्महत्या करु नये म्हणून त्यांना जगण्यासाठी हा धंदा दिला. परंतु हा धंदा असा दिला की तो लवकरच मरायला लागला आहे. या इमूचे अंडे कोणी घेत नाही म्हणून ते शेतकरी आपल्या पोराबाळांसह आत्महत्या करायला लागतील अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. या इमूच्या अंड्याला किती मागणी आहे याची माहिती सरकारने आधी का घेतली नाही, ही माहिती न घेताच सरकारने शेतक-यांना प्रशिक्षण का दिले, कर्ज का दिले असे प्रश्न निर्माण झालेले आहेत. आता या शेतक-यांना कोण वाली आहे ? तेव्हा हे शेतकरी आपल्या मुलाबाळांसह आत्महत्या करण्यापूर्वी शासनाने त्यांच्याकडे लक्ष द्यावे अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 36 वरील बाब क्रमांक 48कडे मी माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. कोरडवाहू क्षेत्रात कडधान्य व गळीत धान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी कृषी यांत्रिकीकरण विशेष मोहीम अंतर्गत 2010-2011मध्ये ट्रक्टर देण्याची योजना आणली. लातूर जिल्ह्यामध्ये शेतक-यांचे गट एकत्र आले...(अडथळा)....

...नंतर श्री. खर्चे...

अप्रधारित प्रत / प्रतिक्षेपी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल .....

.....अडथळा.....सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब हे मला अत्यंत ज्येष्ठ आहेत, मी त्यांचा आदर करतो. महोदय एकूण 2.50 लाख रुपये एवढी रक्कम शेतकरी गटाने जमा करुन भरली तरी देखील त्यांना देय असलेली 7.50 लाखाची रक्कम शासनाकडून मिळाली नाही. वास्तविक मार्च महिन्यात ही प्रोसेस पूर्ण होणार होती पण आता ऑगस्ट महिना आला तरी देखील हे पैसे शेतकऱ्यांना मिळाले नाहीत. मी तर असेही ऐकले की, 1 हजार लोकांकडून प्रत्येकी 2500 रुपये एवढी रक्कम जमा करुन घेतली. तरी देखील उर्वरित रक्कम देण्यासाठी उशीर का होत आहे याचा खुलासा झाला पाहिजे. ज्या योजनांची अंमलबजावणी नीट करता येत नाही त्या योजना शासन सुरु का करते हेच मला समजत नाही. अशा योजना सुरु केल्याचे दाखवून लोकांना आशेवर ठेवावयाचे हा प्रकार योग्य नाही. पीक कर्जाच्या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, लातूर जिल्हा मध्यवर्ती बँक ही बोटावर मोजता येणाऱ्या बँकांमध्ये एक चांगली बँक म्हणून नावारुपाला आलेली होती. पण मी कालच पेपरमध्ये बातमी वाचली की, या बँकेत 10 हजार रुपयांचा चेक सुध्दा वटत नाही, वर काय प्रकार झाला हे मला माहिती नाही पण आमच्या जिल्हा बँकेचा हा कारभार आहे, हे खरे आहे. राष्ट्रीयकृत बँका तर पीक कर्जासाठी पायरीवर सुध्दा चढू देत नाहीत आणि आपल्या राज्य सहकारी बँकेचे तर दिवाळे निघालेले आहे, अशा परिस्थितीत हा गुंता शासन कसा सोडविणार आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

महोदय, अल्पसंख्याक विभागाच्या बाब क्र. 260, पृ.क्र. 315 च्या बाबतीत मला सांगताना तर एका गोष्टीची लाज वाटते की एवढ्या मोठ्या पुस्तकात अल्पसंख्याक विभागाच्या वतीने एकही मागणी नाही. सभागृहात या विभागाचे दोन्ही मंत्री महोदय उपस्थित आहेत हे पाहून मला बरे वाटले. या मागणीच्या अनुषंगाने जी रक्कम संगणकीकरणासाठी मागण्यात आली त्याबाबत मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, शासन जर अशा प्रकारे निधी देतच नसेल तर संगणकीकरण कशाचे करणार आहे, याचा खुलासा व्हावा. आजच्या दैनिक "सकाळ" या वर्तमान पत्रात मी असे वाचले की, "मुंबईतील बेस्ट या उपक्रमात चालकांची कमी, चालकाअभावी बेस्टच्या एक हजार गाड्या बंद आहेत. इझी कॅब, मेरु या टॅक्सीज चालकाअभावी बंद, एस.टी. महामंडळामध्ये ड्रायव्हरांची कमी, नाशिकला चालकांची चणचण, माल वाहतूक क्षेत्रात 30-40

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल .....

ड्रायव्हर कमी" लोकांना एकीकडे नोकऱ्या मिळत नाहीत आणि दुसरीकडे मात्र अशा प्रकारे मायनॉरिटीजच्या बाबतीत शासन वागत असेल तर ड्रायव्हर कसे तयार होणार याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. वास्तविक ड्रायव्हर लाईनमध्ये जास्तीत जास्त मुले ही मायनॉरिटीचीच असतात, अशी माझी माहिती आहे. आपल्या विभागाच्या वतीने "लोकसत्ता" सारख्या दैनिकात अशी जाहिरात दिली जाते आणि सांगण्यात येते की, "अल्पसंख्याक समाजाच्या मुलांना वाहन प्रशिक्षण देण्यासाठी संस्थांनी पुढे यावे." शासनाच्या वतीने दिलेली जाहिरात पाहिल्यानंतर कोणालाही ती खरीच वाटते. त्यानुसार संस्थांनी अर्ज केले, अर्ज करुन दोन वर्षे झाली पण त्याबाबत अजून पुढचा निर्णय काहीच झालेला नाही. एका बाजूला राज्यात चालकांची कमी आहे, चालक मिळत नाहीत, दुसऱ्या बाजूला मात्र प्रशिक्षण देणाऱ्या संस्था पुढे येत असतील तर त्यांना शासनाकडून प्रोत्साहन मिळणे अपेक्षित असताना ते मिळत नाही, अशी परिस्थिती आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांनी इतर संस्थांचा संदर्भ देऊन न सांगता मी स्वत: एक संस्था चालवितो, मी अनेक ड्रायव्हर तयार केले असे सांगावे असे मला वाटते. कारण जेव्हा एक आमदार, सभागृहाचा सदस्य बोलतो त्याला एक प्रकारचे वजन असते. म्हणून त्यांनी सरळ सांगावे की, मी अल्पसंख्याकांच्या हितासाठी ड्रायव्हरांना प्रशिक्षण देणारी संस्था चालवितो.

श्री. सय्यद पाशा पटेल : महोदय, शासनाच्या योजना चांगल्या आहेत पण त्यांची अंमलबजावणी का होत नाही, याचे उत्तर मिळणे अपेक्षित आहे. तसे शासन करीत नाही म्हणून मी अल्पसंख्याक विभागाने प्रस्तावित केलेल्या 10 लाखाच्या पुरवणी मागणीला विरोध करतो. कारण एवढ्या मोठ्या मागण्यांच्या पुस्तकात फक्त दोनच ओळी अल्पसंख्याक विभागाने दिलेल्या आहेत. त्याच्या खालची ओळ पाहिली तर आपल्या विभागाचे व अल्पसंख्याक असलेले मंत्री महोदय इ ोपलेले आहेत की काय अशी शंका येते, कारण पुढचे संपूर्ण पान कोरेच दिसत आहे. या निमित्ताने माझी मागणी अशी आहे की, अल्पसंख्याक विभागाच्या ज्या योजना आहेत त्यांची अमलबजावणी का होत नाही याचा खुलासा करावा. याबाबतचे हजारो पुरावे देण्यास मी तयार आहे.

महोदय, शाळेतील मुलांना गणवेश देण्याची योजना शासनाने सुरु केली पण हे गणवेश शेवटच्या घटकापर्यंत पोहचत नाही हे दुर्दैव आहे. त्याचे कारण म्हणजे अशा गणवेशांचे वाटप

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल .....

शाळा बंद झाल्यानंतर करण्यात येते असा उलटा कार्यक्रम चालू आहे. तसेच अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांचे शेकडो अर्ज शासनाकडे आलेले आहेत. हे अर्ज मंजूर करताना शासनाकडून दर्जेदार शिक्षण दिले जाते काय याची तपासणी केली जाते. पण मला असे म्हणावयाचे आहे की, ज्यांना मान्यता मिळाली त्या शाळांचा दर्जा कधी तपासलेला आहे काय, याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच योजनांचे जे धनादेश येतात ते धनादेश घेण्यासाठी जे लाभार्थी जातात त्यांच्याकडून दक्षिणा घेतल्याशिवाय हे धनादेश मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. यावर्षी आमच्या जिल्ह्यात अशा प्रकारासाठी विरोध केला गेला. मागील वर्षी तिप्पट संस्था होत्या पण चेकचे पैसे घेतले म्हटल्यानंतर वेगळ्याच संस्थांची नावे पुढे आली. मग "हाक ना बोंब" अशी परिस्थिती निर्माण झाली, तक्रार कोणाकडे करावयाची हा प्रश्न निर्माण झाला.

महोदय, अल्पसंख्याक समाजाच्या आर्थिक विकासासाठी बँक कर्जाचे सन 2009-10 मध्ये 17339 कोटीचे उद्दिष्ट असताना प्रत्यक्षात 8655 कोटी एवढीच रक्कम दिलेली आहे, याचीही तपासणी करावी. मंत्री महोदयांकडे मायनॉरिटीचे लोक फार अपेक्षेने पाहत आहेत. यानंतर अल्पसंख्याक विकास कार्यक्रमासाठी सन 2010-11 मध्ये 5340 प्रशिक्षणार्थींची निवड करण्यात आली पण त्यापैकी फक्त 240 प्रशिक्षणार्थींनाच हा लाभ मिळाला. मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती सन 2009-10 मध्ये 44579 विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात आली होती पण शैक्षणिक वर्ष संपत आल्यानंतर सुध्दा अद्यापही 20.09 कोटी एवढी रक्कम या विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली नाही. तसेच अल्पसंख्याक बहुल जिल्ह्याकरिता अंगणवाडी व बालवाडी सुरु करणे या योजनेअंतर्गत सन 2009-10 मध्ये एकूण 862 अंगणवाड्यांचे उद्दिष्ट होते. त्यापैकी एकाही बालवाडी किंवा अंगणवाडीचे काम झालेले नाही. सन 2010-11 मध्ये 862 पैकी फक्त 192 अंगणवाड्या सुरु करण्यात आल्या. तसेच अल्पसंख्याक मुलींसाठी 143 ठिकाणी वसतिगृहे बांधण्याचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला होता.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

अपुर्ण पत्र / प्रतिक्षेपाठी नाही

श्री. पाशा पटेल....

त्यापैकी आपण किती ठिकाणी वसतिगृहांची कामे पूर्ण केलेली आहेत ? मला असे वाटते की, हा विभाग ख-या अर्थाने दुर्लक्षित असा विभाग आहे. या विभागाकडे कोणाचेही लक्ष नाही अशी परिस्थिती आहे. ज्या भागाला वारस नाही अशा भागाकडे शासनाने वेगळया दृष्टिकोनातून बघण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, राजर्षी शाहू महाराजांनी अल्पसंख्याक समाजातील मुलांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी कोल्हापूर येथे मुस्लीम बोर्डिंग सुरु केली होती व या बोर्डिंगचा खर्च व्यवस्थित चालावा यासाठी बोर्डिंगला 80 एकर जमीन दिली होती. ते कोठे आणि आपण कोठे ? मुस्लीम समाज हा दलितांपेक्षा दलित आहे असे लोकांना वाटू लागले आहे. मुस्लीम समाजाला शिक्षण द्यावे लागणार आहे, मुस्लीम समाजाला मदतीचा हात द्यावा लागणार आहे परंतु हे सरकार मात्र मुस्लिमांच्या संदर्भात उदासीन आहे. या पुरवणी मागण्यांच्या चर्चेच्या निमित्ताने मी जे प्रश्न उपस्थित केलेले त्या सर्व प्रश्नांची उत्तरे मंत्रीमहोदयांच्या उत्तराच्या भाषणातून यावे अशी आशा अपेक्षा करतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दिन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्रधिकारी संस्था) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमांक 232,पृष्ठ क्रमांक 282, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भात मी प्रथम विचार व्यक्त करणार आहे. बजेटमध्ये दोन वर्षापूवी वंदनीय राष्ट्र संत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाचे विभाजन करुन गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयांसाठी गडचिरोली येथे गोंडवाना विद्यापीठाची स्थापना करण्याची घोषणा करण्यात आली होती. गोंडवाना विद्यापीठाची घोषणा होऊन आज पर्यंत काहीही काम सुरु झालेले नाही. तसेच यासाठी तरतुद व कुलगुरुंची व्यवस्था न इ ाल्यामुळे हा विषय तसाच प्रलंबित आहे. सन 2011-12 पर्यंत या विद्यापीठाचे काम सुरु होईल ही घोषणा अंमलात आणावी, अशी मी पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक -260,पृष्ठ क्रमांक 315, अल्प संख्याक विभागावर मी विचार मांडणार आहे. सच्चर आयोगाची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने अल्पसंख्याक विभाग सुरु केलेला आहे. अल्पसंख्यांक विभागाच्या बजेटमध्ये अनेक त्रुटी असून या विभागाला फार कमी प्रमाणात पैसे उपलब्ध करुन दिलेले आहेत. एससी,एसटी,ओबीसीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पूर्णपणे मिळते परंतु अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती तसेच लोन सुध्दा मंजूर होत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना विनाकारण त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे अल्पसंख्यांक विभागाला पैसे वाढवून दिले तर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही तसेच त्यांना शिष्यवृत्ती व लोन सुध्दा मिळू शकेल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 208, पृष्ठ क्रमांक 253,रुग्णालय व दवाखाने यावर माझे विचार व्यक्त करणार आहे. महाराष्ट्र शासनाने अनेक ठिकाणी मेडिकल कॉलेजेस सुरु करण्याची घोषणा केलेली आहे. चंद्रपूर जिल्हा हा औद्योगिक जिल्हा असून या ठिकाणी मोठया प्रमाणात प्रदूषण होत असल्यामुळे चंद्रपूर जिल्हयात रोगांचे प्रमाण सुध्दा जास्त आहे. चंद्रपूर जिल्हा मोठा जिल्हा आहे. शासनाचे मेडिकल कॉलेजच्या संदर्भात धोरण असून त्या धोरणानुसार चंद्रपूर येथे सरकारी मेडिकल कॉलेज देण्याची मंत्री महोदयांनी घोषणा करावी अशी विनंती आहे. शासनाने 3 मेडिकल कॉलेजच्या संदर्भात घोषणा केलेली असून विदर्भातील मेडिकल कॉलेजची घोषणा पेंडींग आहे. त्यामुळे पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून चंद्रपूर येथे मेडीकल कॉलेजची घोषणा करावी अशी विनंती करतो व दोन शब्द पूर्ण करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर अजून 22 सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. आज माननीय सभापती महोदयांनी दोन विधेयके चर्चेला घेण्याची विनंती केलेली आहे. दोन विधेयके घेण्यास आमची तयारी आहे. पुरवणी मागण्यांवर 22 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असेल तर दोन विधेयकांना वेळ मिळणार नाही.

सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर बोलण्यापूर्वी मी जो मुद्दा सांगणार आहे तो फार गंभीर आहे. या सभागृहात पुरवणी मागण्यांवर सर्व सन्माननीय सदस्य बोलत असतात.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. सभागृहाचे कामकाज सकाळी 11 ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत चालविण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे सर्व कामकाज 6 वाजण्याच्या आत कसे संपेल ते बघावे. पुरवणी मागण्यांवर अजून 22 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असेल व कामकाज पूर्ण करुन घ्यावयाचे असेल तर पुरवणी मागण्यांवर बोलू इच्छिणा-या सदस्यांची नावे कमी केली पाहिजेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कामकाज करुन घेणे हे सरकारचे काम आहे. विधीमंडळ स्थापन झाल्यापासून पुरवणी मागण्यांवर चर्चा होत असते. सन्माननीय सदस्य पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने चांगले चांगले विषय मांडत असतात. पुरवणी मागण्यांचे दोन भाग आहेत. सभागृहाचे नेते श्री. अजित पवार यानी भाषणात सांगितले होते की, सभागृहात या पुढे पुरवणी मागण्या येणारच नाहीत याची मी काळजी घेईन व पुरवणी मागण्या आल्या तरी त्या फार कमी रकमेच्या असतील. 1000-1500 कोटीच्या वर जाणार नाहीत याची मी काळजी घेईन. परंतु आता 8-10 हजार कोटी रुपयांपर्यंत पुरवणी मागण्या जात आहेत हे लक्षण शासनाच्या अकार्यक्षमतेचे आहे. खरे म्हणजे पुरवणी मागण्या कमीतकमीच आल्या पाहिजेत. योग्य पैसा योग्य वेळी मिळाला तर पुरवणी मागण्या वाढत नाहीत. परंतु आता 3000 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या आलेल्या आहेत. विविध खात्याकडून योग्य प्रतिसाद मिळत नाही हा महत्वाचा भाग आहे. आयत्यावेळी कामे

...4..

अधिकृत वृत्त / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

करावी लागत असल्यामुळेच पुरवणी मागण्या मांडाव्या लागत असतात. खरे म्हणजे आर्थिक शिस्त असली तर अधिक रकमेच्या पुरवणी मागण्या मांडाव्या लागत नाही. आर्थिक शिस्त नसल्यामुळेच शासनाला 3000 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडाव्या लागल्या आहेत.

सभापती महोदय, आम्ही तीन वेळा पुरवणी मागण्यांवर बहिष्कार घातलेला आहे. एकदा सभागृह संपण्याच्यावेळी पुरवणी मागण्या शेवटच्या टप्प्यात होत्या त्यावेळी आम्ही बहिष्कार घातल्यामुळे सभागृहातून निघून गेलो होतो. सभागृहात त्यावेळेस केवळ सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य उपस्थित असतांना संबंधित मंत्रीमहोदयांनी माझ्या विभागाच्या अमुक अमुक मागण्यांवर, अमुक अमुक सन्माननीय सदस्य हे बोलले, ते बोलले असे सांगून दीड दोन तासानंतर पुरवणी मागण्या मान्यतेसाठी मतास टाकल्या होत्या.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आणि त्या मंजूर करून घेतल्या. ती पद्धत आहे. सभागृहात वादविवाद हा होणारच. आम्ही अयोग्य गोष्टीकरिता सभागृहामध्ये वाद घालणारच. तो तर आमचा धर्म आहे. त्यासाठीच आम्ही विरोधी पक्षात आहोत. काल जे घडले त अघटित घडले. पुरवणी मागण्यांच्या चर्चेवरील उत्तर आज द्यावे असे आम्ही त्यावेळी सुचविले होते. आपण निर्णय दिला त्याबद्दल आमचे काहीही म्हणणे नाही. त्यासंबंधी मी माननीय मंत्री श्री.भास्कर जाधव यांना बोललो. मी त्यांना जे काही बोललो ते माननीय पीठासीन अधिकाऱ्यांना आवडले नाही म्हणून त्यांनी मत प्रदर्शन केले. आक्षेप असणे हा भाग वेगळा आणि आवडणे, न आवडणे हा भाग वेगळा. काल आम्ही बर्हिगन करणे, शासनाचा निषेध करणे, नापसंती व्यक्त करणे हा लोकशाहीचा अधिकार आहे. तो कोणाला अवमानित वाटूच नये. ज्या ज्या वेळी आम्ही सदनात चर्चा करतो, माननीय मंत्र्यांवर टीका करतो, त्यावेळी ती व्यक्तिगत टीका नसते. शासन चालवत असताना आपण मंत्री या नात्याने जबाबदारी घेतली असल्यामुळे जे अयोग्य असते त्यावर टीका करत असतो. ज्या वेळी टीका ही व्यक्तिगत स्वरुपात घेतली जाते त्यावेळी ती वाईटच असते.

सभापती महोदय, काल या सदनामध्ये हे विधान मंडळ अस्तित्त्वात आल्यापासून पहिल्यांदाच असे घडले की, पुरवणी मागण्यांना उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री महोदय उभे राहिले नाहीत. बाब क्रमांक अमुक आहे, त्यावर अमुक अमुक सन्माननीय सदस्य बोलले त्यावर माझे असे उत्तर आहे असा उल्लेख करण्यात आला नाही. भले त्यांनी थोडक्यात उत्तर दिले असते तरी चालले असते. त्यांनी उत्तराच्या शेवटी माझ्या विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी सभागृहाला विनंती केली असती तरी चालली असती. मागण्या मंजूर करताना अनुकूल, प्रतिकूल याचा उल्लेख करत नाही. कारण ते गृहीत धरलेले असते. आम्हाला फक्त उत्तर पाहिजे असते. सभागृहात जे सचिव बसतात त्यांनी देखील मार्गदर्शन करायला पाहिजे होते. येथे जे सचिव बसले आहेत त्यांचे ते काम आहे. माझ्याकडे काल माननीय सभापतींनी जे मत व्यक्त झाले आहे, त्याचे प्रोसिडींग आहे. सन्माननीय सदस्यांचे असे मत आहे की, त्यांनी पुरवणी मागण्यांवर चर्चा केली असली तरी त्यांना शासनाकडून उत्तराची अपेक्षा नाही. आम्ही बहिर्गमन केले हे ठीक आहे. पण त्याचे उत्तर देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. आम्ही उपस्थित असू किंवा नसू. या सभागृहाच्या प्रथेप्रमाणे, गरिमेप्रमाणे प्रत्येक मंत्री महोदयांनी पुरवणी मागणी वाचायची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असते. मग मंत्री कशाला पाहिजे ? येथे एकच माननीय मंत्री सभागृहात बसले व त्यांनी सर्व विभागाच्या मागण्या मांडल्या व सभागृहाने अनुकूल, प्रतिकूल केले की, सगळेच संपून जाते. शेवटी त्या त्या खात्याच्या मंत्र्यांने उत्तर द्यायचे असते. खात्याने पुरवणी मागणी का केली हे सांगायचे असते. माझ्याकडे जे प्रोसिडींग आहे त्यामध्ये असे नमूद केले आहे की, चर्चा केली असली तरी त्यांना शासनाकडून उत्तराची अपेक्षा नाही. असे नसते. आम्हाला उत्तराची अपेक्षा असते. आमच्या गैरहजेरीमध्ये जे सांगतात ते आम्ही नंतर प्रोसिडींगमध्ये पाहतो. येथे अनेक वेळा असे घडते की, सन्माननीय सदस्य भाषण करतात आणि बाहेर निघून जातात. आपण ज्यावेळी उत्तर देता त्यावेळी सभागृहात फक्त पाच दोन सन्माननीय सदस्य उपस्थित असतात. ज्यांनी भाषण केले आहे ते येथे उपस्थित असतातच असे नाही. आपण जे उत्तर देता ते नोंदविले जाते. ते आम्ही नंतर जाऊन वाचतो. त्यावरून आम्हाला काय उत्तर मिळाले हे समजते. याही परिस्थितीत पुरवणी मागण्यावरील चर्चा पूर्ण झाली. पुरवणी मागण्या मंजूर झाल्या असे आपण सांगितले. त्यावेळी आमच्या एकाही माननीय मंत्र्यांनी मला मागण्या मांडावयाच्या आहेत, बोलायचे आहे असा कुठलाही नामोल्लेख केला नाही. उलट त्यांनी हसत हसत सर्व विषय संपवला. हे अयोग्य आहे असे मला वाटते. आपण पीठासीन अधिकारी म्हणून सरकारला कृपा करून एवढी सवलत देऊ नका. बोट धरले तर हात कधी खेचून घेतील हे सांगता येणार नाही. अशा प्रवृत्तीचे सध्याचे सरकार आहे. हे आम्ही अनेक वेळा अनुभवत आहोत. हे अयोग्य झाले असे आमचे मत आहे. आम्ही तळमळीने येथे सगळे मांडले. त्याचे त्यांनी उत्तर देणे ही त्यांची जबाबदारी आहे. हा पीठासीन अधिकाऱ्यांचा विषय नाही.

सभापती महोदय, मला आणखी एका गोष्टीची खंत आहे. माननीय सभापती महोदय आता सदनामध्ये असते तर त्यांच्या समोर बोलायला आवडले असते. ते आमचे ऐकतातच. त्यामुळे त्याचा प्रश्न नाही. त्यामुळे ते असल्या सारखेच आहेत. मला माननीय सभापती श्री.दिवाकरजी, रावतेजी म्हणतात. येथे श्री.दिवाकर रावते अशी नोंद आली. त्याची मला खंत नाही, दु:ख नाही. त्यांचा तो मान आहे. वयाचा मान आहे, अनुभवाचा मान आहे. आमच्या विधान मंडळाचे साहेब कोण आहेत ? आमच्या सभागृहाचे साहेब कोण आहेत ? माननीय सभापती आहेत. नंबर वन माननीय सभापती आहेत, त्यानंतर मग माननीय अध्यक्ष आहेत. माननीय मंत्रीमहोदय, सन्माननीय मंत्री महोदय,

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य असे माननीय पीठासीन अधिकारी बोलतात. आजची सकाळची चर्चा चांगली चालली होती. त्यात मला व्यत्यय आणायचा नव्हता. आदरणीय मुख्यमंत्री कामगारांच्या बाजूने सर्व काही सांगत होते आणि सांगणार होते. त्यामुळे मला मध्येच काही बोलावयाचे नव्हते. आमचे साहेब माननीय सभापती. त्यांनी मुख्यमंत्री साहेब बोलावे हे मला खटकले. मुख्यमंत्रीजी बोलावे, मुख्यमंत्री महोदय बोलावे असे बोलले असते तर चालले असते. ते मुख्यमंत्र्यांना साहेब बोलल्यामुळे आमच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झाला. आमचे तर साहेब माननीय सभापती आहेत. त्यामुळे आमच्या साहेबांचे साहेब येथे कसे काय बसू शकतात ? या लहान गोष्टी आहेत. आपण मला फोडून काढले तरी चालेल. मला जे वाटले ते मी येथे मांडत आहे. माननीय सभापतींपेक्षा आम्हाला येथे कोणीही मोठे नाही. आमचे कोणीही साहेब नाहीत. आमचे साहेब माननीय सभापती आहेत. आमच्यावर माननीय पीठासीन अधिकाऱ्यांकडून, माननीय सभापतींकडून संस्कार होत असतात. म्हणून हा विषय मांडला. पीठासीन अधिकारी हा पीठासीन अधिकारीच असला पाहिजे. बाहेर काही वेगळे असेल तर तो विषय तुमचा असू शकतो. भविष्यामध्ये असे घडू नये म्हणून मला हे सांगावयाचे होते. आम्ही असू किंवा नसू, बॉयकॉट करू किंवा काही करू, प्रत्येक माननीय मंत्र्यांनी आपली जबाबदारी ओळखून उत्तर दिले पाहिजे.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आपण पुरवणी मागण्यांवर बोलावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी पुरवणी मागण्यांवरच बोलत आहे. बाहेरचा कुठलाही विषय मांडलेला नाही.

तालिका सभापती : साहेबांचा जो उल्लेख आहे तो कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : कसला उल्लेख.... ?

तालिका सभापती : हे जे आपण बोललात ना तो ....

श्री.दिवाकर रावते : सकाळचा उल्लेख रेकॉर्डवर आहे ना ? मी विधान मंडळांच्या कामकाजाबद्दल बोलत आहे.

तालिका सभापती : ते तपासून घेतो.

श्री.दिवाकर रावते : आपण माननीय सभापतींबाबतचे उद्‌गार काढून टाकणार. हे आणखीन नवीनच आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, एक मिनिट, दीड मिनिट एवढे भाषण करण्याची वेळ आमच्यावर येऊ नये. त्यामुळे प्रत्येकाला आपण वेळ ठरवून द्यावी अशी माझी विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण आपण कशाला हसत आहात ? मला आपली कीव येते. काँग्रेस पक्षाचा जो प्रतोद असतो तो पुन्हा या सभागृहात येत नाही. श्री.संजय दत्त यांना आपण पक्ष प्रतोद केले होते. ते गेले ते परत आलेच नाहीत.

सभापती महोदय, मी ग्रामविकास विभागासंबंधातील माझा मुद्दा उपस्थित करीत आहे. मी या संबंधातील विशेष उल्लेख मांडला होता. वाशिम मधील एका अधिकाऱ्यांने शालेय पोषण आहारामध्ये भ्रष्टाचार केला होता आणि सावकारी करतो म्हणून विशेष उल्लेख मांडला होता. त्या अधिकाऱ्याला निलंबित केले होते. श्री.हिरालाल बजरंग रेवाळे, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, यांनी कान्हेरे शाळेच्या पोषण आहारात भ्रष्टाचार केला होतो. श्री.रेवाळे यांच्या विरूद्ध श्रीमती बबिता प्रशांतराव देशमुख, राहणार परतूर, जि.अकोला यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे सावकारी संबंधात तक्रार केली. मला उत्तर देखील आले आहे. माझा मुद्दा एवढाच आहे की, त्यांचे निलंबन रद्द करण्याचा अधिकार हा फक्त विभागीय आयुक्तांना आहे. पण तसे न होता त्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांना कामात सुधारणा करणे, वरिष्ठांच्या आदेशाची अवहेलना न करणे, या अटीवर त्यांचे निलंबन रद्द करून त्यांना कामावर घेतले. हे बेकायदेशीर आहे. माननीय मंत्री मला उत्तर देतात. आपणाला अधिकारी मार्गदर्शन करीत नाही का हे अयोग्य आहे. माननीय मंत्र्यांच्या सहीने मला उत्तर दिलेले आहे. अयोग्य झालेली गोष्ट मी निदर्शनास आणल्याबद्दल ती योग्य कशी आहे हे सांगण्यासाठी माननीय मंत्र्यांची सही घेतली. मला आपल्याकडून जाणून घ्यायचे आहे. वेळ पडल्यास मला विभागीय आयुक्तांविरूद्ध हक्कभंग देखील दाखल करता येईल. मी अधिकृतपणे सांगतो की, त्यांनी पैसे खाऊन हे निलंबन रद्द केलेले आहे. सावकारी कायद्यामध्ये ते अडकलेले आहेत. वर आपण लिहितात की, सावकारी विषय वेगळा आणि शालेय पोषण आहार विषय वेगळा.

यानंतर श्री.सरफरे....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

म्हणजे शालेय पोषण आहाराचा केलेला अपहार आपल्याला मंजूर आहे, सावकारी केली ती आपल्याला मंजूर आहे, सावकारी कायद्याखाली त्यांना अटक करुन पोलिसांनी नेले हेही आपल्याला मंजूर आहे. आपल्या कामामध्ये सुधारणा करणे आणि वरिष्ठांच्या आदेशाची अवहेलना न करणे या अटींवर श्री. व्यवहारे यांना सेवेत पुनर्स्थापित केले आहे असे त्यांना लेखी लिहून दिले आहे. सन्माननीय मंत्री श्री. जयंत पाटील साहेबांनी हे उत्तर दिले असून अशाप्रकारे तुमच्या अधिकृत उत्तराची अपेक्षा असेल तर आपण कसे काम करावे?

सभापती महोदय, श्री. तिदोरे नावाचे एक कृषी अधिकारी आहेत. त्यांच्या भ्रष्टाचाराचे हे प्रकरण असून त्याला आपणाकडून उत्तर देण्यात आले आहे. त्यात असे म्हटले आहे की, "केंद्र पुरस्कृत गळीत विकास कार्यक्रमांतर्गत सन 2010-11 मध्ये सोयाबीन पिकाचे बियाणे मिनी गट 8 किलो 65 नग परस्पर गायब केले. याबाबत जिल्हा परिषद सदस्य यांनी सभापती, पंचायत समिती पातूर यांच्या विरोधात गैरव्यवहार केल्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असताना एक मिनी गट सभापती गट विकास अधिकारी, पातूर यांनी लंपास केल्याचे सविस्तर अहवालाव्दारे नमूद करण्यात आले. या बाबत अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार विस्तार अधिकारी, कृषी यांना 25.6.2000 अन्वये पंचायत समिती पातूर सभापती, गट विकास अधिकारी व श्री. तिदोरे, कृषी विकास अधिकारी यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. तसेच, श्री. तिदोरे यांना दि. 26.6.2010 च्या आदेशाव्दारे निलंबित केले". ग्राम विकास विभागाने मला पाठविलेल्या या उत्तरामध्ये विसंगती असून ही गोष्ट मी माननीय कृषी मंत्र्यांच्या लक्षात आणून देत आहे. श्री. तिदोरे यांच्याविरोधात कारवाई सुरु असून त्यांनी आपले निलंबन रद्द करुन सेवेत रुजू करण्याबाबत केलेल्या विनंती अर्जानुसार त्यांना खातेनिहाय चौकशीच्या अधीन राहून दि.18.11.2010 च्या आदेशाव्दारे सेवेत पुन्हा रुजू करुन घेतले. सभापती महोदय, आम्ही या ठिकाणी सूचना मांडीत असतांना अशाप्रकारे व्यवस्थापन होत असेल तर ही बाब योग्य नाही. हे पत्र मी मंत्रीमहोदयांकडे पाठवितो त्यांनी त्याची गंभीर दखल घ्यावी अशी विनंती करतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ((नामनियुक्त) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र. 87 व पृष्ठ क्र. 65 मध्ये तेराव्या वित्त आयोगाच्या अंतर्गत एमडीआरची सहा कामे आणि प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत सांगली जिल्ह्यातील कवठे महाकाळ तालुक्यात जवळ जवळ 12 कामे प्रलंबित राहिली आहेत. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामाचे प्रस्ताव सादर करण्यात आले असून ते मंत्रालयात पडले आहेत. बऱ्याच दिवसापासून त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नाही. तेराव्या वित्त आयोगात एमडीआरची जवळ जवळ 48 कि.मी. लांबीची रस्त्यांची कामे पडून आहेत. त्या व्यतिरिक्त एसआर, सीआर, डीओआर यापैकी कोणत्याही कामासाठी पुरवणी मागण्यांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. मागणी करुन सुध्दा कोणत्याही प्रकारचा निधी मिळत नसल्यामुळे जिल्ह्यातील रस्त्यांची कामे प्रलंबित आहेत. त्यासाठी त्वरित निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

सभापती महोदय, कृषी व पणन विभागाच्या बाब क्र. 47 पृष्ठ क्र. 36 च्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, सांगली जिल्ह्यातील आटपाडी, जत, कवठेमहाकाळ हे कायम दुष्काळी तालुके आहेत. मी परवा सभागृहात सांगितले होते की, आमच्या तालुक्यात 15 टक्क्यापासून ते 20, 25 टक्क्यापर्यन्त पेरण्या झाल्या आहेत. आता पाऊस न पडल्यामुळे झालेल्या पेरण्या सुध्दा वाया गेल्या आहेत. पुन्हा पाऊस पडला तर शेतकऱ्यांना दुसऱ्यांदा पेरणी करणे आवश्यक आहे. या गरीब शेतकऱ्यांना पेरणी करण्यासाठी बियाण्यांची उपलब्धता करुन देणे आवश्यक आहे. आपण पीक विमा योजनेसाठी रविवार दिनांक 31 जुलै हा शेवटचा दिवस जाहीर केला. या बाबत संपूर्ण राज्याची माहिती घेतली असता बऱ्याच ठिकाणी शेतकऱ्यांचे बँकांवर मोर्चे निघाले होते.त्यामुळे शेवटच्या दिवशी बऱ्याच शेतकऱ्यांना विम्याचे हप्ते भरता आले नाहीत. याकरिता विम्याची रक्कम भरण्याची मुदत एक महिन्यांनी वाढवून देण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, ग्राम विकास विभागाच्या बाब क्र. 152, पृष्ठ क्र. 150 मध्ये गेल्या वर्षी सन 2010-11 मध्ये अपूर्ण जवाहर विहिरी पूर्ण करण्यासाठी 200 कोटींचे नियोजन केले होते वर्षभरात एका जिल्ह्यात एक हजार विहिरी देण्याचा संकल्प होता. परंतु मागील दोन-तीन वर्षापासून सांगली जिल्ह्यात नवीन विहिरींना परवानगी दिलेली नाही याकडे शासनाने लक्ष देऊन नवीन जवाहर विहिरी कशा सुरु करता येतील यासाठी प्रयत्न करावेत. सांगली जिल्ह्याच्या 85

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. रमेश शेंडगे...

कोटींच्या प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना प्रलंबित आहेत. त्याबाबत कोणत्याही प्रकारचा निर्णय झालेला नाही. अशा जवळ जवळ 10 ते 11 योजनांना ताबडतोब मंजूरी देणे आवश्यक आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, तिसंगी, तालुका कवठेमहाकाळ, जिल्हा सांगली येथे मंजूर झाले आहे, पंरतु निधी नसल्यामुळे त्याचे कोणत्याही प्रकारचे काम सुरु झाले नाही. धालगाव, तालुका कवठेमहाकाळ येथे 50 खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर झाले आहे. त्या बाबत सुध्दा निधी नसल्यामुळे अजूनपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही. सार्वजनिक आरोग्य विभाग आणि ग्रामीण विकास विभागाच्या सचिवांकडे त्या रुग्णालयाची फाईल प्रलंबित आहे.या फाईलवर त्वरित कारवाई झाली पाहिजे.

सभापती महोदय,जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क. 140 व बाब क्रमांक 112 मध्ये पाझर तलावाच्या दुरुस्तीसाठी तरतूद करण्यात आली आहे. या करिता मागील अधिवेशनामध्ये सुध्दा मागणी करण्यात आली होती. कवठेमहाकाळ तालुक्यात 11 पाझर तलावांना गळती लागल्यामुळे त्यांची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. शासनाने त्या कामासाठी पैसे देण्याचे मान्य करुनसुध्दा अजूनपर्यंत त्या पाझर तलावाच्या दुरुस्तीसाठी पैसे मिळाले नाहीत. या करिता त्या कामाचे नियोजन होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्र. 65 व पृष्ठ क्र. 45 मध्ये अजूनपर्यंत शालेय विद्यार्थ्यांना गणवेश मिळाले नाहीत. याबाबत चौकशी केली असता असे लक्षात आले की, ज्या ठेकेदाराला गणवेश वाटपाचा ठेका दिला आहे, त्याने गणवेश शिलाईचे काम महिला बचत गटांना दिले आहे. तो ठेकेदार महिला बचत गटाला एका गणवेशासाठी 45 रुपये देतो परंतु महिला बचत गटाची किमान 100 रुपये मिळावेत अशी मागणी आहे. त्यामुळे मुलांना गणवेश वाटप वेळेवर होत नाहीत हा अतिशय गंभीर व महत्वाचा विषय असल्यामुळे त्याकडे त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्र. 196 व पृष्ठ क्रमांक 248 च्या बाबतीत संपूर्ण राज्यात फिरुन माहिती घेतली असता बऱ्याच ठिकाणी औषधांचा पुरवठा होत नाही हे लक्षात येते. त्यामुळे एनआरएचएमच्या माध्यमातून किंवा राज्य सरकारच्या माध्यमातून औषधांचा पुरवठा होणे अतिशय आवश्यक आहे. सभापती महोदय, कामगार व विशेष सहाय्य विभागाच्या बाब क्र.143 व पृष्ठ क्र. 142 मध्ये पुणे, नागपूर व मुंबई येथील सरकारी अन्न धान्य गोदामामध्ये काम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री.रमेश शेंडगे...

करणाऱ्या कामगारांच्या मागण्यांबाबत राज्य सरकारने 1998 साली ॲग्रिमेंट केले. त्यांच्या मागण्यांबाबत मंत्रालयामधून अजून पर्यंत अंमलबजावणी न झाल्यामुळे त्या कडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पशु संवर्धन व दुग्ध विकास विभागाच्या बाब क्र. 58, पृष्ठ क्र. 39 च्या अनुषंगाने सांगली जिल्ह्यामध्ये पशु संवर्धन वर्ग 1 मधील जे दवाखाने आहेत त्यांच्या करिता इमारत निधी उपलब्ध करुन द्यावा. त्याचप्रमाणे एलजीओ डॉक्टर्सची कमतरता असल्यामुळे त्या डॉक्टर्सच्या ताबडतोब नेमणुका करण्यात याव्यात. सांगली जिल्ह्यामध्ये लसीकरणासाठी, जंतुनाशकांच्या औषधांचा पुरवठा करण्यात आलेला नाही तो पुरवठा करण्यासाठी आदेश द्यावेत. त्याचप्रमाणे पशु संवर्धन विभागावर बोलत असतांना मला मुद्याम सांगितले पाहिजे की, या विभागामार्फत आपण 10 कोटी रुपये मंजूर करुन शेळी गट वाटप सुरु केले आहे. यामध्ये 10 शेळया व एक बोकड देणे अशाप्रकारची योजना पशुसंवर्धन विभागामार्फत राबवीत आहोत. या राज्यात शेळया व मेंढयाच्या विकासाकरिता पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी-मेंढी विकास महामंडळ आहे. या महामंडळाला अनेक वर्षापासून निधी मिळालेला नाही. राज्यातील धनगर समाज,शेतकरी वर्गाला शेळया मेंढयाचे वाटप करण्यासाठी, लाभार्थ्यांना कर्ज वाटप करण्यासाठी एक रुपया सुध्दा मिळाला नाही. शासनाकडे कशापध्दतीने मागितल्यानंतर पैसे मिळू शकतात हे जर आपण सांगितले तर आम्ही त्या पध्दतीने पैसे मागू. परंतु या गोरगरीब जनतेसाठी महामंडळाला पैसे मिळणे आवश्यक आहे. शासनाने 10 कोटींची योजना सुरु केल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. श्री.निमकर यांच्यासारख्या एनजीओच्या फार्मसाठी आपण 50 लाख रुपयांचे अनुदान देत आहात. त्या ठिकाणी निरनिराळे संशोधन केले जात आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, क्रीडा व युवक कल्याणाच्या बाब क्र.68, पान क्र.46 बाबत सांगावयाचे आहे. ग्रामीण भागामध्ये ज्या मराठी शाळा आहेत, त्यापैकी बऱ्याच ठिकाणी क्रीडा साहित्य मिळालेले नाही. अशा वेळी तेथील मैदानाची दुरुस्ती करावयाची असेल किंवा क्रीडांच्या बाबतीत देखील नियोजन करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पान क्र.294, बाब क्र.248 ही महिला व बालकल्याण विभागाशी संबंधित आहे. अंगणवाडीतील मुलांसाठी जेवणाचा खर्च करणे याच्याशी ही बाब संबंधित आहे.पूरक आहार देत असताना बऱ्याच ठिकाणी रॉकेल आणि गॅसचा खर्च परवडत नाही म्हणून महिला बचत गट जेवण देण्याच्या बाबतीत टाळाटाळ करतात. याबाबतीत अभ्यास करुन जर त्यांना जास्त निधी देता आला तर त्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, बालकाश्रम आणि बालगृहे ही ग्रामीण भागामध्ये निर्माण होणे आवश्यक आहे. आपण अल्पमुदत निवास घरे देतो, ती देखील ग्रामीण भागामध्ये उपलब्ध करुन देण्यासाठी त्वरित अंमलबजावणी झाली पाहिजे.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा पान क्र.311 बाब क्र.258 वर सांस्कृतिक कार्य विभागाबाबत असून,त्या बाबत सांगावयाचे तर आपण टी.व्ही. किंवा पेपरमध्ये देखील पाहिले असेल की, महाराष्ट्रातील काळू-बाळू हे एक थोर कलावंत होते आणि काळू-बाळू यांचा तमाशा प्रसिध्द आहे. यामधील मोठया भावाचे म्हणजे काळू यांचे मध्यंतरी 8-10 दिवसापूर्वी दु:खद निधन झाले. मी काल सांगली जिल्ह्यातील त्यांच्या घरी भेट देण्यासाठी गेलो होतो. त्याठिकाणी सर्व तमाशा कलावंत होते आणि त्यांनी मला त्यांच्या व्यथा सांगितल्या. याठिकाणी सदनामध्ये आदरणीय सांस्कृतिक कार्यमंत्री उपस्थित आहेत. मी आपल्या माध्यमातून त्यांना विनंती करतो की, या राज्यातील जे तमाशा कलावंत आहेत ज्यांनी आपल्या राज्याची ही प्राचीन कला खरोखरच जीवंत ठेवलेली आहे.त्या लोकांचे पेन्शनसाठी शेकडो-हजारो अर्ज शासनाकडे पडून आहेत. याबाबतीत सुध्दा त्वरित निर्णय घेण्यात यावा आणि काळू-बाळू यांचे वडील श्री.शिवासंभा आणि असे जे पिढीजात तमाशा करणारे जे लोक आहेत, त्यांनी जवळजवळ 350 वर्षापूर्वीचा इतिहास जीवंत ठेवला आहे.आता त्यांची जी मुले ही कला जीवंत ठेवत आहेत,त्यांना आज हालअपेष्टांना सामोरे जावे लागत आहे. म्हणून या तमाशा कलावंतांसाठी साठी सुध्दा चांगल्या योजना राबवून त्याची
अंमलबजावणी करण्याचा शासनाने प्रयत्न करावा.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे . . . .

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा असा आहे की, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे स्मारक चौंडी, जिल्हा अहमदनगर येथे होणे आवश्यक असून, ते तयार झालेही आहे. पण या स्मारकासाठी निधी अपूरा पडत आहे.याबाबतीत आम्हाला अनेक प्रकारची आश्वासने मिळालेली आहेत. पण अजून निधी मिळालेला नाही. त्याकरिता जवळजवळ 5 कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. त्याठिकाणी आता शासनाने शिल्पसृष्टीसाठी देखील सुरुवात केलेली आहे याबद्दल मी शासनाचे जरुर अभिनंदन करतो. पण त्यासाठी सुध्दा निधीची कमतरता आहे. शासनाने हा निधी सुध्दा उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

. . . .2 जी-3

असुधारीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : माननीय सभापती महोदय, कृषी आणि पणन विभागाच्या पुरवणी मागणी क्र.डी-3, पान क्र.36, बाब क्र.48 या बाबीअंतर्गत विदर्भातील 11 जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विदर्भ विकास कार्यक्रमा अंतर्गत कृषीविषयक सहाय्य करण्याचे प्रस्तावित केलेले आहे.विदर्भ विकास कार्यक्रम पॅकेज अंतर्गत आत्महत्या ग्रस्त जिल्ह्यांमध्ये सोयाबीनच्या बियाणाचे वाटप करण्यात आले.हे बियाणे शासनाच्या महाबीज या नामवंत कंपनीकडून घेऊन ते शेतकऱ्यांना देण्यात आले.बियाणे असेल दमदर तर पीक येईल जोमदार व शेतकऱ्यांच्या विश्वासाचे बियाणे अशी महाराष्ट्र राज्यामध्ये बियाणे महामंडळाची नानाविध घोषवाक्ये आहेत. याच महाबीज कडून यंदाच्या हंगामाध्ये राज्यामध्ये पुरवठा केलेल्या एकूण 5 लाख 23 हजार क्वि.बियाणापैकी मोठया क्षेत्रातील बियाणांची उगवण शक्ती कमी असल्यामुळे तेथे काही उगवलेच नाही. याबाबत राज्यभरातून तब्बल 4925 तक्रारी शेतकऱ्यांनी महाबिजकडे नोंदविल्या. खरेतर शेतकऱ्यांना बियाणे विकण्यापूर्वी त्याला अनेक प्रकारच्या प्रक्रियेतून जावे लागते आणि या सर्व प्रक्रिया महाबीजच्या देखरेखीखाली पार पडणे अपेक्षित आहे. परंतु या प्रक्रियेमध्ये सुरुवातीला शेतकऱ्यांना बियाणे दिल्यानंतर त्यांच्या शेतावर प्रत्यक्ष जाऊन तपासणी केली जाते आणि तपासणीमध्ये शेतकऱ्यांनी योग्य बियाणे पेरले आहे की नाही याची खात्री केली जाते. एकदा पीक तयार झाल्यावर सोयबीनचे ग्रेडींग आणि वर्गवारी केली जाते. त्याप्रमाणे केल्यानंतर जर्मिनेशन टेस्ट तसेच व्हाएबिलिटी टेस्ट केली जाते. या सर्व चाचण्या केल्यानंतर बियाणांवर प्रक्रिया करुन ते विक्रीसाठी उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे आणि या प्रक्रियेला अंदाजे 20 दिवसांचा कालावधी लागतो.

सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना यावर्षी काय झाले ते सांगू इच्छितो. बियाणे महामंडळाने त्यांच्या वेब साईट वर टेंडर लोड केले. त्याची माझ्याकडे प्रत आहे. साधारणत: मृग 7 जूनपासून सुरु होतो आणि त्यावेळी पेरणीची सुरुवात होते. पण दुर्दैवाने यावर्षी पाऊस थोडा उशीरा आला. बियाणे महामंडळाने टेंडर किती तारखेला काढले ? याबाबतीत त्यांनी वेबसाईटवर जी तारीख दिलेली आहे, ती तारीख 02-06-2011 अशी आहे आणि 5 तारखेला संबंधितांनी सप्लाय करावा असे सांगितले आहे. त्यांनी टेंडरमध्ये असा उल्लेख केला की, "Supply of processing nutrients for Rabbi." सभापती महोदय वर "खरीप" लिहिले आणि खाली "रब्बी" असे लिहिले. बियाणे महामंडळने टेंडर काढल्यानंतर वास्तविक त्याची प्रोसीजर अशी आहे की, अगोदर बियाणे महामंडळाने प्लॉट दिले पाहिजेत, तेथे जाऊन उगवण शक्ती किती आहे,ते प्लॉट खरोखरच योग्य आहेत की नाही याची प्रत्यक्षात पहाणी केली पाहिजे. तसेच प्लॉटमधून ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बियाणे वर आल्यावर त्याची जर्मिनेशनची टेस्ट करावयास पाहिजे. परंतु या सर्व बाबी न करता टेंडर काढून, मी याठिकाणी जबाबदारीने आरोप करीत आहे की, मध्य प्रदेशच्या मार्केटमधील शेतकऱ्यांकडून सोयबीन खरेदी करण्यात आले आणि तीन दिवसामध्ये बॅग भरुन बियाणे महामंडळाच्या नावाखाली शेतकऱ्यांना ते विकले गेले आहे. यामुळे हजारो शेतकऱ्यांचे हजारो एकर जमिनीचे नुकसान झाले. याचे कारण असे आहे की, यावर्षी पाऊस उशीरा आल्यामुळे कापसाचा पेरा कमी झाला आणि विशेष म्हणजे याठिकाणी पॅकेजच्या माध्यमातून जे बियाणे देण्यात आले ते आत्महत्याग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या जिल्ह्यामध्ये गेले. शेतकऱ्यांनी उशीर झाल्यामुळे कापूस पेरला नाही. महामंडळाकडून जे सोयाबीन घेतले ते उगवलेच नाही. अशा प्रकारे आपण कोणाच्या जीवनाशी खेळ करीत आहोत हा प्रश्न आहे. या महामंडळाने शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळ खेळलेला आहे. म्हणून आपण येथे जी विशेष पुरवणी मागणी केलेली आहे, त्यामध्ये म्हटलेले आहे की,"या बाबीअंतर्गत विदर्भातील 11 जिल्ह्यांचा उल्लेख केलेला आहे.

सभापती महोदय, या जिल्ह्यांमध्ये बियाणे महामंडळाने शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळ खेळलेला आहे. मार्केट मधून लाखो रुपयांचे बोगस बियाणे खरेदी करुन ते शेतकऱ्यांना पुरविण्यात आले.येथील बियाणे महामंडळ बरखास्त करावे आणि याला जे-जे अधिकारी जबादार असतील यांच्यावर ताबडतोब कारवाई करुन आणि यासंपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन सदनासमोर याचा अहवाल ठेवण्यात यावा अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे

सभापती महोदय, बाब क्र.68, पान क्र.46 ही मागणी क्रीडा विभागाशी संबंधित आहे. याच सदनात माजी शिक्षण मंत्री माननीय प्रा.वसंत पुरके साहेब असताना मी खेळाडूंना शिष्यवृत्त्या देण्याच्या बाबतीत मागणी केली होती. ही मागणी केल्यानंतर तुमची मागणी मान्य झाल्याचे मला पत्र देखील आले. आज खेळाडूंना शिष्यवृत्त्या मिळत असताना सुरुवातीला कबड्डी हा खेळ चांगला होता. हा खेळ म्हणजे महाराष्ट्र राज्याचे उगम स्थान आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून कबड्डी खेळ खेळण्यात येतो आणि या खेळाला देशी खेळ म्हणून मान्यता मिळालेली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये कबड्डीच्या टुर्नामेंटस् होतात, त्या खेळण्यासाठी राज्यातील खेळाडू इतर ठिकाणी जातात. तेव्हा विदर्भ सोडून सर्व महाराष्ट्रातील खेळाडूंना एस.टी.चा पास शासनाकडून दिला जातो. मी या सदनामध्ये मागणी केल्यानंतरही विदर्भातील कबड्डीचा खेळाडू यापासून वंचित राहिला होता. यठिकाणी मी मागणी केल्यानंतर त्यावेळचे माननीय शालेय शिक्षण मंत्री आणि क्रीडा

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

मंत्री माननीय पुरके साहेबांनी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून मान्य केले आणि मला पत्र देखील दिले आणि ते जाहीर सुध्दा केले. पण आजतागायत विदर्भातील कबड्डीच्या खेळाडूंना तशा प्रकारची सवलत मिळत नाही. म्हणून या मागणी व्दारे मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, प्रत्येक गोष्टीमध्ये विदर्भावर अन्याय होत आहे. अशा वेळी खेळाडूवर देखील अन्याय करणार आहत काय ? विदर्भातील कबड्डीचा खेळाडू परदेशामध्ये ऑल इंडिया स्तरावर खेळत आहे. कधी तो परदेशामध्ये ऑल इंडियाचे नेतृत्व करतो अशा खेळाडूंना साधी एस.टी. ची सवलत आपण देऊ शकत नाही. म्हणून या मागण्या मान्य करीत असताना विदर्भातील खेळाडूंच्या संदर्भातील मागणी देखील मान्य करावी अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अधिकृत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, बाब क्रमांक 54 व 55, पृष्ठ क्रमांक 39. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागावर मी बोलू इच्छितो.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

सभापती महोदय, या दोन्ही बाबींद्वारे दुभत्या संकरित गाई व म्हशींचे वाटप करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. ही बाब निश्चितच अभिनंदनीय आहे. गाईंना आपल्या संस्कृतीमध्ये खूप महत्वाचे स्थान आहे. परंतु एका बाजूला गाई द्यावयाच्या, म्हशी द्यावयाच्या आणि त्याच वेळेला दुसऱ्या बाजूला बुलढाणा जिल्हयातील शेगांव तालुक्यामध्ये जनावरांच्या मांसावर प्रक्रिया करण्यासाठी शासनाने आता परवानगी दिलेली आहे. सभापती महोदय, मुंबई कलकत्ता रोड हा अकोल्यापासून जवळ पास 30 किलो मीटर मागे आहे. शेगांव तालुक्यातील मौजा तरोडा कसबा गाव आहे. येथे गट क्रमांक 194 येथील शेतामध्ये शाहिन फ्रोजन फुड नावाच्या संस्थेला शीतगृह व मांस प्रक्रिया याकरिता परवानगी देण्यात आलेली आहे. परंतु ही परवानगी देत असताना यामध्ये बऱ्याचशा अनियमितता केलेल्या आहेत. आवश्यकता असेल तर मंत्री महोदयांना मी या संबंधीची कागदपत्रे देतो. शाहिन फ्रोजन फुड नावाच्या संस्थेला परवानगी देताना शासनाने व संबंधित विभागाने जनतेकडून कोणताही आक्षेप मागविलेला नाही. खरे म्हणजे वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन या बाबतीत हरकती मागवावयस पाहिजे होत्या. खरे म्हणजे शहिन फ्रोजन फुड या संस्थेला ज्या कामासाठी परवानगी देण्यात आली आहे. त्या कामासाठी न वापरता ती परिसरातील जनावरांच्या कत्तलीसाठी वापरण्यात येत आहे. जनावरांच्या शिरगणतीच्या प्रमाणाचा मागील काही वर्षांचा अभ्यास केला असता विदर्भातील विशेष: अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम या जिल्ह्यांतील पशुंचे प्रमाण झपाटयाने कमी होत आहे. ग्रामीण भागातील म्हशी व गाईंच्या चोऱ्यांचे प्रमाण वाढलेले आहे. या जनावरांची कत्तल होत आहे. अशा स्थितीमध्ये शाहिन फ्रोजन फुड या संस्थेमध्ये दरराज 1400 टन मांसावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. तरोडा कसबा हे लहानसे गाव आहे. या ठिकाणी 1400 टन मांसावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. सभापती महोदय, बाळापूर आणि खामगांव तालुक्याच्या बॉर्डरवर असलेल्या लहानशा गावामध्ये 1400 टन मांस कुठून येणार आहे? यामुळे शेतकऱ्यांच्या आजूबाजूच्या पाडयातील, वाडयातील जनावरांच्या चोऱ्या वाढलेल्या आहेत, त्यामुळे हे पशूधन या भागातून नष्ट होण्याची भीती निर्माण झालेली आहे. 1400 टन

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

मांसावर प्रक्रिया करणाऱ्या या कारखान्याला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दिलेल्या संमतीनुसार सदर कारखान्यामध्ये 1400 टन मांसावर प्रक्रिया करण्यात येईल व या मालाला शीतगृहामध्ये ठेवण्यात येईल असे नमूद केले आहे व त्याच बरोबर आजूबाजूच्या क्षेत्रामध्ये कोणालाही कोणताही त्रास होणार नाही अशी अट घातलेली आहे. हायवे वर हा प्रकल्प सुरु होत आहे. हायवेला लागून ती इमारती उभी राहिलेली आहे. त्यामुळे कुठल्याही पध्दतीने या संदर्भात काळजी घेण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, तहसीलदार, शेगांव यांनी सदर कारखान्याला त्यांच्या दिनांक 26 मार्च, 2010 रोजीच्या पत्रान्वये बिगरशेती परवानगी फक्त शीतगृहासाठी दिलेली आहे. त्या ठिकाणी मांसांवर प्रक्रिया करणाऱ्या कारखानदारीसाठी बिगर शेती परवानगी दिलेली नाही तर फक्त शीतगृहासाठी परवानगी दिलेली आहे. सदर उद्योगास केंद्रीय स्वास्थ व परिवहन कल्याण मंत्रालय तसेच अन्न सुरक्षा आणि स्टॅन्डर्ड ॲथॉरिटी मंत्रालय यांच्याकडून कोणतीही परवानगी मागितलेली नाही. अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील दूध उत्पादन कमी असल्यामुळे त्याची पूर्तता करण्याकरिता शेतकऱ्यांना जोडधंदा मिळावा म्हणून शासन दुधाळ जनावरांचे वाटप करीत आहे. खरे म्हणजे मंत्र्यांनी गावोगाव जाऊन आत्महत्याग्रस्त जिल्हयांमध्ये दुधाळू जनावरांचे वाटप केले आहे. मंत्री महोदय, श्री. अनिस अहमद यांनी कॅम्प घेतले आणि अशा प्रकारचे दुधाळू जनावरे त्या ठिकाणी वाटण्याचा प्रयत्न केला आहे. अशा प्रकारे एका बाजूला जनावरांचे वाटप करावयाचे आणि दुसऱ्या बाजूला या जनावरांची रवानगी कत्तलखान्यामध्ये करावयाची असा एक प्रकार या ठिकाणी चालू आहे. पंरतु जनावरांच्या वाढलेल्या चोरीच्या प्रमाणामुळे गायी, म्हशी, बैल मोठया प्रमाणात चोरीला जात असून तपास करुन सुध्दा त्या शेतकऱ्यांना कधीच परत मिळत नाहीत. वरील बाबी घेता जवळच म्हणजे तेथून फक्त दहा किलो मीटरवर संतश्रेष्ठ गजानन महाराजांचे मंदिर विचारात घेऊन सदर प्रकल्पाला दिलेली परवानगी ताबडतोब रद्द करावी अशी या निमित्ताने मी मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 101 पृष्ठ क्रमांक 110 जलसंपदा विभागावर मी बोलू इच्छितो. जिगांव प्रकल्पासाठी पैशाची मागणी करण्यात आलेली आहे. विदर्भाच्या अनुशेषातंर्गत बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यात जिगांव प्रकल्प सन 1990 मध्ये मंजूर करण्यात आला.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुडकर....

सदर प्रकल्प मंजूर करतेवेळी या प्रकल्पाच्या उभारणीचा खर्च 396 कोटी रुपये होता. या प्रकल्पाचे काम सुरु करण्यापूर्वी 4-6 महिन्यातच कामाच्या डिझाईनमध्ये बदल करुन मूळ निविदा दुप्पट तिप्पट किंमतीने बदलून देण्याच्या प्रकारामुळे या प्रकल्पाचा खर्च 4 हजार कोटी रुपयांच्या वर गेला आहे. मूळ प्रकल्प 396 कोटी रुपयांचा होता परंतू मूळ निविदा या दुप्पट ते तीनपट किंमतीने वाढविल्या त्यामुळे या प्रकल्पाचा खर्च आता 4 हजार कोटी रुपयांवर गेलेला आहे. त्या ठिकाणी जो अधिकारीवर्ग आहे तो अधिकारीवर्ग या प्रकल्पाच्या नावाखाली कोटयवधी रुपयांची लूट करीत आहे. या प्रकल्पातंर्गत 12 उपसिंचन योजनांची कामे हाती घेण्यात आली असून उपसा योजनांसाठी पेनस्टॉक आणि एम.एस.माईल्ड स्टील वापरण्याबाबत निविदा करारात नमूद करण्यात आले असतानाही त्यामध्ये निकृष्ट दर्जाचे स्टील वापरुन उच्च दर्जाच्या स्टीलचे दर लावण्यात आले आहेत. याची चौकशी कोण करणार आहे? या प्रकलसाठी जे स्टील खरेदी करण्यात आले आहे त्या स्टीलच्या दरातही गैरव्यवहार झाले आहेत. या योजनेच्या दर्जाबाबतही प्रश्नचिन्ह उभे राहिले असून जिगांव प्रकल्पाचे जे काम पूर्ण झाले आहे ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे तसेच हे काम ज्या ठेकेदाराला दिले आहे त्याला साहित्याचे भाव दुप्पट दराने वाढवून दिल्यामुळे या प्रकल्पाच्या कामात कित्येक कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे उघड झाले आहे. तरी या गैरव्यवहाराची चौकशी करावी अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, नागपूर येथील गोसीखुर्द सिंचन प्रकल्पाची जी कामे मोठया ठेकेदारांनी पूर्ण केली त्यात कमी प्रतिचे साहित्य वापरल्यामुळे गोसिखुर्दच्या कालव्यांना भेगा पडल्याचे उघडकीस आल्यानंतर केंद्रीय जल आयोगातर्फे गठीत झालेल्या समितीने गोसीखुर्द प्रकल्पाच्या कामांची पाहणी केली. समितीने केलेल्या पाहणीत कालव्याच्या अस्तरीकरणात आलेल्या भेगांबाबत अन्वेषण करुन क्षतीग्रस्त अस्तरीकरणाचे काम स्वखर्चाने नव्यानें करुन देण्याबाबत कंत्राटदाराला सूचविले आहे. अस्तरीकरणाच्या या कामात ठेकेदारांनी अधिकाऱ्यांच्या संमतीने करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केल्यामुळे या प्रकल्पाची किंमत कित्येक पटीने वाढली. जल आयोगातर्फे गठीत झालेल्या समितीने केलेल्या पहाणीच्यावेळी अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या पाटबंधारे विभागाच्या 12 अधिकाऱ्यांवर दोषारोपपत्र बजावण्यात येऊनही अद्यापपर्यंत त्यांचेविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. दिनांक 9 डिसेंबर, 2010 मध्ये गोसीखुर्द प्रकल्पाच्या कामामध्ये झालेल्या

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

अनियमिततेच्या संदर्भात विधानपरिषद सभागृहात झालेल्या चर्चेच्यावेळी चौकशी समितीचा अहवाल सरकारकडे प्राप्त झाला असून त्या अहवालाच्या अनुषंगाने दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करुन त्यांची चौकशी करणे गरजेचे आहे, असे या सभागृहात सांगण्यात आले होते पण अद्याप त्यासंबंधीची कारवाई झालेली नाही. तेव्हा या 12 अधिकाऱ्यांना ताबडतोब निलंबित करावे, अशी मागणी मी या निमित्ताने या ठिकाणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 100, पृष्ठ क्रमांक 85. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पूरक मागणीवर बोलू इच्छितो. या बाबी अंतर्गत प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी रुग्णालयांच्या बांधकामाचा खर्च भागविण्यासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे. एकूण 27 ग्रामीण रुग्णालयांचे बांधकाम करण्यासाठी हा निधी दर्शविण्यात आलेला आहे. या 27 ग्रामीण रुग्णालयांमध्ये विदर्भातील 3 व कोकणातील फक्त 1 ग्रामीण रुग्णालय दाखविण्यात आलेले आहे. खरेतर ग्रामीण रुग्णालयाचा अनुशेष कोणत्या निकषावर काढण्यात आला आहे हे तपासणे गरजेचे आहे. शासनाकडे उपलब्ध असलेल्या अहवालामध्ये खालील अनुशेष दाखविण्यात आला आहे.

यानंतर श्री. बरवड....

अप्रधारित प्रत / प्रतिक्षिप्त नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

यामध्ये बुलढाणा जिल्ह्यामध्ये 6 ग्रामीण रुग्णालयांचा अनुशेष आहे. वाशिम जिल्ह्यामध्ये 3, अमरावती जिल्ह्यामध्ये 5, यवतमाळ जिल्ह्यामध्ये 3, भंडारा जिल्ह्यामध्ये 4 आणि. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये एका ग्रामीण रुग्णालयाचा अनुशेष आहे. याच पध्दतीने कोकणामध्ये सुध्दा अनुशेष आहे. एवढा अनुशेष असताना विदर्भात केवळ 3 ग्रामीण रुग्णालये दाखविण्यात आली आहेत आणि कोकणात एक ग्रामीण रुग्णालय दाखविण्यात आले. या परिस्थितीत बदल करुन विदर्भातील आणि कोकणातील अनुशेष दूर करावा अशी मागणी मी या निमिताने करतो.

सभापती महोदय, यानंतर मी ग्रामविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 150 वरील बाब क्रमांक 152 बाबत बोलणार आहे. दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींची जनगणना करण्यासाठी या बाबीव्दारे तरतूद करण्यात आली आहे. खरे तर वाढत्या महागाईमुळे दारिद्र्य रेषेची असणारी जुनाट संकल्पना आता पुसणे गरजेचे आहे. सन 1978 मध्ये दारिद्र्य रेषा ठरविण्यासाठी उष्मांक हा निकष ठरविण्यात आला होता. ग्रामीण व्यक्तींसाठी 2400 तर शहरातील व्यक्तींसाठी 2100 उष्मांकाची गरज असते. त्यानुसार दारिद्र्यरेषा ठरविण्यात आली. त्यानंतर नियोजन आयोगाने चालनवाढीनुसार दारिद्र्य रेषेत बदल केले. उष्मांकाचा निकष अपुरा असल्याने दहाव्या योजनेत विविध 13 निकष ठरविण्यात आले व त्या आधारावरील गुणांकनावरुन द्रारिद्र्य रेषा ठरविण्यात आली. सन 2009 मध्ये सुरेश तेंडुलकर समितीने दिलेल्या अहवालात 37 टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली असल्याचे म्हटले आहे तर सक्सेना समितीने 50 टक्के लोक गरीब असल्याचे म्हटले आहे. याचाच अर्थ निकष थोडा जरी बदलला तरी द्रारिद्र्य रेषेखालील लोकांच्या प्रमाणामध्ये घट अथवा उतार होतो. त्याकरिता दारिद्र्य रेषेखालील लोकांची गणना योग्य निकषांव्दारे करावी व त्या आधारे त्यांच्या उत्थानाकरिता योजना राबवाव्यात अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 283 वरील बाब क्रमांक 237 बाबत बोलणार आहे. या बाबीव्दारे शासकीय तंत्र निकेतन येथील अधिव्याख्यात्यांना मानधन देण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. या शासकीय तंत्र निकेतनमध्ये

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

अधिव्याख्यात्यांनी वैयक्तिक रोष मनात ठेऊन त्यांच्याविरुध्द आवाज उठविणाऱ्या विद्यार्थ्याला खोट्या कॉपी प्रकरणात अडकविले आहे. हिंगणा कारेगाव ता. खामगाव, जि. बुलढाणा येथील श्री. शक्तीसिंह सारंगधरसिंह चौहान हा विद्यार्थी खामगाव येथील शासकीय तंत्र निकेतनात सिव्हिल तृतीय वर्षात शिकत होता. तो खामगाव येथील शासकीय तंत्र निकेतनात विद्यार्थी आघाडीचे काम करीत होता. विद्यार्थ्यांचे प्रश्न तो नेहमीच सोडवित होता. खामगाव येथील शासकीय तंत्र निकेतनात काम करीत असलेल्या कंत्राटी अधिव्याख्यात्यांनी त्यांना शासकीय सेवेत नियमित करुन घेण्यासाठी दिनांक 19 एप्रिल, 2010 पासून केलेल्या आंदोलनास विद्यार्थी आघाडीने पाठिंबा दिला नसल्यामुळे या प्रकरणाचा बदला म्हणून या कंत्राटी अधिव्याख्यात्यांनी त्यांच्या विरुध्द खोटे कॉपी प्रकरण घडवून त्याला रस्टीकेट केले.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या क्रमांक मरातंशिमं/का-21/ विस:2010/कॉपीकेस/498, दिनांकित 16 नोव्हेंबर, 2010 च्या "विद्यार्थ्याने परीक्षेमध्ये गैरप्रकाराचा अवलंब केल्याबाबत चौकशी अहवाल" या विषयावरील पत्राच्या अनुषंगाने कॉपी प्रकरणामध्ये ज्या विद्यार्थ्यांवर कॉपी केल्याचा आरोप असेल त्यांचेकडून कॉपी जप्त होणे, त्या कॉपीतील मजकूर त्यांनी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेत लिहिणे, सदर विद्यार्थ्यांची कॉपीवर सही घेणे, अशी कोणतीही प्रक्रिया झालेली नाही. एकही पुरावा नाही. त्यामध्ये साक्षीदार नाही, पंच नाही, बयाण नाही. या सर्व गोष्टींची पूर्तता नसताना त्यांनी जाणीवपूर्वक अर्धवट माहिती तंत्र शिक्षण मंडळाकडे पाठविली. शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती यांनी सादर केलेल्या माहितीत जप्त केलेल्या कॉपीची प्रत, परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या जवळपासच्या दोन विद्यार्थ्यांचे साक्षीदार/पंच म्हणून सह्या केलेले बयाण यांचा समावेश अहवालासोबत पाठविला नसल्याचे दिसून येते. हे सर्व बोगस प्रकरण आहे. त्याचा अहवाल शासकीय तंत्रनिकेतनकडे आल्यानंतर या ठिकाणच्या समितीने त्याच्या विरुध्द निकाल दिला. ज्यावेळी मी व्यक्तिश: माननीय मंत्री महोदयांना भेटलो त्यावेळी त्यांना सर्व प्रकरण दाखविले. माहितीच्या अधिकारामध्ये अमरावती विभाग आणि महाराष्ट्र शासन यांच्याकडून माहितीच्या अधिकाराखाली कागदपत्रे मागविली. त्यामध्ये त्या विद्यार्थ्याच्या विरोधात एकही पुरावा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

नव्हता. पण मंडळाने निर्णय दिला आणि त्यात असे सांगण्यात आले की, याला अपिलींग ॲथॉरिटी नाही. म्हणजे एखाद्या प्राध्यापकाच्या मनात आले की एखाद्या विद्यार्थ्यावर सूड उगवावयाचा आहे तर ते त्या विद्यार्थ्याचे जीवन उद्ध्वस्त करु शकतात, हे यावरुन सिध्द झालेले आहे. त्या विद्यार्थ्याचे चार विषयांचे मार्क रोखलेले आहेत. त्याचा चार विषयांचा निकाल रोखलेला आहे. त्याला रस्टीकेट तर केलेच आहे पण त्याचा चार विषयाचा निकालही देण्यास तयार नाहीत. अशी जर कार्यपध्दती चालू राहिली तर त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनाचे नुकसान होऊ शकते. म्हणून मी ही बाब या ठिकाणी उपस्थित केली. माननीय मंत्री महोदयांनी यासंबंधी आपल्या उत्तरात खुलासा करावा अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : आता पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या उत्तराला सुरुवात करावयाची काय ?

श्री. राजन तेली : सभापती महोदय, आम्हाला बोलावयाचे आहे. काँग्रेस पक्षाकडून एकाही सदस्याला बोलण्याची संधी मिळालेली नाही.

उप सभापती : मी कोणत्याही सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी नकार दिलेला नाही. प्रश्न एवढाच आहे की, आपल्याकडे सायंकाळी 6.00 वाजेपर्यंतचा वेळ आहे. तसेच आपल्याला शासकीय बिले सुध्दा घ्यावयाची आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आज शासकीय बिलावरील चर्चा होणे शक्य नाही. सायंकाळी 6.00 वाजता ही चर्चा थांबेल. राहिलेल्या मंत्र्यांना नंतर उत्तरे द्यावी लागतील. सत्ताधारी पक्षाची काय जबाबदारी आहे हे त्यांनी ठरवावयाचे आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, पक्षाचे प्रतोद ज्या सदस्यांची नावे बोलण्यासाठी देतात त्या क्रमाने आपण सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी. जे सन्माननीय सदस्य नियमित सभागृहात असतात, उदा. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले साहेब नियमित बसतात. एखादा सदस्य बाहेरुन आला की, तो 20 मिनिटे बोलतो आणि सतत नियमित बसणाऱ्या सदस्याचे नावच येत नाही. म्हणून पक्षाचे प्रतोद जी नावे देतात त्याप्रमाणे आपण क्रम द्यावा. आपण जर असे म्हणालात की, आघाडीच्या पक्षाच्या सदस्यांनी बोलावयाचे नाही तर तेही मान्य करु पण आपण सन्माननीय सदस्यांना क्रमाक्रमाने बोलण्याची संधी द्यावी. जे सदस्य बाहेरुन येतात ते अर्धा तास बोलतात आणि विमान पकडावयाचे आहे म्हणून ताबडतोब निघून जातात, हे बरोबर नाही. कृपया आम्हाला न्याय द्यावा. दिवसभर सन्माननीय सदस्य बिचारे तयारी करीत आहेत. बाब क्रमांक शोधत आहेत आणि आपण त्यांना जर बोलण्याची संधी दिली नाही तर ते योग्य होणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य दुसऱ्या सदस्यांवर हेत्वारोप करीत आहेत. विमान पकडावयाचे आहे म्हणून सदस्य भाषण करुन निघून जातात असे म्हणणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले बिचारे आहेत का ?

उप सभापती : या नंतर सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले बोलतील. त्यांनी आपले भाषण सुरु करावे.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ AKN/

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी मनापासून आपले आभार मानतो. सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 118 वरील बाब क्रमांक 113 बाबत बोलणार आहे. जे जुने जलसिंचन तलाव आणि प्रकल्प आहेत ते अगोदर पूर्ण करा, तोपर्यंत एकही नवीन जलसिंचन तलाव घेऊ नका अशा प्रकारचे आदेश माननीय राज्यपालांनी दिले आहेत असे आम्ही वर्तमानपत्रात वाचलेले आहे. मराठवाडा आणि विदर्भामध्ये अशा अनेक साईट्स उपलब्ध आहेत की, ज्या ठिकाणी लघु प्रकल्प, गाव तलाव, मध्यम प्रकल्प, साठवणूक तलाव मोठ्या प्रमाणावर घेता येऊ शकतात आणि शेतकऱ्यांची हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येऊ शकते. म्हणून माझी राज्य शासनाला आग्रहाची विनंती आहे की, मराठवाडा आणि विदर्भामध्ये ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्रकल्प घेता येऊ शकतात, किमान 500 हेक्टरपर्यंत मराठवाडा आणि विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रकल्प घेतले जाऊ शकतात, त्याला आपण प्राधान्य देऊन ते प्रकल्प घ्यावेत. जी रखडलेली कामे आहेत ती पूर्ण कराच परंतु रखडलेली कामे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत एकही नवीन काम घेणार नाही ही भूमिका असेल तर ती योग्य नाही. ही बाब मराठवाडा आणि विदर्भावर अन्याय करणारी आहे. कारण तेथील जनता उपेक्षित आहे. आजही आमचा भौतिक अनुशेष शिल्लक आहे. हा भौतिक अनुशेष पूर्ण करण्याच्या दृष्टीने नवीन सिंचन प्रकल्पांना मान्यता देणे म्हणजे एक पाऊल पुढे टाकणे असे मी मानतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील 5 कोल्हापूर पध्दतीच्या विशेष दुरुस्तीचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत. त्यांना तात्काळ मान्यता द्यावी अशी मी आग्रहाची विनंती करतो. माननीय राज्यपालांनी या सभागृहात नियुक्त केलेले आम्ही 12 सन्माननीय सदस्य आहोत. माझी शासनाला विनंती आहे की, माननीय राज्यपालांनी आम्हाला नामनियुक्त केलेले आहे. महाराष्ट्रातील वस्तुस्थिती माननीय राज्यपालांच्या कानावर पडावी यासाठी शासनाला गरज भासली तर विशेष प्रतिनिधी म्हणून आम्ही बाराही सन्माननीय सदस्यांना माननीय राज्यपालांकडे घेऊन जावे. आम्ही महाराष्ट्र शासनाची भूमिका माननीय राज्यपालांच्या कानावर सक्षमपणे घालू आणि त्यांनीच आम्हाला या सभागृहात पाठविले असल्यामुळे आमची मागणी ते 100 टक्के मान्य करतील अशी अपेक्षा व्यक्त केली तर ती चुकीची होणार नाही.

सभापती महोदय, यानंतर मी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पान क्र.283 वरील बाब क्र.235 वर बोलणार आहे. महाराष्ट्रामध्ये वरिष्ठ महाविद्यालयांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. या महाविद्यालयातील प्राध्यापकांनी पीएडी, एमफिल्.पदवी धारण केलेली असते. म्हणजे त्यांचे अर्धे आयुष्य शिक्षण घेण्यामध्ये जाते. कायम स्वरुपी विना अनुदानित तत्वावरील वरिष्ठ महाविद्यालयातील हे प्राध्यापक दुर्दैवाने दुर्दैवाच्या फे-यात अडकले आहेत. त्यांना 2 हजार रुपये, 3 हजार रुपये, 4 हजार रुपये पगार दिला जातो. मुंबईतील गिरणी कामगार होते त्यांच्यासारखेच राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापनाचे कार्य करणारे हे प्राध्यापक उपेक्षित आहेत. त्यांचा प्रश्न शासनाने मार्गी लावावा अशी मी आग्रहाची विनंती करतो. कायम स्वरुपी विना अनुदानित तत्वावर कोणालाही महाविद्यालय शासनाने मंजूर करु नये. जर मंजूर करावयाचेच असेल तर ते अनुदानित महाविद्यालय मंजूर करावे. महाराष्ट्रामध्ये वयाच्या 30-32 वर्षापर्यंत त्यांनी शिक्षण घ्यायचे, सध्या महाराष्ट्रातील सरासरी आयुष्य 65 वर्षे इतके गृहित धरले तर या प्राध्यापकांनी संसार केव्हा करायचा, वैवाहिक जीवनाचा आनंद केव्हा घ्यायचा, मुलांना केव्हा शिकवायचे ? म्हणून ही गंभीर बाब आहे असे मला वाटते. (अडथळा) त्यांच्या मुलांना सुध्दा शाळेत पाठवावे लागते, त्यांच्या शिक्षणाची फी द्यावी लागते, मुलांना गणवेष घेऊन द्यावा लागतो. या सगळया

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

गोष्टींमुळे व महागाईमुळे या वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापन करणा-या वरिष्ठ प्राध्यापकांना 3-4 हजार रुपयांच्या पगारामुळे हा खर्च भागविणे शक्य होत नाही. म्हणून शासनाने विना अनुदान तत्वावर शाळा व महाविद्यालये मंजूर करण्याचे धोरण बंद करावे. महाराष्ट्रात काही वरिष्ठ महाविद्यालये मंजूर केली जाणार आहेत. जसे शासनाने जाहीर केले आहे की, प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक यांच्या संदर्भात "कायम स्वरुपी" हा शब्द काढून टाकला आहे. तशा प्रकारे कायम स्वरुपी शब्द या वरिष्ठ महाविद्यालयांच्या काढून टाकावा बाबतीत अशी मी विनंती करतो.

यानंतर महिला व बालविकास विभागाच्या पान क्र.293 वरील बाब क्र.247 बाबत मी बोलणार आहे. आज महाराष्ट्रातील शेकडो बालक आश्रमांची स्थिती वाईट आहे. त्या ठिकाणचे कर्मचारी मानधनावर काम करतात. त्यांना केवळ 1500 रुपये 2000 रुपये मानधन दिले जाते. माननीय शिक्षण मंत्र्यांनी याचा फेरआढावा घ्यावा किंवा पुनर्विलोकन करावे. या बालक आश्रमासाठी शासनाने पूर्ण वेळ कर्मचारी नेमले पाहिजेत. कारण बाल मनावर संस्कार करण्याचे काम हे कर्मचारी करीत असतात. पूर्ण वेळ नेमलेले कर्मचारीच संस्काराचे काम चांगल्या रितीने करु शकतात. परंतु तेच जर अर्धपोटी असतील तर त्यांनी बाल मनावर संस्कार करण्याचे काम कसे करावे याचाही शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मी कृषी विभागाच्या पान क्र.36, बाब क्र.49 वर बोलणार आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सोयाबीनच्या पिकाचा मुद्दा मांडला आहे. सोयाबीनच्या बियाण्याबाबत मराठवाड्यातील शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली आहे. हजारो हेक्टरवरील सोयाबीनचे पीक वाया गेले आहे. ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीनचे पीक घेतले होते त्याच्या शेतीमध्ये पूर्ण पीक तयार झाल्यानंतर त्यांनी ते बाजारात नेल्यावर....

उप सभापती : मला सर्व सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, सभागृहाची वेळ संपण्यासाठी केवळ 35 मिनिटांचा कालावधी शिल्लक राहिलेला आहे. पुरवणी मागण्यांवरील चर्चेचा आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. त्या मुळे पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मंत्री महोदयांची उत्तरे आजच पूर्ण होणे आवश्यक आहे. त्या मुळे पुरवणी मागण्यांवरील चर्चा संध्याकाळी 6 वाजण्याच्या आत संपवावयाची असेल तर प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी वेळेचे बंधन पाळावे. अन्यथा सभागृहाची वेळ वाढवावी लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहाची वेळ रात्री 8 वाजेपर्यंत वाढविण्यात यावी.

उप सभापती : काही हरकत नाही.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, हे पीक बाजारात नेल्यावर शेतकऱ्यांच्या पदरात जो पैसा पडला असता तितका पैसा या महामंडळाकडून शेतकऱ्यांना दिला गेला पाहिजे. नाही तर या महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर शासनाने कारवाई करुन शेतकऱ्यांना दिलासा दिला पाहिजे असा मी आग्रह करणार आहे.

सभापती महोदय, पान क्र.36, बाब क्र.46 वर मी बोलणार आहे. आमच्या मराठवाड्यातील पशुधन खात्याचा कार्यभार सांभाळणाऱ्या मंत्री महोदयांच्या निदर्शनास मी आणून देऊ इच्छितो की, पशुखाद्यामध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होत आहे. पेंढीमध्ये भेसळ होत आहे. त्याचे नमुने गोळा करण्याचे अधिकार या खात्याला नाही. म्हणून मी आयुक्तांना पत्र लिहिले होते. त्यांनी मला असे उत्तर दिले आहे की, हा अधिकार अन्न व औषध प्रशासन विभागाला आहे. आम्ही आपले काम करु शकत नाही. हा अधिकार आम्हाला नाही. महाराष्ट्रातील पशुखाद्यामध्ये भेसळ होत आहे. त्याचा दुष्परिणाम दुधावर होत आहे, दुधाचा परिणाम शरीरावर होत आहे, शरीराचा परिणाम शेवटी समाज व्यवस्थेवर होतो. याचा साकल्याने विचार करुन महाराष्ट्रात पशुखाद्यामध्ये, पेंडीमध्ये व्यापाऱ्यांकडून होत असलेल्या भेसळीला आळा घालावा अशी आग्रहाची विनंती करतो आणि आपण मला अधिक वेळ बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

उप सभापती : आता मंत्री महोदयांच्या उत्तरांना सुरुवात होईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील या चर्चेसाठी आपण वेळ वाढवून द्यावा.

श्री.दिवाकर रावते : काल माननीय सभापतींनी पुरवणी मागण्या मान्य झाल्याचे जाहीर केले होते, तसे आपणही जाहीर करावे.

उप सभापती : संध्याकाळी 6 वाजण्यासाठी 5 मिनिटे शिल्लक असेपर्यंत ज्या सन्माननीय सदस्यांना भाषणे करावयाची असतील त्यांनी ती करावीत. माझी काहीच हरकत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011-12 च्या पुरवणी मागण्यांवर मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र.97 वर मी माझे विचार प्रथम मांडते. पुणे येथील ससून हॉस्पिटलमध्ये विद्युतीकरण करणे व विविध विभागांच्या इमारतींचे बांधकाम करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. ससून हॉस्पिटलमध्ये पाण्याच्या टाकीचे बांधकाम करणे सुध्दा आवश्यक आहे. शव विच्छेदन होईपर्यंत मृतांचे नातेवाईक थांबलेले असतात. त्यांना उभे राहण्यासाठी तेथे पत्र्यांची शेड व स्वच्छतागृह बांधणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे हॉस्पिटलच्या संपूर्ण इमारतीचे आधुनिकीकरण करण्यात यावे. त्या ठिकाणी बर्न विभागामध्ये आयसीयु आहे त्याला लिफ्ट नाही. आयसीयुमध्ये दाखल होणाऱ्या पेशंटसना जिन्यावरुन नेले जाते. म्हणून बर्नच्या आयसीयुला लिफ्टची गरज आहे. तेथील सर्व स्वच्छतागृहांची अवस्था वाईट आहे. माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री.विजयकुमार गावित यांनी ससून हॉस्पिटलला भेट दिली होती. त्यावेळी संपूर्ण स्टाफने या हॉस्पिटलमध्ये पाण्याची टंचाई आहे असे सांगितले होते. हॉस्पिटलसाठी स्वतंत्र पाण्याची योजना नसल्यामुळे पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असलेले छोटी छोटी कामे 1-1 वर्ष, 2-2 वर्षे प्रलंबित आहेत असे मंत्री महोदयांसमोर त्यांनी सांगितलेले आहे. म्हणून माझी विनंती आहे की, शासनाने या कामासाठी तातडीने तरतूद करावी.

दुसरे असे की, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विविध रस्त्यांची कामे केली जातात. पुणे-मुंबई एक्सप्रेस रस्ता किंवा अन्य रस्ते असतील....

यानंतर श्री.शिगम....

अधोरेखित पत्र / प्रतिक्षिप्त नाही

(डॉ. नीलम गो-हे..

या रस्त्यावर कोठेही स्वच्छता गृहाची सोय केलेली नाही, याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. पुणे येथील परिवहन विभागाच्या आवारात देखील सार्वजनिक स्वच्छता गृह असणे अतिशय गरजेचे आहे. पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत विविध विकास कामे घेतली जातात. शिर्डी, शनी शिंगणापूर यासाठी व्यवस्था झालेली आहे. यापूर्वी लोणार सरोवर, अष्टविनायक आणि दुर्गांच्या विकासासाठी 50 कोटीची तरतूद केलेली होती. या तरतुदीचा विनियोग कशा पध्दतीने होणार याबाबतची स्पष्टता नाही, याकडे मी शासनाचे लक्ष वेधीत आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या संदर्भात आम्ही दिनांक 8 जुलै 2011 रोजी दैनिक महाराष्ट्र टाईम्समध्ये अशी बातमी वाचली की पुण्याजवळ अजून एक लेकसिटी होणार आहे. त्यासंदर्भात जलसंपदा विभागाच्या मंत्री महोदयानी एक बैठक देखील आयोजित केली होती. त्यानंतर दुस-या दिवशी वर्तमानपत्रातून असे जाहीर करण्यात आले की लेकसिटी होणार नाही. या जलसंपदा विभागाने पानशेत, वरसगाव या ठिकाणच्या परिसरामध्ये धरणांच्या संदर्भात काही कार्यक्रम आखलेला आहे काय ? अनेक ठिकाणी धरणांच्या भिंतीमधून गळती होत आहे.विशेषत: पानशेत प्रलयाला 50 वर्षे पूर्ण झाली म्हणून अनेक कार्यक्रम घेतले गेले. या धरणांच्या सुरक्षिततेसाठी जलसंपदा विभागाने काय पावले उचलली आहेत हे स्पष्ट होत नाही. कारण बाब क्रमांक 107 नुसार मॉनेटरिंगसाठी व्यवस्था केलेली आहे. तेव्हा हे मॉनिटरिंग होते की नाही याबाबत स्पष्टता होत नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 243कडे मी मंत्री महोदयांचे लक्ष वेघू इच्छिते. यामध्ये स्वागत केंद्रे, राज्यगृहे, संरक्षण केंद्रे यासाठी देयकाची तरतूद केलेली आहे. हे तिसरे अधिवेशन आहे. आम्ही सातत्याने शासनाचे या गोष्टीकडे लक्ष वेधत आहोत की, बालगृहांवर देखरेख करण्याच्या कामाला मदत करणारी मोठी जबाबदारी राज्य महिला आयोगाकडून अपेक्षित आहे. या राज्य महिला आयोगाच्या गेल्या 5 वर्षापासून तीन-चार जागा रिक्त होत्या. अजूनही दोन्ही पक्षांकडून महिला सदस्यांची नावे न गेल्यामुळे राज्य महिला आयोगावर महिला सदस्यांच्या नियुक्त्या झालेल्या नाहीत. दर महिन्या दोन महिन्यांनी मतिमंद मुलींवर, गतिमंद मुलींवर बलात्कार झाले, छोट्या मुलांना चटके देण्यात आले अशा प्रकारच्या घटना वर्तमानपत्रातून वाचावयास मिळतात. आपण जर राज्य महिला आयोगावर सदस्यांची नियुक्तीच केली नाही तर अशा प्रकारच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

घटना वारंवार होत रहातील. कोल्हापूरच्या पोलीस केन्द्रातील महिलांवरील अत्याचाराचा विषय समोर आला त्यावेळी देखील राज्य महिला आयोगाची कमतरता जाणवली.

सभापती महोदय, 244 या बाबी नुसार आपण देवदासीसाठी निर्वाह अनुदानाची व्यवस्था केलेली आहे. परंतु देवदासी प्रतिबंध कायद्यानुसार देवदासींचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता आहे....(अडथळा)... सभापती महोदय, मी माझे भाषण दोन मिनिटामध्ये पूर्ण करते. देवदासी प्रतिबंध कायद्यानुसार एक समिती अपेक्षित आहे. ही समिती अद्याप नेमली गेलेली नाही, याकडे मी शासनाचे लक्ष वेधित आहे.

उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागाच्या बाब क्रमांक 148 मध्ये लहान, मध्यम व मोठ्या उद्योगांना आणि विशाल प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी 400 कोटीची तरतूद केलेली आहे. याचा तपशील स्पष्ट होत नाही.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या बाब क्रमांक 66 नुसार विश्वचषक जिंकणारे झहीर खान, सचिन तेंडुलकर यांच्या सारखे महाराष्ट्रातील खेळाडू त्याचप्रमाणे रांची, झारखंड येथे आयोजित केलेल्या 34व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील राज्यातील पदक विजेत्या खेळाडूंना व त्यांच्या प्रशिक्षकांना रोख रकमेत बक्षिस देण्यासाठी 12 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. दरवर्षी क्रीडा स्पर्धांचे पुढचे शेडयुल जाहीर केले जाते. या स्पर्धामध्ये महाराष्ट्रातून कायम स्वरुपी खेळणारे जे कीर्तिमान खेळाडू असतात त्यांच्यासाठी तरतूद वाढविली पाहिजे. सभापती महोदय, मला बोलण्यासाठी वेळ कमी दिल्याबद्दल मी माझी नाराजी व्यक्त करते. आमचे सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य हे आणीबाणीचे हस्तक असल्यासारखे वागत आहेत. त्याचा त्यांना राजकारणामध्ये काहीच फायदा मिळणार नाही एवढे नमूद करुन मी माझे भाषण संपविते.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय सन 2011-2012च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या पृ.क्र.45 वरील बाब क्रमांक 67कडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छिते. स्पर्धामध्ये सहभागी होणा-या खेळाडूंसाठी निवास व भोजनाचा खर्च भागविण्यासाठी 50 लाख रु.ची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु खेळांच्या यादीमध्ये स्केटींग या खेळाचा अजून समावेश केलेला नाही. वास्तविक आंतरराष्ट्रीय स्तरावर ही मुले खेळत असतात आणि पारितोषिकेही पटकावित असतात. हा जोखमीचा खेळ खेळून देखील या खेळाची खेळांच्या यादीमध्ये नोंद नाही. ही नोंद घेण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करते.

शालेय शिक्षणाच्या बाब क्रमांक 64मध्ये ग्रंथपालाच्या अतिरिक्त पदाच्या वेतनावरील खर्च भागविण्यासाठी तरतूद केलेली आहे. राज्यातील खाजगी ग्रंथालयांची स्थिती अतिशय वाईट आहे. त्यांना शासनाकडून अतिशय तुटपुंजी मदत मिळत असल्यामुळे ती बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. ग्रंथालये ही ज्ञानाची भांडारे आहेत. ज्यांना पुस्तके घेता येत नाहीत ते ग्रंथालयामध्ये जाऊन हवी असलेली पुस्तके घेऊन अभ्यास करीत असतात. या ग्रंथालयासाठी वर्षाला फक्त 20 हजार रुपये दिले जातात. म्हणजे महिना त्यांना दीड हजार रुपये येतात. या दीड हजार रुपयामध्ये या ग्रंथालयांचा कोणताही खर्च भागत नाही, नवीन पुस्तके खरेदी करता येत नाहीत, लाईट बिल भरता येत नाही, जागेचे भाडे देता येत नाही, टेबल खुर्च्या घेत येत नाहीत. तेव्हा ग्रंथालयाला मासिक किमान 10 हजार रुपये मदत केली तर ती ग्रंथालये चांगल्या रीतीने चालू शकतील, गरिबांच्या मुलांच्या ज्ञानामध्ये ही ग्रंथालये भर घालू शकतील, त्यांना ज्ञानाचे भांडार उपलब्ध होऊ शकेल. म्हणून या ग्रंथालयाकडे शासनाने लक्ष द्यावे अशी मी विनंती करते.

जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 113 वरील बाब क्रमांक 105मध्ये पाणी वाटप संस्थांच्या व्यवस्थापन अनुदानासाठी तरतूद केलेली आहे. आपण आसोलामेंढा येथील पाण्याच्या वाटपासाठी पाणी वाटप संस्था निर्माण केल्या. नियमाप्रमाणे त्यांना हिश्श्याचे पाणी द्यावयास पाहिजे, कालवे दुरुस्त करुन द्यायला पाहिजे. परंतु अद्यापपर्यन्त त्यांना कुठलेही कालवे दुरुस्त करुन दिलेले नाही, त्यांना हिश्श्याचे पाणी मिळत नाही. ही संस्था केवळ कागदोपत्रीच आहे. तेव्हा आपण ज्या पाणी वाटप संस्था निर्माण केलेल्या आहेत त्यांना न्यायाप्रमाणे सर्व काही मिळाले पाहिजे, याची नोंद शासनाने घ्यावी.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 112 वरील बाब क्रमांक 104 मध्ये लहान पाटबंधारे योजनांच्या परिरक्षण व दुरुस्तीसाठी अतिरिक्त निधीची तरतूद केलेली आहे. पूर्व विदर्भामध्ये मोठया प्रमाणावर माजी मालगुजारी तलाव आहेत. या माजी मालगुजारी तलावांच्या परिरक्षण व दुरुस्तीसाठी नगण्य आर्थिक तरतूद केली जाते. तलावाच्या दुरुस्तीसाठी हेक्टरी 21 हजार रु. याप्रमाणे दुरुस्ती खर्च देण्यात यावा असा शासनाने जी.आर. काढला. परंतु तलावाचे खोदकाम, माती काठावर नेऊन टाकणे या सगळया गोष्टी एवढ्या पैशात होत नाहीत असा आमचा अनुभव आहे. म्हणून माजी मालगुजारी तलावाच्या दुरुस्तीसाठी किमान 40 हजार रुपये द्यावेत अशी मी मागणी करते.

सभापती महोदय, ट्रीपल आरचा पैसा केन्द्र शासनाकडून आलेला आहे. लघु पाटबंधा-यांची दुरुस्ती या ट्रीपल आरमधून करता येते. त्यासाठी 90 टक्के केन्द्र शासनाकडून निधी मिळतो आणि 10 टक्के निधीची तरतूद राज्य शासनाने करावयाची असते. पूर्व विदर्भामध्ये सर्वात जास्त लघु प्रकल्प आहेत. या लघु प्रकल्पावर धानाची शेती होते. परंतु या ट्रिपल आर योजनेचा कोणताही फायदा पूर्व विदर्भाला मिळालेला नाही. या योजनेतून पश्चिम महाराष्ट्रातील 482 प्रकल्प घेण्यात आले. विदर्भामध्ये 80 देखील प्रकल्प घेण्यात आले नाहीत. तेव्हा पूर्व विदर्भातील जास्तीत जास्त प्रकल्प या योजनेंतर्गत घेण्यात यावेत अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या बाब क्रमांक 153कडे मी आपले लक्ष वेधू इच्छिते. पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेंच्या अंमलबजावणीसाठी 40 कोटी 84 लाख रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. हा कार्यक्रम जेव्हा मागील वर्षी राबविण्यात आला त्यावेळी ग्रामपंचायतीना अडीच तीन रुपयाचे रोपे साडेसात ते 10 रुपयांना विकले गेले. त्यामुळे ती झाडे तशीच पडून राहिली आणि आपला पर्यावरण संतुलनाचा उद्देश यशस्वी होऊ शकला नाही. तेव्हा हा कार्यक्रम अतिशय बारकाईने आणि व्यवस्थितरीत्या राबविला गेला पाहिजे. किमान पावसाळयामध्ये रोपे पुरविली तर ती लावता येतील याची नोंद ग्रामविकास विभागाने घ्यावी. तेव्हा या पर्यावरणाच्या बाबतीत मागील वर्षाप्रमाणे स्थिती निर्माण होणार नाही अशा रीतीने चांगल्या पध्दतीने कार्यक्रम राबवावा एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय सन 2011-2012च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पान क्रमांक 80 वरील बाब क्रमांक 96मध्ये नागरी क्षेत्रातील रुग्णालयांच्या बांधकामावरील खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आपण रुग्णालये, रस्ते बांधत आहोत. परंतु मुंबई-गोवा मार्गाच्या रुंदीकरणाचा अनेक वर्षापासूनचा प्रलंबित असलेला प्रस्ताव कधी मार्गी लागणार आहे ? येणा-या गौरी-गणपतीच्या सणासाठी लाखो चाकरमाणी मुंबईहून कोकणामध्ये जातात.

...नंतर श्री. खर्चे...

अधोरीत पत्र / परिशिष्टासाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

त्यांना जवळजवळ 10-12 तास प्रवास करावा लागणार आहे, कारण रस्त्यात मोठ्या प्रमाणात खड्डे व नाले असल्याने अपघाताचे प्रमाण जास्त आहे. अशा ठिकाणी अपघात झाल्यानंतर तात्काळ मदत सुध्दा उपलब्ध होत नाही अशी परिस्थिती आहे. यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मार्फत वरखळ नाक्याजवळ एक ट्रॉमा केअर सेंटरचा प्रस्ताव तयार करुन त्याला शासनाने मंजुरी द्यावी व असे सेंटर ताबडतोब सुरु करावे.

बाब क्र. 65, पृ.क्र. 45-शालेय शिक्षण विभागाच्या अनुषंगाने मी एक बाब शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे की, पूर्व माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळावी म्हणून निधीची मागणी केली आहे. शासनाने ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु केलेली आहे पण त्यात प्रक्रियेत अजून अनेक कच्चे दुवे आहेत, ते ताबडतोब दुरुस्त करावेत अशी माझी मागणी आहे. कारण याविषयावर सभागृहात बरीच चर्चा झालेली आहे आणि नेहमी होत असते. तसेच 15 ऑगस्ट या स्वातंत्र्य दिनी ध्वजवंदन करण्याबाबत सुध्दा अनेक वेळा चर्चा झालेली आहे. 15 ऑगस्ट रोजी अनेक शाळा ध्वजवंदन करीत नाहीत, त्यात सीबीएसई व आयसीएसई सारख्या शाळांचे प्रमाण जास्त आहे. ही बाब माजी शिक्षण मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या लक्षात आणून दिली होती. या शाळा ध्वजवंदनाचा कार्यक्रम 14 ऑगस्ट रोजीच उरकून घेतात आणि 15 ऑगस्ट रोजी संपूर्ण सुटी देतात. असे प्रकार यापुढे राज्यासह मुंबईत सुध्दा होणार नाहीत, याची काळजी घ्यावी. प्रत्येक शाळेत कंपल्सरी ध्वज वंदनाचा कार्यक्रम होईल व त्याचा रिपोर्ट शासनाकडे येईल अशा रितीने व्यवस्था करावी अशी मागणी प्रा.वसंतराव पुरके शिक्षण मंत्री असतानाच्या काळात केली होती, पण त्याची अंमलबजावणी अद्यापही होत नाही, याचा खुलासा होणे गरजेचे आहे. तसेच शाळांच्या बसचा प्रश्न सुध्दा आता मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला आहे. मुलांना शाळेत घेऊन जाण्यासाठी ज्या शाळांच्या बसेस असतात त्या रस्त्यावर कोठेही पार्किंग केल्या जातात. विशेष करुन मोठ्या शाळा असतात, त्यात सांताक्रूझ, पेडर रोड किंवा अंधेरी, बोरिवली तसेच पूर्व उपनगरातील शाळा असतील या शाळांच्या बसेसमुळे वाहतुकीचा प्रश्न निर्माण होत आहे. या बसेसचे चालक रस्त्यात डबल पार्किंग करुन दिवसभर बसेस उभ्या करतात त्यामुळे वाहतुकीचा खोळंबा होतो. माझी मागणी आहे की, ज्या शाळांची अशा बसेसची योजना असेल त्यांनी स्वत:चे पार्किंग तयार करावे व यासंदर्भात चर्चा करुन आवश्यक तोडगा काढावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाब क्र. 119, पृ.क्र.249-सार्वजनिक आरोग्य विभागासंबंधी मला बोलावयाचे आहे. या विभागात अनेक पदे रिक्त आहेत. मंत्री महोदय गेल्या तीन वर्षांपासून सभागृहात सांगत आहेत की, सार्वजनिक आरोग्य विभागातील 100 टक्के पदे भरण्यात येतील. पण आजही हजारो पदे रिक्त आहेत. अनेक डायरेक्टर्सकडे अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे, यासंदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. मलेरिया या रोगाचे नियंत्रण करण्यासाठी मुंबईसाठी केंद्राकडून व्हेक्टर बोर्न्ड डिसीज या हेडखाली जो निधी येतो तो दोन वर्षांपासून आलेला नाही. मागील वर्षी यापैकी फक्त 20 कोटी रुपये मिळाले होते. सन 2008-09 मध्ये 200 कोटीपर्यंतची रक्कम प्रस्तावित होती पण आलेला निधी खर्च न केल्यामुळे केंद्राकडून येणारा निधी कमी होत गेला. या वर्षी या रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी किती निधी आला याची माहिती सदनात दिली पाहिजे. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात लेप्टोस्पायरेसिस हा आजार गेल्या 12 वर्षांपासून येत आहे, त्यात अनेक रुग्ण मृत्युमुखी पडतात. आपल्याकडे प्लेटलेट्स आणि ब्लड सेल्स काऊंट मशिनची मागणी मागील वर्षी केली होती, यावर्षी या रोगावर नियंत्रण आणण्यासाठी अनेक उपाय योजना करणार असल्याचे सांगण्यात आले. पण अशा प्रकारे ब्लड सेल्स काऊंट मशिन सिंधुदुर्ग जिल्ह्यात दिली आहे काय याचाही खुलासा करावा. मला हिवाळी अधिवेशनाच्या काळात आपल्या आरोग्य विभागाच्या संचालकांचे पत्र मिळाले. त्यात त्यांनी असे म्हटले की, 15 दिवसात ही ब्लड सेल्स काऊंट मशिन सिंधुदुर्ग जिल्ह्यात देण्यात येईल, ती मशिन प्रत्यक्षात दिली की नाही, याची माहिती सदनात दिली पाहिजे.

बाब क्र. 243, पृ.क्र.292-महिला व बालविकास विभागाच्या संदर्भात मला असे निदर्शनास आणावयाचे आहे की, बाल सुधार गृहातील 70 ते 75 हजार विद्यार्थ्यांचे भवितव्य आज धोक्यात येण्याची शक्यता आहे. कारण या बाल सुधार गृहाचे अनुदान शासनाकडे थकित आहे, अनेक वर्षांपासून या बाल सुधार गृहांना अनुदान मिळालेले नाही त्यामुळे या मुलांना कोणत्याही सोई-सवलती देता येत नाहीत, हे अनुदान कधीपर्यंत देण्यात येणार आहे, याचा खुलासा झाला पाहिजे.

बाब क्र. 283, प्र.क्र. 232, मुंबई विद्यापीठाच्या कलिना येथे रोजगार केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. त्या केंद्रामार्फत युवकांना पदवीनंतर रोजगार उपलब्ध करुन दिला जातो. तो विभाग देखील 6 महिन्यांपासून बंद आहे. अशा प्रकारच्या बातम्या देखील अनेक वर्तमान

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

पत्रातून आल्या आहेत. ज्याप्रमाणे इंजिनियरिंग सारख्या शाखांमध्ये असे रोजगार केंद्र असते त्याप्रमाणे हे केंद्र कधी चालू होणार आहे याचाही खुलासा झाला पाहिजे.

बाब क्र. 262, पृ.क्र. 222, पर्यावरणाच्या संदर्भात मी बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मध्यंतरीच्या काळात पर्यावरणाचे संशोधन करणाऱ्या एका कंपनीने असा रिपोर्ट दिला होता की, मुंबईतील चेंबूर भागात लोहाचे प्रमाण जास्त असल्याने त्या भागातील लोकांमध्ये फुप्फुस आणि श्वसनाचे आजार बळावत आहेत. यासंदर्भात नेमकी काय परिस्थिती आहे याची माहिती उत्तरातून मिळाली पाहिजे, किंवा लेखी उत्तराच्या माध्यमातून दिली तरी चालेल, जेणेकरुन या भागातील लोकांना दिलासा मिळेल. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

....4...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेत असताना मी असे निदर्शनास आणून देणार आहे की, बाब क्र. 46, पृ.क्र. 36 कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकासासाठी राष्ट्रीय दुग्धविकास महामंडळाने दिलेल्या कर्जाला राज्य शासनाने हमी दिली होती. त्याची परतफेड न केल्याने 9 कोटीचा भुर्दंड शासनाला भरावा लागला त्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. यासंदर्भात कर्जाला हमी देताना कोणत्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे ही बाब आर्थिक शिस्त लावताना लक्षात घेणे आवश्यक आहे व पुढील काळात याबाबतचा विचार करावा लागेल.

कृषी विभागातील बाब क्र. 47, च्या संदर्भात "क" व "ड" वर्गीय सेवा भरती करण्यासाठी 30 कोटी त्या त्या वेळी नियोजनात व बजेटमध्ये येणे आवश्यक हेाते. तसे झाले असते तर बहुधा 52 कोटीचा सरप्लस अर्थसंकल्प सादर करण्याचा आग्रह मंत्री महोदयांनी धरला नसता. कारण त्यानंतर पुरणी मागण्यांमध्ये हा खर्च आणून मंजूर करुन घ्यावयाचा व बजेट सरप्लस दाखवावयाचे हे योग्य नाही. सन 2007 मध्ये पशु गणनेची देयके भागविण्यासाठी 43.95 लाखाची तरतूद केली आहे. ही योजना 100 टक्के केंद्रपुरस्कृत असली तरी चार वर्षे देयके न देण्याचे कारण काय आहे, याची माहिती मिळाली पाहिजे. जी योजना केंद्र पुरस्कृत असेल त्याचा सर्व पैसा केंद्राकडून आपल्याला मिळत्तो. तरी देखील आपल्याला ही रक्कम देण्याचे कारण काय याची माहिती मंत्री महोदयांनी सुध्दा घ्यावी.

शालेय शिक्षण विभागाच्या संदर्भात केंद्र शासनाने मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा राज्यांमध्ये लागू केला. त्याला सव्वा वर्षे झाले पण त्याची नियमावली अद्यापही आपल्या राज्याने तयार केली नाही. जर यापुढे अशी नियमावली तयार केली नाही तर केंद्रात या कायद्याची जी नियमावली आहे तीच आपल्याला सुध्दा लागू होऊ शकते. यासंदर्भात मी एक अशासकीय विधेयक आणलेले आहे, त्यावेळेस विस्ताराने बोलता येईल. पण राज्य शासन कायद्याची अंमलबजावणी करण्यात किती बेफिकिर आहे व त्यामुळेच राज्यात 35 हजार शिक्षण सेवकांच्या भरतीची फाईल अद्यापही वित्त विभागाकडे पडून आहे. ती फाईल जर निघाली असती तर या पुरवणी मागण्यांमध्ये अजून वाढ झाली असती.

महोदय, कु. प्राजक्ता सावंत नावाच्या विद्यार्थीनीने आपल्या देशाला जागतिक स्पर्धेत मेडल मिळवून दिलेले आहे. अशा बॅडमिंटन पटू विद्यार्थीनीला वेगवेगळे प्रशिक्षण व स्पर्धेसाठी शहराच्या

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

बाहेर जावे लागते. त्यामुळे कॉलेजमध्ये परीक्षेला तिला बसता आले नाही. मग तिने बाहेरुन परीक्षा देण्याचा निर्णय घेतला पण बाहेरुन परीक्षा दिल्यामुळे कॉलेजमधील 15 मार्कांची ग्रेस तिला लागू होत नाही. माझी माननीय शिक्षण मंत्र्यांकडे अशी मागणी आहे की, ज्या खेळाडूंनी अशा प्रकारचे मेडल देशाला मिळवून दिले त्यांच्या विशिष्ट परिस्थितीचा विचार करावा. यासंदर्भात तीन चार महिने पाठपुरावा केल्यानंतर मान्यता मिळाली पण त्यासाठी शिक्षण विभागाला खास अधिकार वापरावे लागले आणि हा विषय ज्यावेळेस बोर्डाच्या अधिकाऱ्यांशी मी चर्चेला आणला .....

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

यानंतर श्री. जुन्नरे .....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

त्यावेळेस बोर्डाचे अधिकारी म्हणतात की, सावंत यांचेच काय आम्ही तर सचिन तेंडुलकरला सुध्दा दिले नव्हते. परंतु आता सचिन तेंडूलकर यांना डॉक्टरेट पदवी देण्याच्या मागे हे सर्व लागलेले आहेत. अशा प्रकारे डोकें वापरुन काम करावे की, पुस्तकातील शब्द पाहून काम करण्याच्या संदर्भात शिक्षण विभागाने निकष ठरविण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, महिला व बालकल्याण विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी पनवेलच्या मेंटली रिटायर्ड चाईल्ड मुलींवर झालेल्या बलात्काराच्या संदर्भात विचार मांडलेले आहेत. या विषयाच्या संदर्भात सभागृहात चर्चा देखील झालेली आहे. ख-या अर्थाने सावित्रीबाई फुले आणि महर्षी धोंडो केशव कर्वेंच्या महाराष्ट्रात लाज वाटेल अशा प्रकारची घटना घडलेली आहे. या विषयात गृह विभागाने तपास केल्यानंतर महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी दोषी आहेत, असे आढळून आले. केवळ संस्थेला मान्यता देणा-या अधिका-यांना दोषी धरता कामा नये. अशा प्रकारची जी प्रकरणे वाढत आहेत त्यासाठी महिला व बालकल्याण विभागाला ॲडमिनिस्ट्रेटीव्ह रिफॉर्म्सची जास्त आवश्यकता आहे. पाच जणांची चाईल्ड वेल्फेअर कमिटी संपूर्ण ठाणे जिल्हा सांभाळूच शकत नाही. या कमिटीच्या मेंबर्सना एका बैठकीसाठी 100 रुपये मिळायचे परंतु प्रत्यक्ष जाण्या-येण्याचा खर्च 250 रुपये होतो, त्यामुळे ही चाईल्ड वेल्फेअर कमिटी भेटीच देत नव्हती. आपल्याला जर चांगली माणसे हवी असतील, चांगल्या एनजीओज हव्या असतील तर त्या पध्दतीने विचार करण्याची गरज आहे. तसेच यापूर्वी कोणत्या संस्थांना परवानग्या दिल्या आहेत अशा संस्थांची कामे तपासण्याची आवश्यकता आहे. पनवेलच्या प्रकरणात कोर्टाच्या सांगण्यावरुन समितीने त्या ठिकाणी भेट दिल्यामुळेच हे प्रकरण उघडकीस आले होते. समिती समोर तेथील एका मुलीने परफॉर्मन्स केल्यामुळेच हे प्रकरण उघडकीस आले. अशा प्रकारे माझी विनंती आहे की, चाईल्ड वेल्फेअर कमिटीच्या निमित्ताने ॲडमिनिस्ट्रेटीव्ह रिफॉर्म्स करण्याची गरज आहे, असे ॲडमिनिस्ट्रेटीव्ह रिफॉर्म्स आपण करणार आहात काय ?

सभापती महोदय, दिवसेंदिवस पर्यावरणाचे महत्व वाढत चालले आहे. पाणी प्रदूषण नियंत्रण हा फार महत्वाचा मुद्दा आहे. महानगरपालिका व नगरपालिका पाणी प्रदुषणाच्या संदर्भात बेफिकीर आहेत. या स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पैसा नसल्यामुळे त्या कामे करीत नाहीत. प्रदूषण

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

खात्याकडे यासंदर्भात पैसा आहे काय हा महत्वाचा भाग आहे. पर्यावरण मंत्रालयाचे मॉनिटरींग वाढले आहे त्यामुळे पर्यावरण खात्याला सुध्दा ॲडमिनिस्ट्रेटीव्ह रिफॉर्म्सची गरज आहे. पर्यावरणाच्या वाढत्या महत्वामुळे त्यात असलेल्या केवळ 35 अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जीवावर हे खाते चालू शकणार नाही. त्यामुळे प्रदूषण खात्याची पुर्नबांधणी करण्याची गरज आहे याबाबत शासनाने काही विचार केलेला आहे काय ? येत्या काळात पर्यावरणाचा विषय वाढत जाणारा आहे. पर्यावरण खाते त्यांची जबाबदारी पार पाडण्याच्या पलीकडील असल्यामुळेच पळवाटा निघतात व त्यामुळे जनतेच्या जीविताच्या संदर्भातील अपायकारक गोष्टी घडत जातात. त्यामुळे पर्यावरण विभागाच्या संदर्भात चांगले काम व्हावे अशी अपेक्षा आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी अगदी थोडक्या शब्दात माझे मनोगत व्यक्त करणार आहे. बाब क्रमांक 65,66 शालेय शिक्षण विभागाच्या मागण्यांच्या संदर्भात मी अशी सूचना करणार आहे की, शिष्यवृत्तीसाठी 8,35,78,000 रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. किती विद्यार्थ्यांना राज्यामध्ये शिष्यवृत्ती द्यावयाची आहे, याबाबतची संच मान्यता यापूर्वीच झालेली आहे. विद्यार्थी संख्या निश्चित असतांना 8,35,78,000 रुपयांची पुरवणी मागणी करावी लागते याचा अर्थ योग्य पध्दतीने नियोजन झालेले नाही असा होतो. शालेय शिक्षण विभागाच्या बाबतीत 4 मार्च 2011 रोजी बिगर आदिवासी क्षेत्रातील 61 वर्ग तुकडयांना व आदिवासी क्षेत्रातील एक वर्ग तुकडी अनुदानास पात्र झालेली असल्याचा शासनाने आदेश काढला होता त्यासाठी या पुरवणी मागण्यांमध्ये अनुदानाची तरतूद केली जाईल, असे वाटले होते परंतु पुरवणी मागण्यांमध्ये यासंदर्भात तरतूद झालेली नाही. खरे म्हणजे सन 2010-11 पासून त्यांना अनुदान द्यावयाचे होते परंतु सन 2011-12 सुरु झालेले असतांना देखील अनुदान मिळालेले नाही. शासन निर्णय 30.10.2010 प्राथमिक विभागातील 123 तुकडया आणि 35 शाळांना अनुदानास पात्र आहेत असा शासनाने आदेश काढला होता. बजेटमध्ये सुध्दा यासंदर्भात तरतूद करण्यात आली नव्हती त्यामुळे त्यासंदर्भातील तरतूद पुरवणी मागण्यांमध्ये होईल, असे वाटले होते परंतु पुरवणी मागण्यांमध्ये सुध्दा ही तरतूद करण्यात आलेली नाही. 2.5.2011 नुसार 73 वर्ग तुकडयांना पात्र ठरविण्यात आले होते परंतु त्यासंदर्भातील तरतूदही पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात आलेली नाही. शालेय शिक्षण विभागातील अनेक प्रश्न वेगवेगळया आयुधाचा उपयोग करुन सभागृहात मांडतो. वर्षानुवर्षे ते प्रश्न प्रलंबित आहेत. मग वेतनेतर अनुदानचा, शिक्षण सेवकांच्या मानधनाचा, अर्धवेळ ग्रंथपालांचा, शिक्षकांच्या आकृतींबधाचा,ज्युनियर कॉलेजच्या शिक्षकांच्या वेतनातील तफावत, पायाभूतपेक्षा वाढीव पदांचा,आश्वासीत प्रगती योजना, मूल्यांकनाचे निकष अशा किती तरी प्रश्नाच्या संदर्भात आम्ही वर्षानुवर्षे मागणी करीत आहोत परंतु त्यासंदर्भात कोणताही निर्णय झालेला नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 67,68, पृष्ठ क्रमांक 46 वरील क्रीडा विभागावर माझे विचार व्यक्त करणार आहे. आर्टीस्टीक जिमनॅस्टीक या क्रीडा पुरस्कारासाठी शिव छत्रपती पुरस्कार दिला जातो. जिम्नॅस्टीक क्रीडा प्रकार हा सर्व क्रीडा प्रकारांचा मूळ गाभा आहे असतांना जिम्नॅस्टीकल क्रीडा प्रकाराला शिवछत्रपती पुरस्कारामधून वगळण्यात आलेले आहे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

यासंदर्भात आम्ही मंत्रीमहोदयांची भेट घेतली होती. या क्रीडा प्रकाराला आम्ही छत्रपती पुरस्कार देणार आहोत असे मंत्री महोदयांचे लेखी पत्र माझ्याकडे आहे. परंतु आता जे पुरस्कार जाहीर इ ाालेले आहेत त्यातून आर्टिस्टीक जिम्नॅस्टीकला वगळण्यात आलेले आहे. त्यामुळे यासंदर्भात विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी उल्लेख केला आहे की, राज्यस्तरावर, आंतरराष्ट्रीय स्तरावर जे विद्यार्थी प्रतिनिधीत्व करतात अशा 10 वी 12 वी च्या विद्यार्थ्यांना 25 गुण ग्रेस मार्क म्हणून दिले जातात. मंत्रीमहोदयांना आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची तळमळ आहे. राज्यस्तरावर आश्रम शाळेच्या स्पर्धा या कोणत्याही संघटनेने घेतल्या नव्हत्या परंतु आश्रमशाळामध्ये राज्यस्तरावर स्पर्धा झाल्या व त्यामध्ये ज्या विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रातील गुणवत्ता सिध्द केली त्यांना मांत्र 25 गुणांचा लाभ आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना मिळालेली नाही. वारंवार पत्रव्यवहार करुनही त्या पत्राचे उत्तर सुध्दा आम्हाला मिळालेले नाही. माझी क्रीडा मंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी या प्रश्नामध्ये लक्ष घालावे व आदिवासी विद्यार्थ्यांना 25 गुण मिळवून देण्याची कार्यवाही करावी,

सभापती महोदय, अनेक क्षेत्रामध्ये सहावा वेतन आयोग लागू झालेला आहे. बीपीएड महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात येईल असे मंत्रीमहोदयांनी आश्वासन दिले होते त्याचीही अद्यापपर्यंत पुर्तता झाली नाही.

सभापती महोदय, अल्पसंख्यांक विभागाकडून अल्पसंख्यांक संस्थांना आर्टीकल 30 खाली दर्जा प्रदान केला जात असतो. धार्मिक अल्पसंख्यांक किंवा भाषिक अल्पसंख्यांकांना शासनाकडून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या संदर्भात सवलत मिळत असते. या नावाखाली आपला धर्म बदलून आम्ही अल्पसंख्याक आहोत असे सांगून शासनाचे फायदे घेण्याचा प्रयत्न सुरु केलेला आहे. कल्याण मधील एका शाळेचे नाव "ललिता" होते परंतु त्यांनी शाळेचे नाव "लिली" केलेले आहे. आम्ही आता ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यामुळे आमची संस्था धार्मिक अल्पसंख्याकामध्ये आलेली आहे असे सांगून डी.एड,बी.एड.कॉलेज, शाळा इंजिनिअरींग कॉलेजचे फायदे या संस्था घेत आहेत त्यामुळे अल्पसंख्यांक विभागाने पडताळणी करुन प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता आहे.

....5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

सभापती महोदय, मराठी माध्यमांच्या शाळा बंद पडत आहेत. अंगणवाडया कोणत्या विभागाकडे आहेत हे माहिती नाही परंतु त्या शालेय शिक्षण विभागाकडे येणे अपेक्षित आहे. मराठी माध्मांचा पाया अंगणवाडया व बालवाडया आहेत त्यामुळे शासनाने अंगणवाडयांचा कारभार शालेय शिक्षण विभागाच्या अंतर्गत आणण्याची आवश्यकता आहे एवढे मी या निमित्ताने मी सांगू इच्छितो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकात पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक45, बाब क्रमांक 66, क्रीडा विभागाच्या संदर्भात माझे विचार मांडणार आहे. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ज्यांनी पदके मिळविली आहेत त्यांच्यासाठी व प्रामुख्याने भारतीय क्रीकेट टीमने विश्वचषक जिंकल्यामुळे सचिन तेंडुलकर व जाहीर खान यांच्यासाठी 13 कोटी तरतूद करण्यात आलेली आहे हे एका अर्थाने आपल्या महाराष्ट्रातील खेळाडूंना प्रोत्साहन देणारे आहे. परंतु महाराष्ट्राची खरी ओळख ही योगा आणि मल्लखांबमुळे आहे. हे दोन खेळ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत नाहीत. महाराष्ट्राच्या क्रीडा खात्याने यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सभागृहाची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत आहे. परंतु, सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय गट नेते श्री.दिवाकर रावते यांच्या बरोबर माझ्या दालनात चर्चा झाली. त्याप्रमाणे आजची दोन बिले मंजूर होई पर्यत आणि त्यानंतर अर्धा तास चर्चा होई पर्यंत सभागृहाच्या कामकाजाची वेळ मी वाढवत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपल्या दालनात चर्चा झाली. पुरवणी मागण्या पूर्ण करून माननीय मंत्र्यांचे उत्तर होई पर्यंत सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढवायची असे ठरले होते. वाटले तर उद्या आम्ही दोन्ही बिले मंजूर करून देतो. या बैठकीला सेक्रेटरी देखील उपस्थित होते.

सभापती : माझ्या दालनात स्पष्ट चर्चा झाली. माझ्या कार्यालयात एखादा टेपरेकॉर्डर आणून ठेवला तर मी जे काही बोललो, आपण काय बोललात हे समजेल व सदनाला देखील अचूक माहिती उपलब्ध होईल. आपली जी चर्चा झाली त्यात असे ठरले की, आजच्या पुरवण्या मागण्या उत्तरासहित आज पूर्ण कराव्या व त्यानंतर दोन बिले मंजूर करावी. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये अर्धा तास चर्चा दर्शविण्यात आल्या आहेत. या चर्चा आज आपण घेतल्या नाही तर त्या पुन्हा कधीच होणार नाही. म्हणून सभापती या नात्याने मी हा प्रस्ताव ठेवला आहे व आपणा सर्वांच्या संमतीने या पद्धतीने आपल्याला काम करावयाचे आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, पहिल्या दिवशी आपणच नियम समितीमध्ये जो निर्णय झाला होता तो आम्हाला सांगितला. आपणच आम्हाला सांगितले की, सकाळी 11.00 ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंतच कामकाज घ्यायचे. हा नियम आपणच आम्हाला सांगितला. आपल्या दालनात काय झाले हे आम्हाला माहीत नाही. त्यांनी आमची परवानगी घेतली नाही. आम्हाला त्यांनी काहीही सांगितलेले नाही. आमचे सगळे अधिकार त्यांना दिलेले नाहीत.

सभापती : संसदीय लोकशाहीमध्ये ते द्यावेच लागतात.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : गतनेता म्हणून त्यांना जसा अधिकार आहे त्याप्रमाणे आम्हाला सांगणे कल्पना देणे ही देखील त्यांची जबाबदारी आहे. नियमाप्रमाणे सकाळी 11.00 ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत कामकाजाची वेळ ठरलेली आहे. अजून माननीय मंत्र्यांची उत्तरे व्हायची आहेत. यातच एक तास जाईल. म्हणजे आपल्याला येथेच दहा वाजतील. कारण आपल्याला दोन बिले मंजूर करायची आहेत.

सभापती : दररोज सकाळी 11.00 ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज करावयाचे असे ठरले असले तरी आज अपवादात्मक परिस्थितीमध्ये पुरवणी मागण्यांवरील चर्चा व त्या वरील उत्तर पूर्ण होणे आवश्यक आहे. माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांनी माझ्या बरोबर, माझ्या दालनात जी चर्चा केली ती चर्चा गृहीत धरून आजची दोन्ही विधेयके मंजूर झाल्या नंतर अर्धा तास चर्चा होईल व त्या नंतर सभागृहाचे कामकाज संपेल असा माझा निर्णय आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आमची अपेक्षा अशी होती सायंकाळी 5.00, 5.30 वाजेपर्यंत ही चर्चा संपेल. ट्रेझरी बेंचकडून माननीय सदस्यांची नावे कमी करावी असे आम्ही सातत्याने सांगत होतो, विनंती करीत होतो. त्या मुळे आता कामकाज पूर्ण करण्याची जबाबदारी कोणाची आहे ?

सभापती : कामकाज पूर्ण करण्याची जबाबदारी दोघांची आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, दोन्ही बाजूंची जबाबदारी आहे हे मला देखील माहीत आहे. पण जास्त जबाबदारी सरकारची आहे.

सभापती : सरकारची जबाबदारी तर असतेच.

श्री.दिवाकर रावते : आम्ही सहकार्य करीत नाही काय ? आम्ही सहकार्य करीत असतो. सत्ताधारी पक्षातर्फे नियंत्रण करायला नको काय ? सत्ताधारी पक्षाचे प्रतोद उभे राहून सांगतात की, मी दिलेल्या नावाप्रमाणेच सन्माननीय सदस्यांना बोलण्यास अनुमती द्यावी. म्हणजे त्यांचे काहीच सहकार्य नाही असे आम्ही समजायचे काय ?

सभापती : नाही. त्यांचे आपल्याला सातत्याने सहकार्य असते आणि आपले देखील त्यांना सहकार्य असते. मी माझा निर्णय दिलेला आहे. त्या मुळे आता सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी आपल्या भाषणास सुरूवात करावी. ..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, क्रीडा विभागामध्ये आता ज्यांना बक्षिसे मिळतात त्यांना आपण रोख बक्षिसे देतो. तसेच किती तरी खेळाडू असे आहेत की, त्यांनी त्यांच्या काळामध्ये अशी पदके मिळविली आहेत. पण त्या काळामध्ये त्यांना रोख बक्षिसे देण्याची व्यवस्था नव्हती. कोल्हापूरच्या अर्जुन पुरस्कार विजेत्या श्रीमती शैलजा साळुंके असतील, पैलवान गणपतराव आंदळकर असतील, यांना त्या काळामध्ये अशा प्रकारची भरघोस बक्षिसे मिळालेली नाहीत. त्यामुळे अर्जुन पुरस्कार मिळालेले हे खेळाडू आज अतिशय दयनीय स्थितीमध्ये आहेत. ज्यांनी खूप कर्तृत्त्व गाजविले आहे, अशा महाराष्ट्रातील खेळाडूंना आपण काहीना काही पेन्शनच्या स्वरूपात मदत केली पाहिजे. असे तीन खेळाडू कोल्हापूरमध्ये आहेत. एक म्हणजे ऑलिंपिकमध्ये भाग घेतलेले श्री.राम सावंत, दुसरे म्हणजे अर्जुन पुरस्कार प्राप्त खेळाडू श्रीमती शैलजा सावंत व तिसरे म्हणजे श्री.गणपतराव आंदळकर या तिन्ही खेळाडूंना शासनाने मदत करावी अशी माझी विनंती आहे.

यानंतर मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यावर बोलणार आहे. कोल्हापूर-सांगली हा चौपदरी रस्ता झाला नाही तर अजून किती बळी जाणार आहेत हे सांगता येणार नाही. कोल्हापूर-सांगली हा चौपदरी रस्ता लवकरात लवकर करावा अशी मी विनंती करीत आहे.

यानंतर मी पान क्रमांक 292 वरील बाब क्रमांक 244 वर बोलणार आहे. देवदासींना निर्वाह अनुदान देण्याकरिता पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली आहे. देवदासी ह्या प्रामुख्याने सांगली, कोल्हापूर या भागामध्ये अधिक आहेत. त्या त्या जिल्ह्यामध्ये कोटा ठरवून दिलेला आहे. तो कसा ठरविला जातो हे मला कळत नाही. काही जिल्ह्यांमध्ये देवदासी आहेत. त्यांना अनुदान द्यावे लागेल. त्यामुळे एवढी संख्या झाल्यानंतर अनुदान मिळणार नाही ही जी कोटा पद्धती आहे ती बंद केली पाहिजे, असे मला वाटते.

ठाण्यातील मनोरूग्णालयासाठी तरतूद करण्यात आली आहे. ही चांगली बाब आहे. महाराष्ट्रात अनेक मनोरूग्णालये आहेत. त्यांच्यासाठी देखील भरीव आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे. माझ्या या 3-4 नेमक्या मागण्या मांडून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

... ..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंके (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, बाब क्र.235, पान क्र.283 वर मी बोलणार आहे. अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतनाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाचे थकबाकीचे प्रदान करण्यासाठी 17 कोटी रूपयांची तरतूद केल्याबद्दल धन्यवाद. पण याच बरोबर दोन तरतुदी राहून गेलेल्या आहेत एक म्हणजे राज्यातील शारीरिक शिक्षण महाविद्यालये आठ आहेत, त्यांच्यासाठी आर्थिक तरतूद अजून करण्यात आलेली नाही. तसेच सामाजिक शास्त्र महाविद्यालये 13 आहेत, त्यांच्यासाठी तरतूद करण्यात आलेली नाही. त्यांच्यासाठी देखील तरतूद करावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

यानंतर बाब क्र.232, पान क्र.282 वर मी बोलणार आहे. मुंबई विद्यापीठाच्या मरीन लाईन्स येथील क्रीडा संकुलासाठी कृत्रिम धावपट्टी निर्माण करण्यासाठी 3 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. हा विषय चांगला आहे. शिवाजी विद्यापीठाचा सुवर्ण महोत्सव सुरू आहे. शिवाजी विद्यापीठाचा विकास आराखडाही आपल्याकडे आलेला आहे. त्यासाठी मात्र तरतूद झालेली नाही. ती तरतूद केली जावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

यानंतर बाब क्र.240, पान क्रं.284 वर मी बोलणार आहे. केंद्र शासन पुरस्कृत योजनाबद्ध रोजगारभिमुख कौशल्य या योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून सन 2009-2010 व 2010 -2011 या दोन आर्थिक वर्षामध्ये एकूण 6 कोटी 14 लाख रूपये केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले आहेत. त्याची अंमलबजावणी उशिराने होत आहे. केंद्र शासनाचा निधी व योजना राज्य सरकारकडे भरपूर प्रमाणात येत आहेत. पण राज्य सरकार त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जेवढे संवेदनशील असावयास पाहिजे होते तेवढे राहिलेले नाही. ते राहणे आवश्यक आहे, याकडे मी शासनाचे लक्ष वेधतो.

यानंतर मी बाब क्रमांक 66,67,68 पान क्र.45 वर बोलणार आहे. या तीन बाबीतून खेळाडूंसाठी 22 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. मात्र शाळांतील खेळासाठी लागणाऱ्या साहित्यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेले नाही. यासाठी शासनाने तरतूद करावी अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

अधिकृत मत / मराठीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. बाब क्रमांक 46, पान क्र.36 दुग्धव्यवसाय यावर मी प्रथम बोलणार आहे. राज्य सरकारने बाजारातील दुधाच्या विक्रीचे दर एक रूपयाने वाढविले आहेत. त्याच बरोबर शेतकरी दूध उत्पादकांना मात्र कुठल्याही प्रकारची वाढ दिली नाही. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाने मजुरी वजा जाता दुधाचा काढलेला उत्पादन खर्च 19 रूपये 60 पैसे आहे. म्हणून मी येथे मागणी करतो की, दूध उत्पादक शेतकऱ्यांना 24 रूपये 70 पैसे भाव दिला गेला पाहिजे.

त्याच बरोबर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 90 पान क्रमाक 75 वर मी बोलणार आहे. महसूल विभागाच्या नवीन तहसील व प्रशासकीय इमारतींच्या बांधकामावरील खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. बीड जिल्हाधिकारी प्रशासकीय कार्यालयाच्या इमारतीचे काम दोन वर्षापासून काम सुरू आहे. सदर इमारतीचे 50 टक्क काम अपूर्ण आहे. सदर काम पूर्ण व्हावे अशी मी विनंती करतो.

बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ हे 12 ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. पर्यटन स्थळ म्हणून त्याचे मोठे नाव आहे.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

सभापती महोदय, मी मागील दोन्ही अधिवेशनामध्ये ज्योतिर्लिंगाच्या ठिकाणी पर्यटन क्षेत्र विकास निधी देण्याबाबत मागणी केली होती तो निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

सभापती महोदय, बाब क्र. 259 पृष्ठ क्र. 311 च्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, बीड जिल्हयातील धारुर येथील ऐतिहासिक किल्ल्याची भिंत खचली असून ती आता शेवटची घटका मोजत आहे. ही ऐतिहासिक वास्तू टिकविण्यासाठी विशेष निधी देण्यात यावा अशी पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मागणी करीत आहे. सभापती महोदय, बाब क्र. 765, पृष्ठ क्र. 45 च्या अनुषंगाने राज्यातील पूर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृती देण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. या संदर्भात सांगू इच्छितो की, इयत्ता 10 वीच्या बीजगणिताच्या पुस्तकातील पान क्र. 102, 103, 104 व 172 वर एका पत्त्याच्या कॅटमध्ये किती पत्ते असतात, त्यामध्ये एक्का किती, राजा किती व गुलामांची संख्या किती, पत्ते कशा रितीने पिसले जातात? यासंबंधीचा अभ्यासक्रम पूर्व प्राथमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांना शिकविला जातो. अशाप्रकारे शिक्षण विभागाने जुगाराचे शिक्षण देण्याचे काम माध्यमिक विभागाच्या शाळांमध्ये सुरु केले आहे. याबाबत कुठेतरी विचार करण्यात आला पाहिजे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्र. 201 व पृष्ठ क्र. 249 व 250 च्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, आशिया खंडामध्ये प्रसिध्द असलेल्या अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयातील सी.टी. स्कॅन बंद आहे. त्याचबरोबर कर्करोग उपचार केंद्रातील कोबाल्ट मशीनसाठी शासनाने 3 कोटी रुपये मंजूर केले होते, परंतु हे 3 कोटी रुपये एकाच दिवसात खर्च झाले पाहिजेत अशा पध्दतीचे आदेश शासनाकडून आले आहेत. एका दिवसात एवढे पैसे खर्च होऊ शकले नाहीत म्हणून ते परत गेले. त्यामुळे त्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाची अवस्था आहे तशीच आहे. आज सुध्दा तेथील नवीन मशीन बंद आहेत. तज्ज्ञ डॉक्टरांची भरती करण्यात न आल्यामुळे 41 पदे रिक्त आहेत. त्या निमित्ताने या रुग्णालयाकडे सुध्दा शासनाने विशेष लक्ष द्यावे अशी या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मागणी करतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र. 83 व पृष्ठ क्रमांक 65 च्या अनुषंगाने पुणे शहरातील सोमवार पेठ समर्थ, खडक, शिवाजी नगर,विश्रामवाडी, भवानी पेठ , स्वारगेट या पोलीस वसाहतीची अवस्था अतिशय वाईट झाली आहे. या पोलीस वसाहतीची आजची अवस्था पाहिली सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तिचे नूतनीकरण करणे अतिशय महत्वाचे आहे या करिता या विभागाने विचार करावा अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र. 91 व पृष्ठ क्र. 76 च्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, पुणे शहर चारही बाजूने वाढत चालले आहे. या करिता नवीन प्रादेशिक कार्यालय पुणे शहराच्या पूर्व आणि पश्चिम भागासाठी होणे अतिशय महत्वाचे आहे. त्या उपकेंद्राचे बांधकाम बावधन, बाणेर आणि हडपसर या भागामध्ये करण्याची अतिशय गरज आहे. त्याचबरोबर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्र. 203 व पृष्ठ क्र. 251 मध्ये करण्यात आलेल्या पुरवणी मागणीच्या अनुषंगाने असे सांगू इच्छितो की, पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये, औंध हॉस्पिटलमध्ये, महानगरपालिकेच्या दवाखान्यांमध्ये, कामगार रुग्णालयांमध्ये मोठया प्रमाणात श्वानदंश प्रतिबंधक लस उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी अशा प्रकारच्या दोन मागण्या करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने वेळेअभावी मी फक्त दोनच बाबीसंबंधी माझे विचार व्यक्त करणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्र. 64 व बाब क्र. 81 मध्ये वरळी, नायगाव, शिवडी, ना.म.जोशी मार्ग मुंबई येथील बी.डी.डी. चाळींच्या दुरुस्तीसाठी 5 कोटींची मागणी करण्यात आली आहे. गेली अनेक वर्षे या बी.डी.डी. चाळीच्या पुनर्विकासाचा प्रश्न लोंबकळत पडला आहे. या निमित्ताने शासनाला विनंती करावयाची आहे 100 वर्षे जुन्या असलेल्या इमारतींच्या दुरुस्तीवर आपण कोटयवधी रुपये खर्च करीत आहोत. तेव्हा त्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न सोडविण्याचा निर्णय तातडीने घेण्यात यावा.

सभापती महोदय,उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्र. 282 व बाब क्र. 233 मध्ये सर जे. जे.कला महाविद्यालयातील शिक्षकांना अतिरिक्त वेतन देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. मध्यंतरी मी स्वत: जे.जे. कला महाविद्यालयात गेलो होतो. त्या ठिकाणी मी पाहिले की, अनेक शिक्षक दहा ते बारा वर्षे टेंपररी स्वरुपात काम करीत आहेत. त्या महाविद्यालयामध्ये पुरेसे शिक्षक नाहीत अशी अवस्था आहे. हे शिक्षक अनेक वर्षापासून टेंपररी काम करीत असल्यामुळे त्यांना परमनंट करणे, किंवा वेगवेगळया कला क्षेत्रासाठी लागणारा शिक्षक वर्ग उपलब्ध करुन देणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने आणखी एक गोष्ट सभागृहाच्या लक्षात आणून देतो की, कॉलेज ऑफ आर्किटेक्चरची स्वतंत्र इमारत बांधण्याचे काम कलिना येथे सुरु असल्यामुळे जे.जे. कला महाविद्यालयाच्या परिसरामध्ये त्यांना तात्पुरत्या स्वरुपात जागा देण्यात आली होती. परंतु कलिना येथील इमारत बांधून पूर्ण झाल्यानंतर देखील हे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर जे.जे. कला महाविद्यालयाच्या जागेमधून त्यांच्या इमारतीमध्ये स्थलांतरीत होत नाही. जे.जे. कला महाविद्यालयाला जगामध्ये फार महत्वाचे स्थान आहे. भारतीय कलेबद्दल जगामध्ये खूप आदर आहे. एम.एफ.हुसेन यांच्यासारख्या चित्रकाराने जगात नाव कमाविले आहे. याकडे शासनाने जास्तीत जास्त लक्ष देऊन जे.जे कला महाविद्यालयाचा संपूर्ण कॅम्पस डेव्हलप करण्यात यावा अशी मी शासनाला सूचना करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, क्रीडा व युवक सेवा विभागाच्या पृष्ठ क्र 45 व बाब क्र. 66 वरील पुरवणी मागणीच्या अनुषंगाने विश्वचषक जिंकणाऱ्या महाराष्ट्रातील खेळाडूंसाठी भरीव तरतूद केल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. त्याचप्रमाणे तालुका क्रीडा संकुलासाठी निधीची घोषणा करण्यात आली आहे. परंतु फक्त भौतिक सुविधा देऊन चालणार नाही तर प्रत्येक तालुक्यामध्ये बी.पी.एड. झालेले शिक्षक देण्यापेक्षा खेळाडूंना प्रशिक्षक म्हणून नेमले पाहिजे अशी मागणी करतो.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्र. 283 व बाब क्र. 237 मध्ये शासकीय तंत्र निकेतन व संलग्न संस्थांमधील अधिव्याख्यात्यांना मानधन देण्याची तरतूद करण्यात आली आहे. या निमित्ताने सन 2001 पूर्वीच्या अनुदानीत महाविद्यालयातील विना अनुदान तत्वावरील इलेक्ट्रॉनिक, कॉम्प्युटर एज्युकेशनच्या पदांना अनुदान मंजूर करण्यात यावे अशी आग्रहाची विनंती मी करीत आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

अप्रधारित प्रत / परिषदेपुरती नाही

श्री. उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, क्रीडा व युवक सेवा विभागाच्या पृष्ठ क्र. 45 वरील बाब क्र. 66, 67 च्या बाबतीत मी सरकारचे अभिनंदन करतो. आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये सचिन तेंडुलकर, झहीर खान इत्यादी खेळाडूंनी नैपुण्य गाजविल्याबद्दल आपण त्यांना पुरस्कार देत आहोत. हे करीत असतांना काही खेळाडूंच्या बाबतीत दिरंगाई होत आहे. यामध्ये तेजस्विनी सावंत असेल, विरधवल खाडे असतील, सय्यद असतील अशा सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याचबरोबर क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंच्या निवासस्थानांकरिता आपण तरतूद केली आहे. मला या ठिकाणी अत्यंत नम्रपणे सांगितले पाहिजे की, कोणत्याही खेळाचा व्देष म्हणून नव्हे तर सरकारचे, खेळांचे, प्रेक्षकांचे आणि सर्वांचे लक्ष फक्त क्रिकेटभोवती केंद्रित झाले आहे. क्रिकेट हा उत्तम खेळ आहे, त्यामध्ये आपल्या देशाचे खेळाडू उत्तम नैपुण्य गाजवीत आहेत याबद्दल शंका नाही. परंतु महाराष्ट्रातील जे मर्दानी खेळ आहेत, त्यामध्ये कुस्ती, कबड्डी, मल्लखांब असे स्पर्धा गाजविणारे खेळ आहेत. एक काळ असा होता की, स्वर्गीय मारुती माने यांनी एकाच वेळी आशियाई सुवर्ण पदक, ब्रॉंझ पदक अशी अनेक पदके मिळविली होती. अशाप्रकारची पदके मिळविण्यामध्ये बुवा भोमे यांच्यासारखी नामवंत पहिलवान मंडळी होती.

सभापती महोदय, आपण त्या भागातील आहात. सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड तालुक्यामधील लक्ष्मण वऱ्हाड, मारुती वऱ्हाड या दगड फोडणाऱ्या बंधूनी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेमध्ये दोन वेळा सुवर्ण पदके मिळविली. आज आपण केवळ घोषणा करतो, परंतु या खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद करीत नाही. आज कबड्डी सारख्या खेळांना पुरस्कर्ते मिळत नाहीत. मुंबई, महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी कबड्डीच्या स्पर्धा आयोजित केल्या जात होत्या परंतु प्रायोजक मिळत नसल्यामुळे या स्पर्धा आयोजित करणे अशक्य झाले आहे. कै. बुवा साळवी यांच्यासाठी शासनामध्ये एक पद निर्माण करण्यात आले, व त्याला शासनाची मान्यता मिळाली. या मर्दानी खेळाला प्रोत्साहन कसे मिळेल यासाठी शासनाने आर्थिक तरतूद केली पाहिजे. रुस्तम ए हिद हरिश्चंद्र बिराजदार हे आज दुर्दैवाने खूप आजारी आहेत. तरीसुध्दा ते गोकुळ वस्ताद तालीम,पुणे येथे आंतरराष्ट्रीय पातळीवरील कुस्तीगीर तरुण मुले फार मेहनतीने तयार करीत आहेत. त्यांना देखील शासनाच्या क्रीडा खात्यामध्ये एक पद निर्माण करुन त्यांना योग्य ते मानधन देण्यासाठी खूप खटपट व प्रयत्न करावे लागले.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

श्री.उल्हास पवार . . . .

आज त्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. श्री.गणपत आंदळकर असतील किंवा श्रीपती खंजनाळे असतील, दिनकर दहिहरे असतील, अण्णासाहेब पाडोळेकर असतील, ॲग्लो निग्रो पांडू सुतार अशी कितीतरी नावे घेता येतील की ज्यांनी महाराष्ट्राचे नाव राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अशा जागतिक स्पर्धेमध्ये गाजविले. पण आज कुस्ती, खो-खो किंवा कबड्डी या मर्दानी खेळांकडे अधिक गांभीर्याने लक्ष देऊन त्याकरता अधिक तरतूद, अधिक प्रोत्साहन मिळण्यासाठी जो प्रयत्न केला पाहिजे, तसा दुर्दैवाने प्रयत्न होत नाही.

सभापती महोदय, पुण्यामध्ये स्व.मामासाहेब मोहोळ यांच्या नावाने एक कुस्ती केंद्र आहे.गोकूळ पेठ येथील माझ्या घरापासून जवळच रुस्तमहिंद हरिशचंद्र बिराजदार हे गोकुळपास्ता तालीम केंद्र चालवित आहेत. आमचे काका पवार अर्जूनवीर अवॉर्ड विजेते यांनी धंतोली येथे एक केंद्र सुरु केले आहे पण त्याठिकाणी जाणारे रस्ते चांगले नाहीत. तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. त्यांना निवासस्थान नाही.गोकुळपास्ता तालमीमध्ये 100-100 मुले कोणत्या तरी एका खोलीमध्ये रहात आहेत. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा गाजविणाऱ्या मुलांना तेथे प्रोत्साहन मिळत आहे आणि श्री.बिराजदार यांच्यासारखे उत्तम प्रशिक्षक तेथे काम करीत आहेत. पण आपले या सर्व गोष्टींकडे जेवढे गांभीर्याने लक्ष असावयास पाहिजे, पण दुर्दैवाने तेवढे दिले जात नाही हे अत्यंत विनम्रपणे शासनाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. म्हणून भारतीय आणि मर्दानी खेळांना प्रोत्साहन मिळावे यासाठी आर्थिक तरतूद कराच करा पण कै.बुवा साळवी किंवा श्री.बिराजदार यांना जशी पदे निर्माण करुन दिली,त्याप्रमाणे यांचे प्रमोशन करावयाचे असेल तर त्याबाबत विचार करावा.पंजाबमध्ये एखाद्याने खेळामध्ये पदे मिळविल्यानंतर ताबडतोब डी.वाय. एस.पी.सारख्या पदावर नेमणूक करतात. पण आपल्या राज्यामध्ये मात्र याबाबतीत अत्यंत किचकट दिरंगाई केली जाते आणि दुर्दैवाने अशा लोकांचा सन्मान होत नाही. खरे म्हणजे या लोकांचा सर्व अर्थाने सन्मान व्हावयास पाहिजे. जर हे खेळाडू प्रशासकीय सेवेमध्ये असतील तर त्यांना चांगल्या पदावर प्रमोशन मिळाले पाहिजे. बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये माननीय श्री.वसंतराव पाडगावकर हे प्रमुख असताना ज्यांना छत्रपती अवॉर्ड मिळाले,त्यांना त्यांनी दुसऱ्या दिवशी प्रमोशन दिलेले आहे. त्याच प्रमाणे ज्यांना अर्जून अवॉर्ड मिळाले,त्यांनाही प्रमोशन दिलेले आहे.अशा प्रकारे संबंधितांना जम्पींग प्रमोशन देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे आणि ही बाब विशेषत: मर्दानी खेळांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंच्या बाबतीत अंमलात आणली तर लोक त्याचे स्वागत .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करतील असे मला वाटते.

सभापती महोदय, यानंतर पर्यटनाच्या बाबतीत शेवटचा मुद्दा मांडतो. याबाबतीत एकच सांगू इच्छितो की, मुक्ताईनगर किंवा अहमदनगरचा किल्ला हा ऐतिहासिक आहे आणि त्यासाठी शासनाने पूरक मागण्यांव्दारे तरतूद केली आहे हे अत्यंत उत्तम काम आहे. परंतु मी सार्वत्रिक रुपाने एक नम्र विनंती करतो की, जी तीर्थक्षेत्र आहेत, त्याठिकाणी जे ॲप्रोच रोड आहेत, विविध मार्ग आहेत. त्या मार्गांची आजची स्थिती पाहिली तर ती फारशी चांगली नाही. पंढरपूरकडे जाण्या साठी विविध मार्ग आहेत. एक मार्ग सासवडमार्गे, दुसरा फलटण मार्गे किंवा सोलापूर येथील अकलूज मार्गे जाणारा रस्ता असेल, या सगळया रस्त्यांची अवस्था अत्यंत वाईट झालेली आहे. विशेषत: आषाढी एकादशीच्या किंवा वारीच्या निमित्ताने परतीच्या मार्गावर असताना दुर्दैवाने घटना घडली. यासाठी रस्ता रुंदीकरण आणि वारकऱ्यांसाठी वृक्षारोपण करावयास पाहिजे. तसेच त्या ठिकाणी पालख्या उतरु शकतील यासाठी निवासस्थानांची सोय, स्वच्छता गृहे या सर्व गोष्टी करावयास पाहिजेत. आपण गेल्या दोन वर्षामध्ये मोठी तरतूद केली पण त्याची अंमलबजावणी ज्या गतीने, ज्या त्वरेने आणि ज्याप्रकारे व्हावयास पाहिजे ती होत नाही ही अत्यंत दुर्दैवाची बाब असून माननीय मंत्री महोदयांनी ते लक्षात घ्यावे आणि शासनाने याबाबतीत कार्यवाही करावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

. . . .2 पी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : शुक्रवार, दिनांक 29 जुलै 2011 रोजी ज्या वेळी पुरवणी मागण्यांवर चर्चा झाली तेव्हा माननीय मंत्री महोदया प्रा.फौजिया खान यांनी त्यांच्या विभागाच्या मागण्यांबाबत उत्तर दिले आहे. त्या दरम्यानच्या काळामध्ये सभागृहामध्ये गोंधळ झाला आणि त्या वेळी विरोधी पक्षाचे उपस्थित असलेले सन्माननीय सदस्य सभागृहाच्या बाहेरही गेले. या परिस्थितीत त्या वेळी तेथे उपस्थित असलेले सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि अन्य काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या पूर्वी ही चर्चा झालेली आहे. या अनुषंगाने मी असा निर्णय घेतलेला आहे की, माननीय मंत्री महोदयांची ही चर्चा पूर्ण झालेली आहे आणि त्या मुळे त्या वर आता आपल्याला काही भाष्य करता येणार नाही.

. . . .2 पी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र.76 ते 100 अशा 25 पुरवणी मागण्या असून, त्याची रक्कम 701.70 कोटी रुपयांची आहे. या विभागाच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चा केली. त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री विक्रम काळे, जयंत प्र.पाटील, रमेश शेंडगे, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.दीपक सावंत, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.मोहन जोशी इ.अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मुद्दे मांडले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी दोन-तीन मुद्दे उपस्थित केले असून त्यातील एक मुद्दा असा होता की, राज्यामध्ये अनेक ठिकाणी कोर्टाच्या इमारती कमी आहेत आणि त्या लवकरात लवकर पूर्ण केल्या पाहिजेत. मी याबाबत फक्त एवढेच सांगू इच्छितो की, ही बाब विधी व न्याय विभागाशी संबंधित असून ते जेव्हा सदरहू काम प्रस्तावित करतील आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तरतूद केली जाईल तेव्हा आम्ही निश्चितपणे ते काम पूर्ण करु. त्यांचा आणखी महत्वाचा मुद्दा होता की, सर्व जिल्ह्यातील जे जोडणारे रस्ते आहेत त्याचे चौपदरीकरण करावयास पाहिजे. मी एवढेच सांगू इच्छितो की, आजच्या घडीला 23 जिल्हे असे आहेत की ज्याठिकाणी तेथील रस्ते जोडण्यात आलेले आहेत. उर्वरित जे जिल्हे आहेत तेथील रस्त्यांचे चौपदरीकरण करण्यासाठी तेथील ट्रॅफीक इन्टेन्सिटी लक्षात घेऊन नंतर ते बी.ओ.टी. बेसिसवर काम करणार आहोत.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी अलिबाग येथून मुंबईला येताना रस्त्यावरील खड्डयांचा उल्लेख केला आणि असेही सांगण्यात आले की, तेथे जो विभाग काम करतो, तेथे मोठया प्रमाणात खड्डे आहेत पण ज्याठिकाणी बी.ओ.टी.तत्वावर कामे होत आहेत तेथील रस्ते फार चांगले आहेत. याबाबतीत मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, जे काम बी.ओ.टी.तत्वावर केले जाते, त्याचे स्पेसिफीकेशन चांगले रहाते.सार्वजनिक बांधकाम विभाग जेव्हा दुपदरी किंवा चौपदरी रस्त्यांचे काम करते तेव्हा त्याची किंमत 25 ते 30 लाख कि.मी.अशी असते. बी.ओ.टी.बेसिसवर काम करतो तेव्हा दोन पदरी रस्त्याची किंमत 3 ते 4 कोटी रुपये आणि चौपदरी रस्त्यासाठी 8 ते 10 कोटी रुपयांची किंमत असते. अशा वेळी निश्चितपणे त्यांची क्वॉलिटी उत्तम असणारच. त्यामुळे तेथ खड्डे निर्माण होण्याची शक्यता फार कमी रहाते. तसेच त्यांच्यामार्फत टोल घेतला जातो, त्यामुळे त्या माध्यमातून ते रस्ते दुरुस्त करीत असतात. त्यामुळे त्यांच्या रस्त्यांची स्थिती चांगली असते. आपल्याकडे नॉन प्लॅनमध्ये तरतूद होते त्यानंतर आम्ही खड्डे बुजवत रहातो. महाराष्ट्र ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यामध्ये जवळपास 2.40 लाख कि.मी.लांबीचे रस्ते आहेत आणि दर पाच वर्षामध्ये एकदा रस्त्यांच्या नूतनीकरणाचे काम करणे आवश्यक आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : त्यादिवशी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी जाहीरपणे सांगितले की, रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी पैसे नाहीत.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, आमची मागणी जवळपास साडेसात कोटी रुपयांची होती आणि आम्हाला 1600 कोटी रुपये मिळाले आहेत. त्यामुळे ज्याप्रमाणे आम्हाला निधी उपलब्ध होईल, त्याप्रमाणे जी कामे प्राधान्याने हाती घ्यावयास पाहिजेत, ती घेतली जातात. यानुसार आम्ही हळूहळू सर्व कामे निश्चितपणे करणार आहोत.

सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे साहेबांनी पंतप्रधान ग्रामसडक योजनेबाबत उल्लेख केला. मी याबाबत एवढेच सांगू इच्छितो की, ही बाब ग्रामविकास विभागाकडे असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नाही.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी ससून हॉस्पिटलबद्दल उल्लेख केला होता. त्यांनी तेथील लिफ्टबाबत आणि दुरुस्तीबाबत सांगितले.मी एक गोष्ट आपल्याला सर्वांना सांगू इच्छितो की, ससून हॉस्पिटलमध्ये ब्लॉकचेस प्रस्तावित आहेत आणि त्यामध्ये मॉर्च्युरी पण आहे. तसेच तेथे आय.सी.यु.ला जाणारी जी लिफ्ट आहे, त्याच्या दुरुस्तीची बाब विचाराधीन आहे. पण आम्हाला जो पर्यंत विभाग निधी देणार नाही, तोपर्यंत आम्ही दुरुस्ती करु शकणार नाही. आम्ही तसा प्रस्ताव पाठविलेला आहे की, याठिकाणी लिफ्टची दुरुस्ती करण्याची गरज असल्याने यासाठी ताबडतोब तरतूद करणे आवश्यक आहे असा आम्ही प्रस्ताव पाठविला आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, याठिकाणी दुरुस्तीसाठी 5-10 लाख रुपयांची गरज आहे आणि याची दुरुस्ती करणे गरजेचे आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, ते करुन देतो. तसेच आपण असाही उल्लेख केला की, मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वर शौचालयाची सोय नाही. याबाबतीत मी सांगू इच्छितो की, प्रत्येक पेट्रोल पंप आणि फूड मॉलच्या ठिकाणी ही सोय आहे. इतर ठिकाणी बी.ओ.टी.तत्वावर बांधलेले जे रस्ते आहेत त्याठिकाणी आपण निश्चितपणे शौचालये इन-कॉर्पोरेट करतो. पण जे राज्य मार्ग आहेत किंवा एम.डी.आर.आहेत त्याठिकाणी कुठे ना कुठेतरी टॉयलेट बांधण्याची गरज आहे. त्याबाबत आपण एक कमिटी गठीत केलेली आहे आणि त्याठिकाणी देखील आता आपण ही बाब

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इन-कॉर्पोरेट केली आहे आणि त्याचे कारण असे की,जी कोणी व्यक्ती सुलभ शौचालय चालविणार आहे, स्वच्छ ठेवणार आहे, त्यांच्यासाठी आपल्याला काही ना काही इन्सेन्टीव्ह द्यावे लागणार आहे. याबाबतीत आपण निश्चितपणे मार्ग काढू.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मुंबई-गोवा एक्सप्रेस वे कधी होणार आहे याबाबत प्रश्न उपस्थित केला आहे.

(सभापतीस्थानी - माननीय उप सभापती)

यानंतर कु.थोरात . . . .

अप्रधारित पत्र / परिपत्रकासाठी नाही

श्री. रणजित कांबळे.....

सभापती महोदय, मुंबई-गावा एक्स्प्रेस हाय-वेच्या बाबतीत मी एवढेच सांगू इच्छितो की, शून्य ते 0284 या किलो मीटरचे टेंडर दिनांक 22/10/2011 रोजी मंजूर झाले असून त्याच्या लँड ॲक्विझिशनचे काम प्रगतीपथावर आहे. इंदापूर ते जरब या रस्त्याच्या कामाच्या बाबतीत कन्सल्टन्सीची नियुक्ती झालेली असून या संबंधीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे गेलेला आहे. जरबपासून पुढच्या 20 किलो मीटर रस्त्याच्या चौपदीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग करीत आहे.

डॉ. दीपक सावंत यांनी ट्रॉमा सेंटरच्या बाबतीत या ठिकाणी उल्लेख केला. त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, महाड तसेच संगमेश्वर येथील ट्रॉमा सेंटरचे काम प्रगतीपथावर आहे. त्या रस्त्यावर अनेक ग्रामीण रुग्णालये आहेत. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी कोल्हापूर सांगली रस्त्याचे चौपदरीकरण लवकरात लवकर व्हावे अशा प्रकारची मागणी केली. तो प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. इन्फ्रास्ट्रक्चर समितीमध्ये हे प्रस्ताव घेण्यात येणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी पोलीस लाईन, पुणे यांच्या दुरुस्तीच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. मी अगोदरच सांगितल्याप्रमाणे नॉन प्लॅनसाठी पैशांची कमतरता आहे. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी ज्या कामाचा उल्लेख केलेला आहे त्या कामासाठी निश्चितपणे काही ना काही तरतूद करण्यात येईल. बी.डी.डी. चाळीच्या रीडेव्हलपमेन्टच्या प्रस्तावाबाबत श्री. प्रकाश बिनसाळे यांनी उल्लेख केला. हा विषय गृहनिर्माण विभागाचा आहे. सभापती महोदय, सदर पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय. पर्यटन विभागाची बाब क्रमांक 258 मध्ये जवळपास 9 कोटी रुपयाची पुरक मागणी केलेली आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे आणि सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी सूचना केलेल्या आहेत. त्या निश्चितपणे पूर्ण केल्या जातील. सभागृहाने आमच्या विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 101 ते 121 अशा एकूण 213 कोटी 83 लाख 81 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा झालेली आहे. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, रमेश शेंडगे, प्रा. सुरेश नवले, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस यांनी सहभाग घेतला व चांगल्या सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी गोसीखुर्द धरणाचा कालवा फुटलेला आहे त्याच्या बाबतीत चौकशी होत आहे काय आणि दोषी अधिकाऱ्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित केले तसेच काही चांगल्या सूचनाही केलेल्या आहेत. या कालव्याच्या कामाच्या गुणवत्तेबाबत दोन तज्ज्ञांच्या समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. मेंडेगिरी, मुख्य अभियंता नागपूर यांची एक तज्ज्ञ समिती आणि व्ही.एन.आय.टी. नागपूर यांच्या माध्यमातून एक तज्ज्ञ समिती अशा दोन तज्ज्ञ समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. या दोन्ही समित्यांचा अहवाल प्राप्त झाला असून त्यांनी असा निष्कर्ष काढलेला आहे की, हे काम योग्य पध्दतीने झालेले नाही. त्यामुळे दोन्ही कंत्राटदारांना स्वखर्चाने हे पूर्ण बांधकाम करुन देण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. तशा प्रकारे कामकाजाची सुरुवातही झालेली आहे. 12 अधिकारी यामध्ये दोषी आढळून आले असून त्या सर्व अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. त्या चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या संदर्भात योग्य ती कारवाई करण्यात येईल.

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जिगांव प्रकल्पाची किंमत वाढलेली आहे अशा प्रकारचा उल्लेख या ठिकाणी केलेला आहे. निश्चितपणे सुरुवातीला या प्रकल्पाची किंमत 356 कोटी रुपये होती आता ती किंमत जवळपास 4 हजार कोटी रुपयांपर्यंत पोहचलेली आहे. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्य श्री.फुडकर साहेबांना सांगू इच्छितो की, आता या प्रकल्पाचा एआयबीपीमध्ये समावेश करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा एआयबीपीमध्ये समावेश झाल्यानंतर वेगवर्धित योजनेमध्ये हा प्रकल्प आल्यामुळे या प्रकल्पाला केंद्र शासनाकडून निधी मिळून या प्रकल्पाला गती मिळेल. या वर्षी सुध्दा या प्रकल्पासाठी राज्य शासनाने काही तरतूद केलेली आहे त्यामुळे पुनर्वसनांच्या कामामध्ये वेग आला पाहिजे या दृष्टीने कामे घेतलेली आहेत. माईल्ड स्टीलच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उल्लेख केलेला

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. या संदर्भात तपास करुन नेमकी माहिती घेण्यात येईल आणि योग्य ती कारवाई करण्यात येईल.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पानशेत धरण आणि वरसगाव धरणाच्या गळतीच्या संदर्भात उल्लेख केला. सभापती महोदय, पावसाळा सुरु होण्यापूर्वी मोठया धरणांचे इन्स्पेक्शन करण्यात येते. या संदर्भात्ील सुरक्षितता संघटना नाशिकला आहे. या संघटनेच्या माध्यमातून अहवाल आल्यानंतर दुरुस्तीच्या संदर्भातील कारवाई करण्यात येते. या धरणांच्या बाबतीतील अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे. या आर्थिक वर्षामध्ये या धरणांच्या दुरुस्तीसाठी तरतूद करण्यात येईल, विशेष बाब म्हणून मान्यता देऊन पानशेत आणि वरसगाव धरणांच्या कामाला मंजुरी देण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी मराठवाडा आणि विदर्भामध्ये 500 हेक्टर पर्यंतच्या प्रकल्पांना मंजुरी द्यावी, अशा प्रकारची सूचना केली आहे.ज्या प्रकल्पांची कामे 80 ते 90 टक्के पूर्ण झालेली आहेत, त्या प्रकल्पांच्या कामाला सध्या प्राधान्य क्रमांक 1 दिलेला आहे. त्यामुळे या कामांना गती देऊन नव्याने कालवे आणि वितरिकांच्या कामांना पहिल्यांदा पैसे उपलब्ध करुन द्यावयाचे आहेत. त्यातून नव्याने सिंचन क्षमता निर्माण होईल असे शासनाचे उद्दिष्ट आहे. त्या सोबतच काही नवीन कामांना देखील सुरुवात करावयास पाहिजे. त्या संदर्भातील चर्चा या सभागृहात अनेक वेळा झालेली आहे. त्या संदर्भातील व्यवहारिकता चेक करुन विदर्भ आणि मराठवाडयातील नवीन प्रकल्पांना कशी मंजुरी देता येईल या संदर्भात निश्चित स्वरुपात कारवाई केली जाईल.

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी आसोला-मेंढा या गावच्या दुरुस्तीच्य संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. पाणी वापर संस्थेच्या माध्यमातून बाब क्रमांक 104 मध्ये दुरुस्त्यांना मंजुरी दिलेली आहे. त्यामध्ये आसोला-मेंढा या गावाच्या दुरुस्तीच्या कामासाठी कमी तरतूद करण्यात आलेली आहे असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. मी हे तपासून घेतो आणि त्यामध्ये कशी वाढ करता येईल या दृष्टीने निश्चित स्वरुपात कार्यवाही केली जाईल. आर ॲण्ड आर. पॉलिसीमध्ये केंद्र शासनाचा 90 टक्के आणि राज्य शासन 10 टक्के

....4...

श्री. राजेंद्र मुळक.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सहभाग आहे. यामध्ये चंद्रपूर भाग हा धानाचा भाग असल्यामुळे या भागातील प्रकल्पांना आर ॲण्ड आर पॉलिसीमध्ये समावेश केला पाहिजे, अशा प्रकारची चांगली सूचना केली आहे. येणाऱ्या सिंचन विभागाच्या बैठकीमध्ये हा विषय घेण्यात येईल. चंद्रपूरमध्ये नाही पण विदर्भात जे काही धान उत्पादक जिल्हे आहेत त्या ठिकाणी ही योजना राबविण्याच्या संदर्भात प्रयत्न केला जाईल. पाझर तलावाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी मुद्दा मांडला होता. हा विषय जलसंधारण विभागाकडे येतो मी जलसंधारण विभागाकडे ही सूचना निश्चितपणे पाठवीन, जलसंपदा विभागाकडून या बाबतीत निश्चितपणे मदत होऊ शकेल. सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 101 ते 121 अशा एकूण 21 पुरवणी मागण्या असून त्यांची रक्कम 213 कोटी 83 लक्ष 81 हजार रुपये इतकी आहे, सदर पुरवणी मागण्या मंजूर करण्यात याव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

...5...

अप्रमाणित प्रत / प्रतिलिपीसाठी नाही

श्री. डी. पी. सावंत (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 232 ते 241 अशा एकूण 56.20 कोटी रुपयांच्या मागण्यावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. सर्वाश्री विक्रम काळे, जैनुद्दीन जवेरी,पांडुरंग फुंडकर, प्रा. सुरेश नवले, श्रीमती शोभा फडणवीस सर्वश्री भगवान साळुंखे, प्रकाश बिनसाळे व सतीश चव्हाण या सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेऊन अतिशय मोलाच्या अशा सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी तंत्र विद्यापीठाची मागणी केलेली आहे. लोणेरे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठ आहे. याच विद्यापीठाला महाराष्ट्र शासनाचे तंत्र विद्यापीठ करण्यात यावे आणि सर्व तंत्र विद्यालये आणि कॉलेजेस त्या विद्यापीठाला ॲटॅच करावेत अशी त्यांची मागणी होती.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी. पी. सावंत ....

ही मागणी जरुर शासनाच्या विचाराधीन आहे. काही दिवसात त्यावर निर्णय होईल असे वाटते. तसेच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, शासकीय तंत्रनिकेतन मधील कंत्राटी पध्दतीचे जेवढे निदेशक किंवा शिक्षक आहेत त्यांना नियमित सेवेमध्ये घ्यावे. या विषयी आम्ही प्रस्ताव मांडला होता परंतु सर्वच विभागांनी म्हणजे सामान्य प्रशासन विभाग, विधी व न्याय विभाग, वित्त व नियोजन विभाग तसेच एमपीएससी यांनी सुध्दा या बाबतीत असमर्थता दाखविलेली आहे. कारण सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे कंत्राटी लोकांसाठी ही बॅक डोअर एंट्री होते आणि अशा प्रकारची एंट्री शक्य नाही असे त्यांनी कळविलेले आहे. त्यामुळे शासन या बाबतीत काही करु शकणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांनी गोंडवाना विद्यापीठाच्या संदर्भातील विषय या ठिकाणी मांडला. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, गोंडवाना विद्यापीठाची स्थापना करण्यासंबंधीची घोषणा झाल्यानंतर त्यासाठी आवश्यक असणारे सवंर्गनिहाय कर्मचारी आणि अधिकारीवर्ग या पदनिर्मितीस शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात आलेली आहे. याशिवाय नागपूर येथे 'ड' संवर्गातील 51 अतिरिक्त झालेली पदे सुध्दा या विद्यापीठासाठी वर्ग करण्यात आलेली आहेत. सद्य:स्थितीत कुलगुरु पदासाठी शासनास प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन सदरील नस्ती माननीय मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेसाठी पाठविलेली आहे. त्यावर लवकरच निर्णय होईल. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी खामगाव येथील शासकीय तंत्रनिकेतन मधील विद्यार्थी श्री. शक्तीसिंह चौहान यांच्यावर झालेल्या कथित अन्यायाबाबत सांगितले. त्याबद्दल जरुर चौकशी करुन जे योग्य असेल त्याप्रमाणे कार्यवाही जरुर करण्यात येईल. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी कायम विनाअनुदानित महाविद्यालयाच्या बाबतीत या ठिकाणी विषय उपस्थित केला. परंतु हा धोरणात्मक विषय आहे. हा धोरणात्मक निर्णय असल्यामुळे आम्ही शासनाकडे याबाबत जरुर पाठपुरावा करु.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी ग्रंथालयांच्या तुटपुंज्या मदतीच्या संदर्भात विषय उपस्थित केला. आपण दर पाच वर्षाने ग्रंथालयांना जरुर वाढ देतो. परंतु गेल्या पाच-सात वर्षांमध्ये ही वाढ देण्यात आलेली नाही. ही बाब जरुर विचाराधीन

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. डी. पी. सावंत .....

आहे. येत्या काही दिवसांमध्ये यावरही निर्णय होईल. सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांनी शिवाजी विद्यापीठास सुवर्ण महोत्सवी वर्षासाठी मागणी मागितली होती. त्या संदर्भात जरुर आम्ही विचार करु. त्यांनी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या संदर्भात मागणी केली होती. ती मागणी क्रीडा विभागाकडे येते. त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना विनंती करीन की, त्यांनी क्रीड विभागाकडे या संदर्भात पाठपुरावा करावा. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी जे.जे.कॅम्पस इम्प्रूव्ह करण्याच्या संदर्भात या ठिकाणी सूचना केली. ही अतिशय चांगली सूचना आहे. कलिना येथे जे.जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर शिफ्ट करण्याच्या संदर्भात सुध्दा त्यांनी सूचना केलेली आहे. त्या संदर्भातही शासन लवकरात लवकर विचार करील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी 2001 पूर्वीची जेवढी महाविद्यालये आहेत त्यामध्ये कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि फिजिकल एज्युकेशन या विषयांच्या संदर्भात मागणी केली. गेल्यावेळी सुध्दा या संदर्भात चर्चा झाली होती. याबाबत निर्णय घ्यावा असे कोर्टाचे आदेश होते. 2001 पूर्वीची जेवढी महाविद्यालये आहेत त्यामध्ये कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि फिजिकल एज्युकेशन हे तीन विषय काही महाविद्यालयांमध्ये विना अनुदानित म्हणून देण्यात आले होते. मला सांगण्यास आनंद होतो की, गेल्या कॅबिनेटमध्ये असा निर्णय झाला आहे की, 1.4.2012 पासून या तीनही विषयाला अनुदान देण्यात येईल. हा निर्णय मी आज या सभागृहामध्ये घोषित करीत आहे.

डॉ. दीपक सावंत : विद्यापीठाच्या रोजगार केंद्राचे काय झाले ?

श्री. डी. पी. सावंत : त्या संदर्भात चर्चेमध्ये कोणी मागणी केली नव्हती.

डॉ. दीपक सावंत : मी हा विषय उपस्थित केला होता की, मुंबई विद्यापीठामध्ये रोजगार केंद्र बंद होते ते कधी सुरु होणार आणि कसे सुरु होणार ?

श्री. डी. पी. सावंत : मी माहिती घेऊन या बाबत सन्माननीय सदस्यांना सांगेन. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 232 ते 241 या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी सभागृहाला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय असे म्हणाले की, माहिती घेऊन सांगतो. या ठिकाणी अधिकारी बसतात. सन्माननीय सदस्य या ठिकाणी जे बोलतात याची त्यांनी नोंद घ्यावयाची असते आणि मंत्री महोदयांना कळवावयाचे असते. अधिकारी जर आपली दिशाभूल करीत असतील तर त्यांच्या बाबतीत मंत्री महोदयांनी विचार करावयास पाहिजे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. राजेंद्र गावित (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी कामगार विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात चर्चेमध्ये भाग घेऊन अशी सूचना केलेली आहे की, सरकारी गोदामांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना न्याय मिळावा. संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी आणि संबंधित जिल्हाधिकारी यांना तशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील. सभापती महोदय, कामगार विभागाच्या मागणी क्रमांक 4 अंतर्गत बाब क्रमांक 142 ते 144 या खालील एकूण 5 कोटी 6 लाख 24 हजार रुपयांच्या तीन पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य, शालेय शिक्षण, महिला व बालविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 194 ते 208 अशा एकूण 15 मागण्या, महिला व बालकल्याण विभागाच्या बाब क्रमांक 242 ते 250 अशा एकूण 9 मागण्या तसेच शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 64, 65 आणि 66 अशा तीन मागण्या सभागृहाने मान्य कराव्या अशी विनंती करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, आरोग्य विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, रमेश शेंडगे, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत तसेच सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी या ठिकाणी अनेक उपयुक्त सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी उप जिल्हा रुग्णालय, कळबनी या रुग्णालयाच्या बाबतीत अनेक वेळा या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या रुग्णालयामध्ये सद्य:स्थितीत फक्त 3 वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. त्यातील एक स्थायी आणि 2 अस्थायी आहेत. उप संचालक स्तरावर आज आपण प्रत्येक पहिल्या आणि तिसऱ्या गुरुवारी वॉक-इन-इंटरव्ह्यू ठेवत आहोत. त्यामध्ये आपल्याला पाहिजे असलेले उमेदवार उपलब्ध झाल्यास ताबडतोब त्या ठिकाणी पदे उपलब्ध करुन द्यावीत असे आदेश उप संचालक, कोल्हापूर यांना दिलेले आहेत. तसेच एमकेसीएलच्या भरतीमधील जे उमेदवार आहेत त्यामध्ये प्राधान्य देऊन अतिरिक्त मुख्य सचिव, आरोग्य विभाग यांना लवकरात लवकर म्हणजे ताबडतोब या रुग्णालयात सुविधा उपलब्ध करुन द्यावी असे सांगितले आहे आणि ते करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी औषध पुरवठ्याच्या बाबतीत या ठिकाणी मुद्दा उपस्थित केलेला आहे. मला असे सांगावयाचे आहे की, आज महाराष्ट्रामध्ये औषध पुरवठ्याचा प्रश्न नाही. आपण त्यांना चार-चार महिन्यांची परवानगी दिलेली आहे. त्यांना सर्व औषधे खरेदी करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यामुळे औषधे उपलब्ध आहेत. त्याशिवाय पीएलए अकाऊंटमधून, आरकेएसमधून, आयपीएचएसमधून, एनआरएचएमच्या माध्यमातून औषध खरेदी करण्यात येते. रिक्त पदांच्या बाबतीत सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

प्रा फौजिया खान .....

मुद्दा उपस्थित केला. रिक्त पदांच्या संदर्भात अनेक प्रकारच्या उपाययोजना करण्यात येत आहेत. यामध्ये एमकेसीएलच्या माध्यमातून वर्ग-2 ची भरती करण्यात आलेली आहे आणि वर्ग-2 च्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती केलेली आहे. त्याशिवाय वॉक-इन-इंटरव्ह्यूच्या संदर्भात मी उल्लेख केलेला आहे. इएसटी बोर्डची बैठक सुध्दा झालेली आहे. त्यामध्ये 6 सह संचालक आणि 10 उप संचालक पदोन्नतीने भरण्याच्या बाबतीत निर्णय झालेला आहे लवकरच ती पदे मिळतील. त्याशिवाय लोकसेवा आयोगाकडून सुध्दा उप संचालकांची पदे मिळतील असे मी या ठिकाणी सांगू इच्छिते. आज राज्यामध्ये डॉक्टर्सची 21 टक्के रिक्त पदे राहिलेली आहेत. ती पदे सुध्दा लवकरात लवकर भरण्याचा प्रयत्न करण्यात येईल. लेप्टोस्पायरोसीससाठी ब्लड सेल्स काऊंट मशीन सिंधुदुर्गमध्ये उपलब्ध करण्याबाबत सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला. त्याच्या खरेदी प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यामध्ये आपण आहोत आणि दोन महिन्याच्या कालावधीमध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये हे सेल्स काऊंट मशीन उपलब्ध होतील.

डॉ. दीपक सावंत : पावसाळा संपून जाईल.

प्रा. फौजिया खान : त्याची प्रक्रिया चालू आहे आणि युध्द पातळीवर आपण त्याचा पाठपुरावा करीत आहोत.

डॉ. दीपक सावंत : गेल्या वर्षी हिवाळी अधिवेशनात मला संचालक साहेबांनी पत्र दिले आहे की, हे पुढच्या दोन महिन्यात होईल. आता ऑगस्ट महिना चालू आहे आणि आपण ऑक्टोबरमध्ये होईल असे सांगत आहात.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आरोग्य विभागाबाबत अनेक सूचना करण्यात आलेल्या आहेत. त्या सूचनांबाबत मी सन्माननीय सदस्यांना व्यक्तिगत रितीने पत्र लिहून त्यांची शंका दूर करीन.

महिला व बालकल्याण विभागाच्या मागण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम व डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी आपली मते मांडली आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे व रामदास कदम यांनी या विभागात प्रशासकीय सुधारणा करण्याची गरज आहे असे मत व्यक्त केले आहे. बालक आश्रमशाळा मंजूर करीत असताना मास्टर प्लॅन व नवीन नियम तयार करावेत. ही सर्व प्रक्रिया विभागात यापूर्वीच सुरु केलेली आहे. विभागाकडून निकष ठरविले जात आहेत. नवीन निकषानुसार जाहिरात दिल्यानंतर मास्टर प्लॅननुसार अलॉटमेण्ट केले जाईल. त्यासाठी ही प्रक्रिया सुरु केली असून लवकरच त्यासंबंधी निर्णय होईल. त्याच प्रमाणे बालक गृहे व बालक आश्रमांसाठी जाहिरात मागवून त्याचे अलॉटमेण्ट केले जाणार आहे.

श्री.रामदास कदम : मी असा मुद्दा मांडला होता की, प्रत्येक तालुक्याला एक बालक आश्रम द्यावा असा शासनाचा नियम आहे. असे असताना काही विशिष्ट तालुक्यात 8-8, 9-9 बालक आश्रम मंजूर केले आहेत. मी 2 वर्षांपासून मागणी करीत आहे की, प्रत्येक तालुक्याला ताबडतोब एक बालक आश्रम मंजूर करावा. शासनाने बृहत् आराखडा तयार करावा, तोपर्यंत प्रत्येक तालुक्यासाठी एक बालक आश्रम देण्यात यावा. एकेका तालुक्यात 8-8, 9-9 बालक आश्रम मंजूर केले असून त्यापैकी काही आश्रमांना तर इमारती सुध्दा नाहीत. यामध्ये 500 कोटींचा भ्रष्टाचार झालेला आहे. ज्या ठिकाणी बालक आश्रम नाही तेथे शासनाने अनुदानाचे वाटप केलेले आहे. असे असताना ज्यांचे नियमानुसार प्रस्ताव आलेले आहेत त्यांना बालक आश्रम देण्यामध्ये शासनाला काय अडचण आहे ? माननीय उप मुख्यमंत्री म्हणत आहेत की, प्रत्येक जिल्ह्यासाठी एकच बालक आश्रम मंजूर करावा अशा केंद्र सरकारच्या सूचना आहेत. ठीक आहे, परंतु एका तालुक्यात 9-9 बालक आश्रम दिलेले आहेत आणि कोकणात एकही दिलेला नाही असा भेदभाव कशासाठी केला जातो ?

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी आहे. काही ठिकाणी जास्त बालक आश्रम देण्यात आलेले आहेत. परंतु त्याच्यावर नियंत्रण आणण्यासाठी शासन आता बृहत् आराखडा तयार करीत आहे. केंद्र शासनाच्या निकषानुसारच प्रक्रिया केली जाईल, कोकणावर अन्याय होणार नाही.

श्री.रामदास कदम : यापूर्वी ते बेकायदेशीर काम झालेले आहे, शासन त्यांच्या बाबतीत काय करणार आहे ?

प्रा.फौजिया खान : कोकणावर अन्याय होणार नाही याची शासनाकडून दक्षता घेण्यात येईल. प्रत्यक्षात खात्री करुन निकषानुसार बालक आश्रम देण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.तावडे यांनी प्रशासकीय सुधारणा करण्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. ही सर्व प्रक्रिया व नवीन योजना अंमलात आणण्याचे काम विभागामार्फत चालू आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, नियमबाह्य बालक आश्रम मंजूर केले आहेत त्याबाबत मंत्री महोदय काहीच सांगत नाहीत. ते बालक आश्रम रद्द करणार की नाही ? एका तालुक्यात एक बालक आश्रम देण्याचा नियम असताना नियमबाह्य काम करण्यात आले आहे ते रद्द करणार का ?

प्रा.फौजिया खान : ज्यावेळी या बालक आश्रमांना मंजुरी देण्यात आली त्यावेळी बृहत् आराखडा नव्हता. त्यावेळी मंजूर करण्यात आलेले बालक आश्रम नियमबाह्य आहेत किंवा नाही याबाबत चौकशी करुन त्याबाबत निर्णय घेतला जाईल. सभागृहाने महिला व बालकल्याण विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती करते.

सन्माननीय सदस्यांनी शालेय शिक्षण विभागासंबंधी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. शालेय शिक्षण विभागातील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : या बालक आश्रमांवर देखरेख करण्याच्या कामी राज्य महिला आयोगाची मोठी भूमिका आहे. गेली 5 वर्षे राष्ट्रवादी काँग्रेसची पाच पदे रिक्त होती, आता तर सहाही पदे रिक्त आहेत. ही पदे केव्हा भरण्यात येणार आहेत ?

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सन्माननीय सदस्यांना मी यापूर्वीच सांगितले आहे की, काही मुद्यांबाबत उत्तर देण्याचे राहिल्यास त्याबाबत व्यक्तिश: मी पत्राने उत्तर देणार आहे. राज्य महिला आयोगाच्या सदस्यांची नेमणूक करण्यासंबंधी माझे माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्याबरोबर बोलणे झालेले आहे. त्याबाबत लवकर निर्णय होईल असे मला आश्वासन देण्यात आलेले आहे. (अडथळा) माननीय मुख्यमंत्र्यांनी हे अधिवेशन संपल्यानंतर या नेमणुका करण्यात येतील असे सांगितलेले आहे.

शालेय शिक्षण विभागाचे अनेक विषय प्रलंबित आहेत. हे सर्व प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहेत. शाळांच्या मूल्यांकनाची फाईल मंत्रिमंडळासमोर जात आहे. त्यामध्ये वेतनेतर अनुदानाचा विषय, शिक्षण सेवकांचे मानधनाचा विषय आहे. या चर्चेत सन्माननीय सदस्य सर्वश्री विक्रम काळे, जयंत प्र.पाटील, रमेश शेंडगे, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, शोभाताई फडणवीस, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, प्रा.सुरेश नवले यांनी भाग घेतला आहे. या सर्व सन्माननीय सदस्यांनी उपयुक्त सूचना केलेल्या आहेत. त्यांच्या सर्व सूचनांवर शासनाकडून विचार करण्यात येईल. त्यांनी मांडलेले मुद्दे शासनाच्या विचाराधीन आहेत. त्यावर लवकरच निर्णय घेण्यात येईल. सभागृहाने शालेय शिक्षण विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी मी विनंती करते.

राजशिष्टाचार विभागाच्या मागण्या क्र.1, 2, 3 व 8 देखील सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करते आणि माझे उत्तर संपविते.

4...

अधिकृत पत्र / प्रतिक्षिप्ती नाही

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, ग्रामविकास विभागाच्या बाब क्रमांक 151 ते 155 वर नमूद केलेल्या 255 कोटी 25 लाख 7 हजार रक्कमेच्या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करीत आहे.

या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री विक्रम काळे .दिवाकर रावते, रमेश शेंडगे आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी काही प्रश्न मांडले आहेत. दारिद्रय रेषेखालील लोकांचा नव्याने सर्व्हे सुरु केला जाणार आहे. त्यासंबंधी केंद्र शासनाच्या सूचना आलेल्या आहेत. त्यानुसार दोन टप्प्यामध्ये हा सर्व्हे करण्यास सुरुवात होणार आहे. ऑक्टोबर व नोव्हेंबर या महिन्याच्या तारखा निश्चित केलेल्या आहेत. या दोन महिन्यात दारिद्रय रेषेखालील लोकांचा सर्व्हे पूर्ण होईल. दारिद्रय रेषेखाली असणाऱ्यांना एनआरएलएमच्या माध्यमातून महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्याचे धोरण शासनाने स्वीकारलेले आहे. पी.एम.जे.एस.वाय. या योजनेतील तरतूद वाढवावी, किंबहुना, नवीन टप्पा मंजूर व्हावा यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरु ठेवलेला आहे.

त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी श्री.हिरालाल रेवाळे व श्री.तिजोरे या दोन अधिकाऱ्यांना निलंबित करावे असा विषय मांडलेला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा व शिस्त अपील 1963 मधील नियम क्र.3/5 च्या अनुषंगानेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी निर्णय घेतलेले आहेत. त्यांनी घेतलेल्या निर्णयाचा रिव्हयू करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना असल्यामुळेच त्यांनी निर्णय घेतले आहेत. एखादी घटना घडल्यानंतर प्रथम आपण एफआयआर नोंदवित असतो किंवा तक्रार दाखल करीत असतो. परंतु चौकशीअंती ते अधिकारी निर्दोष असतील तर त्यांना पुन्हा कामावर घेतले जाते. त्यानुसार या दोन्ही अधिका-यांना पुनर्स्थापित करण्यात आलेले आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, ग्रामविकास विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर करण्यात याव्यात.

श्री.नसीम खान (अल्पसंख्याक विकास मंत्री) : सभापती महोदय, अल्पसंख्याक विकास विभागाच्या बाब क्र.260, पान क्र.282 वर 10 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. या पुरवणी मागण्यांवर सन्माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल, जैनुद्दीन जव्हेरी, रामनाथ मोते यांनी अनेक सूचना केल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळासाठी भागभांडवल वाढवून दिले पाहिजे. या विभागासाठी सुध्दा बजेट वाढवून दिले पाहिजे असे सांगितले.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नसीम खान...

सभापती महोदय, आपणा सर्वांना हे माहीत आहे की, अल्पसंख्याक विभाग सन 2008-2009मध्ये अस्तित्वात आला. त्यावेळी या विभागाचे बजेट 51.50 कोटी इतके होते. सन 2009-2010मध्ये ते 58 कोटी 99लाख रु. इतके वाढविण्यात आले. सन 2010-11 आणि सन 2011-2012 या वर्षामध्ये 275 कोटीचे बजेट अल्प संख्याक विभागाला देण्यात आलेले आहे. या विभागाच्या माध्यमातून अल्प संख्याक समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांनी अल्प संख्याक विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती मिळत नाही असे सांगितले. 12वी नंतरच्या विद्यार्थ्यांसाठी 2008-2009मध्ये 6290 विद्यार्थ्यांना 11 कोटी 45 लाख रुपये शिष्यवृत्तीच्या माध्यमातून देण्यात आलेले आहेत. सन 2009-2010मध्ये 14457 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपोटी अंदाजे 34 कोटी रुपयाचे वाटप झालेले आहेत. सन 2010-2011मध्ये मार्च 2011 पर्यत 23055 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पोटी 54 कोटीचे वाटप करण्यात आलेले आहे. या प्रमाणे विभागाची माहिती आहे. आतापर्यन्त गेल्या तीन वर्षामध्ये 101 कोटीचे वाटप करण्यात आलेले आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, शालेय शिक्षण विभाग या विभागा मार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांतर्गत अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करण्यात येत असते. बेरोजगारांना रोजगाराच्या संधी निर्माण करुन देण्यासंबंधीचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला. त्याबाबतीतही शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतलेला आहे. राज्यातील 42 तालुक्यामध्ये 42 आयटीआय सुरु करण्यात आलेले आहेत. अल्प संख्याक समाजातील मुला-मुलींना शिक्षण आणि रोजगाराच्या संधी देण्याच्या बाबतीत शासनाने केवळ घोषणाच केली नाही तर घोषणेची अंमलबजावणी देखील केलेली आहे. अंदाजे 5 हजारापेक्षा जास्त मुलांना या आयटीआय मधून प्रशिक्षण मिळत आहे. अल्पसंख्याक विकास विभागामार्फत योजनावर नियंत्रण ठेवले जात नाही असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. परंतु तशी परिस्थिती नाही. 15 कलमी कार्यक्रमाची योजना असू द्या किंवा राज्य शासनाच्या वेगवेगळया विभागाच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी ज्या ज्या योजना सुरु झालेल्या आहेत त्या प्रत्येक योजनेचा आढावा सचिव स्तरावर, राज्यमंत्र्यांच्या स्तरावर, मंत्री स्तरावर आणि माननीय मुख्यमंत्र्याच्या स्तरावर वेळोवेळी घेतला जातो. यावर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी जिल्हानिहाय समित्या निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या समित्या देखील लवकरात लवकर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नेमल्या जातील. सन्माननीय सदस्यांनी आणखी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्या सूचना लक्षात घेऊन जरुर ती कारवाई करण्यात येईल. सभापती महोदय, आपल्या माध्यमातून माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, बाब क्रमांक 260 वरील अल्पसंख्याक विभागाची रु. 10 लाखाची पुरवणी मागणी मंजूर करावी.

उप सभापती : माझी सर्व मंत्री महोदयांना नम्र विनंती आहे. या ठिकाणी पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या वेळी ब-याच सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी कमी वेळ दिलेला होता. त्यांचे म्हणणे थोडक्यात मांडण्याबाबत त्यांना विनंती करण्यात आली होती. पुरवणी मागण्यांच्या संदर्भात उत्तर देत असताना मंत्री महोदयांचे उत्तर मुद्देसूद आणि संक्षिप्त असावे याची माननीय मंत्री महोदयांनी नोंद घ्यावी.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे पाटील ((कृषी व पणन मंत्री) : सभापती महोदय, कृषी व पणन विभागाच्या बाब क्रमांक 47, 48, 49 आणि 50 त्याचप्रमाणे पणन विभागाच्या बाब क्रमांक 231 या मागण्यावरील चर्चेमध्ये सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर सन्माननीय सदस्य सर्वश्री. विक्रम काळे, पाशा पटेल, दिवाकर रावते, रमेश शेंडगे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन चांगल्या सूचना केल्या आणि काही विषयाच्या संदर्भात काही बाबी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. वेळ कमी असल्यामुळे मी सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांच्या संबंधातच भाष्य करणार आहे. विशेष करुन सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांनी कोरडवाहू शेतामध्ये जी अनुदानावर योजना सुरु केलेली आहे त्याचा उल्लेख केला. त्या योजनेसाठी 51 कोटी रु. प्राप्त झालेले आहेत. शेतकरी समूहाकडून अडीच लाख रुपये उपलब्ध करीत असताना बाकीचे 5 लाख रुपये अनुदान देण्याच्या बाबतीत आपले धोरण होते. हेतू हा होता की, त्यावर आपले व्यवस्थित नियंत्रण असावे. जिल्हा पातळीवर पुन्हा आपण खरेदीचे अधिकार दिले तर त्यातून मधल्या काळामध्ये जशा अनावश्यक खरेदी झाल्याच्या तक्रारी झाल्या, गुणवत्ता पाहिली गेली नाही अशा तक्रारी झाल्या तशा तक्रारी होत रहातील. याबाबतीत आपल्याला एक विशेष धोरण करावे लागले. किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि गुणवत्तेवर नियंत्रण करण्यासाठी थोडा कालावधी गेला हे मी मान्य करतो. परंतु येत्या 15 दिवसामध्ये या बाबतीतील संपूर्ण कार्यवाही आपण पूर्ण करीत आहोत.

सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी विमा योजनेच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला. विम्याची रक्कम भरण्यासाठी काही कालावधी वाढवून दिला पाहिजे असे त्यांनी सांगितले. याबाबतीत मला सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, आजच आपल्याला केन्द्र सरकारचे आदेश प्राप्त झालेले असून 16 ऑगस्ट पर्यन्त विमा रक्कम भरण्याची मुदत वाढविण्यात आलेली आहे. याचा शेतक-यांना मोठा लाभ होणार आहे.

सभापती महोदय, सोयाबीनच्या बोगस बियाण्याच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मुद्दा उपस्थित करताना बियाणे महमहामंडळाच्या बाबतीत काही आक्षेप नोंदविलेले आहेत. सोयाबीनच्या बाबतीत 7-8 जिल्हयातून जास्त तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. काही नैसर्गिक अडचणीमुळे उगवण क्षमतेवर परिणाम झाला. त्यामुळे बियाण्याच्या गुणवत्तेबाबत काही प्रश्नचिन्ह निर्माण झाले. आपण खाजगी कंपनी किंवा सरकारी कंपनी म्हणून जी काही बियाण्याच्या रकमेची

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भरपाई शेतक-याला देतो त्यासंदर्भात कार्यवाही सुरु केलेली आहे. बियाणे महामंडळाच्या बाबतीत सातत्याने तक्रारी प्राप्त होत आहेत. विधानसभेमध्ये देखील या विषयावर मोठी चर्चा झाली. बियाणे महामंडळाचे संचालक मंडळ बरखास्त करण्याच्या संदर्भात सातत्याने मागणी होत असते. त्यामध्ये केन्द्र आणि राज्य शासनाचा सहभाग असल्यामुळे काही कायदेशीर अडचणी निर्माण होतात. परंतु सरकारला महामंडळाविरुध्द कारवाई करायला कोणतीही अडचण वाटत नाही.

...नंतर श्री. खर्चे...

अप्रधारित प्रत / परिषदेसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

यासंदर्भातील कायदेशीर बाबींची तपासणी केल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही निश्चितपणे केली जाईल. या महामंडळावर नियंत्रण असले पाहिजे, किंवा त्यांच्या कामकाजावर नियंत्रण आणत असताना त्या विभागाच्या मंत्र्यांच्या स्तरावर एक उच्चाधिकार समिती स्थापन करता येईल काय याचाही विचार करण्यात येईल. तसेच या माध्यमातून आवश्यक ते बदल करावे किंवा शेवटचा पर्याय महामंडळ बरखास्तीचा हा आपल्याकडे आहेच, अशा सर्व शक्यतांचा विचार करुन दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या मागणीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे, त्यामुळे कोणालाही पाठीशी घालण्याचा शासनाचा प्रयत्न नाही. तसेच पणन विभागाच्या अनुषंगाने फार सूचना कोणी केलेल्या नसल्याने मी त्यावर भाष्य करणार नाही. एवढे बोलून कृषी विभागाने ज्या पुरवणी मागण्या सादर केल्या त्याला सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विकास राज्य मंत्री) : सभापती महोदय, पशुसंवर्धन विभागाच्या बाब क्र. 46, 51 व 63 च्या संदर्भात 79.66 कोटीच्या पुरवणी मागण्या सदनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आल्या आहेत. यावर बोलताना सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी सांगली जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या इमारतीच्या दुरुस्तीबाबत सूचना केली. या अनुषंगाने मी असे स्पष्ट करणार आहे की, या दवाखान्यांच्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी आपण दोन तीन बाबींच्या माध्यमातून तरतूद केलेली असते. त्यात डीपीडीसी, स्वेच्छा निधी तसेच केंद्रपुरस्कृत योजना अशा तीन माध्यमातून तरतूद केलेली असते. त्यानुसार सन 2011-12 या वर्षासाठी एकूण 16 कोटीचा निधी या दुरुस्तीसाठी दिलेला आहे. तसेच पशुधन विकास अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरली पाहिजेत या अनुषंगाने मी असे स्पष्ट करु इच्छितो की, एमपीएससीच्या माध्यमातून आपण 184 पशुधन विकास अधिकाऱ्यांची पदे भरण्यासाठी जाहिरात दिलेली आहे. तसेच आणखी या रिक्त जागा भरण्यासंबंधीचा प्रस्ताव एमपीएससी कडे पाठविलेला असून लवकरच त्यावर कार्यवाही करण्याचा शासनाचा विचार आहे. औषध पुरवठ्याच्या संदर्भात काही सूचना केलेल्या असून त्यासंदर्भात संबंधितांना तशा सूचना वेळोवेळी दिलेल्या आहेत. त्याचबरोबर जी नावीन्यपूर्ण योजना दुग्धविकास विभागाने नव्यानेच सुरु केली आहे त्यानुसार 10 शेळ्या आणि एक बोकड देण्याचे धोरण देखील शासनाने आखले आहे. यासंदर्भात अशी सूचना केली गेली की, महामंडळाच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात यावी. पण नुकतीच ही योजना आपण सुरु केलेली असल्याने या योजनेसाठी विभागाच्या माध्यमातून तरतूद केलेली आहे. तसेच महामंडळाला यापूर्वी जवळपास 36 कोटी रुपये देण्याचाही आपण प्रयत्न केलेला आहे, त्यातील काही रक्कम खर्च होण्याचे बाकी आहे. यापुढे सुध्दा महामंडळाला जास्तीत जास्त निधी देण्याचा प्रयत्न केला जाईल व महामंडळाचा वतीने अधिकाधिक चांगले काम होण्याचा प्रयत्न केला जाईल.

माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सूचना केली की, शेगांवजवळ जो 1400 मे.टन मांसावर प्रक्रिया करणारा फ्रोजन फुड प्रकल्प सुरु होत आहे त्यावर शासनाने बंदी घातली पाहिजे. यासंदर्भात मी त्यांना सांगू इच्छितो की, कत्तलखाना आणि कोल्ड स्टोअरेजच्या प्रकल्पांना कोणत्याही प्रकारची परवानगी दिली जात नाही. तसेच यासंदर्भात एमपीसीबी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकडून माहिती घेऊन काय करता येईल यासाठी एक बैठक सुध्दा आयोजित करण्यात येईल व निश्चित असे धोरण घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर .....

सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी अशी सूचना केली की, शासनाच्या वतीने पशुगणना दर पाच वर्षांनी केली जाते. ही योजना राबवित असताना प्रथम टप्प्यात गांव-गोषवारा काढण्यात येतो. दुसऱ्या टप्प्यात गावातील शेतकऱ्यांच्या नावासह पशुंची सविस्तर गणना आपण करतो. यासाठी ही 43 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. त्यातून आपल्याला संगणकाच्या माध्यमातून संपूर्ण पशुंची नोंदणी करावयाची आहे. ही योजना 100 टक्के केंद्रपुरस्कृत योजना असल्यामुळे त्याला मंजुरी द्यावी. त्याचबरोबर दूध महापूर योजना टप्पा क्र. 2 व 3 अंतर्गत देण्यात येणाऱ्या कर्जाची परतफेड करण्यासाठी ही मागणी आहे. या योजनेच्या माध्यमातून आपल्या राज्यातील जवळपास 21 संघांना कर्जवाटप करण्यात आले होते. त्यातील 15 संघांनी कर्जाची परतफेड केली असून 6 संघांची परतफेड शिल्लक आहे. त्या कर्जाची रक्कम जवळपास 22.88 कोटी एवढी आहे. पण एनडीडीबीच्या माध्यमातून असा प्रस्ताव दिला व आपण त्यात 5 टक्के व्याज दराने तडजोड केली व एनडीडीबी बरोबर बैठक घेऊन हा प्रस्ताव त्यांच्याकडून मान्य करुन घेतला आहे. त्यात शासनाचा मोठ्या प्रमाणात फायदा झालेला आहे.

महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी पशुसंवर्धन विभागामार्फत जी पेंड पुरविण्यात येते त्यात मोठ्या प्रमाणात भेसळ केलेली असते, हे प्रकार थांबले पाहिजेत, अशी मागणी केली आहे. हा विषय अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अखत्यारितील असल्याने त्यांच्याशी चर्चा करुन निर्णय घेतला जाईल, असे मी सभागृहाला सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी शेतकऱ्यांना वाढलेल्या दुधाच्या दराचा फायदा मिळाला पाहिजे, अशी मागणी केली. वास्तविक दुधाचे दर फेब्रुवारी, 2011 मध्येच वाढविलेले आहेत. पुन्हा दुधाच्या उत्पादन खर्चाचा आढावा घेऊन अजून त्यात दरवाढ करता येते काय याचा विचार शासनाच्या स्तरावर निश्चितपणे करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी "इमू" नावाच्या पशुंच्या पालनाबाबतच्या योजनेचा उल्लेख करुन काही सूचना केल्या आहेत. पण मी यासंदर्भात असे सांगू इच्छितो की, अशा प्रकारचे पशुसंवर्धन विभागाचे कोणतेही धोरण नाही. त्यांनी या अनुषंगाने अनेक प्रश्न उपस्थित केले. त्यात काही ठिकाणी लोकांना या योजनेच्या माध्यमातून फसविले गेले, याची नोंद शासन जरुर घेईल पण हा विषय संबंधित नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय उप मुख्यमंत्री बसून बोलतात)

श्री. सय्यद पाशा पटेल : माननीय उप मुख्यमंत्र्यांनी म्हणजेच शासनाने बसूनच ही योजना फायद्याची नाही असे कबूल केले. मग ती आमच्या शेतकऱ्यांच्या माथी मारण्याचे कारण काय ? कारण या योजनेसाठी शासनाच्या वतीने शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून इमू पशुपालनाचे प्रशिक्षण देण्यात आले, अनुदान आणि कर्जाचे वाटप सुध्दा करण्यात आले.....

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आमच्या विभागाच्या वतीने अशा प्रकारचे कोणतेही प्रशिक्षण शेतकऱ्यांना दिलेले नाही, कर्ज किंवा अनुदान सुध्दा वाटप केलेले नाही, एवढेच नव्हे तर या योजनेशी आमच्या विभागाचा कोणताही संबंध नाही.

श्री. पाशा पटेल : महोदय, केंद्र शासनाच्या मानव संसाधन व विकास मंत्रालयाच्या माध्यमातून "मानव विकास मिशन" नावाच्या योजनेतून जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांना प्रोत्साहन दिले. त्यातून शेतकऱ्यांना प्रशिक्षण, कर्ज व अनुदान सुध्दा देण्यात आले. बिल्ले देण्यात आले व शेवटी गाळात घातले.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अप्रधारित प्रत / परिषदेसाठी नाही

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, एक दोन वर्षापूर्वी "इमू पालन" हा व्यवसाय जोडधंदा म्हणून शेतक-यांच्या दृष्टीने फार चांगला आहे असे वाटत होते. परंतु या व्यवसायाच्या सुरुवातीला इमू पक्षाच्या एका अंडयाला हजार-हजार, दीड दीड हजार रुपये मिळत होते. परंतु नंतरच्या काळात हा व्यवसाय फायदेशीर नाही असे दिसून आले. या पक्षाचे मटन 450 रुपये किलोच्या पुढे विकले गेले तरच हा व्यवसाय फायद्याचे ठरत असतो. या विषयाच्या संदर्भात सर्व माहिती घेतल्यानंतर इमू पालन हा व्यवसाय महाराष्ट्रातील शेतक-यांच्या दृष्टीने फायदेशीर नाही असे लक्षात आले. मागे काही घडले असेल तर त्यामध्ये राज्यशासन दुरुस्ती करील. एखादी योजना चांगल्या हेतूने राबविण्याचा प्रयत्न झाला असेल आणि त्यातील चूक लक्षात आल्यानंतर चूक दुरुस्त करण्याची राज्य शासनाची तयारी आहे. इमू पालन व्यवसायाला राज्यशासनाचे समर्थन नाही तसेच इमू पालन व्यवसायास राज्य शासन सहमत नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, एका गावातील 40 कुटुंबातील शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त झालेले आहेत. या 40 शेतक-यांना बँकेने कर्ज दिले, अनुदान दिले आहे.

श्री. अजित पवार : सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल हे मानव विकास निर्देशांकाच्या संदर्भात बोलत आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, यामध्ये जर काही झाले असेल तर यातील भाग नियोजन विभागाच्या अंडर येतो. या विषयाच्या संदर्भात मी आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी निर्णय घेतलेला आहे की, पूर्ण राज्यात ज्या तालुक्यांचे पर कॅपिटा उत्पन्न कमी आहेत असे 125 तालुके निवडले गेले होते. यासंदर्भात मागच्या काळात प्रायोगिक तत्वावर मराठवाडयातील काही भागात काम सुरु केले होते. नुकसान होऊ नये म्हणून राज्य शासनाने खबरदारी घेणे गरजेचे असते त्यामुळे अशा गोष्टीचा निश्चितपणे आढावा घेतला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. यामध्ये पशुसंवर्धन विभागालाही विश्वासात घेतले जाईल. यामध्ये शेतक-यांचे नुकसान होणार नाही तसेच त्यांना कारण नसतांना भुर्दंड पडणार नाही अशा प्रकारचा व्यवहारी मार्ग त्यातून राज्यशासन निश्चितपणे काढेल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, हैद्राबाद येथील कंपनी एजटांना बरोबर घेऊन हा शासकीय कार्यक्रम आहे असे सांगून लोकांची दिशाभूल करीत आहेत. यासंदर्भात स्टार माझा या वाहिनीने मोठया प्रमाणात माहिती दिलेली आहे. अजून सुध्दा या कंपनीचे एजंट फिरत असतील व हा सरकारी कार्यक्रम आहे असे वाटून जनतेची दिशाभूल होऊ शकते त्यामुळे यासंदर्भात चौकशी करावी अशी माझी मागणी आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माहिती घेण्यात आली असून कुठे असा प्रकार सुरु असेल तर तो बंद करण्यात यावा अशा प्रकारचा इशारा आमच्या विभागाकडून देण्यात आलेला आहे.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या मागण्या क्रमांक 46,51 आणि 63 मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पद्माकर वळवी (क्रीडा व युवक कल्याण मंत्री) : सभापती महोदय, क्रीडा व युवक कल्याण विभागावरील मागण्यांवर सन्माननीय सदस्य सर्वश्री विक्रम काळे, रमेश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, डॉ. नीलम गो-हे, श्रीमती शोभा फडणवीस सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, सतीश चव्हाण, उल्हास पवार यानी बहुमोल विचार व्यक्त केलेले आहेत. पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी, तालुका क्रीडा संकुल उभे करण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे तसेच सन्माननीय सदस्य सतीश चव्हाण यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. तालुका क्रीडा संकुले लवकरात लवकर उभी झाली पाहिजेत असा त्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. क्रीडा संकुले लवकरात लवकर उभी करण्यासाठी आम्ही कृती आराखडा तयार केलेला असून त्यामुळे क्रीडा संकुले लवकरात लवकर उभी करण्याचा विभागाचा प्रयत्न सुरु आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विदर्भ कबड्डी असोसिएशनला एसटी पासची सोय उपलब्ध होत नाही असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. विदर्भाला राज्यस्तरीय दर्जा दिलेला आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात परिवहन विभागाशी चर्चा करुन मार्ग काढला जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यामध्ये पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र व कोकणाला सवलत दिलेली आहे. परंतु फक्त विदर्भालाच अशा प्रकारची सवलत देण्यात आलेली नाही. मागच्या शिक्षण मंत्र्यांनी व क्रीडा मंत्र्यांनी ही बाब मान्य केली होती तसेच त्यांनी यासंदर्भात पत्रही दिलेले आहे. त्यामुळे याबाबत चर्चा आणि विचार करण्याची गरज आहे असे मला वाटत नाही.

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, ही बाब मी स्वत: तपासून घेतो व याबाबत परिवहन विभागाशी चर्चा करुन योग्य तो मार्ग काढतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी मराठी शाळांना क्रीडा साहित्य उपलब्ध करुन देण्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. युवा खेल व क्रीडा अभियानामध्ये ग्रामपंचायतींना साहित्य पुरविण्याची तरतूद आहे. नवीन क्रीडा धोरणात शाळांना क्रीडा साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी तरतूद करण्यात येत आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी एशियाड आणि राष्ट्रकुल खेळाडूंना बक्षिसे दिलेली आहेत ती योजना पुढे सुरु ठेवावी अशी मागणी केली असून याबाबतीत मी सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात क्रीडा विभागाने निर्णय घेतलेला आहे. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्पर्धकांना बक्षिसे दिली जातील. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील खेळाडूंसाठी 9.20 कोटी रुपयांचा बक्षीस वितरण कार्यक्रम आयोजित केलेला आहे. खेळाडूंच्या बक्षिसांमध्ये भरीव वाढ करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी स्केटींग खेळाला राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी करुन घ्यावे अशी सूचना केली आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, स्केटींग हा खेळ राज्यभर खेळला जातो त्यामुळे स्केटींगसाठी आपण वेगळया प्रकारच्या योजना देत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी कु.प्राजक्ता सावंत यांना 25 मार्क्स देण्याची सूचना केलेली आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, राज्यातील सर्व खेळाडूंना 25 मार्क्स दिलेले आहेत. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यासंदर्भात स्वतंत्रपणे चर्चा करुन 25 मार्क्स देण्याच्या बाबतीत आम्ही नवीन धोरण स्वीकारणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी जिम्नॅस्टीकच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केलेला आहे. शिव छत्रपती पुरस्काराचा आम्ही क्रायटेरिया बदलवणार आहोत. हा प्रकार यामध्ये राहून गेला असेल तर त्या खेळाला निश्चितपणे सहभागी करुन घेण्यात येईल.

सभापती महोदय, आदिवासी शासकीय आश्रमशाळेत राज्यस्तरीय स्पर्धा होत असतात. या स्पर्धेतील खेळाडूंना सुध्दा 25 मार्क्स देण्यात यावे असा सन्माननीय सदस्य श्री. मोते साहेबांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. राज्यस्तरीय तसेच आदिवासी विकास विभागाकडून स्वतंत्रपणे स्पर्धा घेतल्या जात असतात. त्यामुळे आदिवासी विकास विभाग, क्रीडा विभाग व शालेय शिक्षण विभाग एकत्र बसून 25 मार्क्स देण्याचा होकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकात पाटील यांनी योग आणि मल्लखांब खेळांना प्रोत्साहन देण्याच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. या खेळांना शालेय क्रीडा स्पर्धेत

...5...

अरुणाचल प्रदेश / प्रतिलिपीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी....

सहभागी करण्यात आलेले आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. खेळाडूंना वेगवेगळया प्रकारची बक्षिसे देणे, निवृत्त खेळाडूंना मानधन देण्याच्या संदर्भात विभागाने भरीव अशी वाढ केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी राज्यातील पारंपारिक खेळांना, मैदानी खेळांना प्रोत्साहन देण्याच्या संदर्भात सूचना केलेली आहे. मागील काळात जसे आपण सामावून घेतले होते त्याच प्रकारे ज्या खेळाडूंनी चांगली कामगिरी केलेली आहे त्यांना निश्चितपणे मान-सन्मान दिला जाईल. यासंदर्भात राज्यशासनाने वर्ग-1 व वर्ग-2 मध्ये नियुक्ती देण्याचा निर्णय घेतलेला आहे. शासनाने क्लास वन व क्लास टू साठी 13 खेळाडूंच्या नियुक्तीचे डायरेक्ट आदेश काढलेले आहेत. आतापर्यंत राज्यशासनाने जवळ जवळ 945 खेळाडूंना सेवेत सामावून घेतलेले आहे. या चर्चेच्या निमित्ताने माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित आहेत त्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, 2011 च्या नवीन युवा व क्रीडा धोरणास लवकरच महाराष्ट्र शासन मंजुरी देईल. यासंदर्भात प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे क्रीडा विभागाची मागणी क्रमांक इ-3 अंतर्गत बाब क्रमांक 66,67 व 68 खाली 13,80,59,000रुपयांच्या पूरक मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय देवतळे (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, पर्यावरण व सांस्कृतिक विभागाच्या पुरवणी मागण्यांवर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, पाशा पटेल, रमेश शेंडगे तसेच विनोद तावडे यांनी विचार व्यक्त केलेले आहेत. सन्माननीय सदस्यांच्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी मिरज येथील कला टिकवण्यासाठी कलांवताना पुरस्कार द्यावा अशी सूचना केलेली आहे. यासंदर्भात कलावंतांना सांस्कृतिक पुरस्कार दर वर्षी दिले जात असतात. तसेच मानधन देण्याच्या बाबतीत जिल्हा स्तरीय समितीकडे अर्ज केले तर त्यांच्या माध्यमातून वृध्द कलावंताना मानधन मिळू शकते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी काळू-बाळू तमाशा कलावंतांचा उल्लेख केलेला आहे. वृध्द कलावंताना मानधन देण्याची योजना असून त्यांच्याकडे अर्ज केले तर निकषा प्रमाणे मानधन मंजूर केले जात असते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय देवतळे.....

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक हा प्रश्न आमच्या विभागाशी संबंधित नाही. तरी देखील हा प्रश्न संबंधित विभागाला पाठविण्यात येईल. येथे सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्याची नोंद घेण्यात आली आहे. मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, पर्यावरण विभागाच्या बाब क्र.221, 222 तसेच सांस्कृतिक कार्य विभागाच्या बाब क्रमांक 257, 258 वरील पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात.

====

==2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी शिक्षण विभागाच्या मागण्यांवर बोलताना प्रश्न ICSE, CBSE, IB या शाळांना 15 ऑगस्टला ध्वजवंदन करण्यासाठी शासन आदेश देईल काय असा प्रश्न उपस्थित केला होता.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, ही गंभ्ीर बाब आहे. 26 जानेवारी, 1मे, 15 ऑगस्ट या दिवशी सर्व शाळांना ध्वजवंदन करावे अशा प्रकारचे पत्र पाठविण्यात येईल.

उप सभापती : सन 2010-2011 च्या पूरक विवरपणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

.....

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) विधेयक

L. C. BILL NO. VI OF 2011 (A BILL FURTHER TO AMEND THE SHREE SAI BABA SANSTHAN TRUST (SHIRDI) ACT, 2004.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE JOINT SELECT COMMITTEE

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 6- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम,2004 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभागृहाच्या कामकाजा बाबत

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकातील हेतू आम्हाला समजलेला नाही. पण एक बाब आपल्या निदर्शनास आणावयाची आहे. मी आपल्याला आज दुपारी 3.30 वाजता, 3.45 वाजता बोललो होतो की, विधेयके घ्यायची असतील तर लवकरात लवकर पुरवणी मागण्या मंजूर झाल्या तर बरे होईल. त्यानंतर येथे माननीय सभापतींनी येऊन निवेदन केले. कमिटमेंट केली. आम्ही ती बाब आपल्या निदर्शनास आणली होती. आम्ही आलो आणि मागे गेलो अशातला भाग नाही. काही वेळा असेही होते की, एखादे काम कबूल केलेले असते पण वेळे अभावी होत नाही. काळी वेळा आपण सर्वजण ठरवतो की, जे काही काम असेल ते आपण पूर्ण करू या. येथे ज्यावेळी उल्लेख झाला त्यावेळी मी सभागृहाच्या बाहेर होतो. सभागृहाच्या कामकाजाची वेळ सकाळी 11.00 ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत नियमाने ठरविलेली आहे. सायंकाळी 6.00 वाजल्यानंतर अपवादात्मक परिस्थितीमध्ये किती वेळ पुढे जायचे हा देखील एक मुद्दा आहे. आम्ही नाकारलेले कधीच नव्हते. अशा प्रकारे माननीय सभापतींना भावना व्यक्त करावी लागणे हे त्यांना ज्या प्रमाणे रूचले नाही त्याप्रमाणे आम्हाला देखील त्याच्या यातना झाल्या. उद्या पासून आम्ही त्यांच्या दालनात चर्चेसाठी गेल्यानंतर ते ध्वनिमुद्रण करणार आहेत. त्यामुळे मी उद्यापासून चांगले ध्वनिमुद्र यंत्र शोधण्याच्या प्रयत्नात आहे. आमच्या माननीय सभापतींनी सन्माननीय सदस्यांबद्दल अशा भावना व्यक्त करणे अयोग्य आहे. आम्ही खोटारडे आहोत अशा प्रकारच्या भावना व्यक्त करणे अयोग्य आहे. मराठी भाषेत सांगावयाचे झाले तर आम्ही "लायर्स" आहोत. हे बरोबर नाही. सत्ताधारी पक्षाला जी मराठी भाषा समजते त्या भाषेत मी सांगितलेले आहे. "लॉयर" आणि "लायर्स" ह्यामध्ये खूप फरक आहे. हे आम्हाला बोलणे दु:खदायक आहे आणि माननीय सभापतींनी आम्हाला बोलणे हे त्यांना क्लेशकारक आहे. हे मी मुद्दाम नमूद करू इच्छितो.

येथे अशा प्रकारचा कोणताही विषय नव्हता. पण चांगले झाले. अपवादात्मक बाब म्हणून का होईना आपण आज रात्री 10.00, 11.00 वाजेपर्यंत काम करू या. त्यांनी रागाने पुढे एवढे पण सांगून टाकले की, विधेयकानंतर अर्धा तास

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

चर्चा घेणार. आम्ही अकरा काय बारा वाजेपर्यंत देखील थांबायला तयार आहोत. फक्त आपला आदेश हवा. तरी देखील माझे म्हणणे आहे की, आपण जो 11.00 ते 6.00 वाजेपर्यंत कामकाज घेण्याचा नियम केला आहे तो पाळू या. आमचा तो उद्देशही नव्हता, आणि लपवलेही नव्हते आणि सांगितले नव्हते. एखाद्या विषयासंबंधी आम्ही आपल्याकडे विश्वासाने येऊन बोलतो. तेव्हा लपवालपवीचा विषयच नसतो. त्यामुळे ते बरोबर आहे असे मला वाटत नाही. माझ्या व्यक्तिगत संबंधासंबंधी खुलासा केला. शासकीय विधेयके रात्री बारा, एक वाजेपर्यंत चालविण्यास आमची काहीही हरकत नाही. फक्त ट्रेझरी बेंचवरील सन्माननीय सदस्यांनी हजर रहावे हे मात्र मी आग्रहाने सांगतो. मघाशी बोलताना त्यांनी सांगितले की, विरोधी पक्षाची देखील कामकाज चालविण्याची जबाबदारी असते. ती जबाबदारी आमच्या एकट्याची नाही. खरी जबाबदारी ट्रेझरी बेंचची आहे. आम्ही नेहमीच सहकार्य करतो. ते आजपर्यंत केलेले आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : माननीय सभापती महोदय, आजच्या कामकाजासंबंधी आपल्या दालनात गटप्रमुखां समवेत आपली चर्चा झाली. त्यासंबंधी आपण एक निवेदन केले होते. ते निवेदन करताना मी देखील सभागृहात उपस्थित होतो. सभागृह चालवताना आपण एकत्रितपणे विचार करून निर्णय घेत असतो व त्या प्रमाणे कामकाज चालते. सन्माननीय सदस्यांनी "खोटारडा" किंवा "लायर्स" हा शब्द प्रयोग वापरला आहे. अशा प्रकारची भावना माननीय सभापतींची नव्हती हे आम्हाला देखील माहीत आहे. त्यामुळे ते दोन शब्द कामकाजात राहणे बरोबर वाटत नाही म्हणून सदर दोन्ही शब्द आजच्या कामकाजातून काढून टाकावेत अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आपण आपल्या भावना व्यक्त करून निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयाची पार्श्वभूमी अशी होती की, आपल्या दालनात जी काही चर्चा झाली त्याचा उल्लेख सभागृहात केला. या सदनातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम सभागृहात असे म्हणाले की, त्यांनी काय चर्चा केली हे आम्हाला माहीत नाही. अशी ज्यावेळी चर्चा झाली त्यावेळी माननीय सभापतींनी सांगितले की, अशी आमची चर्चा झाली होती. तेव्हा माननीय विरोधी

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

पक्ष नेते श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी देखील विचार मांडले होते. तेव्हा माननीय सभापतींनी विचार मांडले की, आपली अशी चर्चा झाली आहे. त्यानुसार आपल्याला कामकाज घ्यायला हवे. त्यामुळे येथे खोटारडे व अन्य जे काही शब्द वापरले आहेत हे तितकेसे योग्य नाही. ते रेकॉर्डवर राहू नयेत एवढीच आमची विनंती आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, राज्याचे मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी बिल मांडल्यानंतर एक वेगळा विषय सभागृहामध्ये चर्चेला आला आहे. माझी एवढीच विनंती आहे की, माननीय सभापतींनी निर्णय दिल्यानंतर त्यावर कसल्याही प्रकारची चर्चा होणे हे योग्य नाही. एवढेच नव्हे तर टीकाटिपणी किंवा काही मत व्यक्त करणे हे देखील योग्य नाही. आम्ही देखील बरीच वर्षे सदस्य या नात्याने या सदनात काम करीत आहोत. कधीच अशा प्रकारची चर्चा होत नाही. त्यामुळे सर्वांना विनंती आहे, तसेच माननीय सभापती महोदय आपल्यांना देखील विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी बिल मांडल्यानंतर जी काही चर्चा उपस्थित झाली आहे. त्यात सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, श्री.बाळासाहेब थोरात, भाई जगताप यांनी भाग घेतला. ती सगळी चर्चा कामकाजातून काढून टाकावी व त्या विषयाला पूर्णविराम द्यावा अशी माझी विनंती आहे.

सभापती : मी मघाशी प्रथम आलो त्यावेळी मी काय बोललो ते सभागृहातील सन्माननीय सदस्यांना माहिती आहे. माझ्या दालनात सन्माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते साहेब आले त्यावेळी उद्याच्या कामकाजाची देखील चर्चा झाली. उद्या नियम 260 अन्वयेचे दोन प्रस्ताव आहेत, असे मी सांगितल्या नंतर त्यांनी मला असे सूचित केले की पहिला कायदा व सुव्यवस्थेचा प्रस्ताव आहे. ती अडीच तासाची चर्चा घ्यावी.

यानंतर श्री.सरफरे....

अप्रमाणित प्रत / प्रमाणित नाही

सभापती ...

आणि त्यानंतर सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव चर्चेसाठी घेण्यात यावा अशी चर्चा झाली. त्या करिता सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांना मी नंतर बोलाविले, मी त्यांच्यासाठी वाट पाहिली. अशा पध्दतीने उद्याच्या सभागृहाच्या कामकाजाची चर्चा झाली. शेवटी सभागृहाचे कामकाज चालवितांना दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा करुन त्या मधून होणाऱ्या निर्णयाबरहुकूम आपण चर्चा करीत असतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या बाबतीत किंवा सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या बाबतीत "खोटारडा" किंवा अन्य असा कोणताही शब्द मी वापरलेला नाही. आणि माझ्या आयुष्यात असा शब्द माझ्या तोंडामधून येण्याची शक्यता नाही. सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी मांडलेला मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात जे बोलले ते मी कामकाजातून काढून टाकीत आहे. आता सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या विधेयकावर आपण चर्चा करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) विधेयक

L. C. BILL NO. VI OF 2011 (A BILL FURTHER TO AMEND THE SHREE SAI BABA SANSTHAN TRUST (SHIRDI) ACT, 2004) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE JOINT SELECT COMMITTEE

चर्चा पुढे चालू

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या विधेयकासंबंधी मी थोडक्यात राज्य शासनाची भूमिका मांडू इच्छितो. श्री साईबाबा शिर्डी संस्थान विश्वस्त व्यवस्था हा एक रजिस्टर ट्रस्ट असून तो 1950 साली स्थापन करण्यात आला आहे. त्या ठिकाणी येणाऱ्या असंख्य भाविकांसाठी अधिक सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि त्यासाठी जमा होणाऱ्या निधीचा विनियोग योग्य रितीने व्हावा यासाठी राज्य सरकारने सन 2004 मध्ये श्री साई बाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी असा अधिनियम पारित केला होता. त्या कायद्यामध्ये कालांतराने परिस्थितीनुसार बदल करण्यात आला. या कायद्याच्या कलम 17 मध्ये समितीची कर्तव्ये आणि कलम 21 मध्ये विश्वस्त निधीचा विनियोग करण्यासाठी विस्तृतपणे तरतूद करण्यात आली आहे. मागील काही वर्षात शिर्डीमध्ये श्री साई बाबा यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी भक्त गणांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.त्यामुळे देशाच्या काना-कोपऱ्यामधून रेल्वेने, बस गाडयांमधून, विविध वाहनांव्दारे लाखोंच्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. त्या ठिकाणी खूप मोठया प्रमाणात गर्दी होते आणि म्हणून अधिकाधिक नागरी सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न कायद्यानुसार शासनाने जे प्राधिकरण नेमले आहे त्याच्या माध्यमातून होत आहे.

अलिकडच्या काळात मोठया प्रमाणात भक्तगण येत आहेत त्यामुळे शिर्डी येथे विमानतळाची गरज असल्याचे सर्वांच्या लक्षात आले आहे. त्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. त्या अनुषंगाने शिर्डीलगतच्या परिसरात विमानतळासाठी लागणारी जवळ जवळ 300 हेक्टर जमीन संपादित केली असून पुढील कारवाई अपेक्षित आहे. त्यासाठी लागणारा 40 कोटींचा निधी शासनाने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला दिलेला आहे. हे विमानतळ खाजगी सहभागातून उभारावे असा विचार समोर आला आहे. या कामासाठी जमीन उपलब्ध करुन सर्व जबाबदारी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे सोपविण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण....

हे करीत असतांना जवळ जवळ 50 कोटींचा निधी या विश्वस्त निधीतून देण्यात यावा याकरिता बैठका घेण्यात आल्या होत्या. पहिल्यांदा फेब्रुवारी 2007 मध्ये बैठक झाल्यानंतर जानेवारी 2009 मध्ये दुसऱ्या झालेल्या बैठकीमध्ये विमानतळाचा विकास करण्यासाठी राज्य सरकारच्या मान्यतेने अर्थ सहाय्य करण्याबाबत निर्णय घेतला होता. मात्र त्यानंतर कार्यवाही होऊ शकली नाही. एप्रिल 2011 मध्ये शिर्डी येथे विमानतळाचे काम जलद गतीने व्हावे यासाठी आर्थिक सहभाग म्हणून 50 कोटी रुपये देण्याचा ठराव विश्वस्त मंडळाने पारित केला . त्यानंतर ऑगस्ट 2010 मध्ये व एप्रिल 2011 मध्ये झालेल्या बैठकीमध्ये त्या बद्दल सविस्तर चर्चा होऊन शिर्डी येथे होणाऱ्या विमानतळाकरिता श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या निधीतून आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु या कायद्यानुसार विश्वस्त निधीतून विमानतळ व तत्सम पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी थेट आर्थिक निधी उपलब्ध करण्यासाठी स्पष्ट तरतूद नसल्यामुळे या अधिनियमातील कलम 21 मध्ये सुधारणा करणे अपरिहार्य असल्यामुळे तशी सुधारणा या कायद्यामध्ये सुचविण्यात आली आहे.

सभापती महोदय, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियमच्या कलम 21 मधील तरतुदीमध्ये न्यासाकडील आर्थिक अधिकार वाढविण्यासाठी ही उपाय योजना प्रस्तावित केली आहे. यामध्ये शिर्डी येथे येणाऱ्या भाविकांसाठी पायाभूत सुविधांमध्ये विमानतळ, रेल्वे स्थानक, बस स्थानक किंवा तत्सम सुविधा विकसित करण्यासाठी लागणाऱ्या इतर पायाभूत सुविधा वृध्दिंगत करण्यासाठी राज्य सरकारची पूर्व परवानगी घेऊन राज्य सरकार या संदर्भात वेळोवेळी निर्देश देईल त्या मर्यादेत अटी व शर्तीना अधीन राहून शासकीय विभाग, शासकीय महामंडळे, शासकीय कंपन्या आणि शासनाच्या अधिपत्याखाली असणाऱ्या संस्था यांना सहाय्य किंवा अनुदान उपलब्ध करुन देण्याचे अधिकार विश्वस्त व्यवस्था न्यासाला प्रदान करण्यात यावेत अशाप्रकारचे हे विधेयक आहे. या प्रस्तावाला मंत्रीमंडळाच्या दिनांक 1.6.2011 रोजी झालेल्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर राज्यपाल महोदयांच्या मान्यतेने दिनांक 4.6.2011 रोजी अध्यादेश पारित करण्यात आला होता. सदर अध्यादेशाचे कायद्यामध्ये रुपांतर व्हावे या उद्देशाने हे विधेयक प्रसृत करण्यात आले आहे. आतापर्यंत या संस्थानाच्या विश्वस्त समितीने विमानतळाची उभारणी करण्यासाठी कबूल केल्याप्रमाणे देण्यात येणाऱ्या 50 कोटीपैकी 35 कोटी रुपये महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला प्रदान करण्यात आले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

सभापती महोदय, शिर्डी येथील संस्थानाचे वार्षिक उत्पन्न 255 कोटी रुपये असून त्यांचा वार्षिक खर्च 152 कोटी रुपये आहेत. त्यामधून संस्थानाकडे 100 कोटी रुपये शिल्लक राहतात, सदरचे सर्व पैसे बँकेमध्ये डिपॉझीट करुन ठेवले असून त्याशिवाय इतर चांदी-सोन्याच्या रुपाने देखील द्रव्य संस्थानाकडे शिल्लक आहे. या उद्देशाने या ठिकाणी प्रसृत करण्यात आलेले विधेयक असून हे विमानतळ सुरु झाल्यानंतर राज्यामध्ये फार मोठी सुविधा निर्माण होणार आहे. या विधेयकामध्ये हा अनेब्लिंग क्लॉज असून त्याकरिता या विधेयकाच्या कलम 21 मध्ये बदल करण्याचे प्रस्तावित केले आहे. या विधेयकाला सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

सभापती : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचा प्रस्ताव आहे. त्यांच्यापैकी कोणीही एकाने तो मांडावा.

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 6 श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम, 2004 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 25 सदस्यांच्या संयुक्त समितीकडून त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्याच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे. असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

सभापती : आता विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव यावर एकत्रित चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव प्रथम मतास टाकला जाईल व तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, याठिकाणी जे विधेयक आणलेले आहे, त्यासंदर्भात दिनांक 04 जून 2011 रोंजी सन्माननीय राज्यपाल महोदयांच्या हस्ते अध्यादेश काढण्यात आला आणि आता त्याचे कायद्यात रुपांतर करण्यासाठी आपल्या सर्वांसमोर हे विधेयक आणलेले आहे. मला एक गोष्ट पहिल्यांदा समजली पाहिजे की, या साठी कोणती तातडी होती ? कारण अधिवेशन लवकरच सुरु होणार होते असे असताना माननीय राज्यपालांच्या सहीने दिनांक 04 जून 2011 रोजी अध्यादेश काढण्याची गरज काय होती हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, आपण याठिकाणी 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 14 च्या कलम 21 मध्ये ही सुधारणा आणलेली आहे. मी सुरुवातीलाच एक गोष्ट सांगू इच्छितो की, मी देखील साईबाबांचा भक्त आहे आणि गेल्या 40 वर्षापासून शिर्डीमध्ये सतत जातो. याठिकाणी माननीय मंत्री श्री.राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित असून त्यांना देखील कल्पना आहे. गेल्या 40 वर्षामध्ये किमान महिन्यातून एकदा म्हणजे यामध्ये सतत सातत्य ठेऊन शिर्डीला जाऊन साईबाबांचे दर्शन घेणारा मी एक भक्त आहे. एक गोष्ट मला येथे समजली नाही की, शासनावर अशी वेळ का यावी ? म्हणजे साईभक्त त्याठिकाणी गेल्यानंतर त्यांच्या कुवतीनुसार जो काही धनादेश पेटीमध्ये टाकतात त्यातला पैसा घेऊन त्या साई भक्तांसाठीच खर्च करणे किंवा त्यापुढे जाऊनही आणखी काही बोलण्यासारखे आहे. कारण हे विधेयक तसे काही लहान नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, फक्त आपल्याला विमानतळासाठी 50 कोटी रुपयांची आवश्यकता आहे आणि ते तेवढयापुरते मर्यादित असते तर आमचे काही म्हणणे नव्हते. या विमानतळासाठी तातडी आहे, निधीची आवश्यकता आहे म्हणून आपण त्यातून 50 कोटी रुपये घेत आहोत.त्याकरता सदनामध्ये विधेयक मंजुरीसाठी आणलेले आहे असे असते तर काही अडचण नव्हती. पण हा विषय केवळ 50 कोटी रुपयांचा आणि विमानतळापुरता नाही. याठिकाणी खायचे दात वेगळे आणि दाखवावयाचे दात वेगळे अशा प्रकारचे हे विधेयक आहे. मी दुपारी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब यांना सांगत होतो की, या बिलासाठी घाई करु नका. कारण माझ्या वेगळया भावना होत्या. नाहीतर आम्ही पूर्वी रात्री सभागृहामध्ये 2-2 वाजेपर्यंत कामकाज केलेले आहे. त्याबाबत अडचण नाही. म्हणून याठिकाणी या विधेयकाच्या बाबतीत चांगला अभ्यास करुन, चांगल्या मेजॉरिटीने बसावे आणि वेळ पडली तर माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्याबरोबरही चर्चा करावी असे वाटत होते. हा भक्तांचा पैसा आहे आणि आपण याठिकाणी महामंडळाचा ओझरता उल्लेख केलेला आहे. सभापती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महोदय हे विधेयक लहान नाही. महाराष्ट्रातील सिध्दीविनायक ट्रस्ट असू दे किंवा महालक्ष्मी मंदिराचा ट्रस्ट असू दे, पंढरपूरचा ट्रस्ट असू दे, आता हळूहळू जेथे-जेथे देवस्थानाचा पैसा आहे, तिकडे शासनाचे लक्ष गेले आहे. म्हणजे एका बाजूला आमच्या तिजोरीमध्ये खडखडाट आहे, आमच्याकडे काही पैसा नाही. आमच्या डोक्यावर 2 लाख 40 हजार कोटी रुपयांचे कर्ज झाले आहे.अशा वेळी पैसा कुठून काढावयाचा ही एक बाब आहे आणि दुसऱ्या बाजूला बालकाश्रमा बाबत शासन 500 कोटी रुपयांचा घोटाळा करीत आहे म्हणजे एका बाजूला कोट्यावधी रुपयांचे घोटाळे करावयाचे, दुसऱ्या बाजूला जनतेचा पैसा लुबाडावयाचा. त्याचबरोबर भक्तांच्या पैशावर देखील डोळा ठेवावयाचा अशी परिस्थिती आहे. या विधेयकामध्ये विसंगती आहे. 50 कोटी रुपये खर्च करुन विमानतळ बांधले तर त्यामध्ये काही अडचण नाही. पण तेवढया पुरते विधेयक मर्यादित नाही. शासनाचा हेतू यातून स्पष्ट होतो असे आपण म्हटले तरी त्यांचा हेतू स्वच्छ नाही. म्हणून आपण याबाबतीत जाहिरात दिली पाहिजे. जनतेचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. कारण जनतेला, भक्तगणांना हे मान्य आहे काय ? आज शासनाची 27 महामंडळे तोट्यामध्ये आहेत अशा महामंडळांकडे आपण भक्तगणांचा पैसा वळविणार आहात काय ? मग महामंडळ म्हणजे कोणकोणती ते स्पष्टपणे सांगा. ते कळले पाहिजे. एकदा महामंडळ म्हटल्यानंतर आमच्या डोळ्या समोर पांढरे हत्ती आलेच. जी महामंडळे तुमच्या कार्यकर्त्यांसाठी लाल दिव्याची गाडी देऊन . . .

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

आम्ही जेव्हा सत्ता हातामध्ये घेतली तेव्हा आमच्या डोक्यावर पहिल्या शासनाचे 16 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. आपण तपासून घ्यावे कारण मी जबाबदारीने बोलत आहे.

श्री.अजित पवार (खाली बसून) : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम, जाऊ द्या.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, येथे बोलले पाहिजे. तेही सांगतो. सन्माननीय सदस्य मला चांगला प्रश्न विचारीत आहेत.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी मला उद्देशून बोलावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मग आपण त्यांनाही आदेश द्यावेत की त्यांनी माझ्या भाषणामध्ये व्यत्यय आणू नये. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण मला संरक्षण द्यावे.

श्री.अजित पवार (खाली बसून) : जे बसून बोलत आहेत, त्यांची दखल घेऊ नका.

. . . .2 वाय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : आपण सांगाल पण आपले दादागिरीचे दादापण तेथे दिसत नाही. आपण येथे असतानाही सन्माननीय सदस्य मध्ये बोलतात याचे मला आश्चर्य वाटते.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी भाषण सुरु करावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण सगळा राग माझ्यावर का काढत आहात? जेव्हा आम्ही सत्ता हातामध्ये घेतली तेव्हा कॉंग्रेसच्या शासनाचे 16 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. आम्ही 18 हजार कोटीचे कर्ज काढले आणि आम्ही सत्ता सोडली तेव्हा 36 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. हे मान्य आहे. पण आम्ही हे सांगतो की, कृष्णा खोऱ्यासाठी 7 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले.मुंबईमध्ये 55 उड्डाण पूल बनविले आणि त्यासाठी 5 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले.तसेच मुंबई-पुणे रस्ता तयार केला त्यासाठी देखील 5 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले. अनेक जिल्हे टँकरमुक्त केले आणि नळ पाणी पुरवठा योजना तयार केल्या. यासाठी आम्ही 2 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले. आम्ही गाव तेथे रस्ता बनविण्याचे काम केले. मोफत शौचालये बांधली त्यासाठी दीड हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले. आम्ही याचे हिशोब देतो, तसे तुम्ही सांगा. आज तुमच्यावर 2 लाख 40 हजार कोटी रुपयांचे कर्ज झाले आहे. याबाबतीत श्वेतपत्रिका काढावी अशी माझी मागच्या वेळेपासूनची मागणी आहे. मग हा पैसा कोणाच्या खिशात, कोणाच्या घशात गेला, तो कुठे खर्च केला, कोणाच्या मतदार संघामध्ये खर्च झाला याची माहिती द्यावी. मी आमच्या काळातील हिशोब दिला आहे. मग तुमच्यामध्ये हिंमत असेल तर 2 लाख 40 हजार कोटी रुपयांचा हिशोब द्यावा.

सभापती महोदय, याठिकाणी माझे सन्माननीय मित्र, माझे बंधू श्री.भाई जगताप सदनामध्ये नाहीत. पण मी त्यांची मुलाखत पाहिली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, तुम्ही काढलेल्या कर्जाचे व्याज अजून आम्ही भरत आहोत. पण आमच्या शासनाने किती कर्ज घेतले होते, तुमच्या शासनाने किती कर्ज घेतले होते आणि त्याचे व्याज कोणी किती भरले याचाही हिशोब झाला पाहिजे. म्हणून तुम्ही एका बाजूला राज्याला कर्जबाजारी केले. मोठया प्रमाणात कर्ज उचलण्यात आले आणि आपल्यासमोर कामे कोणतीही नाहीत. दारिद्र्य रेषेखालील जी जनता आहे, ती अधिक खाली जात आहे. जेव्हा तुम्ही मोठया प्रमाणात कर्ज उचलता तेव्हा दारिद्र्यरेषेखाली असलेले लोक वरच्या स्तरावर आले पाहिजेत. पण या शासनामध्ये उलटी गंगा वाहत असल्याचे पहावयास मिळत आहे. जेवढ्या वेळेला अर्थसंकल्प सादर होत आहेत, तेवढया वेळेला दारिद्र्यरेषेखालील लोक आणखी खाली जात आहेत. राज्यात 7 लाख आदिवासी कुटुंबे आहेत आणि त्यातील 95 टक्के आदिवासी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आज देखील दारिद्र्य रेषेखाली आहेत. आपण कोणासाठी काम करीत आहोत? अर्थसंकल्पामधील निधी कुठे जातो ? आमच्या डोक्यावर 2 लाख 40 हजार कोटी रुपयांचे कर्ज झालेले आहे ....

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : सन्माननीय सदस्यांनी विधेयकावर बोलावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी विधेयकावरच बोलत आहे.

यानंतर कु.थोरात . . .

अप्रधारित पत्र / प्रतिलिपीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

सभापती महोदय, आम्हाला कळले पाहिजे. 21 ते 22 लाख आदिवासींपैकी आज देखील 99 टक्के आदिवासी दारिद्रयरेषेखाली आहेत. मग कोणासाठी काम करण्यात येत आहे? श्री साई बाबांच्या ट्रस्टमधील पैसा कोणासाठी वापरावयाचा आहे, हे स्पष्ट झाले पाहिजे. फक्त विमानातून येणाऱ्या लोकांसाठीच हा देवाचा पैसा खर्च करावयाचा नाही तर शेवटच्या टोकावर असलेल्या आदिवासी माणसासाठी देखील हा पैसा खर्च करावयाचा आहे, नेमके काय? हे चित्र स्पष्ट झाले पाहिजे. भक्तांसाठी विविध योजना आमच्या समोर मांडल्या जात आहेत. साईबाबांच्या ट्रस्टमधील परिस्थिती माननीय मुख्यमंत्र्यांनी व्ही.आय.पी. म्हणून जाऊन बघावी. शिर्डीच्या संस्थानामध्ये मी गेली 40 वर्षे सतत जात आहे. मी सकाळी ज्यावेळी तेथे आरतीसाठी जातो त्यावेळी त्या ठिकाणी सर्व विश्वस्तांचे 10-10, 20-20 माणसे आलेली असतात. ते व्ही.आय.पी. मध्ये बसलेले असतात आणि आम्ही उभे असतो. हे कोण आहेत असे विचारण्यात आल्या नंतर ती विश्वस्तांची माणसे आहेत असे सांगण्यात येते. एक कोणी तरी उत्तर भारतीय माणूस आहे, मला येथे त्याचे नाव घ्यावयाचे नाही. 25-25 लोकांना आतमध्ये आणण्याचे काम तो करीत असतो. सकाळी त्याला फक्त तेवढेच काम असते. त्याचा हा एक कलमी कार्यक्रम चाललेला असतो. श्रध्देने त्या ठिकाणी येणारे जे साई बाबांचे भक्त आहेत, जे तेथील पेटीमध्ये दान करतात, त्या पेटीकडे ज्या वेळी शासनाचे लक्ष जाते, त्यावेळी तेथील भक्तांना देखील कशा सुविधा मिळतील याकडे लक्ष देण्याची जबाबदारी शासनाची आहे. सभापती महोदय, माझी आपल्या मार्फत शासनाला विनंती आहे की, शासनाने या पुण्याईच्या पैशाला हात लावू नये.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या बस वाहनतळाला कुठे जागा घेतलेली आहे, हे मला माहीत नाही. सध्या एक किलो मीटर अंतरावर मोठे वाहनतळ आहे. मग नवीन बस वाहन तळाची व्यवस्था करावयाची असेल तर त्यासाठी जागा आहे का, भूसंपादन केलेले आहे का? असे काही असेल तर आम्हाला सांगण्यात यावे. भविष्यामधील पाच-दहा वर्षातील बस वाहन तळाची योजना असेल तर ते वाहनतळ कुठे तरी दोन-तीन किलो मीटरच्या अंतरावर असले पाहिजे. लोक पायी चालत येणार नाहीत. मग तशा प्रकारचे शासनाचे काही नियोजन आहे काय? असेल तर शासनाने ते स्पष्ट करावे. या ठिकाणी दर वर्षी जवळ जवळ साडे तीनशे कोटी रुपये जमा होतात. दागिने वगैरे सगळे धरुन

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम.....

350 कोटी रुपये जमा होतात. म्हणून ज्या बस वाहन तळाचा उल्लेख केलेला आहे, त्याचे काय नियोजन केलेले आहे, हे नेमके कळले पाहिजे. ही जागा नेमकी कुठे आहे, या वाहनतळासाठी किती पैसा खर्च करण्यात येणार आहे? थोडया वेळापूर्वी सन्माननीय मुख्यमंत्री यांनी सांगितले होते की, संबंध देशातूनच नाही तर देशाच्या बाहेरुन देखील या ठिकाणी लोक येत असतात. तिरुपतीपेक्षाही अधिक जास्त प्रमाणात साईबाबांच्या शिर्डी संस्थानात भक्तगण येतात, त्या बद्दल दुमत नाही. अंधश्रध्दा निर्मूलन विधेयकाच्या बाबतीत ज्यावेळी हा विषय येईल, त्यावेळी मी या विषयावर बोलणार आहे. त्या विधेयकांच्या संदर्भात देखील हाच चमत्कारांचा विषय येणार आहे. बाबा त्यावेळी कसे चमत्कार करत होते, पाण्याने दिवे कसे लावत होते हा मुद्दा अंधश्रध्देच्या विधेयकाच्या चर्चेच्यावेळी येणार आहे. उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर स्टेटमेंट केलेले आहे की, यावेळी मी हे विधेयक माझ्या पध्दतीने पास करणार आहे.

श्री. अजित पवार (बसून) : मी असे कधी म्हटलेले नाही.

श्री. रामदास कदम : मी या संदर्भात अवाक झालो, दादा असे कसे म्हणू शकतात? दादांची दादागिरी सर्व ठिकाणी कशी चालू शकते. साईबाबा देखील अनेक चमत्कार करीत होते. हे सर्व चमत्कार कशा रीतीने करण्यात येतात हे अंधश्रध्दा निर्मूलना संबंधीच्या विधेयकामध्ये सांगण्यात आलेले आहे. श्री साई बाबांचा पैसा घेण्यासाठी या ठिकाणी विधेयक आणण्यात येत आहे. सभापती महोदय, बस वाहनतळाचा विषय सोडा पण आज मोठया प्रमाणात खाजगी वाहने त्या ठिकाणी येतात. या खाजगी गाडयांसाठी कुठेही वाहनतळ नाही. रस्त्याच्या दोन्ही बाजूला गाडया उभ्या असतात. या कामांचा पोलिसांवर मोठा ताण पडलेला आहे. शिर्डीमध्ये तांबे नावाचे पोलीस इन्स्पेक्टर आहेत, त्यांची या कामामुळे झोपच उडालेली आहे. ते कधी झोपतात हे मला माहीत नाही. तेव्हा या ठिकाणी बस वाहनतळा पेक्षा खाजगी वाहनतळाची आवश्यकता आहे. यासाठी जागेचे भूसंपादन करण्यात येणार आहे का, आजूबाजूला जागा आहे का, तसा सर्व्हे तहसीलदारकडून केलेला आहे का, त्यासाठी किती पैसे लागणार आहेत, याची माहिती शासनाजवळ आहे का? ज्यावेळी या सभागृहात या संदर्भात विधेयक आणण्यात येते, त्यावेळी या संदर्भातील सर्व माहिती घेऊन ते या सदनामध्ये आणण्यात येते. पण तशा पध्दतीने नियोजन करण्यात आलेले आहे काय?

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम.....

सभापती महोदय, रेल्वे स्थानकाच्या बाबतीत मी या ठिकाणी बोलणार आहे. रेल्वेस्थानकाच्या भूसंपादनासाठी जवळ जवळ 5 कोटी रुपयांची आवश्यकता होती पण माझी माहिती अशी आहे की, केंद्र शासनाच्या माध्यमातून जवळ जवळ 15 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. या विधेयकात रेल्वेस्थानकाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या रेल्वेस्थानकासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून पैसा देण्याची काही आवश्यकता नाही. केंद्र शासन सक्षम आहे. सभापती महोदय, माझ्या माहिती प्रमाणे येथील रेल्वेस्थानकाच्या भूसंपादनाची 5 कोटी रुपये किंमत काढण्यात आली होती. असे असताना केंद्र शासनाने त्या ठिकाणी 15 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. एका बाजूला केंद्र शासन पैसे खर्च करीत असताना त्याचा या ठिकाणी उल्लेख करुन या रेल्वेस्थानकासाठी देखील पैसा खर्च करावयाचा आहे. कशासाठी रेल्वेस्थानकासाठी पैसा खर्च करावयाचा आहे? केंद्र शासन सक्षम आहे.माननीय मुख्यमंत्र्यांचे केंद्र शासनामध्ये चांगले वजन आहे. त्यामुळे काही अडचण येईल असे मला वाटत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांच्या शब्दाला आजही दिल्लीमध्ये किंमत आहे आणि ती उद्याही असेल. सभापती महोदय, एक गोष्ट मी अतिशय गांभीर्याने सांगत आहे. या विधेयकात रेल्वेस्थानकाचा उल्लेख केलेला आहे. पण या रेल्वेस्थानकासाठी साईबाबा संस्थानचा एकही पैसा खर्च करण्याची आवश्यकता नाही. म्हणून हा उल्लेख यातून ताबडतोब काढून टाकण्यात यावा. मी मघाशी उल्लेख केल्या प्रमाणे 5 कोटी रुपयां ऐवजी 15 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. केंद्र शासन पूर्णपणे सक्षम आहे. म्हणून या सभागृहाचीच नाही तर या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेची दिशाभूल करण्याचे काम या विधेयकाच्या माध्यमातून होत आहे, असे मी म्हटले तर चुकीचे आहे असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, या विधेयकातील बसवाहन तळाचा आणि रेल्वेस्थानकाचा उल्लेख पूर्णपणे चुकीचा आहे. तसेच विमानतळाचा उल्लेख केलेला आहे. हा पैसा सर्वसामान्य गरीब माणसांचा पैसा आहे. विमानातून गरीब माणसे येणार नाहीत. म्हणजे जमिनीवर चालणाऱ्या माणसाची व्यवस्था शासन करत नाही पण विमानातून येणाऱ्या लोकांची काळजी घेण्यात येत आहे. त्यासाठी गरीब भक्तांचे पैसे खर्च करण्यात येणार आहेत. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी अशा प्रकारचे विधेयक आणले असते की, हा सगळा पैसा महाराष्ट्रातील फक्त गरीब, धनगर, आदिवासी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

माणसासाठी, मागासवर्गीयांसाठी खर्च करण्यात येईल तर आम्हाला बरे वाटले असते, समाधान वाटले असते. पण नेमके सर्वसामान्य माणसाच्या विरुध्द विमानतळासाठी हा पैसा खर्च करण्यात येणार आहे. सभापती महोदय, या विधेयकाला माझा आक्षेप एवढयाचसाठी आहे की, या विधेयकातील हेतू सर्वसामान्य माणसासाठी नाही. हा सर्वसामान्य भक्तांचा पैसा आहे. या शासनावर कोण विश्वास ठेवील? माननीय मंत्री महोदय श्री. राधाकृष्ण विखेपाटील साहेब, दिल्लीपासून आदर्शपर्यंत सगळे घोटाळे समोर येत आहेत.

सभापती महोदय, मी मंत्री महोदय, श्री. अजित पवार यांच्याकडे नागपूर अधिवेशनामध्ये 17 ते 18 घोटाळे दिले होते, त्याचे उत्तर मला मिळालेले नाही. त्या घोटाळयांची चौकशी झालेली नाही. म्हाडाचा दहा हजार कोटी रुपयांचा घोटाळा दिलेला आहे. कागदपत्रासह सर्व माहिती दिलेली आहे. अशा प्रकारे 5-5 हजार कोटी रुपयांचे घोटाळे करावयाचे आणि तो पैसा खालच्या अधिकाऱ्यापासून वरपर्यंत बसलेल्या सगळयांच्या घशात जाणार आणि येथे मात्र देवस्थानाच्या पैशातून विकासाच्या पाठीमागे लागत आहोत.

यानंतर श्री. बरवड....

अप्रधारित प्रत / परिषद परिषद

श्री. रामदास कदम .....

म्हणजे भिकेचा कटोरा घेऊन भक्तांचे पैसे घेण्यासाठी शिर्डीमध्ये जात आहोत अशी या शासनाची उलटी अवस्था झालेली आहे. मला भीती आहे की, एकदा हे बिल पास झाले तर पुन्हा सिध्दिविनायक मंदिराच्या बाबतीत बिल येईल. महालक्ष्मी मंदिराच्या बाबतीत बिल येईल. कोणताही देव शिल्लक राहणार नाही. सगळे देव झाल्यानंतर मग कोणत्या ग्रामपंचायती सक्षम आहेत आणि कोणत्या ग्रामपंचायतींकडे पैसे शिल्लक आहेत काय हे बघा, माहिती काढा आणि ज्या ज्या ठिकाणी पैसे शिल्लक असतील त्या ठिकाणी शासनाचा डाका पडणार, डल्ला पडणार. या बिलाच्या पाठीमागे हेतू स्पष्ट नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी पहिल्यांदा सांगितले त्याप्रमाणे विमानतळासाठी 50 कोटी हे मी समजू शकतो. वास्तविक या पैशातून सर्वसामान्य गरीब माणसांचे मोफत ऑपरेशन होत असतील, गरीब आजारी माणसाला काही मदत होत असेल, दारिद्र्य रेषेखालील माणसाला मदत होत असेल तर ते फार मोठे पुण्याईचे काम आहे. ते साई बाबांना अपेक्षित होते. पण विमानातून येणाऱ्या माणसांसाठी माझ्या गरीब माणसांनी दिलेला पैसा खर्च व्हावा हे साई बाबांना अपेक्षित नाही. या ठिकाणी नेमके उलटे केले जात आहे.

सभापती महोदय, या बिलामध्ये असे म्हटले आहे की, "महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती." त्यांची खात्री या शासनाने पटवून दिली. यामध्ये काय तातडी आहे हे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले नाही. महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांच्या सहीने इतक्या तातडीने हा अध्यादेश काढण्याइतकी काय तातडी होती ? यामध्ये काहीही तातडी नव्हती. हे अधिवेशन इतक्या जवळ असताना देखील अशा पध्दतीने माननीय राज्यपालांच्या सहीने तातडीने अध्यादेश काढला. यामध्ये 'शासकीय कंपन्या' असा उल्लेख केलेला आहे. या शासकीय कंपन्या कोणत्या ? पुढे 'शासकीय उपक्रम' असा उल्लेख केलेला आहे. म्हणजे आपण कोणत्याही खात्याच्या शासकीय उपक्रमाला पैसे देऊ शकता. उद्या जर दादांना वाटले की, माझ्या खात्यामध्ये पैसे कमी आले आहेत, समाजकल्याण विभागाचे पैसे वळवून झाले, आदिवासींचे पैसे वळवून झाले, मग दादा हळूच म्हणतील की, तिकडचे पैसे माझ्याकडे द्या. यामध्ये आपण 'शासकीय उपक्रम' असा उल्लेख केला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

आहे. यामध्ये बिलाचा उद्देश स्पष्ट होत नाही. या अगोदर या महाराष्ट्रामध्ये गरीब माणसांचे, आदिवासीचे, समाजकल्याणचे पैसे देखील जे सक्षम मंत्री आहेत त्यांच्या खात्यामध्ये आलेले आहेत. शासकीय उपक्रम देखील आपण यामध्ये घातलेले आहेत. म्हणजे शासनाला ज्या ज्या ठिकाणी वाटेल त्या त्या ठिकाणी हे पैसे त्या विश्वस्तांकडून सन्माननीय मुख्यमंत्री कधीही घेऊ शकतात, अशा प्रकारचे हे बिल आहे. म्हणजे यापुढे विश्वस्त हे फक्त नामधारी असतील. त्या विश्वस्तांचा सगळा ताबा, त्याहीपेक्षा शिर्डीच्या साई बाबांच्या खजिन्याच्या सगळ्या चाव्या यापुढे माननीय मुख्यमंत्र्यांच्या हातामध्ये असतील, महाराष्ट्र शासनाच्या हातामध्ये असतील. हे पैसे जनतेचे आहेत. जनतेने हे पैसे साईबाबांच्या ट्रस्टसाठी दिलेले आहेत. त्यांनी हे पैसे शासनासाठी दिलेले नाहीत. आता सरकारवर जनतेचा विश्वास राहिलेला नाही. आपण आता ते दिवस विसरुन जावे. हे पैसे भक्तांचे आहेत. भक्तांनी हे पैसे आपल्या शासनासाठी दिलेले नाहीत. हे पैसे भक्तांनी मोठ्या विश्वासाने कालपर्यंत त्या विश्वस्तांच्या माध्यमातून जी सेवा चालली होती त्यासाठी दिलेले आहेत.

ते संस्थान सरकारच्या अधिपत्याखाली आहे हे मान्य आहे. त्याबद्दल कोठेही दुमत नाही. मी ते नाकारत नाही. मला त्याची कल्पना आहे. पण कालपर्यंत जे काम चालले होते, एखादा माणूस आजारी पडला आणि आमची एखादी चिट्ठी गेली तर त्यांना मदत व्हावयाची. श्री. ससाणे हे फार चांगले काम करीत आहेत. कोणी काहीही म्हणून द्या पण श्री. ससाणे गरीब आहेत आणि चांगले काम करीत आहेत, याबद्दल दुमत नाही. त्यासाठी माझ्या शिफारशीची आवश्यकता नाही. चांगल्याला चांगले म्हणणे काही चुकीचे नाही. श्री. ससाणे यांच्या अध्यक्षतेखाली विश्वस्त म्हणून कालपर्यंत चांगले काम चालले होते. आतापर्यंत आम्ही कधीच तक्रार केली नाही. मी त्या ठिकाणी गेली 40 वर्षे जात आहे. मी कालपर्यंत सभागृहात देखील कधीही विषय काढला नाही. अपवाद म्हणूनही कधी विषय काढला नाही. पण आता अचानक असे काय झाले की, सरकारच्या तिजोरीमध्ये इतका खडखडाट झाला आणि त्यामुळे शासनाचे लक्ष त्या तिजोरीकडे गेले ? त्या ठिकाणी 250 कोटी रुपये आहेत. मग त्यापेक्षा जे घोटाळे झाले, जे भ्रष्टाचार झाले त्यातून काही निघते काय ते बघावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रामदास कदम ....

मी माननीय मुख्यमंत्र्यांना पुन्हा विनंती करतो की, आपल्याकडे मी ज्या फाईल्स दिलेल्या आहेत त्या गांभीर्याने बघाव्यात. गेल्या 10 वर्षात म्हाडाकडून आपल्याला ज्या खोल्या येणार होत्या त्या आल्याच नाहीत. त्या खोल्या अधिकाऱ्यांनी परस्पर संगनमताने विकून टाकल्या. आपण सी.आय.डी. चौकशी करावी. आपल्याला दोन महिन्यांमध्ये 10 हजार कोटी रुपये मिळतील. या 250 कोटी रुपयांची आपल्याला आवश्यकताच पडणार नाही. मी हे प्रामाणिकपणे सांगत आहे. मी नवीन सदस्य नाही. सदस्य म्हणून ही माझी पाचवी टर्म आहे. विधानसभा सभागृहामध्ये माझ्या चार टर्म्स झालेल्या आहेत. मी सगळा अभ्यास केलेला आहे. मी आपल्याकडे असे 17-18 घोटाळे दिलेले आहेत. त्याचा अभ्यास करुन त्यातून जर काही निघत असेल तर देवाच्या या पैशावर आपण डोळा का ठेवावयाचा ? साई बाबांच्या पैशाचा उपयोग अशा पध्दतीने विमानतळासाठी किंवा अन्य गोष्टींसाठी करण्यापेक्षा माननीय मुख्यमंत्री साहेब, माझ्या आपल्याला शुभेच्छा आहेत, पण उद्या बाबांचा वेगळा चमत्कार देखील व्हावयास नको. मी आपल्याला सांगू इच्छितो की, या पैशाचा उपयोग जर चांगला झाला नाही तर पुढची धोक्याची घंटा मी आपल्याला सांगत आहे. मी अनुभव घेतलेला आहे. मला चांगले अनुभव आलेले आहेत. परंतु आपल्याला वेगळे अनुभव येता कामा नये, हे पाप आपल्या हातून होता कामा नये म्हणून मला आपल्याला इशारा द्यावयाचा आहे.

सभापती महोदय, या बिलामध्ये शासकीय महामंडळांचा उल्लेख केलेला आहे. ही शासकीय महामंडळे कोणती आहेत, या शासकीय महामंडळांना आपण कशासाठी पैसे देणार आहात ? त्या पैशाच्या माध्यमातून नंतर कोणती कामे होणार आहेत याचा देखील खुलासा होणे अत्यंत गरजेचे आहे. मघाशी मी उल्लेख केला तेव्हा सांगण्यात आले की, ही महामंडळे नाहीत. मग शासकीय महामंडळे आणखी कोणती आहेत ? त्याचाही खुलासा होणे अत्यंत आवश्यक आणि गरजेचे आहे. माझी आपल्या माध्यमातून सन्माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे. माझ्या माहितीप्रमाणे आपण विमानतळासाठी जी 300 एकर जागा घेतलेली आहे त्या जागेचे भूसंपादन झालेले आहे आणि ती जागा देखील ताब्यात घेतलेली आहे. त्या ठिकाणी 50 कोटी रुपये खर्च करुन काही प्रमाणात काम होणार असेल तर आमची अडचण नाही. पण या सगळ्या पैशांवर शासनाचा अधिकार ठेऊन शासन म्हणेल त्या ठिकाणी ते सगळे पैसे टाकावयाचे, असे जर असेल तर ते पूर्णपणे चुकीचे होईल

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रामदास कदम .....

असे मला सांगावयाचे आहे. शेवटी शासन आपले आहे, आपले बहुमत आहे आणि निर्णय आपण घेणार आहात. आम्ही कितीही बोललो तरी आपल्याला हवे तेच होणार आहे. विधेयक मंजूर होणार आहे. कारण आमची मेजॉरिटी कमी आहे, हे मला माहीत आहे. आपल्या मनात जे आहे तोच निर्णय होणार आहे. काही सन्माननीय सदस्य लोकशाही आहे असे म्हणत आहेत. लोकशाही आहे हे मी मान्य करतो. पण काल आपण ती लोकशाही दाखवली नाही.

सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, 50 कोटी रुपये घेण्याइतपत जर हे विधेयक आणले असेल तर ठीक आहे, नसेल तर माझी आपल्याला विनंती आहे की, हे पैसे शिर्डीच्या साईबाबांच्या भक्तांचे कष्टाचे, मेहनतीचे, घामाचे आहेत. येणारा प्रत्येक भक्त ज्यावेळी दर्शन घेतो त्यावेळी कोठे तरी साईबाबांचे स्वप्न पूर्ण व्हावे, साईबाबांच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्रातील गरीब माणसांना मदत व्हावी या हेतूने यथाशक्ती त्या पेटीमध्ये पैसे टाकतो. त्या भक्तांच्या विश्वासाला तडा जाता कामा नये. याची देखील आपण दखल घेतली पाहिजे असे मी प्रामाणिक मत व्यक्त करतो. मी कोणत्याही राजकीय अभिनिवेशाने या ठिकाणी बोललेलो नाही. मी माफी मागून माननीय सभापती महोदयांना सांगेन की, माझा उद्देश फक्त एवढाच होता की, हा जो बाबांचा पैसा आहे, हा भक्तजनांचा पैसा आहे. या पैशाचा विनियोग शासकीय महामंडळे किंवा अन्य ठिकाणी न होता त्या पैशाचा विनियोग शेवटच्या माणसासाठी, मग तो आदिवासी असेल, मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत अशा गरीब शेतकऱ्यांसाठी, विधवा भगिनींसाठी, महिला बचत गटांसाठी, अशा चांगल्या कामांसाठी हे पैसे खर्ची पडले असते तर आनंद वाटला असता, समाधान झाले असते, बरे वाटले असते. पण विमानतळासाठी, शासकीय महामंडळासाठी, रेल्वेसाठी, अशा पध्दतीने हे पैसे त्या ठिकाणी लावू नयेत अशी माझी पुन्हा एकदा माननीय सभापतींच्या माध्यमातून विनंती करतो. मी या विधेयकाला पूर्णपणे विरोध करुन श्री. साई बाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) विधेयक, 2011 दोन्ही सभागृहांच्या 25 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठवावे अशी कळकळीची विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, वि.प.वि.क्र.6 श्री साई बाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) विधेयक सभागृहासमोर मांडण्यात आलेले आहे. या विधेयकासंबंधी काही मुद्दे मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, एक तर काही तत्वे, काही मूल्ये व काही श्रध्दा याच्याशी संबंधित हे विधेयक आहे. हे विधेयक 2004 साली शिर्डी संस्थानाबाबतच्या विधेयकावर दोन्ही सभागृहात खूप तपशीलवार चर्चा झाली होती. आपण त्यावेळी सभागृहात उपस्थित होता. धर्मस्थानांमध्ये कायद्याचा किती हस्तक्षेप असावा याचे उत्तर राज्य घटनेमध्ये आपण शोधण्याचा प्रयत्न करीत असतो. काही वेळा कायदा व श्रध्दा याच्यामध्ये गल्लत तयार होते त्यावेळी बरीच मतमतांतरे होणे स्वाभाविक असते. या विधेयकाच्या निमित्ताने एका संस्थानाचा विचार करीत आहोत. परंतु भाविकांच्या दृष्टीकोनातून विचार करावयाचा झाला तर माझ्याकडे माहितीपर लेखमालेचा तपशील आहे. त्या तपशीलाचा जर विचार केला तर तो विचार अतिशय आवश्यक वाटतो. त्यातील मोठ्या, निवडक 25 देवस्थानांचा विचार केला पाहिजे. मी त्या सर्व देवस्थानांची नावे घेणार नाही, त्यांची यादी मी पटलावर ठेवीन. परंतु डॉ.पी.आर.वेळापूरे यांनी त्यांच्यासंबंधी जो प्राथमिक अंदाज काढला आहे त्यानुसार या देवस्थानांमध्ये एकूण 5,752 कर्मचारी पूर्ण वेळ सेवेमध्ये आहेत. 11.60 कोटी व्यक्तींनी या 25 देवस्थानांना भेटी दिलेल्या आहेत, त्यामध्ये श्री साईबाबा शिर्डी संस्थानाचा सुध्दा समावेश आहे. या 25 देवस्थानांची मालमत्ता किती आहे ? आपण शिर्डीच्या देवस्थानाचा विचार करतो तेव्हा त्यांच्याकडून 100 कोटी रुपये मिळतील, त्यापैकी 50 कोटी रुपये विमानतळावर खर्च करण्याचा विचार करीत आहोत. परंतु या 25 देवस्थानांच्या मालमत्तेचा विचार करु लागलो तर बँकांसारख्या चांगल्या संस्था, सिंचन योजनेसारख्या चांगल्या संस्था, अनेक शैक्षणिक संस्था यांचा देखील दुरुपयोग करुन काही वेळा आर्थिक गैरव्यवहार किंवा भ्रष्टाचार झाल्याचे दिसते. परंतु 25 देवस्थानांकडील 1374 कोटींची मालमत्ता आहे. या देवस्थानांना एक वर्षामध्ये साधारणपणे 32-35 कोटी रुपयांच्या देणग्या मिळतात. त्यांचा खर्च मात्र 30 कोटीपर्यंत होतो. या सर्व देवस्थानांनी त्यांच्या परीने भाविकांचा जो पैसा आहे तो अतिशय जबाबदारीने जपून

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने हे विधेयक आणलेले आहे.

त्यामध्ये दोन महत्वाचे प्रश्न आहेत. यात पहिला प्रश्न पारदर्शकतेचा आहे. शासनाने पंढरपूर देवस्थानाला 400 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्या ठिकाणचे लोकप्रतिनिधी व त्या ठिकाणचे सर्व भाविक तेथे जातात त्यावेळी असे दिसते की, प्रत्येक ठिकाणी सरकारने किती पैसा उपलब्ध करुन दिला व प्रत्यक्षात किती पैसा भाविकांपर्यंत पोहोचला किंवा भाविकांसाठी किती सोयी सुविधा मिळाल्या याबद्दल फार मोठी तफावत दिसून येते. म्हणून एका विमानतळापुरता हा विषय नाही. माझ्या माहिती प्रमाणे काही भाविक संपूर्ण विमानतळाचा खर्च करण्यासाठी तयार आहेत. परंतु केंद्र सरकारकडून किंवा राज्य सरकारकडून ज्या कामांसाठी निधी उपलब्ध होऊ शकतो त्यासंबंधी शासनाने आणखी एक मुद्दा घेतलेला आहे. त्यात असे म्हटले आहे की, "या पैशातून 9 कामे करता येतील. यात रुग्णालय, दवाखाना, शारीरिक विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह, धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना एवढेच नाही तर सांस्कृतिक संघटना जी बिगर वाणिज्यिक असेल. तसेच स्थानिक नागरी सेवा व सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करणे" याचा यात उल्लेख केलेला आहे. यामध्येही पारदर्शकता असते. तेथील आमदार कोणत्या पक्षाचे आहेत म्हणून मी हे बोलत नाही. एरवी आमदार निधीमध्ये पारदर्शकता असते, खासदार निधीमध्ये पारदर्शकता असते, कोणता निधी कोणत्या कामासाठी वापरला गेला आहे. हा कायदा पुढे जाऊन राज्यात इतर जी देवस्थाने आहेत त्यांना लागू केला तर स्थानिक भाविक आहेत त्यांना नगरपंचायतीमार्फत फायदा होऊ शकेल. परंतु प्रत्यक्षात स्थानिक लोकप्रतिनिधींना मग ते कोणत्याही पक्षाचे असोत त्यांना अमर्याद अधिकार मिळतील. भाविकांनी दिलेला निधी हा त्या व्यक्तीसाठी दिलेला आहे. तुमची इच्छा असो की नसो, परंतु भाविकांच्या पैशावर अप्रत्यक्षरित्या लोकप्रतिनिधीमार्फत सरकारकडे ताबा गेलेला असेल. माझ्या माहिती प्रमाणे गुजरातचे मुख्यमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांनी वेरावळ येथे मंदिर व्यवस्थापन मॅनेजमेंट असा डिप्लोमा तयार केलेले आहे. अनेक मंदिरांचे व्यवस्थापन चांगले चालावे यासाठी संहितीकरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

ज्यावेळी शिर्डीच्या संस्थानाबद्दल व सिध्दीविनायक संस्थाबाबत सभागृहात चर्चा चालू होती त्यावेळी अनेक सन्माननीय सदस्यांनी मत व्यक्त केले होते की, कशा प्रकारे भाविकांचा सहभाग

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

असावयास पाहिजे. विश्वस्त संस्थांमध्ये महालक्ष्मी देवस्थानाचा उल्लेख आहे, तुळजापूर देवस्थानासंबंधी दि.16.7.2011 रोजी माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर आहे. तुळजापूर देवस्थानातील सोने व चांदीमध्ये तूट मोठ्या प्रमाणात आली होती. अशा घटना वारंवार घडल्या आहेत. दुसरीकडे पंढरपूर व कोल्हापूर येथील देवस्थानांकडे किती दागिने आहेत त्याची जसजशी माहिती होत चालली आहे तसतसे लोकांच्या लक्षात येत आहे की, आपण सोयी सुविधांसाठी पैसे दिले पाहिजेत. अन्यथा सोने व चांदीकडेच लक्ष ठेवण्याचे प्रकार होतील. म्हणून या विधेयकाला विरोध करीत असताना मी केवळ यासाठी विरोध करीत नाही की, सरकार कोणत्या पक्षाचे आहे आणि त्यांना या संस्थांकडून 50 कोटी रुपये मिळणार आहेत. महत्वाचा मुद्दा असा आहे की, देवस्थानांचे व्यवस्थापन चांगले व्हावे या दृष्टीकोनातून देवस्थानांचे व्यवस्थापन करणाऱ्या धर्मादाय संस्था आहेत त्यांना किती मार्गदर्शन केले जाते, त्यांना किती सक्षम करतो ? मी धर्मादाय आयुक्तांशी बोलले त्यावेळी धर्मादाय आयुक्तांकडे मर्यादित स्वरुपाचा कर्मचारीवर्ग आहे असे समजले. त्यांच्यामार्फत या देवस्थानांच्या केसेसचा पाठपुरावा होऊ शकत नाही. दुर्दैवाने महाबळेश्वर देवस्थानाची जमीन घेण्यासाठी शेवटी न्यायाधीश जे त्याचे ट्रस्टी आहेत, त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना सुध्दा देवस्थानाच्या जमिनींचा गैरव्यवहार करीत असताना खटला दाखल करण्याची वेळ आली. म्हणून देवस्थानांचे हित साभाळणे ही सरकारची जबाबदारी आहे, हा पैसा सरकारच्या कामासाठी वापरत असताना त्याचे निकष ठरविले पाहिजेत, त्यात पारदर्शकता नसेल तर अमर्याद पैसा हाती आल्यावर केवळ कंत्राटदाराची चांदी होणे, एकाच कामासाठी दोन-दोन ठिकाणाहून निधी आलेला असू शकतो परंतु एकाच ठिकाणचा निधी दाखविला जाणे मग तो केंद्र सरकारकडून, राज्य सरकारकडून की भाविकांकडून आलेला आहे ते स्पष्ट न करणे, याची तपशीलवार माहिती दिली जाणार नाही. त्यामुळे नगरपालिकांना सुध्दा असेच वाटण्याची शक्यता आहे की, सर्व पैसा आम्हीच वापरतो. आज पंढरपूर असेल, शिर्डी असेल या देवस्थानांमध्ये व नगरपालिका यामध्ये कोणाचा काय अधिकार आहे याबाबत मार्ग न काढता आपण शार्टकट किंवा छोटे पाऊल उचलले तर त्यातून मोठा धोका होऊ शकतो. या पैशातून एका विमानतळाचा प्रश्न

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुटेल.

खरा प्रश्न असा आहे की, या 9 कामांचे व्यवस्थापन कोण करणार आहे, त्या दृष्टीकोनातून ते एक आव्हान तयार होईल. कोर्टाची देखरेख असेल असे म्हणत असलो तरी तेथे सुध्दा प्रचंड दिरंगाई होत असते. माननीय मुख्यमंत्र्यांनी चांदी सोन्याचा उल्लेख केला आहे. आपण सगळयांनी पाहिले असेल की, केरळमधील पद्मनाभ मंदिरातील मालमत्तेसंबंधी सबंध देश पातळीवर चर्चा सुरु असताना देवाकडे असलेल्या सोन्या चांदीकडे लोकांचे लक्ष जाईल व त्यातून आज आपल्याला सोपे वाटते की, तेथून 50 कोटी रुपये मिळतील. तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींचा आदर ठेवून मला सांगितले पाहिजे की, डीपीडीसीमध्ये किंवा अन्य समित्यांमध्ये या निधीचा हिशोब मांडण्याची बाब अंतर्भूत करणार की नाही ? हे जर केले नाही तर शिर्डी देवस्थान न राहता एक संस्थान होईल व त्यावर संपूर्ण कब्जा घेण्याचा प्रयत्न होईल. म्हणून आमची अशी सूचना आहे की, या संपूर्ण देवस्थानाच्या व्यवस्थापनात जसे स्थानिक विधानसभेच्या लोकप्रतिनिधींना प्रतिनिधित्व असते तसेच लोकप्रतिनिधी म्हणून त्या भागातील खासदारांना सुध्दा प्रतिनिधित्व दिले पाहिजे. जेणे करुन केंद्र सरकारकडून योजना आणत असताना राज्य सरकारला सहकार्य होऊ शकेल. म्हणून या विधेयकाला विरोध करीत असताना असे सांगावयाचे आहे की, 2004 साली आम्ही विरोध केला. त्यावेळी असे वाटले होते की, आम्ही कोणाच्या तरी द्वेषाने पछाडलेलो आहोत.

यानंतर श्री.शिगम....

अप्रधारित प्रत / प्रेसिडेन्शियल नोट

डॉ. नीलम गो-हे.....

परंतु नंतरच्या या घटना बघितल्या तर फार फरक झालेला दिसतो. तरी देखील आज शिर्डी बरोबरच संपूर्ण महाराष्ट्रातील जी देवस्थाने आहेत त्यांचा धार्मिक आणि सांस्कृतिक चेहरा आपण बदलण्याचा प्रयत्न करतोय. तसे होता कामा नये.

पंढरपूरला एकादशीला प्रसाद म्हणून बुंदीचा लाडु देण्यात येतो. तेथे प्रसाद म्हणून लाडू का देण्यात येतो याबाबत विचारणा केल्यानंतर शिर्डीला प्रसाद म्हणून बुंदीचा लाडू दिला जातो म्हणून येथेही प्रसाद म्हणून बुंदीचा लाडू दिला जातो असे सांगण्यात आले. त्या ठिकाणी जे भक्त येतात त्या भक्तांचा उपवास असेल तर त्यानुसार भक्ताला प्रसाद दिला पाहिजे. शिर्डीला प्रसाद म्हणून बुंदीचा लाडू दिला जातो म्हणून तसा तो पंढरपूरलाही दिला जाणे योग्य होणार नाही. असे होता कामा नये. मंदिराचे एक वेगळे पावित्र्य आणि मांगल्य असते ते राखण्याची आपली जबाबदारी आहे. एकाच मंदिराप्रमाणे दुसरे मंदिर तयार करणे हा संस्कृती संवर्धनाचा उद्देश असू शकत नाही, याकडे मला सभागृहाचे लक्ष वेधावेसे वाटते. जसे शिक्षण विधेयकाच्या बाबतीत आमची मतमतांतरे असली तरी ते विधेयक दोन्ही सभागृहाच्या 29 सन्माननीय सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यात आल्यामुळे एक चांगला असा कायदा बनणार आहे. त्याप्रमाणे हे श्री साई बाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) विधेयक देखील संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे आणि तेथे सर्वंकष चर्चा करुन चांगला कायदा करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते. जय हिंद ! जय भीम !! जय महाराष्ट्र !!!

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, श्री साई बाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था विधेयकावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, एक गोष्ट आपल्यासकट सर्वांना मान्य आहे की, शिर्डीला भेटी देणारे केवळ आपल्या राज्यातील किंवा देशातीलच नाही तर परदेशातूनही शिर्डीला साई बाबांच्या दर्शनासाठी येणा-या भक्तांची संख्या सातत्याने वाढत आहे. अगदी पूर्वीच्या काळात असे एक ठिकाण होते की त्याची महती आणि प्रचिती लोकांना येऊ लागली आणि त्यामुळे भक्तांची संख्या गेल्या काही वर्षामध्ये प्रचंड वाढायला लागली. सहाजिकच ही वाढ होत असताना तेथील स्थानिक पायाभूत सुविधांच्या गरजावर विविध प्रकारचे ताण निर्माण झाले. वाहतुकीची समस्या निर्माण झाली, वाहनतळांची समस्या निर्माण झाली, निवासाची समस्या निर्माण झाली. त्याचबरोबर येणा-या भक्तासाठी बाकीच्या ज्या सोयी आहेत मग ती निवास व्यवस्था असेल, प्रसादाची व्यवस्था असेल, या सर्व गोष्टी करीत असताना गावामध्ये येणारी रोजची जी फ्लोटींग पॉप्युलेशन आहे ती विचारात घेतली पाहिजे. कमीत कमी वेळेत अधिकाधिक लोकांना सुलभतेने दर्शन घेता येईल अशी व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. दर्शनाबरोबरच त्याला काही श्रध्देचे प्रश्न जोडलेले असतात. शिर्डीच्या मंदिरामध्ये 3 महत्वाच्या आरत्या होत असतात. पहाटेची काकड आरती, मध्यान्हाची आरती आणि त्यानंतर संध्याकाळची आरती, अशा तीन आरत्या होतात. साधारणत: असे दिसून येते की काकड आरतीला आधीच्या रात्री पोहोचणा-या भक्तांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. सहाजिकच बाबांच्या दर्शनाला शुचिर्भूत होऊन जाणे ही प्राथमिक गरज निर्माण होते. एवढ्या मोठया संख्येने त्या गावामध्ये भक्त आल्यानंतर आरोग्य व्यवस्थेचे, तेथील पर्यावरणाचे आणि या सगळयांना विळखा घालणारे सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण होतात. या सर्वांचा विचार करुन आताचीच नव्हे तर भविष्य काळातील या सर्व परिसराची गरज लक्षात घेतली पाहिजे. ही गरज कुणाची आहे ?

सभापती महोदय, जे भक्तीभावाने शिर्डीला येतात त्यामध्ये गरीब श्रीमंत असा भेदभाव करण्याचे काही कारण नाही. सर्व प्रकारचे लोक येतात. कुणी धनवान असेल तो कदाचित एखाद्या दिवशी असेही म्हणतो की, मी या सर्व विकासाला 100 कोटी देतो. परंतु श्रध्देने साई बाबांच्या

..3..

श्री. हेमंत टकले....

दर्शनाला आल्यानंतर दानपेटीत आपल्याकडून जे शक्य आहे तेवढा हातभार आपण लावावा. कारण साई बाबांनी दिलेली शिकवण ही सेवेची होती आणि ही सेवा अधिकाधिक लोकापर्यन्त पोहोचायची असेल आणि अधिकाधिक लोक तेथे येणार असतील तर या सर्व सुविधांचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. इतकेच नाही तर हा सातत्याने चालू राहाणार उपक्रम आहे यापध्दतीने आपण पाहिले पाहिजे. रेल्वे स्थानकाचा विषय असेल तर त्याबाबतीत केन्द्रीय मंत्रिमंडळ आहे. रेल्वेकडे पैसा आहे. या गोष्टी ठीक आहेत. पण नुसती रेल्वे येत नाही तर रेल्वेमुळे नवीन समस्या निर्माण होतात. मग काही ठिकाणचे वरचे पूल असतील, किंवा नवीन वाहनतळ निर्माण करण्याची आवश्यकता असेल, या सर्व गरजा चांगल्या पध्दतीने पु-या करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक वेळेला या सर्व पायाभूत सुविधांच्या मागणीकडे लक्ष देऊन जी मंडळे किंवा जे शासकीय विभाग यामध्ये कार्यरत होऊ शकतात अशांकडे हा निधी दिला तर पर्यायाने भक्ताने श्रध्देने, दानाच्या भावनेने, साई बाबांच्या सेवा वृत्तीचा आदर करण्यासाठी दिलेल्या दानाचा योग्य पध्दतीने वापर होतोय असेच आपल्याला लक्षात येईल. हे करण्यासाठी राज्य शासन जेव्हा एखादे पाऊल उचलते त्यावेळी काही शंका उपस्थित केल्या जातात.

सभापती महोदय, हा कारभार देवाचा आहे, साई बाबांचा आहे त्यामुळे तो पारदर्शक असावा, त्याबद्दलची जी कर्तव्यपूर्ती आहे त्याबद्दलची धारणा नक्की असावी. या चांगल्या कामासाठी लोकांचा शिर्डीला येण्याचा, दर्शन घेण्याचा हा जो सर्व कालावधी आहे तो अधिक चांगला सुखदायी, प्रसन्न करणारा आणि देवाचा आशीर्वाद मिळविणारा होईल अशा पध्दतीचा हा विचार या सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी शासनाने केलेला आहे. त्यामुळे या विश्वस्तव्यवस्थेला अधिकार प्रदान करणे ही क्रमप्राप्त गोष्ट आहे. ही कामे आज या विश्वस्तव्यवस्थेच्या मार्फत होतात. मग ती रुग्ण सेवेची असतील, शिक्षणाची असतील, परिसराच्या विकासाची असतील. आज आपल्याला वाटते त्यापेक्षा हा परिसर अधिक मोठा होऊ शकेल. आज आपण पहातो की अनेक ठिकाणी अशा प्रकारची जी केन्द्रे असतात ती श्रध्देची केन्द्रे असतात. त्यांचा विस्तार झाल्यानंतर आपल्याला पर्यावरणाचाही विचार करावा लागतो. जसे औरंगाबादला आपण प्रदूषणरहित वाहनांची सोय केलेली आहे तशा पध्दतीने सगळी वाहन व्यवस्था काही अंतरावर ठेवून आणि तेथून प्रदूषणविरहित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

वाहनांतून, बसेसमधून लोकांना तेथे आणून त्यांना वेळेत दर्शनाचा लाभ देता आला तर अधिक चांगले होईल. अशा प्रकारची सर्व व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी, ती अधिक चांगली करण्यासाठी शासन हे जे प्रयत्न करीत आहे ते खरोखरच अतिशय महत्वाचे आहेत.

सभापती महोदय, आजकाल सगळया गोष्टींचे व्यापारीकरण होत आहे. या बाबतीत मला छोटासा अनुभव आला. मार्केटिंग नावाचा प्रकार सुरु झालेला आहे. नवी मंदिरे होत आहेत. देशामध्ये असे कोणते ठिकाण आहे की त्या ठिकाणी मंदिर उभारले तर अधिकाधिक लोक येऊ शकतील या उद्देशाने एका संस्थेने सर्व्हे केला होता. म्हणजे मार्केटिंगच्या दृष्टीकोनातून नवीन देवस्थाने निर्माण होणे हा एकीकडे भाग झालेला असताना लोकांच्या श्रेध्देचे स्थान असलेले शिर्डी हे अधिक पवित्र कसे राहील, अधिक मांगल्याचे कसे राहील आणि अधिक चांगले कसे करता येईल आणि त्यासाठी या सर्व भक्तांच्या प्रयत्नातून किंवा त्यांच्या दानातून निर्माण झालेले धन हे साई बाबांच्यासाठी कसे योग्य प्रकारे वापरता येईल या दृष्टीने ही आवश्यकता होती. त्यामुळे हा उद्देश सफल करण्यासाठी आणलेले विधेयक अतिशय महत्वाचे, गरजेचे आणि साई बाबांच्या सेवेचे आहे असे माझे मत आहे म्हणून हे विधेयक मंजूर करावे अशी मी आपणास विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

...नंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, सन 2011 चे विधान परिषद विधेयक क्र.6 - साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी अधिनियम, 2004 यामध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आहे.

महोदय, यामध्ये भक्तांची वाढती संख्या विचारात घेऊन वाहनतळ, रेल्वे स्थानक, बस स्थानक आणि विमानतळ यासारख्या सुविधा करण्याचे शासनाने ठरविले आहे. पण शिर्डी संस्थानाची संपूर्ण विश्वस्त व्यवस्था पुनर्गठित करण्यासाठी व विश्वस्त व्यवस्थेला जनतेसाठी अधिक व्यापक कल्याण कार्य हाती घेणे शक्य व्हावे म्हणून तिचे अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापन, प्रशासन, शासन व नियंत्रण करण्यासाठी तरतुदी करण्यासाठी यात बदल करण्याचे ठरविले आहे.

महोदय, हे सर्व करीत असताना ही संपूर्ण व्यवस्था शासनाने आपल्या ताब्यात घ्यावी असे शासनाला का वाटले याचे मला आश्चर्य वाटते. या देवस्थानच्या ठिकाणी लाखो लोक येतात त्यांचा कुठेही उल्लेख केलेला दिसत नाही. मुळात या मंदिरात जाण्यासाठी तेथे व्यवस्था होण्याची गरज आहे. आज तेथे येणारे सर्व भक्तगण दर्शनासाठी लाईन लावत असतात. त्यात दर्शन होईपर्यंत भरपूर वेळ जातो म्हणून मंदिराचा विस्तार व भक्तांसाठी सुविधा निर्माण कराव्यात यासाठी शासन काय करणार आहे, याचा खुलासा होणे आवश्यक आहे. कारण तशी मुबलक जागा या मंदिरात आजच्या परिस्थितीत नाही. भविष्यात जागा मग कोठून घेणार आहात याचाही उल्लेख यात असणे आवश्यक होते. मुख्य म्हणजे शासनाला व प्रशासनाला असे का वाटते की त्यांनी जी गोष्ट हातात घेतली आहे ती चांगलीच होणार आहे. गेली कित्येक वर्षे आपण भष्टाचाराच्या बाबतीत येथे चर्चा करीत आहोत. तसेच यामध्ये विशेष करुन म्हटले आहे की, "शासकीय विभाग, शासकीय महामंडळे, शासकीय कंपन्या किंवा उपक्रम यांना राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तींच्या अधीन राहून, सहाय्यक अनुदान देण्यासाठी, विश्वस्त व्यवस्थेला अधिकार प्रदान करता यावेत म्हणून उक्त कलम 21 मध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. यातून शासनाने खऱ्या अर्थाने विश्वस्त व्यवस्थेला मात्र बाजूला ठेवले आहे. आणि निर्णयाची मागणी करीत असताना प्रत्येक शैक्षणिक संस्था, क्रीडा अॅकडमी, सार्वजनिक वाचनालये, रुग्णालये, दवाखाने, निराश्रीत अथवा शारिरीक दृष्ट्या विकलांग व्यक्तींसाठी या सर्व

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

गोष्टी करीत असताना त्यांनी संस्था व तिचे सभासद व देखरेख करण्यासाठी कला व साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करुन घेण्यासाठी या कायद्यात दुरुस्ती करण्याचे प्रस्तावित केले आहे". मग या नोंदणीकृत संस्थां या कला व साहित्य क्षेत्राशी संबंधितच का याचा खुलासा व्हावा. वास्तविक पाहता ही सुविधा बस स्थानक, रेल्वे स्थानक या ठिकाणी दवाखाना, निराश्रीत व विकलांग व्यक्तींच्या आधारगृहासाठी तसेच सार्वजनिक वाचनालयासाठी असताना त्यात कला व साहित्य क्षेत्राशी संबंधित नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेलाच का महत्व देण्यात आले आहे, याचे स्पष्टीकरण करण्याची गरज आहे.

शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करण्यासाठी सुध्दा या संस्थानच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी विशेषाधिकार शासन देण्याचा प्रयत्न करीत आहे. हे सर्व करीत असताना उच्च न्यायालयाच्या पूर्व मान्यतेने नियुक्त केलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली, असा अध्यक्ष आणि समितीच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले इतर दोन सदस्य अशा एकूण तीन सदस्यांची मिळून बनलेली एक छाननी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. तसेच जे दोन सदस्य निवडून देणार आहेत ते कोणी निवडायचे याचा बोध यातून होत नाही. या सर्व गोष्टी करीत असताना न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली जी समिती आहे असे अध्यक्ष आणि समितीच्या सदस्यांनी निवडून दिलेले दोन सदस्य अशी तीन सदस्यांची मिळून बनलेली ही छाननी समिती स्थापन करावयाची आहे. म्हणजे अर्ज शासकीय महामंडळे अथवा उपक्रमांकडून मागवावयाचे आणि त्यांची छाननी करण्यासाठी छाननी समिती नेमावयाची व त्याच्या माध्यमातून या देवस्थानच्या पैशाचे वाटप करावयाचे असा हा सर्व प्रयत्न सुरु आहे. मघाशी सभागृहात सन्माननीय सदस्यांनी बोलताना सांगितले की, "आता सगळे लुटून झाले आणि देवस्थानांवर आले" अशातला हा प्रकार आहे. कारण देवस्थानांच्या माध्यमातून भरपूर पैसा जमा होतो याची शासनाला जाणीव आहे. मला कळत नाही की, शासनाला रेल्वे स्थानकासाठी शिर्डी मंदिराचाच पैसा का खर्च करण्याची गरज भासली ? महाराष्ट्र शासन किंवा केंद्र सरकार यांच्या माध्यमातून सुध्दा अशा कामांसाठी निधी दिला जातो. वास्तविक शिर्डीला फार मोठी रेल्वे लाईन

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

टाकावयाची नाही. जर तेथे शासनाला रेल्वे लाईन टाकावयाची असेल तर या संस्थानचाच पैसा का खर्च करावयाचा याचा खुलासा होणे आवश्यक आहे. तेथे विमानतळ निर्माण करण्याचा निर्णय शासन घेत आहे. पण विमानतळ वगैरे हे सर्व श्रीमंत लोकांसाठी आवश्यक गोष्टी आहेत. या ठिकाणी मात्र सर्वात जास्त गरीब भक्त गण येत असतात, त्यांच्यासाठी कोणत्या सुविधा निर्माण करणार याचा खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच या गरीब भाविकांना राहण्यासाठी मोठ्या प्रमाणात धर्मशाळा तेथे बांधणार आहात काय, असल्यास त्या कोणत्या ठिकाणी बांधणार आहात, त्यासाठी जागा कोठे निश्चित केली आहे अशा अनेक बाबींचा बोध या विधेयकातून होत नाही. खरे तर शासनाने शिर्डीला विमानतळासाठी जागा पाहिलेली नाही, रेल्वे लाईन कोठून टाकणार याचाही विचार केलेला दिसत नाही. अशी परिस्थिती असताना अगोदर देवस्थानचा पैसा काढून घ्यावयाचा व नंतर ठराव आणून सर्व करणार असाल तर त्यात संशयाला जागा आहे असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. शासनाने हे दुरुस्ती विधेयक आणलेले आहे ते जर जनतेमध्ये गेले तर जनताच असे म्हणेन की सरकारने हे देवस्थान ताब्यात घेतल्यानंतर या देवस्थानचे वाटोळेच होणार आहे. म्हणून मी या विधेयकाला विरोध करते व हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे अशी विनंती करते व माझे भाषण पूर्ण करते.

अधोरेखित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधान परिषद विधेयक क्र. 6 ला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. शिर्डी येथे एक इंटरनॅशनल, ग्लोबल स्पिरिच्युअल सेंटर म्हणजे आंतरराष्ट्रीय श्रध्दास्थान म्हणून या देवस्थानाकडे पाहिले जाते. भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे हे तीर्थस्थान आहे. कदाचित तीर्थस्थान हा शब्द कोणाला आवडला असेल अथवा नसेल. पण सर्व धर्मांचे, सर्व संप्रदायांचे आणि जाती-धर्माचे एकमेव ठिकाण आहे. या ठिकाणी फक्त राज्यातूनच नव्हे तर संपूर्ण भारतातून येणारे श्रध्दाळू येत असतात. आंतरराष्ट्रीय स्तराबरुन येथे श्रध्दाळू संख्या मोठ्या प्रमाणात येत असतात. मघाशी सभागृहात सांगण्यात आले की, कोणत्याही प्रकारचे देवस्थान किंवा उपक्रम पाहिला तर आज शिर्डीचे नाव ज्या पध्दतीने मंदिरासाठी घेतले जाते त्याच पध्दतीने आरोग्याच्या संदर्भात देखील घ्यावे लागेल. कारण हे दवा आणि दुवा देणारे आरोग्य मंदिर आहे. अत्यंत कमी खर्चात हृदयावर तसेच इतरही शस्त्रक्रिया येथे करण्यात येतात. राज्यात सर्वात स्वस्त आरोग्य सेवा शिर्डीतच मिळते म्हणूनच या कलम 21 मध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आणले आहे. यामध्ये फक्त एका विमानतळाच्या बाबतीत थोडा वादाचा मुद्दा दिसत आहे. त्या निमित्ताने मी शासनाला विनंती करणार आहे की, आपण शिर्डीला ज्या पायाभूत सुविधा देणार आहात, त्या निश्चितपणे द्याव्यात पण यातून किमान 50 टक्के निधी आरोग्यासाठीच वापरला जाईल याची काळजी घेतली तर अत्यंत उपयुक्त होणार आहे.

सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे भाषण केले. मी त्यांच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, विमानाने प्रवास करणे ही आता चैनीची बाब राहिली नाही. कारण 50-60 कोटी रुपयापेक्षा जास्त खर्च यावर होणार नाही. पण टनभर चांदी आणि मणभर सोने देणारे श्रीमंत भाविक येथे येतात. त्यासाठी केवळ गरिबांचाच पैसा खर्च होईल अशातला भाग नाही तर अशा धनिकांच्या माध्यमातून सुध्दा या सोयी उपलब्ध होणार आहेत. तसेच येथे 5 हजार लोक एकाच वेळी जेवतील अशा प्रकारचे सभागृह निर्माण करण्याचाही शासनाचा मानस आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, जो प्रसाद बालाजीला दिला जातो तोच प्रसाद उपवास असला तरी शिर्डीला दिला जातो. मला वाटते तसा प्रसाद देण्यास हरकत नसावी. शिर्डी देवस्थानच्या नावाने या राज्याची ओळख आंतरराष्ट्रीय पातळीवर व्हावी असे शासनाला वाटते. म्हणून येथे विमानतळासाठी 50-60 कोटी रुपये खर्च केले

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

तरी बिघडेल अशातला भाग नाही. त्या माध्यमातून भाविकांची संख्या वाढेल व एक वेळ अशी येईल की, शिर्डी हे आंतरराष्ट्रीय विमानतळ सुध्दा होईल, म्हणून हे विमानतळ होणे ही काळाची गरज आहे. ती धार्मिक प्रवृत्तीसाठी, अध्यात्मिक प्रवृत्तीसाठी, शिर्डी हे एक प्रकारे धार्मिक समता निर्माण करणारे केंद्र सुध्दा होऊ शकेल.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रधारित पत / प्रतिलिपीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

शिर्डी म्हणजे सामाजिक समता निर्माण करणारे केंद्र, शिर्डी म्हणजे आध्यात्मिक लोकशाही निर्माण करणारे केंद्र. साईबाबाला "गॉड ऑफ दी मासेस" असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी सांगितले आहे की, नवीन नवीन मंदिरे बांधली जात आहेत. आंध्र प्रदेशामध्ये सुध्दा तिरुपतीचे मंदिर असून तेथे दर्शन घेण्यासाठी 3-3,4-4 कि.मी. ची रांग लागते अशी स्थिती आहे. शिर्डी हे केवळ तीर्थक्षेत्र आहे अशातला भाग नाही. 21 व्या कलमात बदल करीत असतांना भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वेस्थानक करीत असतांना त्यामध्ये विमानतळाचा उल्लेख आलेला आहे. विमानतळाला काही सदस्यांनी आक्षेप घेतलेला आहे तो चुकीचा आहे असेही मी म्हणत नाही. परंतु आज विमानतळाची गरज आहे ही वस्तुस्थिती आहे.. विमानतळासाठी केंद्र सरकारचे पैसे मिळण्यासाठी सुध्दा प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. केंद्रशासनाकडून तीर्थस्थानासाठी भरपूर पैसे मिळत असतात. केंद्र सरकारकडून लहान लहान तीर्थस्थळाला एक एक कोटी रुपये मिळू लागले आहेत. मध्यंतरी हे खाते महाराष्ट्राच्या मंत्र्याकडे होते त्यामुळे त्या मार्गाने प्रयत्न करण्यास काही हरकत नाही असे मला वाटते. शिर्डी संस्थानचे एकूण उत्पन्न व खर्च किती ? याचा विचार केला आणि खर्च कमी केला व त्यातून सेव्हींग झाले तर आपण यात्रेकरुंसाठी अधिक जास्त सुविधा देऊ शकू. शिर्डीमध्ये जितकी स्वच्छता आहे तितकी स्वच्छता महाराष्ट्रातील कोणत्याही तीर्थक्षेत्रात दिसत नाही. शिर्डी येथे चांगल्या प्रकारच्या धर्मशाळा आहेत. संत गजानन महाराजांच्या शेगावमध्ये सुध्दा जास्त सुविधा आहेत. तीर्थस्थळामध्ये सुविधा वाढविल्या पाहिजेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी या विधेयकाच्या निमित्ताने विचार मांडलेले आहेत. परंतु या विधेयकाला विरोध करु नये अशी माझी भावना आहे. या विधेयकाच्या पाठीमागचा उद्देश फार महत्वाचा आहे. दी इन्टेंशन बिहाईंड ब्रिंगींग दी अमेंडमेंट टू दी ॲक्ट महत्वाचे असल्यामुळे शासनाने चांगल्या प्रकारचे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे. विधेयकाच्या 21 व्या कलमाला सभागृहाने मंजुरी द्यावी अशी विनंती आहे. आरोग्याच्या संदर्भात जास्त सुविधा देण्याचा प्रयत्न करावा असे मला वाटते. आदिवासी, अनुसूचित जाती-जमाती, उपेक्षित माणूस, तळागाळातील माणूस, वंचित माणूस, दुर्लक्षित माणसाकडे लक्ष देता यावे यामुळे मी विधेयकाला पाठिंबा देऊन माझे विचार पूर्ण करतो.

---- ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय, बाबांच्या चमत्काराचा एक वेगळा नमुना आपण पाहतो आहोत. महाराष्ट्राचे मुर्तिमंत व आपल्यामध्ये वावरणारे, महाराष्ट्र घडविण्यासाठी कटिबद्ध असलेले बाबा, शिर्डीच्या बाबांना विकासासाठी साद घालीत आहेत.

सभापती महोदय, एक वेगळया चमत्काराचे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे. हा विषय भावनेचा आहे, तसेच श्रध्देचा देखील आहे. विधेयकावरील चर्चा मी काळजी पूर्वक ऐकत होतो. रेल्वे, विमानसेवा अशा सर्व वाहतुकींची चर्चा मी येथे ऐकत होतो व कोणी तरी हळूच टिचकी मारल्यासारखे बोलले की, "दैवतांचे व्यापारीकरण". अत्यंत जाणकार असलेले, वर्षानुवर्षे सत्ता राबवलेले, वाकबगार मंडळी सरकारमध्ये असल्यामुळे अशा प्रकारचे सामर्थ्य घडविण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये आहेच. शिडीमध्ये किती लाख भाविक येत असतात याची विधेयकामध्ये नोंद नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी शिर्डी येथे सुविधा कशासाठी करावयाच्या आहेत याची माहिती दिलेली आहे. शिर्डी संस्थानमध्ये वर्षाला 252 कोटी रुपये जमा होत असतात व 150 कोटी रुपये खर्च होत असतात व 100 कोटी रुपये शिल्लक राहतात व या पैशाचा उपयोग सामाजिक कामासाठी व्हावा असा या विधेयकाचा उद्देश आहे. शिर्डी येथे लाखो भक्तांची रीघ लागलेली असते. भक्तांसाठी सुविधा निर्माण कराव्यात व जेणेकरुन भक्तांचे येणे-जाणे सुखकारक व्हावे असा उद्देश असावा असे मला वाटते. ज्यांना विमानाने यावयाचे असेल ते विमानाने येतील. विमानतळ बांधण्याबाबत मला आश्चर्य वाटलेच नाही. शिर्डी मंदिरात किती किलो सोन्याचा हार आलेला आहे याची जाहिरात होत असते. "मी मराठी" या वाहिनीवर साई बाबांची आरती रोज सकाळी लागते. साईबाबांची मूर्ती सोडून झाकण्यासारखे काहीच राहिलेले नाही. आणखी सोने साईबाबांच्या मूर्तीवर चढवता येत नसल्यामुळे साईबाबांचे प्रगट रुप कोणालाच दिसत नाही अशी परिस्थिती आहे. एका फकिराला धनवान करण्याची किमया भक्तगण करीत असतील तर गोरगरीब माणसाच्या सेवेचे काय होत असेल अशी मला नेहमी चूकचूक लागलेली असते. मला सोन्याने बांधून ठेवले असल्यामुळे मी गरिबांची सेवा करण्यास जाऊ कधी असे बाबांना वाटत असेल. जे भक्त साई बाबाला मण-मण सोने देतात तेव्हा त्यांना शिर्डी येथे येण्यासाठी विमानाची सोय पाहिजे की, नको ? साईबाबाला 25 लाखाची सोन्याची चादर घातल्याची चर्चा आठवडाभर सुरु होती. परंतु नंतर ही सोन्याची चादर खोटी

..3..

श्री. दिवाकर रावते ....

निघाल्याचे आढळून आले परंतु पुढे काहीच झाले नाही. चादर देणारा भक्त सांगतो की, यामध्ये सोनाराने फसवले. शिर्डी येथे बनवाबनवी करणारे जातात आणि स्वत:चा प्रचार करुन घेतात. भक्तांसाठी सर्व सुविधा उपलब्ध करावयाच्या रेल्वेने या, रस्त्याने या रस्ते मोठे करतो, विमानाने या असे म्हणून शिर्डी येथे 252 कोटीचा वार्षिक ऐवज जमा होतो तो 2500 कोटी रुपयांचा कसा करावयाचा ही यामधील चमत्काराची मोठी किमया आमच्या या बाबांकडून त्या बाबांसाठी निर्माण होते आहे. शिर्डी येथे सुविधा एकदाच होतील. परंतु शासकीय विभाग, शासकीय महामंडळे, शासकीय उपक्रमांना जी उपलब्धी द्यावयाची आहे त्यासाठी निधी वाढला नाही तर कसे चालेल ? त्यामुळे जास्त संख्येने लोक यावे व ताबडतोब जावे असा विचार यामागे दिसतो आहे. नाशिकच्या सप्तश्रृंगी देवस्थानात जाण्यासाठी रोपवे करण्याचे काम सुरु असून हे काम रशियातील कंपनीला देण्यात आलेले आहे. तीर्थक्षेत्रासाठी भाविक जास्त संख्येने यावेत, निधी जास्त जमा व्हावा हा महत्वाचा विषय आहे.

विधेयकामध्ये "देवतेच्या दर्शनासाठी शिर्डीला भेट देणा-या भक्तांची वाढती संख्या" असा उल्लेख आहे परंतु बाबांच्या दर्शनासाठी शिर्डीला भेट देणा-या भाविकांची संख्या असा शब्दप्रयोग व्हावयास पाहिजे होता. "देवतेचा" हा शब्द कसा काय आलेला आहे ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

शिर्डी म्हणजे साईबाबांची. येथे देवता हा शब्द कसा आला ? देव आणि देवता यात फरक आहे. दैवत हे प्रत्यक्ष आपल्याकडे असते. देव अजून कोणीच पाहिलेला नाही. हा श्रद्धेचा भाग आहे. दैवत शब्द असला तरी चालले असते. पण यात देवतेचा शब्द आहे. विश्वस्त व्यवस्था निधीचा विनियोजन यात असे म्हटले आहे की,विश्वस्त व्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग. म्हणजे 100 कोटी उत्पन्न असेल तर त्यातील 30 कोटी रूपये विविध कामांसाठी वापरता येतील. ती कामे कोणती याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात केला आहे. ती कामे म्हणजे क्रीडा अकादमी, सार्वजनिक वाचनालय, रूग्णालय, दवाखाना निराश्रित अथवा शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह इत्यादी. हे 30 टक्के या कामावंरच वापरता येणार आहेत. शासनाला जर 50 कोटी पाहिजे असतील तर ते घेता येणार नाही. किती निधी वापरता येईल यासंबंधीची सुधारणा या विधेयकामध्ये यायला हवी होती. मूळातच 30 टक्के अट असेल तर जास्त पैसे लागले तर निधी वाढविणे गरजेचे आहे. आपल्याला जर विकास अभिप्रेत असेल तर शेवटी तुकड्या तुकड्यांनीच काम करावे लागेल. असे एंकदरीत कायद्याच्या तरतुदीप्रमाणे दिसत आहे.

मुंबई उच्च न्यायालयामध्ये कधी तरी तक्रार करण्यात आली असेल. त्याप्रमाणे मुंबई उच्चन्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली 3 जणांची समिती नेमण्यात येणार आहे. तसेच संस्थान विश्वस्त व्यवस्थेकडून वित्तीय सहाय्य मिळवण्यासाठी या अधिनियमाखाली विविध नोंदणीकृत सार्वजनिक धर्मादाय विश्वस्त व्यवस्थांकडून समितीला प्राप्त झालेल्या अर्जांची शिफारस करण्यासाठी मानके निर्धारित करण्याच्या दृष्टीने मुंबई उच्च न्यायालयाने, केवल आर सेमलानी यांच्या प्रकरणातील रिट विनंती अर्ज क्र.1003 चा 2764 यामध्ये दिलेले निदेश आणि मार्गदर्शक तत्त्वे यांना अनुरूप अशी मार्गदर्शक तत्त्वे तयार करून ती प्रकाशित करील. येथे उच्च न्यायालयाचे निर्बंध असतील. ते कोणते आहेत. उच्च न्यायालयाने विश्वस्त संस्थेला निदेश दिले असतील तर मग आपण येथे जे काही निर्माण करण्याचे प्रस्तावित केले आहे ते करता येईल काय ? ते कायद्यात बसते काय? विधी खात्याने या विधेयकाची छाननी केल्यामुळे हे विधेयक आलेले आहे. त्यामुळे त्यांच्या नजरेत सर्व बाबी गेलेल्या असतील. या संबंधातील खुलासा माननीय मुख्यमंत्र्यांच्या सुरूवातीच्या प्रस्तावामध्ये आलेला नाही. त्यामुळे त्याचा खुलासा होणे आवश्यक आहे. 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले म्हणाले की, श्री साईबाबा म्हणजे सेवा. पण सर्वात पुढचे महत्त्वाचे आहे. ती म्हणजे सबुरी. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम व सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सुचविल्याप्रमाणे हे विधेयक पास करण्यासाठी थोडी श्रद्धा व सबुरी ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे हे बिल चिकित्सा समितीकडे जाऊन तेथ त्याची छाननी होणे आवश्यक आहे व साईबाबांच्या श्रद्धेला तडा जाणार नाही, भक्तांच्या श्रद्धेला तडा जाणार नाही हे पहावे लागेल. भक्तांना असे वाटणार नाही की, शासनाच्या तिजोरीत खडखडाट झालेला आहे आणि आता हे संस्थान लुटायला निघाले आहेत. अशा प्रकरची भावना लोकांमध्ये निर्माण होणार नाही या करिता श्रद्धेने आणलेल्या विधेयकामध्ये लोकांच्या हिताकरिता सबुरी घेऊन हे विधेयक चिकित्सा समितीकडे पाठवावे असे मला सुचवावयाचे आहे. सदर विधेयक चिकित्सा समितीकडे योग्य ती छाननी करून आल्यानंतर लोकांना मग निश्चितच आश्वस्त करता येईल. चिकित्सा समितीकडे विधेयक गेले तर लोकांच्या, भक्तांच्या सूचना मागवून घेता येतील. मग आपल्या लक्षात येईल आपण जे करतो आहोत ते योग्य आहे काय, लोकांचे काय म्हणणे आहे. सरकारचा विचार अयोग्य आहे असे असू शकत नाही.

सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी यांनी जे काही सांगितले ते फार मोलाचे आहे असे मला वाटते. आता आपण अधिकृत शासकीय बोलत आहोत. जागतिक अध्यात्मिक संकल्पना म्हणजे शिर्डी असे मत त्यांनी मांडले. अध्यात्मिक आले की त्याची व्याख्या आली. मग ती व्याख्या श्रद्धा-अंधश्रद्धा यातून तावून सुलाखून काढावी लागेल. आज त्यांनी सरकारला न कळत सांगून टाकले की, हे सगळे आणत असताना सावध रहा. श्री साईबाबा यांनी चमत्कार केले. लोक ते चमत्कार मानतात, स्वीकारतात. त्यासाठी उद्या शासन बंधन आणणार काय ? हे सुद्धा त्यांनी शासनाला न कळत खुणावले आहे. त्या बद्दल त्यांना मनापासून धन्यवाद देतो. आपण जाणकार आहात, चाणाक्ष आहात. काय सांगायचे, कधी सांगायचे हे आपल्याला बरोबर माहीत आहे.

..3

अप्रधानित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

या निमित्ताने माझ्या समोर एक प्रश्न आहे. शासनाने जनतेच्या भावनांचा वापर करून कोणती श्रेय घ्यावीत आणि कोणती घेऊ नयेत याचा देखील विचार केला पाहिजे. निरपेक्ष भावनेतून सर्वधर्मसमावेशक सरकार घटनेप्रमाणे चालले पाहिजे. कुठल्याही एका धर्माला उजवे करता कामा नये आणि कुठल्याही एका धर्माकरिता डाव्या बाजूने चालता कामा नये ते सर्वधर्मसामवेशक सरकार. साईबाबा हे सर्व धर्माचे आहेत असे आपण सांगितले. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम तेथे जातात. मी तेथे क्वचित गेलो आहे. मी मागच्या वर्षीच तेथे गेलो होतो. तेथे एक बाळासाहेब विखे-पाटील नावाचा मोठा कॉम्प्लेक्स सुरू झालेला आहे. मला कौतुक वाटले. साईभक्तांची सोय करण्याकरिता श्री.विखे-पाटील यांनी तेथे मोठा कॉम्प्लेक्स उभा केला. असे दानशूर सत्ताधारी पक्षामध्ये आहेत. त्याचे मला बरे वाटले. श्री.ससाणे साहेबांनी आपण फोन केल्या मुळे माझी सगळी व्यवस्था केली होती. मी नमस्कार केला आणि आलो.

सभापती महोदय, माझा विषय वेगळा आहे. मुंबईत सिद्धिविनायक ट्रस्ट आहे, तुळजापूर ट्रस्ट आहे. तुळजापूरमध्ये येणाऱ्या पेटीमध्ये अपहार कसा होत होता हे धर्मादाय आयुक्तांनी दाखवून दिले आणि गेल्या तीन वर्षापासून ती दानपेटी धर्मादाय आयुक्तांनी ताब्यात घेतली. विचार केल्यानंतर एक गोष्ट लक्षात येते. माझे ज्ञान खूप कमी आहे. आपण माझ्या ज्ञानात भर टाकली तर बरे होईल. आपण आपल्या धर्माशी संबंधित असलेल्या गोष्टीकडेच जात असतो. अमरनाथ यात्रेतून मिळणाऱ्या उत्पन्नावर सरकारचे नियंत्रण असते. त्यांनी तीन हिस्से पाडलेले आहेत. एक हिस्सा त्या ट्रस्टला जाता, एक हिस्सा त्या पुजाऱ्यांना जातो, एक हिस्सा मुस्लिम ट्रस्टला जातो. ज्या मुस्लिम माणसाने अमरनाथ गुफा शोधून काढली त्या ट्रस्टसाठी तो हिस्सा जातो. सगळ्या संस्था आपण धर्मादाय आयुक्तांच्या खाली आणल्या. आपण हिंदुंच्या धर्मा व्यतिरिक्त अशी एखादी संस्था असेल तर त्यासंबंधी मला जाणून घ्यायचे आहे. शिर्डी संस्थानच्या मंदिराला सोन्यासहित जेवढा खर्च आला नसेल त्या पेक्षा डोळे दिपविणारी मशिदी देखील मी पाहतो. ठाण्याची मशीद तर डोळे दिपवून टाकणारी आहे. काही दर्गे आहेत, चर्चेस आहेत. हे प्रत्येक मी बघत असतो. श्रद्धा जोपासणाऱ्या प्रत्येकाच्या भावनातून आपापल्या परीने धर्मस्थान उभे करीत असतात. प्रत्येकाला धर्मस्थान आदरयुक्त असते. धर्मादाय आयुक्तांच्या अखत्यारित या धर्माच्या संस्था येतात काय ? आज आपण चांगल्या गोष्टी करिता ह्या करोडो रूपयांवर नियंत्रण करीत आहोत. त्याच वेळी त्या त्या समाजाला त्या रकमेचा विनियोग करता येणार असेल तर तो फार महत्त्वाचा आणि मोलाचा भाग ठरेल. यानंतर सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आणि म्हणून माझ्या मनामध्ये ती कल्पना आली.

मी दुसरे असे म्हणालो की, सरकारने कोणते श्रेय घ्यावे. ? दरवर्षी अर्थसंकल्पाचे वाचन करीत असतांना सन्माननीय अर्थमंत्री सिध्दी विनायक मंदिरासाठी एवढी तरतूद केल्याचे सांगतात. सिध्दि विनायकाच्या दर्शनासाठी मोठया प्रमाणावर भाविक येतात परंतु त्या ठिकाणी वाहन तळासाठी कोणतीही व्यवस्था नाही. त्याच प्रमाणे तुळजापूर असेल, मांढरादेवी असेल, मुंबादेवी असेल येथील ट्रस्टसाठी सरकारच्या तिजोरीमधून पैसे देण्याचे जाहीर करुन सरकार या धर्मिक संस्थांसाठी काय करीत आहे, हे दाखविण्यापेक्षा ही धार्मिक संस्थाने ज्या भागात आहेत तेथील भागामधील गोरगरिबांना सुविधा देण्यासाठी सरकारला आपल्या तिजोरीतील पैसे वापरता येतील की नाही? या ठिकाणी बाबा बसले आहेत अशी आपण संकल्पना करा आणि त्यांच्या दर्शनासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून लोक येत आहेत. श्रध्देला कोणतेही मोजमाप लावता येणार नाही एवढी प्रकट श्रध्दा त्या ठिकाणी दिसते. ज्या परिसरात ते बसले आहेत त्या परिसरातील लोकांना असे वाटले पाहिजे की, साईबाबा या गावामध्ये येऊन बसल्यामुळे आजूबाजूच्या परिसरामध्ये सुबत्ता निर्माण झाली. अशा या परिसरामध्ये मी जन्माला आलो हे माझे भाग्य आहे असे त्याला वाटले पाहिजे. म्हणजेच आपल्याला त्या लोकांच्या सोयी-सुविधांसाठी पैसे दिले पाहिजेत की नाही?

मला आपल्याला विनंती करावयाची आहे की, तेथील भागाचा विकास करीत असतांना पहिल्यांदा आजूबाजूचा 1 कि.मी.पर्यंतचा परिसर घ्या, त्यानंतर पुढील 1 कि.मी. चा परिसर घ्या. अशाप्रकारे आजूबाजूच्या खेडयामधील गावांचा उच्च शिक्षणापासून परिपूर्ण विकास करण्याची संकल्पना राबविली तर विकासाचा परिघ वाढत जाईल आणि त्यामध्ये आणखी गावे समाविष्ट होतील. त्या गावातील सर्वांना आम्ही भाग्यवान आहोत, शिर्डीच्या साईबाबांच्या परिसरामध्ये आम्ही जन्माला आलो त्यामुळे आमचा उध्दार झाला असे वाटेल. अशाप्रकारे विमानातून लोक शिर्डीला दर्शन घेण्यासाठी येत आहेत, यापेक्षा त्या भागामधील कर्तृत्ववान युवक त्याच विमानातून परेदशात गेले असे युवक तयार झाले तर तो शिर्डीच्या साईबाबांचा चमत्कार असेल. तशा प्रकारचा प्रकल्प आपण निर्माण करणार आहोत काय? संस्थानाच्या तिजोरीत जमा होणाऱ्या प्रचंड पैशाचा विनियोग सामाजिक विकासासाठी करण्यात आला पाहिजे हे मला या ठिकाणी नम्रपणे नमूद करावयाचे आहे. विधेयकाला विरोध केला किंवा केला नाही तर बहुमताच्या जोरावर हे विधेयक संमत होईल. परंतु त्या संदर्भात आम्ही सूचना करु शकतो, आम्ही आमच्या भावना मांडू शकतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

सभापती महोदय, एक गोष्ट नक्की आहे व त्याबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. त्या संस्थानाकडून निधीचा विनियोग करीत असतांना त्या निधीचा अपहार केला जाणार नाही. हा साईबाबांचा पैसा असून यामध्ये आपण पाप करता कामा नये अशाप्रकारचा विचार प्रत्येकाला करावा लागेल. तरी सुध्दा त्यामध्ये कुणी कर्म दरिद्री निघाला तर ते साईबाबांचे नशीब आहे, आपले नाही. शिर्डीच्या साईबाबांच्या निधीचा विनियोग सामाजिक विकासासाठी करण्याबाबत विचार करीत असतांना आपण त्या बाबत नकारात्मक भूमिका न मांडता सकारात्मक भूमिका मांडू या भावनेतून मी हे सांगतो. चमत्कार निर्माण करुन करोडो भाविक लोकांना आपल्याकडे श्रध्देने यावयास लावणारे व मनापासून साकडे घालावयास लावणारे साईबाबा आपल्याला पावतात ही भावना आज लोकांमध्ये निर्माण झाली आहे. या भावनेचा स्वीकार करुन साईबाबांच्या पेटीला हात लावतांना सरकारच्या मान्यतेशिवाय तो पैसा वापरावयाचा नाही याची जबाबदारी सरकारने आपल्या अंगावर घेतली पाहिजे. सभापती महोदय, अंधश्रध्देच्या नावाखाली बुवाबाजी चालते तिच्या बाबतीत आम्ही अतिशय कडवट आहोत. अशाप्रकारे बुवाबाजी करणारे जे ढोंगी बाबा आहेत त्यांना सजा झाली पाहिजे. त्या श्रध्देच्या बाबतीत आमची नकारात्मक असलेली भूमिका तुमच्याबरोबर सकारात्मक आहे. त्या बाबतीत आम्ही सकारात्मक आहोत म्हणून अशा प्रकारचे विधेयक आणून ते संमत करुन दाखवू या गमजेमध्ये आपण राहू नये व ते संमत करु नये. त्यामध्ये लोकांच्या असलेल्या श्रध्दा आपण संभाळाव्यात. या करिता त्या साईबाबांनी आमच्या या बाबांना सुबुध्दी द्यावी अशाप्रकारची विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, साईबाबा विश्वस्त संस्थान शिर्डी, अधिनियम 2004 संदर्भातील विधेयक क्रमांक 6 ला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सभागृहामध्ये सन्माननीय ज्येष्ठ सदस्यांनी आपापले विचार मांडले आहेत. मी एवढेच म्हणेन की, हा भावनेचा प्रश्न आहे, श्रध्देचा प्रश्न आहे. हा प्रश्न फक्त महाराष्ट्रासाठी, देशासाठी नसून सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेब म्हणाल्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावरुन भरपूर प्रमाणात भक्तगण त्याठिकाणी आलेले दिसतात. या विधेयकावर बोलण्यासारखे खूप आहे. ब्रिटीश राजवटीपूर्वीची अनेक देवस्थाने आपण पाहिली तर ती राजा-महाराजांच्या ताब्यात होती व ती त्यांच्या नियंत्रणाखाली होती. त्यावेळी असा विचार केला जात होता की, गोरगरिबांना चांगले अन्न मिळावे, त्यांना देवळामध्ये चांगल्या प्रकारे दर्शन घेता यावे, त्यांच्या मनामध्ये भक्तीभाव वाढावा. म्हणजे त्यांच्यातील क्रिमिनल टेंडन्सी कमी होऊन त्यांनी आपले चित्त दुसरीकडे वळवावे. त्या काळात अन्नदान केले जात होते, त्याला अन्नछत्र चालविणे असे म्हटले जात होते. या अन्नदानाला थोडेसे मॉडीफाय करुन आज प्रसाद किंवा महाप्रसाद म्हटले जाते. त्या ठिकाणी गरीब किंवा श्रीमंत माणूस जरी दर्शनासाठी गेल्यानंतर व आरती झाल्यानंतर आता महाप्रसाद घेण्यात यावा असे सांगितले जाते. दर्शनासाठी जाणारी व्यक्ती ही हेलिकॉप्टरने किंवा विमानाने गेली तरी ती त्या महाप्रसादासाठी थांबते. हा प्रश्न आस्तिक आणि नास्तिकमध्ये गुंतून पडतो.

सभापती महोदय, कोणत्याही देवस्थानाकडे लोकांची रीघ वाढल्यानंतर पैशाची आवक-जावक वाढते त्यामधून देवस्थानाच्या व्यवस्थापकाकडे जो कारभार सोपविला जातो त्यावर कुणाचे तरी नियंत्रण असणे आवश्यक आहे. केरळमध्ये आपण देवस्थानाच्या बाबतीत हीच परिस्थिती पाहिली आहे. त्या राज्यातील पद्मनाभन मंदिरामध्ये 1 लाख कोटींचा खजिना हाती लागला. हा खजिना दोन पिढया अगोदर हाती लागला असता तर केरळमधील गरीब लोकांच्या हितासाठी, चांगल्या कामासाठी नक्कीच त्याचा वापर होऊ शकला असता. तेव्हा अशाप्रकारच्या व्यवहारामध्ये नियंत्रण असणे गरजेचे आहेत. आपल्या राज्यात सिध्दीविनायक, कोल्हापूरची महालक्ष्मी, पंढरपूर, तुळजापूर अशी अनेक देवस्थाने आहेत. परंतु या देवस्थानावर शासकीय नियंत्रण ठेवणे किती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर...

आवश्यक आहे हे आपल्याला दाखवून देणे आवश्यक आहे. हे नियंत्रण एक व्यक्ती किंवा एक विश्वस्त ठेवू शकत नाही. उदा. आज लोकशाहीमध्ये ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत ही यंत्रणा निर्माण केली नसती तर खालच्या वर्गाला ज्या सोयी-सुविधांची गरज आहे त्यांच्यापर्यंत त्या पोहोचू शकल्या नसत्या. ही यंत्रणा पुरवीत असतांना तिचा वापर या देवस्थानांसाठी चांगल्या प्रकारे कां होऊ नये? तो वापर करीत असतांना जर आपल्याला त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता वाटली तर तो करता येऊ शकेल. तसेच, ही यंत्रणा निर्माण केल्यानंतर तिचा दुरुपयोग होणार नाही हे सुध्दा पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, शिर्डी येथील साईबाबा संस्थानच्या हॉस्पिटलमध्ये अनेक तज्ज्ञ डॉक्टर मंडळी उपचार करण्यासाठी जातात. आज सुध्दा डॉ. भट्टाचार्य यांच्या सारखे नामांकित डॉक्टर महिन्यातून दोन वेळा जाऊन तेथील रुग्णांवर अतिशय कमी खर्चामध्ये बायपास सर्जरी करतात. हे ऑपरेशन मुंबई किंवा अन्य कोणत्याही ठिकाणी कमी खर्चामध्ये होऊ शकत नाही. अनेक ठिकाणी असलेल्या देवस्थानामध्ये विश्वस्त आहेत, ट्रस्ट आहेत, परंतु त्या ठिकाणी अशाप्रकारची सुविधा दिली जात नाही. अशाप्रकारची नि:शुल्क सुविधा त्या हॉस्पिटलमध्ये दिली जात आहे. याचाच अर्थ वर्षानुवर्षे चालत आलेल्या सोयी-सुविधा त्या ठिकाणी सुरु असून त्यावर सरकारी नियंत्रण आहे.

सभापती महोदय, त्या ठिकाणी विमानतळ कां उभारण्यात येऊ नये? या राज्याची प्रगती होण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक विमानतळ करण्यात यावे अशाप्रकारची मागणी या सभागृहामध्ये अनेक वेळा करण्यात आली आहे. त्याही पलिकडे आपल्याकडे एक अशी म्हण आहे की, "लाख मरो, परंतु लाखोंचा पोशिंदा ना मरो" या म्हणीचा शब्दश: अर्थ घेण्याची गरज नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर . . . .

कोणत्याही देवस्थानामध्ये जाताना जी धनिक व्यक्ती असते ती आपल्या पध्दतीने जास्तीत जास्त दान स्वरुपामध्ये देणगी देत असते.काही लोक सेवा करु शकतात. काही लोक देवस्थानापर्यंत एक-दोन महिने चालत जाऊ शकतात आणि मंदिरामध्ये जाऊन सेवा करु शकतात. पण एखादी धनिक व्यक्ती हेलिकॉप्टरने जाऊन थोड्या वेळासाठी जाऊन तेथे किलोभर सोने देऊ शकते. एकीकडे समाजामध्ये थोड्या सोन्यासाठी किंवा एखाद्या गळ्यातील चेनसाठी वृध्दांचे किंवा लहान मुलीचे अपहरण किंवा त्यांना मारहाण होताना किंवा त्यांचा खून होताना पहातो तर दुसरीकडे साईबाबांच्या चरणी किलो-किलोने सोने वाहणारे देखील पहात आहोत. समाजातील हे दोन्ही घटक आहेत आणि त्यांना एकत्रितपणे ठेवणारी कोणती यंत्रणा असेल तर ती सरकारी यंत्रणा आहे. जर आपण ही यंत्रणा राबविली नाही तर अनागोंदी कारभार होऊ शकतो. म्हणून माझे म्हणणे आहे की, देवाच्या चरणी जनता आपल्या पध्दतीने म्हणजे पैशाच्या रुपाने, सोन्याच्या रुपाने जी मदत करतात, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पुजारी, विश्वस्त आणि सरकारी यंत्रणा असण्याची गरज आहे. मग तेथे विमानाने येणारे लोक असतील, रेल्वेने येणारे असतील, वाहनाने येणारे असतील तर त्यांच्यासाठी रहाण्याची, दर्शनाची आणि प्रसादाची व्यवस्था करावी लागते. ज्या पध्दतीने लोकसंख्या वाढत आहे, त्या पध्दतीने आपल्याला तेथील सोयी-सुविधा देखील वाढवाव्या लागणार आहेत. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, आता आपण या विधेयकामध्ये विमानतळ आणि ठरावित जुजबी बाबींबाबत बोललो आहोत. पण तेवढ्यापुरते मर्यादित न रहाता सर्व देवस्थानांच्या बाबतीत विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, मी ज्या गावातून आलो आहे, त्या गावातील लोक 2011 साली सुध्दा एक देवस्थान चालवित आहेत. तेथे आमच्या कोणाच्याही नावावर कोणतीही जमीन नाही तर 7:12 वर आमच्या सर्वांच्या घराच्या बाबत संस्थान श्री रामेश्वर असे लिहिलेले आहे. आम्ही तेथील कूळ आहोत. आपण आजही 2020 साली महासत्तेकडे जाण्याची स्वप्ने पहात आहोत. त्यावेळी एखाद्या गावातील प्रमुख किंवा तेथील सर्व जमीन ही देवस्थानच्या नावावर असल्याचे मी याठिकाणी उदाहरण देत आहे. म्हणून तेथे सदरहू पध्दती अतिशय चांगल्या पध्दतीने चालत आलेली आहे. तेथे सुध्दा सोयी-सुविधा मिळत आहेत. तेथील लोकांमध्ये देखील चांगल्या पध्दतीने प्रगती होत आहे. आपण त्याच मार्गाने जात असताना शिर्डीच्या संस्थानाच्या ठिकाणी शासनाचे नियंत्रण राहून, जेवढ्या जास्त सोयी-सुविधा देता येतील तेवढया देणे गरजेचे आहे. काही सन्माननीय सदस्यांमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चांगले बदल झाल्याचे मी पाहिले आहे. याबाबतीत मी मुद्दाम सांगू इच्छितो की, समाजवादाने प्रेरित झालेल्यांच्या मनामध्ये भक्तीचा उमाळा दाटावा ही गोष्ट म्हणजे नियतीने घेतलेला सूड आहे असे म्हणावे लागेल. याबाबतीत आमुलाग्र असे झालेले परिवर्तन खरोखर अभिनंदनीय आहे. कारण आपण त्यासंबंधातील विचार मांडले तरी ते माणसाच्या हृदयातून, पोटातून यावे लागतात. म्हणून मी असे म्हणेन की, श्रध्दा आणि सबुरी हा भावनेचा प्रश्न आहे.राजाधिराज योगीराज परब्रम्ह सच्चिदानंद श्रीसाईनाथ महाराज की जय.

. . . .3 एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मला असे वाटते की, आपण महाराष्ट्रातच नाही तर देशाच्या एकूण राजकारणात आणि समाज जीवनामध्ये एक ऐतिहासिक आणि वेगळया प्रकारचा निर्णय घेत आहोत. आपण ज्या शिवाजी महाराजांची परंपरा सांगत हे राज्य चालवित आहोत. त्या शिवाजी महाराजांनी गावागाव मंदिर बांधण्यासाठी मदत केली. मंदिराच्या पैशातून राज्य चालविण्याचा कधी प्रयत्न केलेला नाही. त्यामुळे मला अतिशय नम्रपणे माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, जर एखादा कोणीतरी कोर्टामध्ये गेला तर याबाबत शासनावर कारवाई होऊ शकते. कारण आपण एका बाजूने असे म्हणतो की, हे राज्य धर्मनिरपेक्ष राज्य आहे आणि त्यामुळे आमदारांच्या स्थानिक विकास निधीमध्ये सुध्दा मंदिरांना निधी देण्याची परवानगी नाही. जर एखाद्या मंदिराला मदत करावयाची असेल तर मंदिराचे सभागृह या नावाने करावी लागते. जर आम्ही सरकार म्हणून एखाद्या धर्माच्या मंदिराला मदत करु शकत नाही तर मग त्या मंदिरातून मदत कशी घेऊ शकतो हे मला कळत नाही. त्यामुळे जर एखादा माणूस कोर्टामध्ये गेला तर सरकारवर कारवाई होऊ शकते असे मला वाटते. अशा वेळी धर्मनिरपेक्ष या शब्दाचा अर्थ आपण आपल्या सोयीनुसार कसा काढत आहोत हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, एका बाजूने सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांनी असे म्हटले की, शिर्डीमध्ये या संस्थानच्या माध्यमातून अनेक प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तेथे एक उत्तम रुग्णालय बांधलेले आहे, चांगल्या प्रकारची धर्मशाळा बांधलेली आहे, तेथे चांगल्या भोजनाची व्यवस्था केलेली आहे. अशा वेळी संस्थान आणि तेथील लोक त्यांच्या-त्यांच्या पध्दतीने कार्य करीतच आहेत तर मग अशा प्रकारे कायद्यामध्ये तरतूद करुन विमानतळ करण्यात यावे असे सांगण्याची गरज का भासते असा प्रश्न निर्माण होतो. त्यांना याठिकाणी धर्मशाळा असावी असे वाटले म्हणून त्यांनी ती उभी केली. त्यांना वाटले की, याठिकाणी लोकांना उत्तम प्रकारचा प्रसाद मिळाला पाहिजे तर त्याप्रमाणे व्यवस्था निर्माण केली. चांगल्या प्रकारचे रुग्णालय उभे केले. मग जर तेथे विमानतळ व्हावे असे वाटत असेल तर जास्तीत जास्त सरकार त्यांना तसे सुचवू शकते. पण सरकार यासाठी नियमामध्ये बदल करुन आदेश का देत आहे हे मला कळत नाही. त्यामुळे आपण हे मान्य करीत आहोत की, त्या ठिकाणी येणारा पैसा हा चांगल्या कामासाठी खर्च होतच आहे. पण तेथील पैसा वाईट कामासाठी वापरला जात आहे असे काही झाले आहे काय ? जेणेकरुन यावर रिस्ट्रीक्शन आणावी लागली. त्यामुळे याचाही विचार केला पाहिजे. अशा प्रकारे

त्या-त्या संस्थांच्या कायद्यामध्ये बदल करुन तेथील निधी आपल्या हातामध्ये घेण्याची गरज नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आजूबाजूच्या गावांचा टप्प्याटप्प्याने विकास करण्याबाबतचा उल्लेख केला. याबाबतीत माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेब जास्त चांगल्या प्रकारे सांगू शकतील.परंतु शेगावच्या संस्थांनच्या वतीने आजूबाजूच्या गावांमध्ये तळी, विहीरी बांधण्यासाठी निधी दिला जातो.खरे म्हणजे जे काम सरकारने केले पाहिजे ते शेगाव संस्थान करीत आहे. ही संस्थाने अगोदरच कामे करीत आहेत.या राज्या- तील अशा प्रकारची संस्थाने लोकांचा पैसा हडप करीत आहेत असे काही झालेले आहे काय ? जेणेकरुन आपल्याला त्यांना कायद्याच्या माध्यमातून मॉनेटर करावे लागेल की, तुम्ही चांगल्या कामासाठी पैसे वापरावेत.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, जर त्याठिकाणी येणारा माणूस हा श्रध्देने साईबाबा यांच्या चरणी पैसे अर्पण करीत आहे. तेथे सुविधा निर्माण होण्यासाठी पैसे अर्पण करीत नाही. म्हणून आपल्याला वाटत असेल की, तेथे विमानतळ होण्यासाठी पैसे हवे आहेत तर आपण आज पासून तेथे एक मोठी पेटी ठेवावी आणि लोकांनी साईबाबांच्या बरोबरीने विमानतळा साठी पैसे टाकावेत म्हणजे एका दिवसामध्येच पैसे जमा होतील. परंतु जो पैसा ज्या कारणासाठी दिला जातो, तो त्याच कारणासाठी वापरला जावा. जर आपल्याला विमानतळासाठी पैसे पाहिजे असतील तर त्याच ठिकाणी पेटी बसविण्यात यावी किंवा एक पुस्तक ठेवण्यात यावे. मला असे वाटते की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो मुद्दा मांडला, त्याला अधोरेखित करुन मी माझे बोलणे संपवितो. जर अशा प्रकारे आपण दुरुस्तीच्या माध्यमातून सर्व धर्माच्या, प्रार्थना स्थळांचा निधी घेऊन अशा प्रकारे विकासाच्या कामासाठी पैसे वापरण्याची तरतूद करणार असलो तर या विधेयकाला पाठिंबा देण्यास काहीच हरकत नाही. पण जो नियम होईल, तो या देशामध्ये एकाच धर्माच्या लोकांसाठी लागणार आहे. समान नागरी कायदा होईल तेव्हा होईल. पण किमान संस्थानांच्या बाबतीत, धार्मिक स्थळांच्या बाबतीत जो निधी जमा होत आहे, त्याच्या वापरासाठी आपण समान नागरी कायदा आणणार आहोत काय ? याची ग्वाही माननीय मुख्यमंत्र्यांनी द्यावी. जर आम्ही शिर्डी संस्थानामध्ये जमा होणारा निधी चांगल्या कामासाठी, विमानतळासाठी वापरण्याकरता प्रावधान करीत आहोत तर आम्ही मसजिद आणि चर्च मध्ये सुध्दा मंदिरापेक्षा किती तरी पटीने जास्त निधी आहे. तो देखील आपण वापरणार आहोत काय ? मग या अधिवेशनामध्ये ..

श्री.चंद्रकांत पाटील . . . .

अंधश्रध्दा निर्मूलन विधेयक किंवा आता जादूटोणा विरोधी असे जे नाव बदलण्यात आले आहे. ते विधेयक आपण मागे घेणार आहोत काय ? अशा प्रकारे प्रामुख्याने दोन प्रश्नांची उत्तरे माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुख्यमंत्र्यांनी द्यावीत आणि मगच हे विधेयक संमत करावे असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

. . . .3 एच-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधान परिषद विधेयक क्रमांक-6 साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था अधिनियम 2004 यात आणखी सुधारणा करण्यासाठी याठिकाणी मांडण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, मी काही फार बोलणार नाही. याठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, रामदास कदम, चंद्रकांतदादा पाटील यांनी या विधेयकाच्या बाबतीत काही मुद्दे सुचविले आहेत. माझा या विधेयकाला एकच आक्षेप आहे. जर खरेच प्रामाणिकपणे शिर्डी मध्ये भाविकांच्या सोयीसाठी विमानतळ व्हावे आणि त्यासाठी शिर्डी संस्थानने 50 कोटी रुपये द्यावेत असे आपल्याला वाटत असेल आणि तेवढ्यापुरती 21 व्या कलमामध्ये दुरुस्ती केली असती तर त्यामध्ये शासनाचा प्रामाणिक हेतू होता असे मी म्हणेन.

यानंतर कु.थोरात . . . .

अप्रधारित प्रत / परिपृच्छेसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, विमानतळाच्या नावाखाली बस वाहन तळ, रेल्वे स्थानक, विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा त्याच बरोबर शासकीय महामंडळे, शासकीय विभाग, शासकीय कंपन्या व शासकीय उपक्रम हे टाकण्याची खरे म्हणजे काय गरज होती. म्हणजे शिर्डीत आलेला पैसा उपक्रमांना, शासकीय महामंडळांना, शासकीय विभागांना आणि शासकीय कंपन्यांना देण्यात येणार आहे. विमानतळाचाच एक उद्देश असता तर एका क्षणात या विधेयकाला पाठिंबा देण्यास आमची काहीच हरकत नव्हती. पण आज या ठिकाणी जे विधेयक आणण्यात आलेले आहे त्यामुळे या राज्यामध्ये असणाऱ्या देवस्थानाच्या मनात शंकेची पाल चुकचुकत आहे. त्या ठिकाणी विश्वस्त मंडळ कोणाचे आहे? शिर्डी संस्थानचे विश्वस्त मंडळ हे शासनाने नेमलेले विश्वस्त मंडळ आहे. पंढरपूर संस्थानमध्ये सुध्दा विश्वस्त मंडळाची नेमणूक शासन करते. पण काही संस्थाने अशी आहेत की, जे स्वत: धर्मदाय आयुक्तांच्या रजिस्ट्रेशनखाली काम करतात.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर आता सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांनी या ठिकाणी हेत्वारोप केला की, सरकारचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. संस्थान चालविणे किंवा संस्थानचा कारभार चालविणे हे एकट्या माणसाचे काम नाही. सभापती महोदय, त्यांना माझे अवाहन आहे. मी स्वत: त्यांना संत गजानन महाराज संस्थानमध्ये घेऊन जावयास तयार आहे. संस्थाने कशी चालली पाहिजेत याचा या देशातील एक आदर्श नमुना आहे. मी देखील शिर्डी संस्थानला मानतो. शिर्डी संस्थांन हे देशातील सर्वात मोठे, दोन नंबरचे संस्थान आहे, हे मलाही मान्य आहे. पण आज पर्यंत शिर्डी संस्थांनवर जे जे आरोप झाले तसा एकही आरोप संत गजानन महाराजांच्या संस्थानावर झालेला नाही. परिघाप्रमाणे त्या परिक्षेत्राचा विकास करण्यात यावा अशी सूचना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी केली आहे. संत गजानन महाराजांचे संस्थान असे आहे की, या संस्थानाने एक हजार गावे दत्तक घेतली आहेत. या एक हजार गावातील आरोग्याची व्यवस्था संस्थानने उचलली आहे. त्यांचे नेटवर्क जास्त आहे. संस्थान स्वत: हे करीत आहे. राजकीय शिफारशीवरुन ते हे काम करीत नाहीत. भाजप, शिवसेनेने, काँग्रेसने, राष्ट्रवादी काँग्रेसने सुचविले म्हणून ते काम करीत नाहीत तर संस्थानाच्या माणसांनी प्रत्येक गावामध्ये जाऊन आरोग्य समिती तयार केलेली आहे. याला कुठलाही राजकीय गंध नाही. त्या गावामध्ये गरिबातला गरीब अल्पभूधारक किंवा त्या गावातील भूमिहीन माणूस

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

आजारी झाला, त्याला कुठलाही आजार झाला तरी सभापती महोदय, त्याचा सर्व खर्च संस्थान करते. माननीय मुख्यमंत्र्यांना कॅन्सरच्या पेशंटला पाच हजार रुपये देण्याची शिफारस केली तर दोन हजार रुपयाच्यावर देंण्यात येत नाहीत. कुठलाही आजार असला तरी गरिबातील गरीब माणसाला त्या गावच्या समितीने शिफारस केली तर तो पूर्ण खर्च आज ते संस्थान उचलीत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील एक हजार गावे त्यांनी दत्तक घेतली आहेत. एक हजार गावापर्यंत आज या संस्थानचे नेटवर्क आहे. म्हणजे बुलढाणा जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेचा पूर्ण खर्च आज हे संस्थान करीत आहे आणि देयके सादर केल्यानंतर त्याला एका क्षणाचाही विलंब न लागता, त्याला त्या डॉक्टरच्या नावाने, दवाखान्याच्या नावाने चेक दिला जातो आणि ते पैसे परस्पर त्या ठिकाणी जमा होतात, त्यामुळे सर्व डॉक्टरांचा या संस्थानाच्या बाबतीत विश्वास निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी या ठिकाणी आरोप केला की, एकटया माणसाचे हे काम नाही. आपण शेगावला येऊन पहावे. एकटाच माणूस ते संस्थान चालवित आहे. शेगावपुरता हा विषय मर्यादित राहिलेला नाही. ओंकारेश्वर असेल, नाशिक असेल, त्र्यंबकेश्वर असेल, पंढरपूर असेल या ठिकाणी या संस्थानांचे अन्नछत्र सतत चालू असते. शिर्डीची बरोबरी हे संस्थान करणार नाही. शिर्डीला जाणारा धनिक वर्ग आहे. पण शेगाव संस्थानमध्ये जाणारा पायात चप्पल नसलेला माणूस आहे. त्याच्याकडे देणगी मागितली जात नाही, दर्शनासाठी पैसे मागितले जात नाहीत, कुठे इतके पैसे ठेवा असे संगितले जात नाही की, कुठे दर्शनासाठी दलाली केली जात नाही. कुठेही आपपर भाव नाही. व्हीआयपी विषय त्या ठिकाणी नाही, जे काही दान द्यावयाचे असेल तर ते दानपेटीत टाका अशा पध्दतीची व्यवस्था त्या ठिकाणी केलेली आहे. सभापती महोदय, सर्वच संस्थानचे विश्वस्त चोर आहेत असे समजण्याचे काही कारण नाही. मला या ठिकाणी अभिमानाने सांगावेसे वाटते की, ज्यावेळी संत गजानन महाराजांच्या जन्म शताब्दीचे वर्ष होते त्यावेळी शेगाव विकास आराखडयाचा विषय आला होता. त्यावेळी तो विषय सभापती महोदय, आपण पुढाकार घेऊन या ठिकाणी मांडण्याची संधी दिली होती, त्या बद्दल मी आपल्याला धन्यवाद देऊ इच्छितो. त्यावेळचे माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी त्या विकास आराखडयाला मान्यता दिली. पण ती मान्यता देऊन एक वर्षे झालेले आहे. पायाभूत सुविधा निर्माण करण्याची आम्ही मागणी केली होती. सरकारी खाक्या कसा चालतो. शताब्दीचे वर्ष निघून गेले.

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

अजूनही त्या ठिकाणच्या पायाभूत सुविधांचे रस्त्यांचे काम देखील दीड ते दोन वर्षापासून झालेले नाही. या संस्थानाच्या माध्यमातून शेगाव विकास आराखडयासाठी जो पैसा दिला होता ते रस्ते सुध्दा अद्याप झालेले नाहीत. ते रस्ते खोदून ठेवण्यात आलेले आहेत. रस्ते तर झालेलेच नाहीत पण अव्यवस्था निर्माण झालेली आहे. अशा पध्दतीने चांगल्या चाललेल्या संस्थांनाच्या बाबतीत सुध्दा शंका येत आहे. आज शिर्डीचे संस्थान आहे. उद्या संत गजानन महाराजांच्या संस्थांनाच्या बाबतीत उत्पन्नाच्या 30 टक्के रक्कम शासनाला दिली पाहिजे अशाच प्रकारचा कायदा आण्यात येईल. उद्या पंढरपूर संस्थानाच्या बाबतीत शासन बडगा उगारुन त्यांच्या संदर्भात कायदा करण्यात येईल आणि पंढरपूर संस्थानाची सुध्दा 30 टक्के रक्क्म शासकीय महामंडळे, शासन व्यवस्था, शासकीय कंपन्या यांना दिला जाईल. सभापती महोदय, यातून वाईट मेसेज चाललेला आहे.

सभापती महोदय, शिर्डी येथील विमानतळ हाच विषय जर महत्वाचा असेल तर देशातील आणि परदेशातील धनाढय लोकांना शिर्डीला येण्याची व्यवस्था झाली पाहिजे. त्यांनी यावयास पाहिजे. त्यांनी येण्यास मनाई नाही पण एवढाच मुद्दा असता तर या विधेयकावर चर्चा होण्याची आवश्यकता वाटली नसती. परंतु शासकीय विभाग, शासकीय महामंडळे, शासकीय कंपन्या आणि शासकीय उपक्रम हा जो विषय यामध्ये टाकलेला आहे, तो संशयाची पाल चुकचुकविणारा आहे. आज शिर्डी संस्थांनाच्या माध्यमातून काही व्यवस्था करण्यात आलेल्या आहेत. त्या व्यवस्था मी पाहिलेल्या आहेत. भक्तांच्या सोयीसाठी त्या ठिकाणी व्यवस्था करण्यात आलेल्या आहेत. एक नंबरचे रुग्णालय त्या ठिकाणी आहे. त्याचा गोरगरीब लोक लाभ घेत आहेत. संस्थानाच्या माध्यमातून जर योग्य व्यवस्था पारदर्शीपणाने करण्यात आल्या तर मला असे वाटते की, त्या संस्थानाला त्या करु दिल्या पाहिजेत. ठीक आहे. शिर्डी संस्थानाच्या बाबतीत आवश्यक बाबीसाठी पैशाची मागणी करण्यात आलेली आहे. त्या गावातील विमानतळासाठी पैशाची मागणी करण्यात आलेली आहे,त्याला कोणाचा विरोध असण्याचे काही कारण नाही. कारण संस्थाने वाढली पाहिजेत. दिवसेंदिवस धार्मिक भावना वाढत आहेत. ज्या पंढरपूरला यापूर्वी दीड ते दोन लाख लोक जात होते आता या पंढरपूरला जाणाऱ्यांची संख्या दहा लाखावर गेली आहे. अशा प्रकारे प्रत्येक ठिकाणचे संस्थान दिवसेंदिवस वाढत चालले आहे. पण या संस्थानांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा पायाभूत विकास कसा होईल याचा विचार केला तर मला असे वाटते की, शासनाला याची मदत

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

होऊ शकते. हेतू चांगला आहे. पण या विधेयकात टाकण्यात आलेल्या दोन-तीन शब्दांमुळे शासनाच्या हेतू विषयी शंका निर्माण झालली आहे. पारदर्शीपणाची कोणी गॅरन्टी देऊ शकत नाही.

सभापती महोदय, काल विधानसभेत एका सन्माननीय सदस्यांनी शेगाव विकास आराखडयाचा प्रश्न उपस्थित केला आणि त्यांनी सांगितले की, या शेगाव विकास आराखडयाची उच्च स्तरीय चौकशी झाली पाहिजे इतका प्रचंड भ्रष्टाचार त्या ठिकाणी झालेला आहे. त्यामुळे या ठिकाणीही पारदर्शीपणा राहील असे मला वाटत नाही. भक्तीभावाने दिलेला पैसा, पेटीत टाकलेला पैसा किंवा दिलेले दान हे जर सत्पात्री लागले नाही तर त्याचे पाप शासनावर आल्याशिवाय राहणार नाही. याही पैशाचा अपहार होत राहिला आणि हा पैसा कोणाच्या घशात जाणार असेल तर ते दान सत्पात्री लागल्यासारखे होणार नाही, एवढाच इशारा मी या ठिकाणी देऊन मी माझे वक्तव्य संपवितो. धन्यवाद.

यानंतर श्री. बरवड...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडेले) सभापती महोदय, सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 6 - श्री साई बाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) विधेयकाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. जे संस्थान ज्या भागामध्ये असते त्या ठिकाणी जे भक्त येतात त्यांच्यासाठी वेगवेगळ्या सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न तेथील संस्थान करीत असते. शिर्डी हे फार मोठे संस्थान आहे. केवळ देशातूनच नव्हे तर जगातून अनेक लोक भारतात येतात, आमच्याकडे मुंबई शहरामध्ये अनेक मित्रमंडळी येतात, ते मूळचे भारतीय आहेत, ते विचारतात की आम्हाला शिर्डीला जावयाचे आहे, त्या ठिकाणी विमानतळाची व्यवस्था आहे का ? आम्ही अनेक वेळा सांगतो की, विमानतळाची व्यवस्था नाही पण ती व्यवस्था शासन करणार आहे आणि लवकरच ती व्यवस्था पूर्ण होईल. त्या ठिकाणी गरीबच जाणार आहेत किंवा श्रीमंतच जाणार आहेत असे नाही. मी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना उदाहरण देऊ इच्छितो. आज विमानाची गरज जशी श्रीमंतांना आहे त्याचप्रमाणे सामान्य वर्गाला सुध्दा अनेक वेळा त्याची गरज पडते. अनेक वेळा नोकरी करणाऱ्यांना रजा मिळत नाही. आपल्याला वाटते की, सकाळी जाऊन संध्याकाळी परत यावे म्हणून विमानाची व्यवस्था करतो. आज विमान प्रवासही स्वस्त झालेला आहे. एका बाजूला शिर्डी संस्थानच्या बाबतीत हे घडत असताना दुसऱ्या बाजूला सिध्दिविनायक सारखे संस्थान या मुंबई शहरामध्ये आहे. शिर्डी संस्थानच्या कायद्यामध्ये 30 टक्केची अट घातलेली आहे. परंतु सिध्दिविनायक संस्थानकडे फार मोठी जमीन नाही. त्या संस्थानचे उत्पन्न केवळ 45 कोटी रुपये आहे. त्यातील जवळजवळ 15 कोटी रुपये त्यांच्या आस्थापनेवर खर्च होतात. त्यातून जर 30 टक्के पैसे वाटावयाचे असतील आणि त्यावर वेगवेगळी बंधने येणार असतील तर मला असे वाटते की, जे मूळ उद्दिष्ट आहे, सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी सांगितल्याप्रमाणे जे गरीब रुग्ण आहेत त्यांच्यासाठी जास्तीत जास्त सुविधा निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे.

आज आपण सिध्दिविनायक संस्थानवर खूप बंधने घातलेली आहेत. त्यांच्यावर कायद्यामध्ये कोणतीही तरतूद नसतानाही 30 टक्क्यांचे बंधन घातलेले आहे. कोर्टाकडे प्रकरण गेले आणि कोर्टाने सांगितले की, आपण रुल्स फ्रेम करा आणि तोपर्यंत 30 टक्के खर्च करा. रुल्स फ्रेम झाले तरी आजही त्या ठिकाणी 30 टक्क्याचे बंधन आहे. सिध्दिविनायक संस्थानच्या माध्यमातून आज

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ AKN/

श्री. प्रकाश बिनसाळे .....

मुंबईतील, कोकणातील, महाराष्ट्रातील अनेक सामाजिक संस्था तसेच ज्या छोट्या छोट्या शाळा आहेत, कोकणामध्ये ग्रामीण भागातील जनतेने पैसे एकत्र करुन शाळेची उभारणी करुन शिक्षणाचें पवित्र काम करीत आहेत, त्यांनाही त्या माध्यमातून 15 लाख रुपये, 25 लाख रुपये मदत करण्याचे धोरण सिध्दिविनायक संस्थानच्या माध्यमातून राबविले जाते. संपूर्ण कोकण पट्टीतील अनेक संस्था, पश्चिम महाराष्ट्र असेल, विदर्भ असेल, अनेक संस्था त्या ठिकाणी उभ्या राहिल्या. 26 जुलै, 2008 ला जी अतिवृष्टी झाली त्यामध्ये अनेक शाळा उद्ध्वस्त झाल्या. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांच्या भागातील खेड येथील शाळा उद्ध्वस्त झाली. ती शाळा उभारण्याचे काम या संस्थानच्या माध्यमातून झाले. आज जर आपण एका बाजूला अशा संस्थानवर बंधन आणत असाल आणि तोच 30 टक्क्याचा नियम मुंबईसारख्या शहरामध्ये असलेल्या सिध्दिविनायक संस्थानला लावणार असाल तर कोठी तरी अन्याय होतो असे मला वाटते. आपण 25 कोटी रुपयातील 70 टक्के पैसे तसेच राखून ठेवले तर कालांतराने त्यावर इन्कम टॅक्सची टाच येण्याची सुध्दा शक्यता आहे. इन्कम टॅक्स विभाग सांगेल की, तुम्ही इन्कम टॅक्स भरा. त्यामुळे भक्तांच्या माध्यमातून आलेले हे पैसे सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी निश्चितपणे वापरले गेले पाहिजेत पण त्या ठिकाणी जर सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी वाव नसेल तर मग वैद्यकीय मदत असेल, शैक्षणिक मदत असेल, पुस्तकपेढीसारखी चांगली योजना राबविली जाते, शाळेसाठी मदतीच्या योजना राबविल्या जातात, अशा योजना आणखी मोठ्या प्रमाणावर राबविता येणे शक्य आहे. म्हणून या बिलाच्या निमित्ताने सिध्दिविनायक ट्रस्टच्या बाबतीतही आपण पुनर्विचार करावा आणि त्याचा फायदा गोरगरिबांना जास्त मिळावा एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ AKN/

श्री. धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 6 - श्री साई बाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) विधेयकाला विरोधी करण्यासाठी मी उभा आहे. 8 वर्षापूर्वी याच विधेयकाच्या बाबतीत त्यावेळचे सन्माननीय मंत्री आदरणीय गोविंदराव आदिक साहेबांनी एक सुधारणा या विधिमंडळामध्ये आणली होती. त्यावेळी जी सुधारणा झाली त्यामध्ये स्पष्टपणे असे म्हटले होते की, संस्थेच्या एकूण उत्पन्नातून 20 टक्के रक्कम शिर्डी शहराच्या विकास आणि पायाभूत कामांसाठी खर्च केली पाहिजे. आता पुन्हा हे विधेयक या सभागृहामध्ये चर्चेसाठी आणि मंजुरीसाठी आलेले आहे.

सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, महाराष्ट्र सरकारने आजपर्यंत शिर्डीला आणि शिर्डी संस्थानला काय मदत केलेली आहे, कोणते आर्थिक अनुदान दिले आहे, आपल्या हातून काय विकास घडलेला आहे, हे आपल्या उत्तरातून या ठिकाणी स्पष्ट करावे. माझ्याकडे जी माहिती आहे त्यानुसार मागच्या दीड-दोन वर्षामध्ये शिर्डी संस्थानला महाराष्ट्र सरकारने पाणीपुरवठा योजना करण्यासाठी 7 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. त्याचबरोबर ड्रेनेजसाठी 5 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. या पलीकडे महाराष्ट्र सरकाचा कोणत्याही प्रकारचा निधी शिर्डीच्या विकासाच्या बाबतीत गेलेला नाही. आज साई बाबांच्या सर्वसामान्य भक्तांची काय अपेक्षा आहे ? शिर्डीमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून आणि देशातून भक्त येतात. आता तर ग्लोबलायझेशनच्या बाबतीत श्रध्देचे ठिकाण म्हणून या ठिकाणी चर्चा झाली. माझे एकच म्हणणे आहे की, विमानतळ होण्यासाठी आमचा कोणाचाही विरोध नाही. विमानतळ व्हावे पण विमानतळ जसे नांदेडला झाले तसे व्हावे. जसे लातूरला झाले तसे व्हावे. जसे औरंगाबादला झाले तसे व्हावे. पण या ठिकाणी विमानतळ कसे होत आहे ? या ठिकाणी देवाच्या पैशावर विमानतळ होत आहे. साई बाबांना भक्त दान देतात, श्रध्देने काही पेटीत टाकतात, आता काही सन्माननीय सदस्यांनी मोठ्या भक्तांचाही विषय सांगताना म्हटल्याप्रमाणे कोणाकडून 5 कोटी रुपये, कोणाकडून 10 कोटी रुपये अशा प्रकारच्या देणग्या येत असतील, कोणी वर्षातून दोनवेळा जाणारे असतील आणि श्रध्दाळू म्हणत असतील की, माझा व्यवसाय चांगला होऊ दे, माझ्या व्यवसायातून आलेल्या उत्पन्नातील 5 टक्के उत्पन्न बाबा, तुझ्या पायावर चाढवितो. आज एकीकडे

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ....

बाबांचा असा श्रध्दाळू वर्ग आहे आणि दुसरीकडे आपले हे सरकार विमानतळ बांधण्यासाठी बाबांचेच 50 कोटी रुपये घेत आहेत. याचा या ठिकाणी कोठे तरी विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, साई बाबा संस्थानच्या संदर्भात मी एक महत्वाचा विषय या ठिकाणी मांडतो. साई बाबा संस्थानच्या विश्वस्तांची मुदत 3 वर्षाची आहे. पण आज 8 वर्षे झाली तरी तेच पदाधिकारी त्या ठिकाणी काम करीत आहेत. विश्वस्त बदलले गेले नाहीत. म्हणून आज सामान्य साई भक्तांच्या मनात असा प्रश्न आहे की, हे लेन-देन तर नाही ? एकीकडे सरकार त्यांना एक्स्टेंशन देते. आज आठ वर्षे झालेली आहेत. या विश्वस्तांना 8 वर्षे एक्स्टेंशन दिलेले आहे. विश्वस्त बदलले पाहिजेत या संदर्भात गेल्या आठ वर्षात सरकारने कधीही हस्तक्षेप केला नाही. तीन वर्षाच्या नियमाप्रमाणे त्या ठिकाणचे विश्वस्त बदलले पाहिजेत. पण ते झाले नाही. त्या ठिकाणी विश्वस्त मंडळी सुध्दा सरकारला 50 कोटी रुपये देण्यास तयार झाली. याचा अर्थ काय समजावयाचा ? म्हणून या गोष्टीचाही खुलासा या सदनामध्ये झाला पाहिजे. येथील संदेश साई बाबांच्या भक्तांमध्ये सुध्दा गेला पाहिजे.

सभापती महोदय, त्या ठिकाणी ट्रस्टचे जे एकूण उत्पन्न आहे त्यातील 20 कोटी रुपये त्या ट्रस्टचा खर्च आहे. मग त्यामध्ये विजेचे बिल असेल, पगार असतील, आस्थापना खर्च असेल. आज शिर्डीमध्ये तीन ते चार महत्वाच्या रस्त्यांचे काम चालू आहे. त्या महत्वाच्या रस्त्यांच्या कामासाठी संस्थानचेच पैसे लागत आहेत. दीड वर्षापासून काम चालू आहे. ते काम पूर्ण होण्यासाठी आणखी एक-दीड वर्ष लागेल, अशी परिस्थिती आहे. म्हणजे विमानाने साई बाबाच्या भक्तांनी शिर्डीला यावयाचे, बाबांचे दर्शन घ्यावयाचे, बाबांवर श्रध्दा ठेवावयाची आणि शिर्डी गावाच्या बाबतीत मनात कोठे तरी किंतु-परंतु, काही तरी वाईट गोष्टी म्हणजे विकास नाही, पायाभूत सुविधा नाहीत याची चर्चा करावी, हे आपल्याला शोभा देणारे आहे का ? आताच आदरणीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी सांगितले की, 1 किलोमीटरचा व्यास घ्या तसेच माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुडकर साहेबांनी शेगावच्या बाबतीत सांगितले की तेथील पंचक्रोशीतील गावांचा सुध्दा विकास

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ AKN/

श्री. धनंजय मुंडे ...

संस्थान करते, तसा विकास या ठिकाणी व्हावा. मी या विधेयकाला माझा विरोध दर्शविण्यासाठी उभा आहे माझा आग्रह आहे की, आता सुध्दा जनाची नाही तरी मनाची असेल तर संस्थानचे पैसे घेऊन विमानतळ बांधणे ही सरकारला शोभणारी गोष्ट नाही, याची सरकारने काळजी घ्यावी. एवढे बोलून या विधेयकाला विरोध करुन मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री साई बाबा संस्थान शिर्डी विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) या विधेयकावरील चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन महत्वाच्या सूचना केल्या आहेत. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम, सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे, शोभाताई फडणवीस, सन्माननीय सदस्य सर्वश्री अरुण गुजराथी, हेमंत टकले, दिवाकर रावते, किरण पावसकर, चंद्रकांत पाटील, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे, धनंजय मुंडे या सर्वांनी अतिशय चांगली चर्चा केली आहे. या विधेयकाच्या सर्व पैलूवर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी उत्कृष्टपणे चर्चा केलेली आहे. त्याबद्दल मी सर्व सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सुरुवातीलाच असे विचारण्यात आले की, शिर्डी येथे वर्षातून किती भाविक येतात, त्याची व्याप्ती किती आहे ? दरवर्षी अंदाजे 3 कोटी भक्तगण शिर्डीला येतात. ही संख्या दिवसेंदिवस, दर महिन्याला, दरवर्षी वाढत चालली आहे. 2018 साली साई बाबांच्या समाधीचे शताब्दी वर्ष साजरे होणार आहे. त्या वर्षी अंदाजे या भाविकांपेक्षा दुप्पट भाविक येतील अशी अपेक्षा आहे. त्यामुळे शिर्डीला सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा व्हाव्यात अशी कल्पना करणे, असा प्रयत्न करणे यामध्ये काही वावगे आहे असे कोणालाही वाटणार नाही. देशातील क्रमांक 2 चे हे तीर्थस्थान आहे. या तीर्थस्थानामध्ये सुविधा झालेल्या आहेत. रेल्वेची सुविधा झालेली आहे, बस स्थानकाची सुविधा झालेली आहे. काही भाविक विमानाने औरंगाबादला येतात व तेथून रस्त्याने शिर्डीला येतात. त्यामध्ये महाराष्ट्रातील व महाराष्ट्राच्या बाहेरचा सामान्यातला सामान्य नागरिक आहे. तसेच श्रीमंत भक्तगणही आहेत. असेही उदाहरण आहे की, एका भक्ताने तेथे भाविकांची राहण्याची सुविधा व्हावी म्हणून 100 कोटी रुपयांची व्यवस्था करुन निवासस्थान बांधलेले आहे. हे केवळ शिर्डीलाच होत आहे, शिर्डीलाच मोठ्या देणग्या दिल्या जात आहेत असे नाही तर तिरुपतीला सुध्दा होत आहे. तिरुपतीचा झालेला विकास सुध्दा आपण बघत आहोत. सत्य साई बाबाच्या ठिकाणी सुध्दा मोठ्या प्रमाणात आलेल्या देणग्यातून तेथे विकास झालेला आहे. त्यामुळे हे जे पैसे येतात त्याचा विनियोग कसा करावयाचा याबद्दल 2004 च्या विधेयकामध्ये स्पष्टपणे निवेदन केलेले आहे. या विधेयकाबाबत अशी शंका निर्माण केली आहे की, आता काही तरी नवीन

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

चालले आहे. शासनाने या ट्रस्टवर नियंत्रण ठेवण्यासाठी हा कायदा आणलेला आहे. त्यामुळे या पुढे सर्व काही सरकारच्या माध्यमातून होणार आहे. मला नम्रपणे निवेदन करावयाचे आहे की, हा जुना ट्रस्ट आहे त्यात 2004 सालीच बदल केलेला आहे. शिर्डी संस्थानाचे संपूर्ण नियंत्रण शासनाने नेमलेल्या विश्वस्तांच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे शासन आता काही नवीन करीत आहेत असे नाही.

या मूळ विधेयकातील तरतुदीनुसार काय काय करता येते त्याकडे मी सर्वांचे लक्ष वेधू इच्छितो. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, अन्नछत्र निर्माण करता येते. भाविकांसाठी विश्रामगृहे बांधता येते. ठराविक रक्कमेपर्यंत 30 टक्के रक्कम सरप्लस राहते त्या रक्कमेपर्यंत शिक्षण संस्था, क्रीडा संस्था कला संस्था, रुग्णालये करु शकतो. त्याच बरोबर निराश्रित अथवा शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह असेल किंवा धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था या सर्वांना निधी देण्याची व्यवस्था मूळ विधेयकातच आहे. आतापर्यंत शिर्डी येथे अत्याधुनिक वाहन तळ बांधलेले आहे. त्याचे व्यवस्थापन एस.टी.महामंडळाकडे याच ट्रस्टने दिलेले आहे. पूर्वी असे काही होत नव्हते असे नाही. रुग्णांसाठी अत्याधुनिक रुग्णालय आहे. कमीत कमी पैशात रुग्णांची सेवा केली जाते. तेही काम चालू आहे. इतकेच नव्हे तर साई ट्रस्टच्या माध्यमातून पंढरपूरच्या तीर्थक्षेत्राला, जेजुरीच्या तीर्थक्षेत्राला, तुळजापूरच्या तीर्थक्षेत्राला निधी दिला जातो. अशी बरीच कामे सध्याही होत आहेत.

सभापती महोदय, शिर्डी येथे विमानतळ बांधण्याचा प्रस्ताव पुढे आला. राज्यामध्ये अनेक विमानतळ बांधित आहोत. राज्यामध्ये 4 आंतरराष्ट्रीय विमानतळ आहेत, त्याशिवाय आणखी 2 आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रस्तावित आहेत. म्हणजे 6 आंतरराष्ट्रीय विमानतळ राज्यात असतील. तसेच प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी सुध्दा विमानतळ होणार आहेत. राज्यात मोठ्या प्रमाणात विमानतळ बांधण्याचा कार्यक्रम ठरविलेला आहे. निधीकडे पाहून त्याची प्राथमिकता ठरवित आहोत. शिर्डीचा प्रस्ताव आल्यानंतर तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ निर्माण केले पाहिजे. सुरुवातीलाच एक चांगले विमानतळ बांधले पाहिजे. या विमानतळासाठी येणाऱ्या खर्चापैकी काही

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

खर्च शिर्डीच्या ट्रस्टमधून केला जावा असा विचार पुढे आला. त्यामुळे तेथील ट्रस्टने ताबडतोब तसा ठराव मंजूर केला होता. त्याबाबत 2-3 वर्षे फारशी प्रगती झाली नव्हती. ही चर्चा पुढे नेण्याचा प्रयत्न केला असता त्यातून एक तांत्रिक बाब पुढे आली. मूळ कायद्यात पायाभूत सुविधा करण्याची तरतूद नाही. मग रेल्वे स्थानकाची व्यवस्था असेल, बस स्थानकाची व्यवस्था असेल, विमानतळाची व्यवस्था असेल. या कामासाठी तरतूद करण्यात यावी व त्या माध्यमातून महामंडळ असेल, कंपन्या असतील, सार्वजनिक उपक्रम असेल ज्याला इनेब्लिंग प्रोव्हिजन, असे म्हणतात तशी कायद्यात तरतूद करावी अशी कल्पना पुढे आली. या वाक्यरचनेबाबत, प्रोव्हिजनबद्दल खूप चर्चा झाली. राज्य शासनाच्या कंपन्या, महामंडळे, शासनाचे उपक्रम या सर्वांना शासन पैसे देणार अशी चर्चा झाली. मी नम्रपणे सांगू इच्छितो की, याची मूळ भावना किंवा मूळ वाक्य असे आहे की, " भक्तांच्या सोयीकरिता " हा भाग महत्वाचा आहे.

जे काही करावयाचे आहे ते भक्तांच्या सोयीसाठी करावयाचे. मग शिर्डी नगरपंचायतीमध्ये पायाभूत सुविधा निर्माण करावयाच्या असतील त्याची तरतूद मूळ कायद्यातच आहे. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, घनकचरा किंवा पर्यावरणाचे संतुलन राखण्याचे काम सुध्दा करता येईल. कारण नगरपंचायत कायद्यात अनेक वेळा सुधारणा झालेली आहे. फक्त पायाभूत सुविधा, विशेष प्रवासाच्या, वाहतुकीच्या सुविधा असा उल्लेख त्यात नव्हता. त्यात विश्रामगृहाबाबत उल्लेख आहे, रुग्णालयासंबंधी आहे, शिक्षण संस्थांबाबत आहे. पण प्रवासाच्या मूलभूत सुविधांचा उल्लेख नव्हता. तो उल्लेख करावा असा उद्देश होता. मग वाहन तळ असेल, रेल्वे स्टेशन असेल, उद्या यातून रेल्वे स्टेशन बांधणार आहोत असे नाही, परंतु उद्या कदाचित रहदारी वाढली तर रेल्वेवर ओव्हर ब्रिज बांधण्याची गरज निर्माण होईल त्यासाठी राज्य शासनाकडून निम्मे पैसे द्यावे लागतात. राज्य शासनाला पैशाची अडचण असेल तर यातून खर्च करता येईल काय, विमानतळाची कल्पना तर आहेच. वाहन तळ सध्या बांधलेले आहे, ते वाहन तळ ट्रस्टच्या माध्यमातून बांधलेले असल्यामुळे त्याचे व्यवस्थापन एस.टी.महामंडळाकडे दिलेले आहे. महामंडळाकडे यापूर्वी दिलेले नाही असेही नाही. तेथे एखादे हॉस्पिटल उभे करावयाचे असेल तर ते एखाद्या कंपनीने निर्माण केले तर ते

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

सुध्दा शासनाला करता आले पाहिजे. या सर्व "सुविधा भक्तांच्या सुविधाकरिता" हा शब्द सर्वांना लक्षात घेतला पाहिजे. त्याचा कोणी दुरुपयोग करील अशी कृपा करुन कोणी मनात भावना आणू नये. तसेच तत्सम पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा वाढविण्यासाठी असा जो शब्दप्रयोग आहे त्यामध्ये या सगळया गोष्टी शासनाच्या पूर्व परवानगीनंतरच करता येतील. शिर्डीत कोणी बसल्या बसल्या ट्रस्टचे पैसे कोणाला तरी देण्याचा निर्णय घेईल असे होणार नाही. शासनाने पूर्व परवानगी दिल्यानंतर, योग्य तो विचार झाल्यानंतर, वेळ प्रसंगी कॅबिनेटची मंजुरी मिळाल्यानंतर पूर्वसूचना गॅझेटमध्ये प्रसिध्द केल्यानंतर हे पैसे देता येतील अशी काळजीपूर्वक व्यवस्था केलेली आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांच्या मनात ही जी गैर समजुतीची भावना आहे ती त्यांनी मनातून काढून टाकावी.

शासनामार्फत तेथे मोठे विमानतळ बांधण्यात येणार आहे. त्या विमानतळावर देशातूनच नाही तर परदेशातील भाविक सुध्दा लवकर येतील आणि जातील. एका दृष्टीने रिलिजिअस टुरिझम वाढलेले आहे. तिरुपतीचे उदाहरण आपल्यासमोर आहे. शिर्डीच्या परिसरामध्ये शासनाने प्राधिकरण निर्माण केलेले आहे. त्यामध्ये आजूबाजूची 10-12 गावे समाविष्ट केलेली आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अप्रमाणित प्रत / प्रतिक्षेसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

सबंध परिसराचा विकास होईल, भाविक तेथे येतील या उद्देशाने हे विधेयक आणलेले आहे. एखादा भाविक अजिबात पैसे खर्च करणारा नसेल तर त्याच्यासाठी धर्मशाळेमध्ये मोफत राहाण्याची व्यवस्था केली जाईल, अन्नछत्रामध्ये त्याच्या जेवणाची व्यवस्था केली जाईल. जे भक्त पंचतारांकित हॉटेलमध्ये राहाणारे असतील त्यांच्यासाठी पंचतारांकित हॉटेल्स निर्माण झालेली आहेत. प्रत्येकासाठी सर्वांगीण सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. आता विमानतळ ही एक मूलभूत गरज निर्माण झालेली आहे. 1991च्या आर्थिक सुधारणानंतर आपण विमान कंपन्यांना परवानगी दिली. विमान प्रवासामध्ये खूप मोठी प्रगती झालेली आहे. विमान कंपन्यांच्या स्पर्धेमुळे काही वेळा रेल्वे पेक्षा विमान प्रवास परवडतो अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. शिर्डी येथे विमानतळ झाले तर बाहेरचे लोक विमानाने शिर्डीला येऊन साई बाबांचे दर्शन घेऊन आपल्या घरी परत जातील अशी व्यवस्था करणे काही गैर आहे असे मला वाटत नाही. या विधेयकाच्या माध्यमातून अशी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. अर्थातच हे सगळे पैसे फक्त शिर्डी संस्थानाच्या माध्यमातून मिळतील असे नाही. मूळ जमीन ही शासनाने पैसे खर्च करुन धेतलेली आहे.

सभापती महोदय, या बाबतीत अध्यादेश काढण्याचे कारण काय, अशी विचारणा करण्यात आली. तर शासनाच्या एमअेडीसी कंपनीच्या माध्यमातून तेथे विकास करण्यात येणार आहे. म्हणून एमअेडीसी कंपनीचा उल्लेख करण्यात आला. हे करीत असताना पैशाची अडचण भासायला लागली आणि हे काम मागे पडायला लागले. यासाठी 2011च्या आत व्यवस्था करायला पाहिजे यासाठी अध्यादेश काढून या कामासाठी सुरुवातीला 50 कोटी द्यावेत अशी कल्पना पुढे आली. एक काळजी घेण्याच्या दृष्टीने, एक स्पष्टता यावी म्हणून वाहतूक सुविधेकरिता, पायाभूत सुविधाकरिता या कायद्यामध्ये बदल केला गेला आहे. "देवता" शब्द या विधेयकामध्ये का आला असा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. "देवता" या शब्दा ऐवजी "साई बाबा" असा शब्द असता तर अधिक उचित झाले असते. परंतु सन 2004चे जे मूळ विधेयक होते त्यामध्ये "Deity" असा शब्द आहे. त्याचे मराठी भाषांतर "देवता" असे केले गेले आहे. तेव्हा "देवता" या शब्दा ऐवजी "साई बाबा" असा उल्लेख केला तर त्याबाबतीत कोणताही प्रत्यवाय राहाणार नाही असे मला वाटते. या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण....

ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या शंका उपस्थित केल्या त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, या कायद्याचा काही दुरुपयोग होईल अशी बिलकूल परिस्थिती नाही. एका चांगल्या भावनेने हे विधेयक आणलेले आहे. पायाभूत सुविधा निर्माण व्हाव्यात आणि जास्तीत जास्त धार्मिक आणि श्रद्धाळू भक्त हे देशातूनच नव्हे तर जगातून या ठिकाणी यावेत अशी भावना आहे. या भावनेतून आणलेल्या या विधेयकाचे आपण ार्वांनी समर्थन करावे अशी मी आपणा सर्वांना विनंती करतो. उत्कृष्ट सेवा निर्माण करुन शिर्डी हे भारतील उत्कृष्ट असे श्रद्धास्थान व्हावे यासाठी आपण मदत करावी. तेव्हा हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सनमाननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे तो त्यांनी परत घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो आणि आपली रजा घेतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, हे विधेयक आणण्यामागचा माननीय मुख्यमंत्र्यांचा हेतू चांगला आहे या बद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. मात्र मी माझ्या भाषणामध्ये ज्या एक दोन बाबी मांडल्या होत्या त्यांचा खुलासा झालेला नाही. आता आपण शिर्डी संस्थानाकडून जसा निधी घेतलेला आहे त्याप्रमाणे भविष्यामध्ये सिध्दिविनायक, महालक्ष्मी, पंढरपूर, तुळजाभवानी या संस्थानांकडूनही 30 टक्के निधी विकास कामासाठी घ्याल काय ? आता आपण शिर्डी संस्थानाकडून निधी घेतला, पुढे हळूहळू हिंदूच्या ज्या ज्या देवस्थानांकडे पैसा आहे त्या देवस्थानांकडून अशा प्रकारे निधी घेतला जाईल का ? तेव्हा याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा केला तर बरे होईल.

माझा दुसरा मुद्दा असा आहे की, विश्वस्त मंडळाची मुदत तीन वर्षे असते. शिर्डी संस्थानाचे विश्वस्त मंडळ 8 वर्षापासून बदललेले नाही. या विश्वस्त मंडळामध्ये बदल होईल की नाही ? जे साई बाबांचे भक्त आहेत, ज्यांना सामाजिक कार्याची आवड आहे आणि जे राजकारणापासून अलिप्त आहेत अशा लोकांची विश्वस्त मंडळावर निवड झाली पाहिजे. विश्वस्त मंडळावर राजकीय व्यक्ती असता कामा नये असे मला वाटते. तेव्हा विश्वस्त मंडळामध्ये हा बदल केव्हा करण्यात येईल याचा खुलासा माननीय मुख्यमंत्री महोदयांनी करावा.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, हे विधेयक शिर्डी संस्थानाच्या संबंधीचे आहे. याबाबतीत काही शंका उपस्थित केल्या गेल्या. येथील विश्वस्त मंडळाला बरीच वर्षे झालेली आहेत ही वस्तुस्थिती आहे. विश्वस्त मंडळाचा कालावधी तीन वर्षाचा आहे. परंतु कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, पुढचे विश्वस्त मंडळ येईपर्यन्त हे विश्वस्त मंडळ कार्यरत राहील. लवकरच या विश्वस्त मंडळाची पुनर्रचना केली जाईल असे मी आश्वासन देतो.

सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा मुद्दा असा उपस्थित केला त्याबाबतीत मला आताच विधानमंडळाचे प्रधान सचिव डॉ. अनंत कळसे यांनी सांगितले की, हा जो "देवता" शब्द आहे तो बरोबर नाही. मलाही ते पटते. "देवता" हा शब्द जुन्या विधेयकातील "Deity" या इंग्रजी शब्दाचे भाषांतर आहे. म्हल्लोत्रा कॉलन या पुस्तकामध्ये नमूद केल्याप्रमाणे विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये आपल्याला हा बदल या टप्प्यावर देखील करता येईल. त्यामुळे "देवता" शब्दा ऐवजी "बाबा" किंवा "साई बाबा" असा शब्दप्रयोग आपल्याला करता येईल. यामुळे कायद्यामध्ये काही

..4..

श्री. पृथ्वीराज चव्हाण....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फरक पडणार नाही. त्यामुळे हा बदल स्वीकारायला काही हरकत नाही. मी चर्चा करीत असताना अशी एक सूचना आली की, सर्व धार्मिक स्थळांच्या बद्दल एकच कायदा करावा. परंतु इतकी घाई करणे बरोबर नाही असे मला वाटते. या क्षणाला तरी धार्मिक स्थळांच्या बाबतीत असा काही बदल करण्याचा उद्देश नाही. शिर्डी या ठिकाणी आपल्याला विमानतळ करणे एवढाच उद्देश आहे आणि तो करण्यासाठी आपण सर्वांनी सहकार्य करावे. मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की त्यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मागे घ्यावा.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, साई बाबांच्या भक्तांचा पैसा हा विमानतळासाठी खर्च करावा हे माझ्या मनाला पटत नसले तरी सन्माननीय मुख्यमंत्र्यांवर विश्वास ठेवून हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा माझा प्रस्ताव मी मागे घेतो.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

सभापती : आता मी विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011चे वि.प.वि. क्रमांक 6 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : सन 2011चे वि.प.वि. क्रमांक 6 संमत झाले आहे.

....नंतर श्री. खर्चे....

अधिकृत प्रत / प्रतिलिपीसाठी नाही

पृ.शी.: नागपूर सुधार प्रन्यास (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. VII OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE NAGPUR IMPROVEMENT TRUST ACT, 1936.)
AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE THEREON.

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.प.वि.क्र.7-नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम, 1936 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

सभापती : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचे प्रस्ताव सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस व सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी दिलेले आहेत. त्यांच्यापैकी एकाने तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही)

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, नागपूर सुधार प्रन्यास हा सन 1936 चा जो कायदा आहे त्या माध्यमातून या क्षेत्रविकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सुरुवातीला या प्रन्यासचे कार्यक्षेत्र फक्त नागपूर शहरापुरते मर्यादित होते. त्यानंतर त्यात काही बदल करुन शासनाच्या अधिसूचनेद्वारे नागपूर शहराच्या बाहेर सुध्दा या क्षेत्राची व्याप्ती वाढविण्यात आली. या सुधार प्रन्यासाची सध्याची जी रचना आहे त्यात नागपूर महापालिकेचे स्थायी समितीचे सभापती, नागपूर महापालिकेचे आयुक्त, नगरसेवक आणि शासनाकडून नियुक्त केलेले चार सदस्य, ज्यामध्ये किमान दोन शासकीय सदस्य आणि विधानसभेचा एक सदस्य अशा प्रकारचा हा प्रन्यास आहे. या प्रन्यासाचे सभापती आणि चार सदस्यांची नियुक्ती शासनाकडून करण्यात येते. तसेच प्रन्यासच्या सभापती पदावर आयएएस अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाते. याच विधेयकाचा मूळ उद्देश असा आहे की, नागपूर सुधार प्रन्यासामध्ये ज्या सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या त्यामुळे प्रशासनात एक प्रकारची बळकटी यावी, स्वच्छता यावी व पारदर्शकता असावी यासाठी ही सुधारणा प्रस्तावित केली आहे. यात पहिली सुधारणा अशी आहे की, जिल्हाधिकारी किंवा

...2...

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अतिरिक्त जिल्हाधिकारी या विश्वस्त मंडळावर पदसिध्द सदस्य म्हणून नियुक्त करण्यात यावा. कारण अशा बऱ्याच गोष्टी असतात ज्यात महापालिकांची हद्दवाढ, पुनर्वसन तसेच भूसंपादनाची प्रकरणे, जी जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारित असतात.

दुसरे म्हणजे या प्रन्यासामध्ये जी पदनिर्मिती होईल त्याबद्दल वेतन अथवा तत्सम बाबींच्या बद्दल शासनाकडून निर्देश देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यानंतरची आणखी एक सुधारणा म्हणजे काही पदे सहाय्यक अभियंता किंवा तत्सम पदे यांच्यावरील नियुक्ती व इतर सेवा विषयक बाबींबद्दल सभापतींना काही अधिकार देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे शासनाकडून प्रतिनियुक्तीवर काही अधिकारी पाठविले गेले तर त्यांना अगोदर रुजू केले जात नव्हते पण आता अशा प्रतिनियुक्तीवर पाठविलेल्या अधिकाऱ्यांना रुजू करुन घेण्याची सक्ती करण्यात आली आहे, यासाठीच ही तरतूद करण्यात आली आहे. तसेच शासनाने दिलेल्या निदेशांचे पालन करण्याचेही बंधनकारक करण्यात आले आहे, त्यासाठी स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे. यानंतरची तरतूद म्हणजे लोक हिताच्या विरुध्द असलेली कोणतीही कृती अथवा ठराव प्रन्यासाकडून झाला असेल तर त्याला विखंडित करण्याचे अधिकार शासनाकडे घेण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर सन 1936 आणि 1958 च्या कायद्याप्रमाणे प्रन्यासामध्ये सभापतींच्या वित्तीय मर्यादा फक्त एक हजारापर्यंतच होत्या, त्यात वाढ करुन ही मर्यादा आता 50 लाखापर्यंत करण्याचे प्रस्तावित केले आहे. प्रन्यासाला शासनाच्या विरुध्द अपिल करण्याचे प्रावधान सुध्दा या दुरुस्तीच्या माध्यमातून आपण खुले ठेवलेले आहे. प्रन्यासाच्या सभापतींचे अधिकार व प्रन्यासाचे अधिकार यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले आहेत. जमीन महसुलाची वसुली करण्याचे अधिकार सुध्दा सभापतींना आपण देत आहोत. अशा प्रकारे इतर काही बाबी असतील, ज्या महापालिका कायद्यात असती त्या बऱ्याच तरतुदी आपण एनआयटीसंबंधीच्या दुरुस्तीमध्ये प्रस्तावित करीत आहोत, त्यासाठीच हे विधेयक सभागृहाच्या मान्यतेसाठी आणले आहे. नागपूरचा विकास दिवसेदिवस झपाट्याने होत आहे. हा विकास योग्य प्रकारे व्हावा म्हणून नागपूर शहराच्या शेजारच्या क्षेत्रात एनआयटीचे जे क्षेत्र वाढविले आहे त्यामध्ये चांगल्या प्रकारची कामे व प्रशासन मजबूत व्हावे या उद्देशाने हे विधेयक आणले आहे, त्याला सभागृहाने सहकार्य करुन हे विधेयक मान्य करावे अशी अपेक्षा व्यक्त करतो व माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, संयुक्त महाराष्ट्रापूर्वी महाराष्ट्र राज्याचा काही भाग हा मध्य प्रदेशमध्ये होता. त्या काळात हा नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम करण्यात आलेला आहे. आपण नेहमी म्हणतो की, बाबा आदमच्या काळातील गोष्ट, अशातला हा प्रकार म्हटला तरी चालेल. एकाच वाक्यात सांगायचे तर या कायद्याच्या कलम 5 (क) मध्ये म्हटले आहे की, "ज्यांचे मासिक वेतन दीडशे रुपयाहून अधिक नसेल" या मजकुराऐवजी "ज्यांचे वेतन संरचनेतील श्रेणी वेतन सहायक अभियंत्याला देय असलेल्या वेतनाएवढे किंवा कमी असेल" एवढे कमी वेतन अथवा वेतनश्रेणी आता कोणत्याही सरकारी कर्मचारी अथवा अधिकाऱ्याची नाही. तरी देखील या सर्व तपशीलात मी जात नाही. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे शासनाने नागपूर सुधार प्रन्यासवर अंकुश ठेवण्यासाठी स्पेशल प्लॅनिंग ऑथॉरिटी निर्माण केली असे म्हटले तर चुकीचे होणार नाही.

या प्रन्यासामध्ये शहराच्या व्यतिरिक्त शहराच्या बाहेरचा ग्रामीण भाग देखील समाविष्ट करण्यात आला आहे. तसेच या प्रन्यासाचे चेअरमन म्हणजे स्थायी समितीचा अध्यक्ष असेल. तसेच त्यात महानगरपालिकेचे दोन नगरसेवक आहेत. नागपूर महानगरपालिका ही विरोधी पक्षाच्या ताब्यात असल्यामुळे कदाचित हा विचार शासनाने केला असावा अशी मला शंका येते. माननीय मुख्यमंत्र्यांनी विधेयकाचा उद्देश विशद करीत असताना नागपूर सुधार प्रन्यासाच्या कारभारात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी जिल्हाधिकारी किंवा तत्सम दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती या प्रन्यासावर करण्यात येईल असे सांगितले. वाढत्या नागरिकरणामुळे प्रचंड प्रमाणात जमिनीचा विकास हे या प्राधिकरणाचे काम आहे. त्यामुळे या अध्यक्षांच्या माध्यमातून जे अधिकार शासनाकडे आले आहेत हा त्यातील एक महत्वाचा भाग आहे. माझी या निमित्ताने शासनाला अशी सूचना आहे की, ज्याप्रमाणे विधानसभेतील एक सदस्य या प्रन्यासावर घेतलेला आहे तसा एक सदस्य विधान परिषदेतून सुध्दा घेण्यात यावा. या सभागृहात विदर्भातील अनेक सन्माननीय सदस्य आहेत, त्यातून कोणत्याही एका सदस्याची नियुक्ती आपण या प्रन्यासावर करावी. खरे तर ही व्यवस्था वाढत्या नागपूर शहराला आकार देण्यासाठी केलेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रधानित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री दिवाकर रावते ...

स्थायी समितीच्या सदस्य यामध्ये अध्यक्ष आहे. विधानसभेच्या एका सदस्याला जसे आपण घेतलेले आहे तसेच विधान परिषदेच्या एका सदस्यास यामध्ये घेतले जावे अशी आमची मागणी आहे. आम्ही सार्वभौम सभागृहाचे सदस्य आहोत हे जसे आपण काल मान्य केले आहे त्यामुळे विधान परिषदेच्याही एका सदस्याला यामध्ये घेतले जावे. आपण या सभागृहाचे सदस्य असून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहात त्यामुळे विधान परिषदेचाही एक सदस्य यामध्ये असावा अशी विनंती आग्रहाने करतो. प्रधान सचिव डॉ. कळसे यांनी अशा प्रकारे सदस्यास घेता येईल अशी सूचना केलेली असल्यामुळे त्यांनी यासंदर्भात योग्य ते मार्गदर्शन करावे अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस.क्यू.ज़मा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, इस बिल को मेरा पूरा समर्थन है. यह बिल पास होना ही है. इसमें इनॅब्लिंग क्लॉज है. मैं दो बातों की ओर माननीय मुख्यमंत्री का ध्यान आकर्षित करना चाहता हूं. सरकार ने स्पेशल प्लॅनिंग अथॉरिटी को इसमें शामिल करने का निर्णय लिया है. नागपुर मेट्रो रीजन जो नोटीफाय हुआ है, उसका रेडियस बहुत बड़ा है. उसमें हम लोग भी मेम्बर हैं, बहुत सारे इलेक्टेड मेम्बर हैं, ग्रामीण क्षेत्र के लोग भी मेम्बर हैं. इस बात पर विचार होना चाहिए कि क्या एन.आई.टी. स्पेशल अथॉरिटी बनने के लिए सक्षम है. एन.आई.टी. का 1936 का एक्ट है, इसमें इनॅब्लिंग क्लॉज के लिए अमेंडमेंट है. इसके लिए आपने आर्डिनेंस निकाला है, अच्छी बात है. लेकिन मूलभूत एक्ट में कॉम्प्रहेंसिव अमेंडमेंट करना होगा, ऐसा मेरा सुझाव है.

सभापति महोदय, मेरा दूसरा सुझाव यह है कि जब आपने जिलाधिकारी, रेवेन्यू अधिकारी को लिया है तो मुझे ऐसा लगता है कि इसमें ग्रामीण क्षेत्र का बड़ा हिस्सा है, इसलिए जिला परिषद के अध्यक्ष को इसमें कॉप्ट करने का प्रावधान होना चाहिए. धन्यवाद.

भाषण पूर्ण, 3N-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधिचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 12 (दोन्ही सम्मिलित)विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 7 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 7 संमत झाले आहे.

सभापती : सभा□ह्याची बैठ□ आता स्थ□□त होऊ□ उद्या मंगळवार, दि□ां□ 2 ऑगस्ट, 2011 रोजी स□ाळी 11.00 वाजता पु□: भरेल.

(सभा□ृह्याची बैठ□ रात्रह 10 वाजू□ 25 मि□□टां□□, मंगळवार, दि□ां□ 2 ऑगस्ट, 2011 च्या स□ाळी 11.00 वाजेपर्य□त स्थ□□त झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही